बहुरूपी



नारायण धारप

साकेत प्रकाशन

बहुरूपी



नारायण धारप

साकेत प्रकाशन

बहुरूपी

नारायण धारप

बहुरूपी
कादंबरी
नारायण धारप

प्रकाशन क्रमांक - 1879

प्रकाशक
साकेत बाबा भांड
साकेत प्रकाशन प्रा. लि.
115, म. गांधीनगर, स्टेशन रोड
औरंगाबाद - 431 005
फोन- (0240)2332692/95.
www.saketpublication.com
info@saketpublication.com

पुणे कार्यालय
साकेत प्रकाशन प्रा. लि.
ऑफिस नं. 02, 'ए' विंग, पहिला मजला
धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, 373 शनिवार पेठ
कन्या शाळेसमोर, कागद गल्ली, पुणे -411 030
फोन- (020) 24436692

Table of Contents

बहुरूपी
प्रकाशकीय
१.
2.
3.
4.
5.
6.
7.
8.
9.
10.
11.
12.
13.
14.
15.
16.
17.
18.
19.
20.
21.
22.
23.

प्रकाशकीय

नारायण धारप हे नाव युवा वाचकांना नवीन असले तरीही आपल्या भयचकित करणाऱ्या लेखनाने मराठी साहित्यविश्वाचा एक काळ त्यांनी गाजवला होता. मराठी साहित्यात रहस्यकथेचे आणि कादंबरीचे दालन समृद्ध करणारे जे काही मोजकेच स्वतंत्र लेखन करणारे लेखक आहेत, त्यात नारायण धारपांचे स्थान अव्वल आहे. गेल्या शतकातील साठच्या दशकात त्यांनी लेखनाला सुरुवात केली आणि त्यानंतर अखेरपर्यंत ते सातत्याने लिहीत राहिले.

कथानकात पुढे काय होणार याची उत्सुकता कायम ठेवत, वाचकाला आपल्या लेखनात गुंतवून ठेवणे, इतकेच नाही तर त्या वातावरणाचा एक भाग बनविण्याचे कसब ज्या काही लेखकांना साध्य झाले; त्यापैकी नारायण धारप एक आहेत. वाचकांना त्यांचा अविश्वास क्षणभर दूर ठेवायला लावण्याची किमया हे त्यांच्या कथांचे वैशिष्ट्य आहे. धारपांची भाषा चित्रमय आहे. वाचकांच्या डोळ्यासमोर घटना प्रत्यक्ष उभी करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषेत आणि लेखनशैलीत आहे. त्यामुळेच दूरदर्शन आणि इतर प्रसारमाध्यमांची फारशी चलती नव्हती, त्या काळात सामान्य वाचक अतिशय आतुरतेने त्यांच्या लेखनाची वाट पाहत असत.वाचनालयात विशेषत: सर्क्युलेटिंग लायब्ररीजमधून त्यांची पुस्तके वाचायला मिळविण्यासाठी वाचक रांगा लावीत असत, ही गोष्ट त्यांच्या लेखनाची वाचकप्रियता स्पष्ट करण्यास पुरेशी आहे.

माणसाला नेहमीच कोणतेही रहस्य जाणून घेण्याची मुळातच उत्कंठा असते. स्वत:चे कल्पनाविश्व विस्तारण्याचे जे समाधान वाचनातून मिळते ते दुसऱ्या कोणत्याही माध्यमातून मिळत नसल्यामुळे वाचनाकडे आकर्षित झालेली नवी पिढी रहस्यमय कथा, कादंबऱ्याच्या प्रतीक्षेत आहे. या वाचकांची बौद्धिक भूक भागविण्यासाठी नारायण धारप यांचे रहस्यमय साहित्य पुन्हा नव्याने प्रकाशित करण्याचा आम्ही निर्णय घेतला.

आजपर्यंत आम्ही नारायण धारप यांची जवळजवळ पन्नासहून अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. नारायण धारप यांचे रहस्यमय साहित्य चांगल्या आणि दर्जेदार स्वरूपात प्रकाशित केल्यामुळे वाचकांना त्याचा मनासारखा आस्वाद घेता येईल असा आम्हाला विश्वास वाटतो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगात ही पुस्तके आम्ही 'ई-बुक्स'च्या माध्यमातूनही वाचकांसाठी उपलब्ध केली आहेत. नव्या स्वरूपातील या अस्सल मराठी रहस्य साहित्याचे वाचक नक्कीच स्वागत करतील अशी खात्री आहे.

-प्रकाशक

१.

त्याच्या खोलीच्या दारावर 'अजय कर्नाटकी'अशी पाटी असली तरी ते त्याचं खरं नाव नव्हतं-म्हणजे मुळातलं नाव नव्हतं. जो एक नटाचा मनोमन पेशा त्याने स्वीकारला होता त्या पेशासाठी 'गोविंद वाघदरे'हे नाव सर्वथा अयोग्य होतं (अशी त्याची समजूत होती). अंगी गुण असल्याखेरीज केवळ आकर्षक वा लक्ष वेधून घेणाऱ्या नुसत्या नावाने काहीही साध्य होत नाही हे न समजण्यासारखा तो काही दुधखुळा किंवा अननुभवी नव्हता-तरीही त्या पेशातलं यश तुम्हाला मिळणाऱ्या प्रसिद्धीवर अवलंबून असतं. त्या प्रसिद्धीत चांगल्या नावाचाही काही सहभाग असणारच; पण अजून प्रसिद्धी आणि यश, दोन्हीही त्याच्यापासून फार फार दूर होतं.

ओळखीवर, मोठ्या मिनतवारीने मिळवलेल्या दहा बाय चौदाच्या खोलीत त्याचा सर्व संसार सामावलेला होता. एक घडीची खाट, एक घडीचं टेबल, दोन घडीच्या खुर्च्या, खाटेवरची एक बाजू उसवलेली, बकलं व तुटलेली चामडी सुटकेस, भिंतीच्या जवळच्या उघड्या रॅकमध्ये ठेवलेले कपडे, रॅकच्या खाली ठेवलेला चपलांचा इमानी जोड - पण त्याची सर्वांत आवडती (आणि सर्वांत किमती) वस्तू होती ती म्हणजे एका भिंतीला लावून उभा ठेवलेला पूर्ण उंचीचा आरसा.

अजयने ऐकलं होतं, की नटवर्य नानासाहेब फाटक (आणखी इतरही असतील) आरशासमोर उभे राहून आपल्या भूमिकांची तालीम करीत असत-म्हणून त्यानेही (परवडत नसतानासुद्धा) तो आरसा आणला होता-म्हणजे श्रमात तर तो कोणतीही कसूर करणार नव्हता-आता यश येणं न येणं...

मग आरशासमोरच उभं राहणं आलं. नव्या-जुन्या नाटकांतल्या नटांची स्वगतं आणि अभिनय यांचा एक प्रकारचा रियाझही आला. त्याच्या नकळत त्याचे तासच्या तास या उद्योगात जात.

आणि असाच एका सकाळी आरशासमोर उभा राहून 'नटसम्राट'मधील बेलवलकरांचं शेवटचं प्रभावी स्वगत तो वठवीत होता -

दाराची कडी कोणीतरी खटखटावली.

त्याच्या उपक्रमात तो इतका तन्मय होऊन गेला होता की, क्षणभर त्याला कशाचा अर्थच लागेना. मग तो भानावर आला. ती तंद्री उतरली.

आपले कपडे म्हणजे एक मळकट गंजीफ्रॉक आहे, मळकट पायजमा आहे याची त्याला शुद्धही नव्हती. दारासमोर एक संपूर्ण अनोळखी व्यक्ती उभी होती. क्षणभर त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना-कारण एखाद्या ऐतिहासिक नाटकातल्या पात्रासारखीच त्यांची वेशभूषा होती. डोक्याला रेशमी फेटा, गुडघ्यापर्यंत पोहोचणारा गळेबंद रेशमी कोट, खाली चुणीदार पायजमा, हातात भल्या मोठ्या चांदीच्या मुठीची काठी, झुपकेदार मिशा; दाट भिवया आणि जरासे अंतरावर असलेले भुरसट रंगाचे डोळे -

त्या डोळ्यांची नजर आता त्याच्यावर खिळली होती. जराशी तिरस्काराने, जराशी उपहासाने, जराशी आढ्यतेने-'आपणच अजय कर्नाटकी.'

आवाजही शरीरयष्टीला शोभेल असा बुलंद, गडगडाटी.

'होय.' त्याला तेवढाच शब्द सुचला.

'मी आत येऊ शकतो?'

'माझ्याशीच काम असलं तर अवश्य या.'

अजय मागे सरला. ते गृहस्थ खोलीत आले. पावलावरच उभे राहून त्यांनी आपली नजर खोलीतल्या अस्ताव्यस्त पसाऱ्यावर फिरवली.

अर्ध्याएक मिनिटाने अजयला पाहुणचार सुचला. एका खुर्चीची घडी उलगडून त्याने ती या अनाहूत पाहुण्यांसाठी मांडली आणि तो म्हणाला,

'बसा ना. बसा.'

खुर्चीच्या सीटवर एक जोरदार फुंकर मारून मग ते गृहस्थ खुर्चीवर बसले. काठी दोन्ही पायांमध्ये उभी करून वरची मूठ त्यांनी दोन्ही हातांनी धरली. क्षणाक्षणाला अजयच्या मनातली या घमेंडखोर माणसाबद्दलची नाराजी वाढतच चालली होती.

काहीही पसंत नसल्यासारखी स्वत:शी मान हलवीत त्या गृहस्थांनी कोटाच्या वरच्या खिशातून एक कार्ड काढून ते अजयपुढे धरलं. अर्थात ते घेण्यावाचून आणि वाचण्यावाचून त्याला गत्यंतरच नव्हतं. मुलायम पांढऱ्या शुभ्र चौकोनावर सोनेरी अक्षरांतली इंग्रजी छपाई होती.

श्री. गोवर्धनदास त्रिपाठी

सेक्रेटरी टू
हर हायनेस अँड क्वीन रिजंट,
महाराणी पद्मिनीबाई सूर्यवंशी
किनौर स्टेट.

त्या नावाकडे काही क्षण अजय नवलाने पाहतच राहिला. त्याला या सर्व अनपेक्षित प्रकरणाचा उलगडाच होत नव्हता. शेवटी त्याने दुसऱ्या घडीच्या खुर्चीवरचं सामान ढकलून देत रिकामी केली आणि तो खुर्चीवर बसला. तोही आता या सद्गृहस्थांकडे, म्हणजे त्रिपाठींकडे एकटक पाहत राहिला. काहीतरी खास उद्देशाने ते त्याच्या खोलीवर आले होते हे उघड होतं. नाहीतर त्यांच्यासारख्या राजेरजवाड्यांशी संबंधितांची पावलं त्याच्या टुकार जागेकडे थोडीच वळणार होती? पण तो काहीच बोलणार नव्हता, काहीच विचारणार नव्हता, अधीरपणा आणि आशाळभूतपणा तर मुळीच दाखवणार नव्हता. तो काहीतरी बोलण्याची त्रिपाठी कदाचित वाट पाहत असावेत; पण तो काहीच बोलत नाही असं पाहिल्यावर एक मोठा उसासा सोडून ते म्हणाले,

'कर्नाटकी, केवळ राणीसाहेबांच्या आज्ञेवरून मला हे करावे लागत आहे. माझा याला प्रथमपासूनच विरोध होता आणि आता ही तुमची जागा पाहिल्यानंतर माझंच बरोबर होतं अशी माझी खात्री आहे. तरीही राणीसाहेबांच्या आज्ञेचं मला पालन केलं पाहिजे.'

अजयच्या मनात सुरुवातीस नाराजीची एक लहानशी ठिणगी होती; पण आता तिची धग त्याच्या रक्ताच्या कणाकणापर्यंत पोहोचली होती. तरीही तो काहीही बोलला नाही. ही तर सुरुवात होती. त्याची वेळ आपोआपच येणार होती.

'राणीसाहेबांना तुमचं नाव-पत्ता कोठून आणि कसा मिळाला याचा मला काही उलगडा होत नाही.'

(जणू काही अजयनेच स्वत: काहीतरी खटपट लटपट केली होती!)

'एवढ्यात झालेल्या नाटकांतून मला तुमच्या नावाचा कोणताही- अगदी नाममात्रसुद्धा- उल्लेख आढळला नाही. ही कल्पना अव्यवहार्य आहे. धोक्याची आहे हे राणीसाहेबांना पटवण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला; पण अर्थात मला यश आलं नाही-नाहीतर मी इथे आलोच नसतो.'

त्रिपाठी चेहऱ्यावरचा घाम हातातल्या रुमालाने पुसत होते.

अजय तसाच त्यांच्याकडे पाहत बसून होता.

'माझ्या इथे येण्याचं, माझ्या या बोलण्याचं तुम्हाला अजिबात काही आश्चर्य वाटल्याचं दिसत नाही! का कदाचित तुमची तर अपेक्षाच होती? तर मग माझी शंका खरीच असली पाहिजे!'

अजयच्या मनात आता आपोआपच एक उत्सुकता जन्माला आली होती. तेव्हा आता तर तो कोणताच अविचार करणार नव्हता. त्रिपाठींना जी काही राजाज्ञा (किंवा राणीची आज्ञा) झाली होती तिचं उल्लंघन करायला कोणतंही निमित्त वा सबब देणार नव्हता. मनातला राग मनात ठेवून शांत बसण्याचं नाटक तर तो खासच करू शकणार होता!

'ठीक आहे. राणीसाहेबांना तुमची भेट घ्यायची आहे.' कोटाच्या आतल्या खिशातून सोनेरी पॉकेटवॉच काढून त्यात पाहत ते म्हणाले, 'आता दहा वाजत आले आहेत. साडेदहा वाजता तुम्ही प्रतापपार्कच्या मुख्य गेटपाशी या. तिथे मी तुमची वाट पाहत आहे.'

त्रिपाठी उठले, पाठ फिरवून खोलीतून निघून गेले. ते कदाचित त्या कोणी राणीसाहेब पद्मिनीबाईंच्या हुकमाचे बांधील असतील; पण त्यालाही त्यांनी एक हुकूम फर्मावला होता. असा काही तो त्यांचा ताबेदारच होता!

पण अर्थात पार्कवर न जाण्याचा विचारही त्याच्या मनाला शिवला नाही!

ज्याचे चोवीस तास नाटकांच्या वाचन-मनन यात जात होते त्याला या प्रसंगातली नाट्यमयता जाणवल्याखेरीज कशी राहील?

***

विद्रोही तरुणाची भूमिका वठवायची असली तर अजय त्याच त्या ओंगळ अवतारात त्या भेटीसाठी हजर झाला असता- पण त्रिपाठींच्या बोलण्या-चालण्यावरून त्या कोणी राणीसाहेब पद्मिनीबाई होत्या त्यांची परीक्षा करणं चूक झालं असतं. तेव्हा दाढी वगैरे करून, शक्य तितक्या चांगल्या कपड्यात तो बरोबर साडेदहा वाजता पार्कच्या गेटपाशी हजर झाला. त्रिपाठी गेटपाशीच उभे होते. त्यांच्या कपाळावर नाराजीच्या आठ्या स्पष्ट दिसत होत्या. कदाचित त्या कोण राणीसाहेब होत्या त्यांच्याशी आणखी एखादा खटका उडाला असेल-मग त्रिपाठींना ज्या गोष्टी अनपेक्षित होत्या आणि घडायला नको होत्या त्या अजय अगदी आनंदाने पार

पाडणार होता.
एक शब्दही न बोलता त्रिपाठींनी काठीने त्याला आपल्या मागोमाग यायची खूण केली आणि ते पार्कमध्ये शिरले. आताची वेळ वर्दळीची नव्हती आणि माणसं अगदी तुरळक होती. तरीही त्रिपाठी पार्कमधल्या मागच्या, जराशा आडोश्याच्या, झाडांनी झाकलेल्या एका भागाकडे निघाले. लांबून अजयला दिसलं की, काँक्रीटच्या बाकावर एका स्त्रीची आकृती होती. कपडे शुभ्र पांढरे होते, मान खाली होती, पदर डोक्यावरून घेतलेला होता. ते दोघं अगदी जवळ पोहोचल्यावरही ती मान वर आली नाही.
घसा जरा साफ करीत त्रिपाठी म्हणाले,
'राणीसाहेब, हे कर्नाटकी आले आहेत.'
मग त्या स्त्रीची मान सावकाश सावकाश वर आली. एका वयस्क स्त्रीचा चेहरा. तरुणपणी अत्यंत सुंदर असलेला; पण आताही एक खानदानी शान मिरवणारा चेहरा. चेहऱ्यावर गर्व नव्हता; पण एक खिन्नता मात्र होती. अजयच्या मनात त्या स्त्रीबद्दल एक आदराची आणि त्याचबरोबर सहानुभूतीचीही भावना आपोआपच जन्माला आली होती. ती स्त्री आता अजयकडे एकटक पाहत होती. दोन्ही हात जोडून नमस्कार करीत अजय म्हणाला,
'राणीसाहेब, त्रिपाठीच्या सांगण्याप्रमाणे मी आपल्या भेटीसाठी हजर झालो आहे.'
त्रिपाठींनी एक पाऊल जोरात पुढे टाकलं आणि दोन्ही हात हवेत दोन्ही बाजूंना पसरवीत ते म्हणाले, 'राणीसाहेब, अजूनही मी तुम्हाला विनंती करतो- पुन्हा एकदा विचार करा. घाईने काही करू नका. त्यातला धोका मी आपल्याला सांगितला आहे- प्लीज!'
मान हलवीत त्या म्हणाल्या, 'गोवर्धनदास, तुमचा हेतू स्तुत्य आहे. तुमच्या मनात आमच्या घराण्याचं कल्याणच आहे हे मी जाणते; पण मी माझा निर्णय घेतला आहे. आता मला बोलायचं ते बोलूद्यात- वाटलं तर मी तुम्हाला एवढं खात्रीनं सांगते - या माझ्या कृत्याचे जे काही बरेवाईट परिणाम होतील त्याची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे - तुमच्यावर कोणतीही तोहमत येणार नाही - झालं समाधान?'
काही क्षण होते तसेच उभे राहून त्रिपाठी स्वत:शीच मान हलवीत शेजारच्या बाकाकडे गेले आणि बाकावर मागे रेलून डोळे मिटून बसले.
मग त्या अजयकडे वळाल्या.
'अजय कर्नाटकी, नाही का? अजय, बसा इथे -
त्यांनी बाकावरच्या शेजारच्या जागेवर हात दोन-तीनदा टेकवला.
होता तसाच उभा राहून अजय म्हणाला,
'राणीसाहेब, एक विनंती आहे. आपण माझ्यापेक्षा वयाने, मानाने, अनुभवाने सर्वच बाबतीत श्रेष्ठ आहात. मला 'अरे अजय'अशीच हाक मारा.'
त्यांच्या चेहऱ्यावर एक पुसटसं हास्य येऊन गेलं.
'ठीक आहे, अजय. तर, अजय बस इथे.'

***

2.

त्याच्याकडे प्रत्यक्ष पाहत त्या म्हणाल्या, 'तुझ्या एका हितचिंतकाने तुझं नाव मला सुचवलं आहे. त्याच्या मते तू होतकरू आहेस, महत्त्वाकांक्षी आहेस; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं इमानदार आहेस.'
काहीच न बोलता अजय ऐकत राहिला.
'या गोवर्धनदास त्रिपाठींनी त्यांचं जवळजवळ सर्व आयुष्य आमच्या घराण्याच्या सेवेत काढलं आहे. एरव्ही त्यांच्या मताला मी खूपच किंमत देते; पण या खेपेस मात्र मी माझ्या मनातली कल्पनाच अमलात आणायचं ठरवलं आहे. ती अव्यवहार्य आहे, धोक्याची आहे हे त्रिपाठींचे आरोप अगदीच बिनबुडाचे नाहीतपण अतिरेकी समस्येला अतिरेकी उपायच आवश्यक असतात असं माझं मत आहे.'
अजूनही तो गप्पच होता.
'तुझ्या अंगात नटास आवश्यक ते गुण आहेत अशी तुझी खात्री आहे ना?'
अजयने होकारार्थी मान हलवली.
'मग आता त्याची कसोटी लावायला तयार आहेस? आणि ते काही बंद थिएटरमधलं, पडद्यासमोर काही तासापुरतं साकार केलेलं कृत्रिम नाटक नाही-थिएटरमध्ये नटांना आणि प्रेक्षकांना, सर्वांनाच माहीत असतं

कां, हे नाटक आहे, हे कृत्रेम आहे, जीवनावरचं एक रूपक आहे, जीवनावरची एक टीका आहे-पण खरं नाही. मला तसल्या नाटकाशी कर्तव्य नाही.'
अजयची उत्सुकता क्षणाक्षणागणिक वाढत होती.
'काही दिवस, काही आठवडे म्हण, तुला एका खऱ्याखुऱ्या, जिवंत माणसाची भूमिका वठवायची आहे - नाटकातल्या पडद्यासमोर नाही - तर प्रत्यक्षात, रोजच्या धकाधकीच्या मामल्यात, रोजच्या व्यवहारात आणि तेसुद्धा त्या माणसाला चांगलं ओळखणाऱ्याच्या समोर. हे आव्हान मी तुझ्यासमोर उभं करीत आहे. आव्हान स्वीकारायची तयारी आहे का? असली तर तो म्हण- नाहीतर ही मुलाखत इथेच, याक्षणी थांबेल.'
'राणीसाहेब, मी आपल्याला एक वचन देतो - माझ्यावर जी काही कामगिरी सोपवायची आपली इच्छा आहे ती पार पाडण्यासाठी मी माझा सारा जीव पणाला लावून शिकस्त करीन- शिवाय आणखीही एक वचन देतो- तुमच्या आणि त्रिपाठींच्या बोलण्यावरून मला अशी शंका येत आहे, की हे प्रकरण काहीतरी अगदी खाजगी असावं- ज्याचा गौप्यस्फोट होण्याची त्रिपाठीजींना मनस्वी भीती वाटत आहे - मग आणखीही एक वचन देतो - या आपल्या भेटीत माझ्या कानावर जे काही येईल त्याचा मी कोठेही उच्चार करणार नाही - माझा जो कोणी हितचिंतक आपल्याला भेटला त्याचं इतर म्हणणं काहीही असो- एक मात्र निलाखस सत्य आहे, मी संपूर्ण इमानदार आहे. कोणत्याही गौप्याचा माझ्याकडून स्फोट होणार नाही. काम माझ्या आवाक्यात आहे अशी माझी खात्री पटली तरच मी त्याचा स्वीकार करीन- नाहीतर आपण म्हणता त्याप्रमाणे ही मुलाखत इथेच संपेल.'
'अजय', राणीसाहेब म्हणाल्या, 'माझी आणि तुझी गाठ पडल्याला अजून तासंसुद्धा उलटलेला नाही-पण का कोणास ठाऊक माझा तुझ्या शब्दांवर आणि तुझ्यावर विश्वास बसतो आहे. ठीक आहे ऐक तर मग.'
त्यांनी आपली पर्स उघडली. त्यातून मोठ्या आकाराचा एक लिफाफा बाहेर काढला आणि तो अजयपुढे करीत त्या म्हणाल्या,
'पाहा-अजय-पाहा. त्यात काही फोटो आहेत.'
अजयने लिफाफा उघडला. आत आठ बाय दहाच्या साईजचे अनेक रंगीत फोटो होते. सर्व फोटो एकाच, सुमारे बावीस-तेवीस वर्षे वयाच्या तरुणाचे होते. काही साध्या कपड्यात होते, काही पूर्ण सूट-बूट अशा वेशात होते. काही चेहऱ्याचे क्लोजअप होते. काही जेवण घेताना होते. एकाच त्याच्या हातात मद्याचा प्याला होता. ज्या फोटोत त्याचा चेहरा अगदी स्पष्ट दिसत होता त्या फोटोचं अजयने बराच वेळ निरीक्षण केलं. तसं वय जास्त वाटत नव्हतं; पण एव्हानाच डोळ्यात एक प्रकारची जराशी लाली, नाकाचा लालसर शेंडा या मद्यपानाच्या खुणा दिसायला लागल्या होत्या. पाहताक्षणी चांगला ग्रह व्हावा अशी ती व्यक्ती वाटत नव्हती.
अजयने फोटो पाकिटात घालून ते पाकीट खाली बाकावर ठेवले.
राणीसाहेब बोलल्या तेव्हा त्यांचा आवाज कठीण झाला होता.
'हे फोटो माझ्या मुलाचे आहेत. त्याचं नाव प्रदीप आहे; पण सर्वजण त्याला कुमार म्हणतात. तो माझा एकुलता एक मुलगा आहे.'
त्या काहीक्षण गप्प बसल्या. मग परत बोलायला लागल्या.
'कुमार हा एक संपूर्ण बिघडलेला तरुण आहे. एखाद्या आईला आपल्याच मुलाबद्दल असे शब्द उच्चारताना काय यातना होत असतील त्याची कल्पना इतरांना येणं शक्यच नाही; पण मला ते शब्द बोलावे लागत आहेत आणि तेही एका परक्यासमोर; पण आता इलाजच राहिलेला नाही. गोष्टी आता अशा थराला गेल्या आहेत की-की-खरोखरच पुढचं काहीही सांगता येत नाही.'
'कुमारला दारूचं व्यसन आहे, जुगाराचाही नाद आहे. त्याला संगत आहे तीही चांगली नाही. राजेसाहेब, माझे पती, करड्या शिस्तीचे भोक्ते होते. लहानपणी कुमारला पित्याकडून प्रेम आणि आपुलकी यापेक्षा कठोर बोल आणि कडक शिक्षाच मिळाली असण्याची शक्यता आहे. कदाचित माझ्या पतींच्या वागणुकीत आपुलकीचा ओलावा नसेल; पण त्याच्या आताच्या वर्तनाला केवळ हे एकच एक मानसशास्त्रीय कारण लावणं हा भ्याड पळपुटेपणा होईल. ज्याच्या खांद्यावर पुढेमागे खूप मोठ्या जबाबदाऱ्या येणार आहेत अशा माणसाने स्वत:ला त्या पेलण्यासाठी घडवलंच पाहिजे. साध्या साध्या मोहांनी मन चाळवलं जाता कामा नये. विकारांवर विचाराचा अंकुश सतत ठेवलाच पाहिजे. कारण आमच्या सारख्यांच्यावर अनेकांची आयुष्य अवलंबून असतात - त्या सर्वांना आम्हीच जबाबदार असतो.'
'संस्थानं संघराज्यात सामील झाली खरी-त्यांच्या हातातली शासकीय आणि कायद्याची सत्ता काढून घेतली गेली; पण शतकामागून शतके चालत आलेली ही राजघराणी- त्यांची वतनं आहेत, इस्टेटी आहेत.

व्यापारउदीम आहेत, कुळं आहेत, खूप मोठा नोकरवर्ग आहे- शिवाय वंशपरंपरेने चालत आलेलं असं समाजात मानाचं स्थानही आहे; पण त्यासाठी माणूस योग्य नसला तर मानाचा मुजरा दिखाऊच असणार- आणि पाठीमागे टिंगल-टवाळीच होणार. कुमार असा सज्ञान-म्हणजे कायद्याच्या दृष्टीने- झाला आहे. त्यापुढे आता माझे अधिकार आपोआपच मर्यादित झाले आहेत.
'आणि आता मला शाश्वती राहिलेली नाही की, कुमारकडून मला पूर्वीसारखं सहकार्य मिळेलच. माझा शब्द मोडण्याची, माझी अवज्ञा करण्याची अजून त्याची हिंमत झालेली नाही-पण मला अशी भीती वाटते की, तोही दिवस आता फार दूर नाही-हल्ली तर कुमार जवळजवळ सर्व दिवसभर दारूच्या नशेतच असतो.'
काही क्षण त्या गप्प बसल्या. मग एक दीर्घ उसासा सोडून त्यांनी आपलं बोलणं पुढे सुरू केलं.
'एवीतेवी येथपर्यंत तुला सांगितलंच आहे, अजय-मग बाकीचं कशासाठी मागे ठेवायचं? स्वत: राजेसाहेब अतिशय देखणे आणि मर्दानी होते. सत्तासंपत्ती, सौंदर्य, सर्वकाही त्यांच्यापाशी होतं- अशा पुरुषासमोर अनेक प्रलोभनं येणार नाहीत का? त्याला मी स्त्रीलंपट म्हणणार नाहीपण त्यांची बायकांची अनेक प्रकरणं होती-काहींची चर्चा माझ्या कानापर्यंतही पोहोचली होती- आणखी काही गुप्त असतील-पण मी त्यासंबंधात त्यांच्यावर कधीही शब्दानेही टीका केली नाही- त्याला अनेक कारणं होती. एकतर सारा जन्म मला त्यांनी आदराने, प्रेमाने, आपुलकीने वागवलं. खाजगीत आणि समाजात सर्वत्र माझा मान राखला जाईल याची खबरदारी घेतली. माझ्यापाशी या प्रकरणांची चर्चाही केली नाही आणि माझ्यापासून काही लपवायची फारशी कोशीशही केली नाहीपण त्यामुळे एक झालं-हितशत्रूंना आमच्या दोघांच्यात संशय वा वैमनस्य निर्माण करायला साधनच राहिलं नाही.
'आणखी एक कारण आहे - अलंकारांना शुद्ध, बावनकशी सुवर्ण चालत नाही, त्यात काहीतरी हिणकस मिसळल्याशिवाय त्याला कठीणपणा येत नाही - नाहीतर ते झिजून जाईल- पुराणातला पवित्र मर्यादा पुरुषोत्तम रामचंद्र पुराणात ठीक आहे. सर्वसामान्यांच्या मनात राजाची एक प्रतिमा असते. जरासा रगेल, जरासा रंगेल, मर्दानी; पण ख्यालीखुशालीत रमणारा, अशी ती प्रतिमा असते - कदाचित त्या प्रतिमेला साजेसं म्हणूनही त्यांनी मुद्दाम असं वर्तन केलं असेल - कारण हे जाणण्याइतकी त्यांची बुद्धी तितकी कुशाग्र नक्कीच होती- आणि शेवटी अर्थात पुरुषांचा स्वभाव- ती एक गोष्ट आहेच. या गोष्टी बासनाखाली झाकून ठेवण्याची आपली प्रवृत्ती असते - पण तो केवळ दांभिकपणाच असतो - शक्य असेल तेथे सुख शोधण्याचा मानवी स्वभावच आहे. केवळ आर्थिक, सामाजिक, शारीरिक कारणाने त्यावर ज्या काही मर्यादा पडतात तेवढ्याच- तेव्हा हे सर्व अनुकूल असतं की माणसं अशी वागणारच!
'हे तुला एवढं खुलासेवार सांगण्यामागेसुद्धा एक कारण आहे. या गोष्टी जगजाहीर झाल्या तसा काहींनी त्याचा गैरफायदा घेण्याचाही प्रयत्न केला... एका स्त्रीने तर बनावट कागदपत्र तयार करून 'राजेसाहेबांनी आपल्याशी विवाह केला आहे आणि आपला मुलगा हा त्यांचा औरसपुत्र असून संस्थानच्या मिळकतीत त्याचा अर्धा हिस्सा आहे' असा दिवाणी दावाही दाखल केला होता... पुढे ती कागदपत्रे बनावट सिद्ध होऊन तिला काही वर्षांची शिक्षा झाली हा भाग वेगळा; पण माणसं कोणत्या थरापर्यंत जातील त्याचा नेम नाही...
'आणि अजूनही हे संपलेलं नाही. तिचा मुलगा आता कुमारच्याच वयाचा असेल. तो स्वत:, त्याची आई आणि मागे राहून चिथावणारे आणि फूस देणारे इतर काही- त्यांच्या कारवाया थांबल्या आहेत का? मुळीच नाही! कुमारचा स्वभाव जर वेगळा असता, स्वाभिमानी आणि खंबीर असता तर कशाचीच काळजी नव्हती-पण मला अशी भीती वाटते की, त्यांनी कुमारशीही संधान बांधलेलं आहे आणि त्यांच्या चिथावणीचा त्याच्याही वागण्यावर परिणाम होत आहे - प्रत्यक्ष घरातच हा विरोधक उभा राहिला आहे.
राणीसाहेब पुन्हा एकदा बोलायच्या थांबल्या. अजयच्या मनात एक विलक्षण शंका आली होती- पण ती दिवास्वप्नासारखीच निरर्थक वाटत होती.
'अजय, आता मी तुझी भेट का घेतली त्याच्या कारणाकडे येत आहे. संस्थानात अनेक सहकारी पतपेढ्या आहेत, सहकारी उद्योग आहेत. शिवाय अनेक न्यास आहेत - ज्यांची अध्यक्षपदे आज अनेक वर्षे माझ्याकडे आहे. याखेरीज अनेक कंपन्या आहेत, त्यांच्या बोर्डाची चेअरमन मीच आहे. इतकी वर्षे या स्थानांसाठीच्या निवडणुका औपचारिक असत, नाममात्र असत -पण आता माझ्या कानावर आलं आहे की, यापैकी एक वा अनेक स्थानांसाठी स्वत: कुमारच आपली उमेदवारी जाहीर करण्याच्या विचारात आहे - अर्थात त्याला इरेस घालणारे पडद्यामागचे राहणार आहेत - मला पूर्ण माहीत आहे, की ही स्थानं यशस्वीपणे सांभाळण्यासाठी आवश्यक ती बुद्धीची झेप, माणसांची पारख, सहकाऱ्याशी आणि कनिष्ठांशी वागताना वापरण्याचा व्यवहारीपणा कुमारमध्ये यापैकी एकही नाही. तो सर्वथा नालायक आहे; पण तो खरोखरीच उभा राहिला तर

माझी अवस्था किती चमत्कारिक होणार आहे! विरोध केला तरी अडचण आणि पाठिंबा दिला तरी अडचण!'
'तेव्हा अजय, आता मी तुझी भेट का घेतली याचं खरं कारण ऐक-'
बाकावरचं फोटोंचं पाकीट त्याच्याकडे सारीत त्या म्हणाल्या,
'या सर्व मीटिंग्ज महिन्याभरांनी सुरू होणार आहेत. त्या पूर्ण होईपर्यंत कुमाराला कोणत्या ना कोणत्या मार्गाने मी आडबाजूला कोठेतरी लांब पाठवणार आहे. त्या सर्व मीटिंग्जमध्ये तुला कुमारची भूमिका करायची आहे- त्याचा रोल वठवायचा आहे - नाटकाच्या पडद्यासमोर नाही, तर प्रत्यक्ष जीवनातलं, प्रत्यक्ष व्यवहारातलं हे नाटक करायचं आहे - मी तुला सर्व मदत करायला तयार आहे-पण हे आव्हान स्वीकारण्याची तुझी तयारी आहे? यशस्वी होईन असा तुला स्वत:बद्दल आत्मविश्वास वाटतो? तसं असेल तरच 'हो'म्हण!'

***

3.

शेवटी त्याच्या मनात आलेली विलक्षण शंकाच खरी ठरली होती! पण किती अनपेक्षित! धक्का बसायचा तो बसलाच. एक मोठी संधी त्याच्यासमोर चालून आली होती - एक आव्हानात्मक भूमिका संसाराच्या रंगमंचावर साकार करायची होती; पण व्योक्ती ही होती की, त्याला कितीही यश मिळालं तरी श्रेय मिळणार नव्हतं, कारण तो एक भूमिका करीत होता, काही काळासाठी एका वेगळ्या व्यक्तिरेखेत वावरत होता ही गोष्ट सदासर्वदा गुप्तच राहणार होती! तरीही...
'ज्या कोणी आपल्याला माझं नाव सुचवलं त्याचा मी शतश: ऋणी आहे,' अजय म्हणाला. 'आणि आपण माझ्यावर ही कामगिरी सोपवू इच्छिता यातच मी माझा बहुमान समजतो. हे काम करायची माझी इच्छा तर आहेच, शिवाय मनात दांडगा आत्मविश्वासही आहे; पण...' तो थांबला.
'पण काय?' काही वेळाने राणीसाहेबांनी विचारलं.
'याक्षणी तरी मला दोन गोष्टींचा उल्लेख करायचा आहे. सर्व भीडभाड बाजूला ठेवून आपण आपल्या आयुष्यातल्या अगदी खाजगीतल्या खाजगी गोष्टी मला सांगितल्या आहेत; पण या कुमारांबद्दल एक-दोन मोघम उल्लेख वगळले तर इतर काहीही नाही.' हातातल्या फोटोच्या पाकिटावर बोटे आपटीत तो म्हणाला,
'केवळ या छायाचित्रांनी काहीही साध्य होणार नाही. माणसासारखी दिसणारी माणसं खूप असतात. एखाद्याची पाच-सात क्षण फसगतही होईल; पण प्रत्येकाच्या वागण्यात असंख्य वेगवेगळ्या छटा असतात. सांगण्याचा अर्थ हा की, कुमारच्या आवडी-निवडी, त्याच्या बालपणाच्या काळातल्या काही महत्त्वाच्या घटना, त्याच्या निकटच्या काही मित्रांची नावे हे सर्व मला समजलं पाहिजे. त्यातल्या काही आपण सांगू शकाल किंवा लिहून देऊ शकाल; पण ही काही तीन-चार तासात संपणारी भूमिका नाही, दिवसामागून दिवस, सतत चोवीस तास चालणारी आहे आणि नाटकातल्यासारखी काल्पनिक नाही. या भूमिकेचा खरेखोटेपणा जाणणारे जाणकार आसपास वावरत असणार... त्याची भूमिका सर्रास ही उठवायची असेल तर मला त्यांच्या वागण्याबोलण्याचे, हावभावांचे अगदी जवळून निरीक्षण करता आले पाहिजे.'
'पण अजय, याचा अर्थ असा, की या तुझ्या दोन-तीन मागण्या पूर्ण झाल्या तर हे काम स्वीकारायला तू तयार आहेस?'
'हो.'
हुश्श! आवाज करीत राणीसाहेबांनी सुटकेचा एक दीर्घ नि:श्वास सोडला. 'अजय, एकदा तू तयार झालास म्हणजे बाकीच्या बाबी अगदी गौण आहेत. तशी आजची आपली पहिली भेट ही अगदी प्राथमिक आहे. मी तर म्हणेन की या एकाच भेटीत खूपसं साध्य झालं आहे. पुढच्या भेटीचं ठरवून मी तुला निरोप पाठवते.'
'अं हं.' अजय म्हणाला.
'नाही? नाही म्हणजे काय?' त्यांनी आश्चर्यानं विचारलं.
'पुढच्या भेटीची वेळ आताच ठरवून टाका, राणीसाहेब आता यात जितक्या कमी लोकांचा संबंध येईल तितका चांगला.'
'ठीक आहे. आजपासून तीन दिवसांनंतर? याचवेळी? इथेच?'
'मान्य आहे आणि आता आणखी एक नम्र सूचना राणीसाहेब, त्रिपाठींना तुमची योजना तितकीशी पसंत नाही आणि माझ्याबद्दलही त्यांचं फारसं चांगलं मत झालेलं नाही असा माझा तर्क आहे. तेव्हा आपल्या दोघांत आता जे काही बोलणं झालं आहे ते आपल्या दोघांतच राहिल्यास उत्तम.'
'म्हणजे? गोवर्धनदासांचासुद्धा तुला संशय येतो?'

‘नाही; पण आता कोणाचाही अपवाद करायचा नाही.’
राणीसाहेब बराच वेळ अजयकडे तीक्ष्ण नजरेनं पाहत होत्या.
‘ठीक आहे. तसं तर तसं. त्याने तोटा काहीच होणार नाही.’ त्यांनी पर्समधून आणखी एक पांढरा लिफाफा काढला. तो पुढे करीत त्या म्हणाल्या,
‘अजय, या पाकिटात एक हजार रुपये आहेत. जास्त घ्यायला सवडच मिळाली नाही. त्याची भरपाई पुढच्या भेटीत होईल.’
त्या पाकिटाला हातही न लावता अजय म्हणाला, ‘पण राणीसाहेब! हे पैसे कशासाठी? मी तर अजून काहीच केलेलं नाही!’
एक हात वर करून राणीसाहेब म्हणाल्या,
‘अजय, पैसे किती आणि केव्हा द्यायचे हे ठरवण्याचं काम माझं आहे. तुझ्यावर सोपवलेली जबाबदारी पार पाडणं हे तुझं काम आहे. ते तू कर.’
त्यांनी पर्सचा खटका दाबला आणि पदर सावरला.
मुलाखत संपली होती.
त्या उभ्या राहताच त्यांना नमस्कार करून अजयनं त्यांचा निरोप घेतला. राणीसाहेब उठताच त्रिपाठीही पुढे आले होते. अजयने हात जोडून त्यांचाही निरोप घेतला; पण त्यांनी अजयकडे नजरसुद्धा वळवली नाही.
राणीसाहेब आणि त्रिपाठी, दोघांची जोडी सावकाश सावकाश चालत पार्कच्या गेटमधून बाहेर पडली. तोपर्यंत अजय होता तिथेच उभा होता.
किती वाजले हे पाहण्यासाठी त्याने हाताकडे नजर टाकली. डाव्या हातात मोठ्या फोटोंचं पाकीट होतं, उजव्या हातात पैशांचं पाकीट होतं.
घड्याळात बारा वाजले होते.
त्रिपाठी त्याच्या खोलीत जेमतेम दोन तासांपूर्वी आले होते.
फक्त दोन तास!
पण त्या अल्पकाळात त्याच्या आयुष्याला केवढी अनपेक्षित आणि विस्मयकारक कलाटणी मिळाली होती! पण ही तर या नव्या वाटेची केवळ सुरुवातच होतीत्याचं आयुष्य त्यानंतर आणखी कोणकोणत्या विलक्षण वळणाने जाणार होतं याची काही कल्पनाच करता येत नव्हती.
भरकटणारं मन त्याने कसंतरी ताळ्यावर आणलं.
आता आधी रोजच्या खानावळीतलं जेवण आणि मग खोली.

***

खोलीवर परत आल्यावर त्याने फोटोच्या पाकिटातला कुमारच्या चेहऱ्याचा क्लोजअप असलेला फोटो, आरशाच्या कडेला सरकवून ठेवला. तो आरशासमोर उभा राहताच दोन्ही चेहरे शेजारी शेजारी आले, आणि त्याच्या लक्षात आलं की आपल्या दोघांच्या चेहऱ्यात विलक्षण साम्य आहे. त्याचा जो कोणी अज्ञात हितचिंतक होता त्याच्याही ध्यानात हे साम्य आलं असलंच पाहिजे आणि म्हणूनच त्याने राणीसाहेबांकडे अजयच्या नावाची शिफारस केलेली असणार. कुमारचे केस जास्त लांब वाढलेले होते, त्याचे कल्ले कानाखाली आले होते, भांगही वेगळ्या प्रकारचा होता. अजयपेक्षा त्याचे गाल जरा चोपलेले होते आणि नाकाचा शेंडा जरासा फुगीर होता. अर्थात हे बाह्य रूप होतं. मेकअपच्या किमयेने सहज साध्य होणारं; पण खरा फरक अंतरंगात होता. जो कुमारच्या नजरेत दिसत होता. डोळे किंचित लालसर होते आणि नजर तापट होती. प्रत्येकालाच आव्हान देत असावीशी वाटत होती. त्या नजरेत एक बेफिकीर उर्मटपणा होता... तोच गर्व फोटोतल्या पोझमधली किंचित मागे झुकलेली मान अधोरेखित करीत होती. हा आत्मविश्वास नव्हता, तर अहंगंड होता. कदाचित त्याच्या लहान वयापासून त्याला सर्वांच्या हांजी हांजीचा, लाचारपणाचा अनुभव येत असेल, त्याच्या वर्तणुकीवर टीका करायची कोणाची हिंमतही झाली नसेल. अशा परिस्थितीत माणूस स्वत:ला सर्वगुणसंपन्न समजू लागला, आत्मपरीक्षणाला पारखा झाला तर त्यात नवल नव्हतं; पण आता अजयला त्याच्या पवित्र्यात, बोलण्याचालण्यात क्षणाक्षणाला ही रग, ही मस्ती, हा उद्दात्त ताठा आणायचा होता. खरंतर त्याच्या स्वभावाच्या बरोबर विरुद्ध!

***

तिसऱ्या दिवशी सकाळी साडेदहा वाजता अजय भेटीच्या ठरलेल्या जागी हजर होता. दोन-तीन मिनिटांतच राणीसाहेब आल्या. दूरवर त्या दिसताच अजय उठून उभा राहिला होता. त्या जवळ पोहोचताच त्याने त्यांना

नमस्कार केला. आधी त्या बाकावर बसल्या. अजयही त्याच बाकावर बसला. त्या आपल्याकडे एवढं निरखून का पाहत आहेत हेच त्याला उमगेना. त्याचे कपडे रोजचेच होते. बदामी झब्बा. पांढरा पायजमा. फक्त आज ते लाँड्रीतून आलेले होते.
'आपण काय पाहत आहात?' शेवटी त्यानं विचारलं.
'तुझे कपडे.'
'त्यात काय विशेष आहे? ते तर रोजचेच आहेत.'
'त्यातच विशेष आहे. माझी कल्पना होतीहातात पैसे आले आहेत...'
'की लागलीच मी नवीन, फॅशनेबल पोशाखात हजर होईन?' अजय हसत म्हणाला, 'खरंतर तो विचारही माझ्या मनात आला नाही. कारण अजून त्या पैशातली कवडीही मी कमावलेली नाही.'
'अजय, तुला मी या कामगिरीसाठी पसंत केलं हे अत्यंत योग्य होतं असं मला क्षणाक्षणाला वाटायला लागलं आहे.'
अजयने केवळ दोन हात समोर करून 'त्यात काय मोठं?' असा आविर्भाव केला.
'ठीक आहे तर. आता आपल्यापुढचं काम.' राणीसाहेबांनी पर्समधून टाचलेल्या कागदांचा एक गठ्ठा काढून तो अजयच्या हाती दिला.
'अजय, कुमारच्या लहानपणापासूनच्या ज्या काही आठवणी मला मनासमोर आणता आल्या त्या मी त्यात लिहिल्या आहेत. त्याचं शिक्षण, त्याचे छंद सर्व काही त्यात आहे.'
काही वेळाने त्या म्हणाल्या, 'अजय, आता अर्थात तुझ्यापासून खाजगी असं काही ठेवण्यात अर्थच नाही, नाही का? तर मग ऐक. माझा एक दूरचा मावसभाऊ होता. त्याच्या नावागावाशी आता कर्तव्य नाही, कारण तो काही वर्षांपूर्वी मृत झाला आहे. माझ्या विवाहानंतर काही वर्षांनी तो आमच्याकडे पाहुणा म्हणूनपण खरं म्हणजे आश्रितचआला. राजेसाहेबांनी त्याच्या मुक्कामाला कधीच हरकत घेतली नाही. अन्नपाण्यासाठी कष्ट करावे लागत नव्हते, खांद्यावर कसल्याही जबाबदाऱ्या नव्हत्या, शिवाय सुखाचं जीवन. रिकामं मन सैतानाचं रिंगण असतं म्हणतात. ऐशआरामाच्या लालसेला शरण न जाणारे फार थोडे असतात. माझा मावस भाऊ त्यांच्यातला नव्हतायावरून काय समजायचं ते समज. शेवटी राजवाडाराजघराणं आलं, की खुशमस्कऱ्याची, संधिसाधूंची वर्दळ आलीच. भावाला घोड्यांच्या रेसचा नाद लागला. सतत खाली खाली, शेवटी कर्दमात नेणारी वाट, गायत्री नावाची त्याला एक मात्र मुलगी होती. सुंदर, हुशार, व्यवहारी, चुणचुणीत. केवळ तिच्यासाठी मी तिच्या वडिलांचे सर्व अपराध क्षम्य मानले. त्याने आमच्या नावावर उधाऱ्या केल्या, पैशांची उचल केली, नाना लफडी केली. गायत्री जसजशी मोठी होत चालली तसा तिच्या गुणांना बहरच येत चालला. मला ती माझी सून म्हणून आमच्या घराण्यात यावी अशी फार फार इच्छा होती. राजेसाहेबांनाही अर्थात गायत्री मनापासून पसंत होती. राजेसाहब आणि भाऊ यांना एकत्र आणून मी त्यांच्याकडून कुमार आणि गायत्री यांच्या विवाहाच्या आणाभाका करून घेतल्या. कुमारच्या वर्तनात बिघाड व्हायला लागला होता, अगदी सुरुवातीस, गायत्रीशी यावर बोलले होते. तेव्हा ती म्हणाली होती, 'आत्या, माझ्या बाबांनी शपथेवर दिलेला शब्द मी कधीही मोडणार नाही.' पण त्याला आता काही महिने उलटून गेले आहेत. 'आता मला तिला तो प्रश्न विचारण्याचं धाडसच होत नाही. कुमारशी विवाह झाला तर ती सुखी होईलच याची मला मनोमन खात्री वाटत नाही. भूतकाळातल्या काही शब्दांच्या दावणीला तिचा सर्व भविष्यकाळ जखडून ठेवण्याची कल्पना माझ्या मनाला पटत नाही. खरोखर किंकर्तव्यमूढता म्हणजे काय याची या क्षणाला खरी जाणीव होते. तुला हे विस्ताराने एवढ्याचसाठी सांगितलं, की राजवाड्यावर आल्यावर तुझी गायत्रीशी गाठ पडणारच आहे. तू राजवाड्यावर येणारच आहेस, नाही तुला यायलाच हवं... आपल्या भेटीतली तुझी कल्पना माझ्या मनात होती. त्यावर मी जो उपाय योजला आहे तो असा आहे.
'राजेसाहेबांना स्वत:ला वाचनाचा फारसा शौक नव्हता; पण विद्वानांना संस्थानात राजाश्रय मिळाला पाहिजे ही त्यांची धारणा होती. त्यासाठी त्यांनी तज्ज्ञांच्या देखरेखीखाली राजवाड्यातच एक वाचनालय उभारून घेतले. त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमासाठी एका लायब्ररीयनची नेमणूक केलेली असते. कारभारासाठी एक विश्वस्त समिती आहे. ग्रंथांची निवड, खरेदी, देखभाल, वाचकांसाठी सोयी इत्यादी त्यांनी पाहायचं असतं. वाचनालय सर्वांसाठी खुलं आहे आणि समितीच्या शिफारशीने दिलेल्या ओळखपत्रावर पुस्तके घरीही नेण्याची व्यवस्था आहे; पण या समितीच्या बैठका कधी होतच नाहीत. ही सर्व कामं ग्रंथपालच स्वत: करतो. सध्या तेथे काम करीत असलेल्याला मी तिथून हलवू शकेन आणि त्या जागी तुझी नेमणूक करू शकेन. गेस्ट कॉर्टर्समधल्या दोन खोल्या तुला राहण्यासाठी वापरता येतील आणि मुख्य म्हणजे तुला सर्वत्र मुक्त वावर

करता येईल. त्याला कोणीही हरकत घेणार नाही. तुला कशी काय वाटते ही कल्पना?'
जरासा हसत अजय म्हणाला, 'प्रयत्न करून पाहायला हरकत नाही. अशा अर्थी, की हे करून मला कुमारच्या निरीक्षणासाठी पुरेसा वेळ अथवा पुरेशा संधी मिळाल्या नाही, तर दुसरा कोणतातरी मार्ग शोधता येईल; पण राणीसाहेब, मागचाच इशारा मी पुन्हा देतो, ही गोष्ट आपल्या दोघांखेरीज इतर कोणासही माहीत नसलेलीच बरी. त्या जागेसाठी रीतसर जाहिरात द्यात्या जाहिरातीच्या आधारावर मी आपली भेट घेईन.'
आता बोलण्यासारखं या क्षणी तरी काही उरलं नव्हतं. बाकावरून उठून उभा राहत अजय म्हणाला, 'राणीसाहेब, आणखी एक रिक्वेस्ट.'
'आता काय?'
'आपल्या दोघांच्यात खाजगी असा एक परवलीचा शब्द हवा.'
'परवलीचा शब्द? हे तर कट कारस्थानासारखं झालं!'
'नाहीतरी आपण एक कटच रचत आहोत, नाही का?'
'ठीक आहे... अं... ओंकार... हा शब्द कसा वाटतो?'
'ओंकार. ठीक आहे.' त्याने खिशातून आपला पत्ता लिहिलेला कागद काढला आणि तो राणीसाहेबांसमोर धरला.
'कदाचित आवश्यकता पडणार नाही; पण पडलीच तर या पत्त्यावर आपण माझ्याशी संपर्क साधू शकता.'
त्यांनी कागद पर्सच्या एका कप्प्यात ठेवला. त्या म्हणाल्या,
'मी जाहिरात देते आणि प्रकाशनाची तारीख तुला कळवते.'
ही दुसरी मुलाखत येथे संपली.

***

आपल्यापुढे एक नामी संधी चालून आली आहे याची त्याला कल्पना होती. तसंच हे आव्हान स्वीकारायचीही जबर इच्छा होती; पण ती किती कठीण गोष्ट होती याची त्याला पुरेपूर कल्पना होती. तेव्हा, एवढ्यातच तो कोणताही निर्णय घेणार नव्हता. शिवाय आणखीही एक गमतीदार कल्पना त्याच्या मनात आली होती. एखाद्या कृत्रिम भूमिकेत केवळ तीन तासच नाही, तर दिवसामागून दिवस वावरता येणं ही एक कसोटीच होती आणि स्वत:चा मगदूर अजमावून पाहण्याची संधीही अनायासेच त्याच्यासमोर आली होती.
राजवाड्यातल्या वाचनालयाचे ग्रंथपाल!
त्याने ठरवलं होतं की, स्वत:च्या रूपात त्या नोकरीसाठी जायचंच नाही. त्यासाठी एक संपूर्ण काल्पनिक व्यक्तिरेखा उभी करायची. ग्रंथपाल हा काही निधड्या, हिकमती, चलाख नसतो. तो पापभीरू, स्वत:ची खुर्ची आणि कातडी सांभाळणारा, स्वत:च्या कामाव्यतिरिक्त इतरत्र मान वर करूनही न पहाणारा, निरुपद्रवी जीव असतो. निदान अजय त्याला तसा बनवणार होता.
राणीसाहेबांनी दिलेले कागद त्याने एकदा वाचून पाहिले आणि ठेवून दिले. मागाहून अवकाश भरपूर मिळणार होता. कुमारचं प्रत्यक्ष निरीक्षण केल्यावरच त्याला आपल्याला हे काम जमेल का नाही याची काही कल्पना येणार होती. त्या आधी ग्रंथपाल उभा करणं जास्त महत्त्वाचं होतं. त्या संध्याकाळी आणि दुसऱ्या दिवशी दिवसाचा बराचसा वेळ त्याने गजबजलेल्या रस्त्यांवर, गर्दीच्या चौकात, वाहत्या रहदारीच्या पुलावर उभं राहून पादचाऱ्याचं निरीक्षण करण्यात काढला. माणसांचे असंख्य नमुने त्याच्या डोळ्यांसमोरून जात होते. नव्या व्यक्तिमत्त्वाचा एक एक घटक मनात साकळत होता. असा जाड प्रेमचा (झीरो नंबरचा) चष्मा, असा मळखाऊ रंगाचा कोट; हातात अशी एक खूप वापरलेली रेक्झीनची बॅग, अशी जुन्या फॅशनची, बाहीला खाली दुमड असलेली ढगळ पँट; इत्यादी इत्यादी...
गोविंदराव अडकरांचा जन्म झाला होता.
त्याचा देह वगळता अडकरांसाठी सर्व जामानिमा जमवावा लागला.
आणि त्यासाठी राणीसाहेबांकडून मिळालेल्या रकमेचा त्याने व्यवस्थित वापर केला. कारण यादी खूपच मोठी होती. तीन शर्ट, तीन पँट, चष्मा, बॅग... राणीसाहेबांचे हजार रुपये पाहता पाहता खर्च हाऊन गेले. पूर्वी दिवसाचे चोवीस तास रिकामटेकडेपणाने घालवताना वैताग यायचा. आता त्याच्या मनात एक अधीरता जन्माला आली होती. घटना केव्हा गती घेतात असं झालं होतं.

***

तिसऱ्या दिवशी त्याच्या पत्त्यावर पाकीट आलं.
आत एका वर्तमानपत्राचं नाव आणि तारीख होती.

मायना, काही, अर्थातच काहीही नव्हतं.
जाहिरात वर्तमानपत्रात यायला आणखी दोन दिवस जावे लागले.
जाहिरात ठराविक साच्याची होती.
सर्टिफिकेट, शिफारसपत्रे इत्यादींसह प्रत्यक्ष हजर व्हायचे होते.
तो ती जाहिरात वाचत असतानाच दारावर अचानक थाप आली.
आता यावेळी आपल्याकडे कोण येणार? तो मनाशी नवल करीत होता. खोलीभर गोविंदराव अडकरांच्या वस्तू पडल्या होत्या. एक खबरदारीचा उपाय म्हणून त्याने एकूण एक साऱ्या खाटेखाली दडवून ठेवल्या. वर्तमानपत्रही गादीखाली ठेवून दिलं आणि, 'आलो!' अशी हाक देत, एकदा खोलीवरून नजर फिरवली आणि मग दाराचा बोल्ट सरकवला, दार उघडून बाहेर पाहिलं.
आणि आश्चर्य! दाराबाहेर गोवर्धनदास त्रिपाठी उभे होते!
संपूर्ण अनपेक्षित असे!
'वा! वा! त्रिपाठीजी! या ना आत!' अजय मागे सरत म्हणाला.
मागच्यासारखेच ते आत आले, पावलाभरावरच उभे राहून त्यांनी खोलीवरून नजर फिरवली. त्यांची काय काय दिसण्याची अपेक्षा होती आणि त्यांना ते दिसले का नाही याची त्यांच्या चेहऱ्यावरून काहीही कल्पना आली नाही आणि येणारच नाही. मुरलेला मुत्सद्दी गृहस्थ तो!
हातातली काठी दोन्ही हातात धरून सावकाश सावकाश फिरवीत त्यांनी अजयने दाखवलेली खुर्ची घेतली. दोन्ही पायात काठी उभी करून, मूठ दोन्ही हातात धरून, मुठीवर हनुवटी टेकवून ते अजयकडे एकटक पाहत होते.
'त्रिपाठीजी! या गरिबाच्या खोलीवर कशी काय पायधूळ लावलीत?' अजय त्याच त्या नकली अगत्याच्या आवाजात बोलत होता. 'राणीसाहबांकडून काही निरोप आहे का?'
'कर्नाटकी! अनाडीपणाचं सोंग आणू नका! तुम्हाला काय असं वाटलं का, की माझ्यापासून काही लपून राहील? तीन दिवसांपूर्वी तुम्ही पार्कमध्ये राणीसाहेबांची गाठ घेतली का नाही?
अजयच्या मनात विजेच्या वेगाने विचार येऊन गेले. म्हणजे या म्हाताऱ्याने प्रत्यक्ष राणीसाहेबांच्या हालचालीवरही पाळत ठेवली होती तर! त्याच्याबद्दलची अजयच्या मनातली नाराजी आणखी तीव्र झाली.
'त्रिपाठीजी! तुम्ही तर राणीसाहेबांच्या खास मर्जीतले कारभारी! तुमच्या सल्ल्यानेच राणीसाहेब वागत असणार, नाही का?'
'मला शब्दांचे खेळ नकोत, कर्नाटकी! राणीसाहेबांची कल्पना संपूर्ण अव्यवहारपणाची आहे, धोक्याची आहे हे मी त्यांना पटवून देण्याचा अटोकाट प्रयत्न केला; पण त्यांनी ते मानायला नकार दिला आहे आणि तुमच्यासारखे स्वार्थी, धनलाभाच्या आशेने काहीही करणारे लोक त्यांना आणखी भरीस घालतात!'
'मी?' अजयने खऱ्या नवलाने विचारले?
'हो, हो, तुम्ही! त्यांना उमगलं नाही तर तुम्हाला उमगायला हवं होतं, की ही कल्पना सपशेल फसणार आहे! तुम्ही का नाही नकार दिलात? भोळेपणाने त्यांनी खाजगीतल्या नाही नाही त्या गोष्टी तुमच्या कानावर घातल्या. काय खात्री देता येते, की तुम्ही त्या माहितीचा दुरुपयोग करणार नाही? राणीसाहेबांकडून पैसे उकळण्यासाठी वापरणार नाही? कुमारांचे कान फुंकून त्यांच्याकडून काही पदरात पाडून घेणार नाही? राणीसाहेबांच्या हातून थोडीशी गफलत झाली असेल; पण आमच्यासारखी काही नेक, इमानदार माणसं अजून जिवंत आहेत हे विसरू नका! त्यांच्या गफलतीचा फायदा आम्ही भलत्यासलत्याला उठवू देणार नाही!'
'तुमच्यासारखे एकनिष्ठ सहकारी लाभले आहेत हे राणीसाहेबांचं मोठं भाग्यच म्हणायचं!' आवाज शक्य तितका सरळ ठेवीत अजय म्हणाला; 'पण त्रिपाठीजी, मला एक सांगा, राणीसाहेबांना ज्या काही गोष्टींची काळजी वाटत आहे ती काळजी रास्त आहे का?'
'तुमच्यासारख्या फडतूस माणसाला राजघराण्यातल्या नाही नाही त्या गोष्टीत लुडबूड करायची काहीही गरज नाही!'
'कोणाच्या वागण्याचे आधी अंदाज बांधता येतात का? कोणी सांगावं कुमारांना ऐनवेळी शहाणपण सुचेलही! राणीसाहेबांना येत असलेल्या शंका शेवटी काल्पनिकच ठरतील!'
'तस झालं तर फारच छान! पण राणीसाहेबांची तशी खात्री नाही. तेव्हा त्रिपाठीजी, मी राणीसाहेबाना नकार देणार नाही!' आणि ते काही बोलण्याच्या आधीच हात वर करून त्यांना थांबवीत अजय म्हणाला, 'आणि

आणखी एक ऐका त्रिपाठीजी, जगात सर्वचजण स्वार्थी, नमकहराम असतात असं का धरून चालता? नि:स्वार्थी, दिल्या शब्दाला जागणारेही असतात!'
काठी जमिनीवर जोरात आपटत त्रिपाठी उभे राहिले. 'कर्नाटकी, मी एकदाच सांगितलं आहे, माझ्या नजरेआड काहीही होऊ शकत नाही आणि माझे हात फार लांबवरपर्यंत पोहोचतात, तेव्हा सांभाळून असा! विश्वासघाताचा विचारसुद्धा मनात आणू नका! गाठ माझ्याशी आहे!'
रागारागाने ते खोलीतून निघून गेले.
त्यांच्या भेटीचं अजयला नवल वाटलं नाही. त्यांनी आपली नाराजी जरा उघड करून दाखवली होती इतकंच.

***

अडकरांच्या भूमिकेसाठी त्याने अगदी कमीत कमी मेकअप आणि थोडा रंग इत्यादींचा वापर केला होता. मुख्य भर शारीरिक हालचाली, बोलण्यातल्या काही खास उच्चारांचा वापर यांवर होता. प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जायची वेळ झाली तोपर्यंत त्याने त्या भूमिकेची तासन्तास रंगीत तालीम केली होती आणि आता काही गफलती होणार नाहीत असा त्याला आत्मविश्वास होता. अर्थात तो अडकरांच्या भूमिकेत जसा वावरेल तेच लोकांना स्वीकारावं लागणार होतं, कारण इथे तुलनेचा प्रश्नच नव्हता.
मुलाखतीसाठी सकाळी दहा ते बारा अशी वेळ ठेवली होती.
सव्वादहाच्या सुमारास तो राजवाड्यावर पोहोचला.
दारवानास हातातलं वर्तमानपत्रातलं कात्रण दाखवताच त्याने अजयला तळमजल्यावरच्या एका दालनात नेलं. आत जवळजवळ तीस जण जमले होते.
इतके जण! त्याने मनाशी नवलाने विचार केला; पण लागलीच त्याला त्याचं कारणही उमगलं. राजघराण्यातल्या व्यक्ती आणि त्यांचं दैनंदिन जीवन याबद्दल सर्वसामान्यांच्या मनात विलक्षण कुतूहल असलं पाहिजे. या नोकरीच्या निमित्ताने राजघराण्यातील व्यक्तींचा निकटचा सहवास लाभणार होता, तेव्हा त्या संधीसाठी लोकांच्या उड्या पडल्या यात नवल काहीच नव्हतं.
तोही भिंतीशेजारच्या एका खुर्चीवर बसला.
तो खुर्चीवर बसताच एक गडी चहा आणि नाश्त्याची प्लेट घेऊन त्याच्यापाशी आला. अजयला दिसलं की प्रत्येकासाठीच ही सोय होती, तेव्हा त्याने ती प्लेट घेतली. प्लेटवरच कागदाचा चौकोन होता, वर क्रमांक होता आणि खाली नाव आणि त्यापुढे एक कोरी रेघ असं छापलं होतं. नावासाठीच्या रेषेवर 'गोविंदराव अडकर' लिहून त्याने कागद गड्याकडे परत दिला.
बहुधा क्रमांकाप्रमाणे एकेकास बोलावणं येत होतं आणि सुमारे दहा मिनिटात मुलाखत संपत होती. त्या लोकांना बहुधा तिथूनच बाहेर पोहोचवलं जात असावं, कारण त्यांच्यापैकी कोणीही परत खोलीत आलेला दिसला नाही.
'अडकर! अडकर! गोविंदराव अडकर!'
आपलंच नाव पुकारलं जात आहे हे ध्यानात यायला त्याला जरा वेळ लागला. मग तो लगबगीने उठून गड्यामागोमाग गेला. डावीकडे खोल्यांची रांग होती. त्यातल्या एका खोलीच्या दारासमोर गडी उभा राहिला होता आणि त्याने हातानेच अजयला आत जाण्याची खूण केली. दार उघडून अजयने खोलीत प्रवेश केला. खोली मध्यम आकाराची होती. समोरच मेज होतं, मेजासमोर दोन खुर्च्या होत्यामेजामागच्या खुर्चीवर राणीसाहेब बसल्या होत्या.
'याअडकर नाही का? बसा.'
त्याने मेजासमोरची खुर्ची घेतली. तो काहीच बोलला नाही. त्याच्या वेशांतराची ही एक कसोटीच होती.
'कागद आणले आहेत? द्या ना!' राणीसाहेब म्हणाल्या.
त्याने बॅगमधली फाईल काढली आणि ती टेबलावर ठेवली.
फाईलमध्ये एकच कागद होता आणि त्यावर एकच अक्षर लिहिलं होतं, ओंकार आणि अक्षराभोवती चौकट होती. फाईल उचलताच तिचा हलकेपणा त्यांना जाणवला. अजयकडे एकदा प्रश्नार्थक नजरेने पाहून त्यांनी फाईल उघडली. एक दोन क्षणच त्या थांबल्या आणि मग त्यांच्या हातातून फाईल खाली पडली आणि डाव्या हाताने तोंडाला पदर लावून त्यांनी आतून येणारं हास्य कसंतरी अडवलं.
'अजय...' त्या म्हणाल्या.
'नाही! नाही! अडकर!' तो हलक्या आवाजात म्हणाला.
'अडकर तर! कमाल आहे! ठीक आहे. मी त्या समितीला औपचारिक पत्र पाठवून तुमची निवड झाल्याचं

कळवते. आज किती तारीख आहे पंधरा, नाही का? वीस तारखेपासून कामावर रुजू व्हायचं पत्र आताच तुमच्या हाती देते. ठीक आहे?'
'हो.'
टेबलावरच्या पॅडवर त्यांनी आवश्यक तो मजकूर लिहिला आणि कागद त्याच्याकडे सारला. कागदाची घडी करून त्याने ती कोटाच्या खिशात ठेवली आणि टेबलावरची फाईल उचलून काहीही न बोलता तो खोलीबाहेर पडला.

***

4.

कुमारला जेव्हा जाग आली तेव्हा तो बाहेरच्या दिवाणखान्यात एका आरामशीर कोचावर अस्ताव्यस्त पडलेला होता. आदल्या रात्रीच्या प्रसंगापैकी अगदी काहीच, आणि तेही अगदी अंधुक अंधुक असे आठवत होते. पार्टी एक-दीडपर्यंत तरी चालली होती. त्याच्या दोन मित्रांनी जवळजवळ जबरदस्ती करूनच त्याला बाहेर काढले होते आणि गाडीत चढवले होते. त्यानंतरचं त्याला काही आठवतच नव्हतं.
कोचावर उठून बसताना डोक्यात वेदनेची अशी काही सणक आली की बस! तो कसातरी उठून बसला आणि डोळे मिटून शांत बसून राहिला.
खालच्या फरशीवर अनवाणी पावलांचा चट् चट् आवाज आला.
'कोण आहे?' कुमारने विचारलं.
'मी शिवबा, छोटे मालक.'
कुमार काहीच बोलला नाही.
'छोटे मालक, कॉफी आणलीय, ती घ्या.'
'कुमारने डोळे किलकिले करून समोर पाहिलं. प्रकाशाने त्याचे डोळे दिपूनच जात होते. शिवबाने पुढे केलेला कॉफीचा कप त्याने कसातरी हातात घेतला, तसाच तोंडाला लावला. कडक कॉफी. त्याला मागच्या अशा कितीतरी आठवणी आल्या. रात्र अपरात्र असो, पहाट असो-शिवबा आपला कडक कॉफी घेऊन हजर.
कुमारने कप खाली ठेवला.
'छोटे मालक...' शिवबा बोलायला लागताच कुमारने एक हात वर करून त्याला गप्प केलं.
'शिवबा, आता मला शांत बसू दे. मला माहीत आहे तू काय म्हणणार आहेस ते; पण आता नको.'
शिवबा काहीतरी बोलणार होता, पण कुमारचे तांबारलेले डोळे पाहून त्याने तोंड बंद केलं आणि कॉफीचा रिकामा कप घेऊन तो आत गेला; पण लागलीच तो घाईघाईने परत आला. जवळजवळ पळतच.
'छोटे मालक! छोटे मालक!' तो घाईघाईने बोलत होता.
'अं?' आळसावलेल्या आवाजात कुमार बोलला.
'राणीसाहेब येत आहेत! इकडेच येत आहेत!'
डोळे न उघडता कुमारने हातानेच त्याला जायची खूण केली. स्लीपर्सचा आवाज जवळ जवळ आला, त्याच्यापाशीच थांबला. नाकाला मंद सेंटचा सुगंध जाणवला. कुमारने डोळे उघडले.
राणीसाहेब समोरच उभ्या होत्या. त्याच्याकडे एकटक पाहत होत्या.
'मातोश्री! प्रणाम!' कुमार जरा नाटकी आवाजातच बोलला. 'झिंगून पडायचं होतं तर निदान तुझ्या खोलीत तरी जाऊन पडायचं होतं!' राणीसाहेबांचा आवाज संतापाने थरथरत होता. 'येथे, उघड्यावर, चारचौघांच्या नजरेसमोर तरी घराण्याची अब्रू काढू नकोस!'
'मातोश्री, दोन जानी दोस्त बरोबर होते म्हणून इथपर्यंत तरी पोहोचलो, नाहीतर रस्त्याकडेच्या गटारातच लोळत पडलो असतो! मातोश्री, जी गोष्ट राजवाड्यातल्या सर्वांना माहीत आहे ती आपल्या राज्यातल्या आम जनतेलाही माहीत झाली असती!'
राणीसाहेब संतापाने कुमारकडे पाहत उभ्या होत्या.
'आपल्या करारी नजरेखाली गणेगंपे चळचळा कापत असतील; पण माझ्यावर त्याचा काहीही परिणाम होणार नाही, मातोश्री!'
'माझ्याशी सरळ बोलायचंच नाही असा काही पण केला आहेस का तू कुमार? सदासर्वदा उपाहासानेच बोलायला हवं का?'
'एखाद्या हुजऱ्यासारखं, आश्रितासारखं, मान लववून लाचारीने बोललेलं आपल्याला आवडेल का राणीसाहेब?

एखाद्या लाडक्या लेकाने आपल्या प्रेय आइशी प्रेमाने बोलावं तसं मी बोलावं अशी आपली इच्छा असेल तर ते शक्य नाही! आपल्या दोघात कधीकाळी काही प्रेम असलंच तर ते केव्हाच आटून, वाळून, सुकून, जळून गेलं आहे... ज्यावेळी मला प्रेमाची, मायेची, ममतेची, आधाराची गरज होती तेव्हा आपण नव्हतात, मातोश्री!'
'राजेसाहेब असतानाची गोष्ट तू करीत असशील तर तू स्वत:ला फसवत आहेस. तुझ्या वागण्याचीच फळं तुला भोगावी लागत होती. तुला पाठीशी घालून, तुझ्या चुका लपवून, खोटं बोलून मी राजेसाहेबांची फसवणूक करायला हवी होती का? ते प्रेम नव्हे... ती आंधळी, निर्बुद्ध माया झाली असती.'
'स्वत:च्या वर्तनाचा बचाव करण्यासाठी प्रत्येकापाशी काही ना काही समर्थन असतंच! मातोश्री, ही चर्चा अनेक वेळा झाली आहे आणि त्यातून काहीही निष्पन्न झालेलं नाही. आपली जर काही खास आज्ञा नसेल तर कृपा करून मला विश्रांती घेऊ द्याल का?'
'कुमार, मी तुला पूर्वी सूचना केलीच होती. आता तुला मी इशारा देत आहे... अशा वागण्याचे परिणाम चांगले होणार नाहीत.'
राणीसाहेबांच्या आवाजातली नवीन धार कुमारला जाणवली असावी. एव्हाना मद्याची गुंगी उतरली होती. जरा सावध नजरेने वर पाहत तो हलकेच म्हणाला, 'समजा मी आपल्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केलं... काय होणार आहे?'
राणीसाहेबांच्या चेहऱ्यावर असा भाव होता, की त्या नको त्यावेळी नको ती गोष्ट बोलून गेल्या होत्या. काही न बोलता त्यांनी केवळ मान स्वत:शीच हलवली आणि त्या निघून गेल्या.
दूर दूर जाणाऱ्या त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे कुमार जरा विचारमग्न नजरेने पाहत होता. तो व्यसनी असला तरी मूर्ख नव्हता. भीतीने, रागाने तशीच अपमानाच्या जाणिवेने नजरेला एक तीक्ष्ण धार येत असावी. आतापर्यंत राणीसाहेबांनी त्याला अशी जवळजवळ प्रच्छन्न धमकी कधीही दिली नव्हती. त्याला मनोमन अशी शंका येत होती, की आपण आपल्या आईचं केवळ बाह्य रूपच पाहिलं आहे. मृदूभाषी, संयमी, आपल्या वडिलांच्या, राजेसाहेबांच्या, ज्या काही आठवणी त्याच्या मेंदूत होत्या, त्यात राजेसाहेब सदासर्वदा आग्रही, कठोर, सडेतोड, प्रसंगी निष्ठुरही होते; पण राणीसाहेबांनी त्यांना व्यवस्थित हाताळलं असलंच पाहिजे. त्या दोघांच्यात कधी वादावादी किंवा हमरीतुमरी झाल्याचं त्याला आठवत नव्हतं. तेव्हा राणीसाहेबांच्या या वरवरच्या मुलायम, प्रेमळ, गोंडस, मधुरभाषी वेष्टणाच्या आत एक कठोर, निर्धारी गाभा असलाच पाहिजे. वेळप्रसंग आला तर उपयोगात आणण्यासाठी त्यालाही आपल्या बचावाचे काही मार्ग शोधून ठेवलेच पाहिजेत.
आधीची कडक कॉफी आणि नंतरचं हे विचारमंथन.
मद्याची गुंगी एव्हाना पार उतरली होती.
त्याच्या पाच-सहा खोल्यांच्या स्वतंत्र विभागाकडे तो निघाला. त्याने त्या खोल्या मुद्दाम निवडल्या होत्या. एक तर राणीसाहेबांच्या वापरातल्या खोल्यांपासून त्या जास्तीत जास्त दूर होत्या; आणि राजवाड्याच्या आत-बाहेर जाण्याच्या दृष्टीने सोयीच्या होत्या. त्याच्या भेटीस येणाऱ्या व्यक्ती चारचौघांच्या नजरेस पडणं म्हणजे जराशी तोहमतच.

***

राणीसाहेब मोठ्या व्हरांड्याच्या टोकाशी आल्या. वरच्या मजल्याकडे जाणारा प्रशस्त जिना तिथून वळून वर जात होता आणि त्या जिन्याच्या वळणावरच गायत्री उभी होती. आपल्या रूपाची, इतरांच्या, विशेषत: वयाने वीस वर्षांहूनही लहान असलेल्या स्त्रीच्या रूपाशी तुलना करण्याचा मूढ बालिशपणा त्यांच्या हातून होणं अर्थात अशक्य होतं; पण त्यांच्या मनात एवढं येऊन गेलंआपणही तरुणपणी असेच सुंदर दिसत असलो पाहिजेकेवळ त्या सौंदर्यावर भाळूनच राजेसाहेबांनी त्यांची निवड केली होतीभले का त्यांचं घराणं अगदी सामान्य मध्यमवर्गीय असेना. त्यांच्या घराण्यातच हा सौंदर्याचा स्रोत असला पाहिजे. कोणत्या अज्ञात मार्गाने तेच सौंदर्य गायत्रीमध्ये, त्यांच्या मावसभावाच्या मुलीमध्ये प्रगट झालं होतं आणि त्या सौंदर्याला बुद्धिमत्तेची, शालिनतेची, कृतज्ञतेची सोनेरी झालर होती. आपल्यातील या सर्व गुणांची जाणीव असूनही गायत्रीच्या स्वभावात कोठेही गर्विष्ठपणा नव्हता, मात्र स्वाभिमान अवश्य होता. अशा या गुणसंपन्न मुलीचा विवाह कुमारशी होणार होता. सुरुवातीस राणीसाहेबांची ती मनीषा होती खरी; पण आता त्यांना आपल्या त्या कृत्याबद्दल मनातल्या मनात जरासा पश्चात्ताप व्हायला लागला होता. कारण गायत्रीचं आयुष्य सुखी होईलच याची शाश्वती देता येत नव्हती. संपती आणि मानमरातब यात कधीही कमी पडणार नव्हतं; पण-
'गायत्री! इतक्या लवकर कुठे निघालीस?'

‘आत्या, खरं सांगू का? विसरूनच गेले बघ! जिन्यावरून खाली आले आणि समोरच कुमार दिसला. शिवबाने त्याला नुकताच कोचावर आणून झोपवला होता आणि आत्या, तुमची दोघांची भेटही मी इथून पाहिली.’
‘त्याच्यात दिवसेंदिवस बिघाडच होत चालला आहे, नाही?’
‘हं.’
‘तुझ्याशी कधी काही बोलतो तरी का?’
‘माझ्याशी जरा सांभाळूनच असतो.’
राणीसाहेबांना त्यामागचं कारण माहीत होतं. कुमारच्या मित्रांपैकी एकाने गायत्रीशी (दारूच्या प्रभावाखाली; नाहीतर त्याने असं केलंच नसतं) जरा अतिप्रसंग केला होता. गायत्रीने त्याचा असा काही समाचार घेतला होता, की तो (आणि त्याचे सहकारी) ती आठवण जन्मभर विसरणार नव्हते.
‘गायत्री, या विषयावर मी तुझ्याशी मागं बोललेच आहे; पण आता पुन्हा बोलायची वेळ आली आहे. मागे तू म्हणाली होतीस, कदाचित त्याच्यात सुधारणा होईल; पण गायत्री, सुधारणा होण्याऐवजी त्याचं वागणं दिवसेंदिवस बिघडतच चाललं आहे; आणि त्याच्या वागण्यात एक नवाच मगरूरपणा यायला लागला आहे. त्याच्या वडिलांच्याबद्दल त्याच्या मनात काही राग असला तर तो समजू शकतो-राग समर्थनीय नसला तरी त्यामागे काहीतरी कारण दाखवता येतं-माझ्याशी तो असा का वागतो?’
राणीसाहेबांपेक्षा गायत्री वीसहून अधिक वर्षांनी लहान होती. पुढच्या पिढीची प्रतिनिधी होती आणि क्वचितप्रसंगी काही काही गोष्टी तिच्या कानावरही आल्या होत्या. ती आता म्हणाली,
‘आत्या, कुमारचा जो मित्रांचा ग्रुप आहे त्यात काही काही स्वार्थी, मतलबी, बुभुक्षित आहेत, स्वत:च्या स्वार्थासाठी त्यांच्यापैकी काही काहींनी कुमारला भडकावण्याचा प्रयत्न केला असला, तर त्यात नवल वाटायला नको आणि अर्ग्युमेंट किती सोपं आहे! अरे, तू एवढा मोठा झालास, सज्ञान झालास, ही संस्थानं विलीन झाली नसती तर राजपुत्रच झाला असतास! पण तुझ्या हातात काही सत्ता आहे का? त्या बाईच्या मर्जीवर तुला चालावं लागतंतिच्या तालावर नाचावं लागतंती तुझ्यासमोर जे काय चारदोन तुकडे फेकील त्यावर समाधान मानावं लागतं! आत्या, असं झालं असेलच असं मी म्हणत नाही;पण होणं अशक्य नाही.’
दोघी मोठ्या जिन्याने वर गेल्या. गायत्रीच्या वापरासाठी त्या मजल्यावर तीन मोठमोठ्या खोल्या होत्या. खोलीत जाता जाता राणीसाहेब म्हणाल्या, ‘गायत्री, समजा तू म्हणतेस तसं झालं असलंत्याच्या वागण्याची अगदी तर्कशुद्ध संगती लागलीया सगळ्या कोरड्या तात्त्विक चर्चेचा उपयोग काय आहे? त्याचं वागणं बदलणार आहे का? मी तुला पुन्हा एकदा सांगतेमागच्या पिढीतल्या आणाभाका काय असतील त्या असोतते काही कायदेशीर करार नाहीतते काही कोणावर बंधनकारक नाहीततू जर तुझं मत बदलवलंस तर मी तुला कोणताही बोल लावणार नाही.’
जराशी हसत गायत्री म्हणाली, ‘आत्या, कुमारही त्या जुन्या आणाभाका फारसा गंभीरपणे घेत असावा असं मला वाटत नाही. तो मला लहानपणापासून पाहत आहे. त्याला माहीत आहे, कोणाच्या हातचं मेणाचं बाहुलं बनून राहण्याचा माझा स्वभावच नाही, तेव्हा पाहू या काय काय होतं ते. डोळे मिटून आंधळेपणाने पाऊल टाकणारांपैकी मी नाही, तू काळजी करू नकोस.’

***

5.

गोविंदराव अडकर याच भूमिकेत अजय सावकाश सावकाश चालत राजवाड्याबाहेर पडला. ग्रंथपालाची नोकरी तर मिळाली होती; पण त्याला तर त्या विषयाचं जरासुद्धा ज्ञान नव्हतं. त्याच्या अडाणीपणामुळे त्याचं ढोंग उघडकीला आलं तर त्याला दोनचार अपशब्द ऐकून घ्यावे लागतील. त्याने काही त्याच्या शरीराला जखमा होणार नव्हत्या; पण राणीसाहेबांना त्याने शब्द दिला होता आणि त्यांनी त्याच्यावर विश्वास टाकला होता. त्या विश्वासाला त्याला सार्थ ठरवावं लागणार होतं, म्हणजे त्या व्यवसायाची नीट माहिती करून घेऊन ग्रंथपालाची भूमिका खरोखर, प्रत्यक्षात वठवावी लागणार होती. पुढचे तीन-चार दिवस त्याला याच कामात खर्च करावे लागणार होते.
काही पुस्तकं घ्यावी लागतील. मुख्य म्हणजे राणीसाहेबांनी दिलेले पैसे संपले होते आणि आता त्यांच्याशी संपर्क कसा साधायचा हा प्रश्नच होता. मुलाखतीच्या वेळीच त्याने सांगितलं असतं तर त्यांनी तिथल्या तिथे त्याची सोय केली असती. मग त्याला आठवलं राजवाड्याच्या मोठ्या गेटबाहेर एका खांबाला एक मोठी लाल रंगाची पेटी बसवली होती. ही प्रथा फार फार जुनी होती. प्रजाननांपैकी कोणाचेही अर्ज, विनंत्या, तक्रारी,

इत्यादी त्या पेटीत टाकले जात. खरोखरीच त्याचा उपयोग होत होता की नाही त्याला कल्पना नव्हती; पण एक प्रयत्न करायला हरकत नव्हती. त्याने एक साधं पाकीट विकत घेतलं. ज्या कागदाच्या चौकोनावर ओंकार ही अक्षरे लिहिली होती त्याच्याच खाली 'मागे पाहा'अशी टीप घातली आणि कागदाच्या मागच्या बाजूस,
'पैशांची निकड आहे.'
एवढी एकच ओळ लिहिली. पाकीट बंद करून त्याने ते त्या पेटीत टाकले. वीस तारखेला पाचच दिवस राहिले होते. या केवळ पाच दिवसांत काय काय जमणार होतं देवासच माहीत!
अजयला माहीत नव्हतं की, ती बाहेर खांबाला लावलेली पेटीही एक पोकळ, अर्थशून्य रूढी नव्हती. दररोज दुपारी बारा वाजता आणि रात्री आठ वाजता पेटी उघडली जायची आणि आत जे काही कागद असतील ते एका अधिकाऱ्याकडे पोहोचते केले जायचे. मजकुराप्रमाणे कागदांचे गठ्ठे करून त्यांची पुढे योग्य ठिकाणी रवानगी होत असे. राजेसाहेबांना एकेकाळी (विलीनीकरणाच्या आधी) संपूर्ण अधिकार होते; पण अजूनही या तक्रारी किंवा सूचनाविनंत्या संपूर्ण निरर्थक नव्हत्या; पण राजेसाहेबांच्या वेळेपासून एक कडक नियम होता. प्रत्येक पत्राची नोंद व्हायलाच हवी आणि पत्रलेखकाला किंवा अर्जदाराला उत्तर जायलाच हवं. तो शिरस्ता आजही पाळला जात होता आणि शेवटचा शब्द अर्थात राणीसाहेबांचा होता. रुटीन पत्रांची वासलात लागल्यानंतर अर्थात काही पत्रं अशी उरत, की त्यांचा निर्णय राणीसाहेबांनाच घ्यावा लागे, अशी शेलकी पत्रं शेवटी त्यांच्या टेबलावर येऊन पोहोचत.
एक वाजता भोजनास जाण्याच्या आधी या अशा पत्रांवर नजर टाकण्याचा त्यांचा शिस्ता होता. पत्रं चाळता चाळता राणीसाहेबांच्या समोर एकदम तो कागद आला. एका चौकोटीत लिहिलेला एकच शब्द ओंकार आणि खाली टीपमागे पाहा आणि मागे एकच तुटक वाक्य.
पैशांची निकड आहे.
अर्थात अजय; पण तो सकाळी मुलाखतीच्या निमित्ताने भेट झालेली असताना हे का बोलला नाही? ती मुलाखत आठवली की अजूनही त्यांना जरासं हसू येत होतं. त्याच्या अंगी वेगवेगळ्या भूमिका वठवण्याची कला आहे एवढंच त्याने त्या मार्गाने दाखवून दिलं होतं. अर्थात त्याच्याकडे पैसे पोहोचवायलाच हवे होते; पण कोणतीही गोष्ट
षट्कर्णी होऊ न देण्याचा त्याचा इशारा त्यांना आठवला आणि तो योग्यच होता.
त्यांच्याजवळ त्याचा पत्ता होता. (तीही त्याचीच कल्पना!)
फोनवरून त्यांनी त्या पत्त्यावर तार केली. शब्द मोजकेच होते.
'ओंकार, प्रताप पार्क. संध्याकाळी सहा वाजता.'

***

तार अजयला दुपारी तीनलाच मिळाली होती आणि पाचच्या सुमारासच तो पार्कच्या मागच्या भागात जाऊन बसला होता. असे कानाकोपऱ्यातून, झाडांमागे एका बाजूला बसणारे कितीतरी लोक होते. त्यामुळे तो तासभर तिथे बसला तरी कोणीही त्याच्याकडे लक्ष देणार नव्हते. आपल्या पत्राला आलेला तो अनपेक्षित आणि शीघ्र प्रतिसाद आश्चर्यकारक तसाच आनंददायकही होता. कोणासही संशय न येता संदेशन करण्याचा हा मार्ग होताचोरून छपून नाही, तर राजरोसपणे, सर्वांच्या नजरेसमोर.
ते त्रिपाठी राणीसाहेबांच्या हालचालींवर कदाचित नजर ठेवत असतीलही; पण त्याची आणि राणीसाहेबांची भेट झालेली त्यांच्या कानावर गेली तरी त्यांना त्यात आश्चर्य काहीच वाटणार नाहीराग येईल कदाचित. जोपर्यंत त्यांच्यातलं बोलणं गुप्त राहत होतं तोपर्यंत पार्कसारख्या जागी त्यांना भेटण्यात काहीच अडचण नव्हती.
बरोबर सहा वाजता राणीसाहेब तिथे येऊन पोहोचल्या.
त्या सरळ बाकापाशी आल्या आणि बाकावर बसल्या.
मिनिटाभरात अजय त्यांच्याशेजारी येऊन बसला.
'राणीसाहेब, तुम्हाला विनाकारण तसदी घ्यायला लावली याची मी माफी मागतो. आपली मुलाखत संपल्यानंतर बाहेर आल्यावर मग माझ्या ध्यानात आलं की, माझ्याजवळचे पैसे संपलेत. या अडकरांच्यासाठी सगळीच नवीन खरेदी करावी लागली. कोट, पँट, शर्ट, चष्मा, बॅग...'
'अजय, मी तुला हिशेब विचारला आहे का?'
'नाही'पण कल्पना देणं माझं कर्तव्य आहे. राणीसाहेब, काही काही गोष्टी माझ्या ध्यानात मागाहून आल्या

आहेत. कुमारांना गाडी चालवता येत होती ना?'
'अर्थात.'
'मग ते मला शिकावं लागेल. आणखी कोणकोणत्या कला त्यांनी आत्मसात केल्या होत्या? राणीसाहेब, त्यांची भूमिका वठवायची म्हणजे ते जे जे काही करीत असत ते ते मला यायलाच हवं.'
'तुझं'म्हणणं खरं आहे. राजेसाहेबांना मागे लागून लागून त्याला घोड्यावर बसायला शिकवलं होतं. त्याला पिस्तूल आणि बंदूकरायफल वापरायला शिकवलं होतं. डान्सच्या क्लासला घालून त्याला पाश्चिमात्य डान्सही शिकवले होतं. बिलीयर्ड, गोल्फ हेही खेळ तो खेळत असे... त्यात मोठं प्रावीण्य नव्हतं; पण तो खेळत असे.'
'बापरे, बापरे! केवढी यादी!' मान हलवत अजय म्हणाला. 'पण इलाज नाहीमला हे सर्व यायलाच हवंही थोडीशी कल्पना होती म्हणूनच पैशासंबंधात आपल्यापर्यंत शब्द पाठवला.'
'अजय, मी आता दहा हजार रुपये आणले आहेत. ते मी इथे ठेवून जाणार आहे. काही निरोप पाठवायचे असतील तर आता सोपा मार्ग उपलब्ध आहे. पूर्वीही मी लायब्ररीतून पुस्तके मागवून घेत असेत्या पुस्तकात तू तुझा निरोप ठेवू शकतोस. पान शंभर आणि एकशेएक यांच्यामध्ये कागद ठेवत जा.'
त्यालाही ती कल्पना पसंत पडली.
'मी आता निघते;' राणीसाहेब म्हणाल्या.
एकदा अजयला वाटलं की, ते गोवर्धनदास त्रिपाठी त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवायलासुद्धा मागेपुढे पाहत नाहीत; पण मग त्याला पटलं, ते सांगणं चूक झालं असतं. राणीसाहेब अनुभवी होत्या. त्यांना माणसांची पारख पुरेपूर होती. आधीच या कुमारची त्यांच्यामागे काळजी होतीत्यात भर घालण्याची आवश्यकता नव्हती आणि हे त्रिपाठी खरोखरच अशी नजर ठेवत असतील तर ही काही नव्याने घडलेली घटना नव्हतीत्यांच्या राजवाड्यातल्या राजकारणाचाच तो एक भाग होता. त्याच्यामुळे राणीसाहेबांना त्रास होणार नाही याची काळजी त्याने स्वत: घ्यायची होती.
त्याने त्यांना नमस्कार करून त्यांचा निरोप घेतला.
मागे त्यांनी बाकावर पैशांचं करड्या रंगाचं पाकीट ठेवलं होतं.
ते झब्ब्याच्या खिशात घालून अजय काही वेळ पार्कमध्येच चकरा मारीत राहिला आणि अर्ध्या एक तासानंतर बाहेर पडला.

***

आपण राणीसाहेबांना नकार दिलेला नाही ही गोष्ट त्रिपाठींच्या कानावर आपण घातली आहे, तेव्हा ते आपल्या हालचालीवर बारकाईने नजर ठेवणार ही गोष्ट त्याला कोणत्याही क्षणी विसरून चालणार नव्हती. गाफील राहून चालणार नव्हतं. काही काही गोष्टी तो उघडपणे करू शकत होता आणि त्याला फार कमी वेळ उपलब्ध होता. जे काम मोठ्या विश्वासाने राणीसाहेबांनी त्याच्यावर सोपवलं होतं ते तो त्याच्यापरीने प्रयत्नांची पराकाष्ठा करून पूर्ण करणार होता. त्यासाठी वेळेची वा श्रमांची पर्वा करणार नव्हता.
कुमारला अवगत असलेल्या सर्व कला हस्तगत करणं खरोखरच आवश्यक होतं. त्यात प्रावीण्य मिळवणं अर्थात कठीण आणि अशक्य होतं, पण निदान तो नवशिका तरी दिसायला नको होता.
शहरात स्पोर्ट क्लब होते, रायफल क्लब होते, जिमखाना होता; पण या सर्व संस्था उच्च वर्गातील यशस्वी लोकांसाठी होत्या. या संस्थांत प्रवेश मिळवण्यासाठी तरी त्याला राणीसाहेबांच्या शब्दाचा उपयोग करावाच लागणार होता.
या मधल्या तीन-चार दिवसांत त्याला नंतर जे काम करायचं होतंलायब्ररीयनचंत्याबद्दल माहिती मिळवली. त्याला या गोष्टीचं आश्चर्य वाटलं, की या विषयाकरिता युनिव्हर्सिटीचे कोर्सेस आहेत. त्यात डिप्लोमा आहेत. त्या विषयावर शेकड्यांनी पुस्तकं लिहिली गेली आहेत. त्या पुस्तकांपैकी अगदी प्राथमिक श्रेणीची एक-दोन पुस्तके त्याने विकत आणली आणि वाचली.

***

एकोणावीस तारखेस संध्याकाळी आपलं सामान घेऊन अजय राजवाड्यावर हजर झाला. गेस्ट हाऊसची व्यवस्था पाहण्याचं काम ज्याच्याकडे होतं त्याला अजयच्या नेमणुकीची कल्पना देण्यात आली होती. त्याने अजयसाठी दोन खोल्या तयार ठेवल्या होत्या. गेस्टहाऊसमध्ये अ, ब आणि क अशी वर्गवारी होती. अ वर्ग-तीन खोल्या, ब वर्गदोन खोल्या. क वर्गएक खोली. अजयने सामान खोलीत ठेवले. गेस्ट हाऊस म्हणजे तीन मजली, यू आकाराची मोठी इमारत होती. सुदैवाने त्याला मागच्या बाजूच्या, फाटकाजवळच्या खोल्या मिळाल्या होत्या. एक खोली झोपण्यासाठी होती. पलंग, गादी, उशी, शाल, चादर सर्व होतं. बाहेरची खोली

बसण्या उठण्याची होती. एक कामाचं टेबल, तीन साध्या लाकडी आरामखुर्च्या, एक गोल मेज, एक रॅक. भिंतीपाशी एक मोठं आरशाचं कपाट. मागच्या बाजूला एक छोटी बेसिन आणि बाथरूम होती. चहा, जेवण, नाश्ता इत्यादीची काय सोय होती याची चौकशी करायला हवी होती.
खालच्या मजल्यावर शोधता शोधता त्याला कार्यालय दिसलं. तो मघाचाच गृहस्थ टेबलामागे बसला होता. अजय खोलीत येऊन त्याच्या टेबलासमोरच्या खुर्चीवर बसेपर्यंत त्याने काही दखलही घेतली नाही.
'नमस्कार,' अजय म्हणाला. 'माझं नाव अडकर.'
'हो, माहीत आहे.' थंड प्रतिसाद.
'माझी वाचनालयात नेमणूक झाली आहे.'
'माहीत आहे.' तोच थंड प्रतिसाद.
'खोल्या छान आहेत. सर्व सोयी आहेत; पण चहा वगैरेची काय व्यवस्था आहे?'
'एक रुपया, दोन रुपये, पाच रुपये, दहा रुपये अशा किमतीची कुपनं विकत मिळतात. याच मजल्यावर मागच्या बाजूला बोर्डिंग आहे. तिथे तुम्ही चहा, नाश्ता, जेवण इत्यादीसाठी कुपनं वापरू शकता. कुपनं इथेच, माझ्याकडे विकत मिळतात.'
'हे छान आहे,' अजय म्हणाला आणि त्याने पंचवीस रुपयांची कुपनं खरेदी केली. ही व्यवस्था त्याला खरोखरच आदर्श वाटली. कोठेही मक्तेदारी नाही, लाल फीत नाही, वशिलेबाजी नाही.
पहिल्याच भेटीत जास्त चौकशा करणं योग्य दिसणार नाही हे जाणून त्याने त्या गृहस्थांचाज्याचं नाव टेबलावरच्या एका त्रिकोणी पट्टीवर श्री. देखणेदाखवलं होतंनिरोप घेतला.

***

आठच्या सुमारस तो बोर्डिंग विभागाकडे गेला. सर्वत्र विलक्षण स्वच्छता होती. एका मोठ्या फळ्यावर सर्व खाद्यपदार्थांचे दर लिहिले होते. प्रत्येकाला काहीही निवडण्याचं स्वातंत्र्य होतं. चाळीस माणसांची एका वेळेस सोय होण्यासारखी व्यवस्था होती; पण आता सुमारे वीस मंडळी जेवण घेत होती. एका बाजूला एक मोठं लाकडी टेबल होतं, त्यावर एका बाजूला ताट, वाट्या, भांडी, चमचे रचून ठेवले होते. टेबलामागे दोघे उभे होते. टेबलापाशी उभं राहून लोक आपली ऑर्डर देत होते, हिशेबाप्रमाणे कूपन देत होते आणि स्वत:चं ताट घेऊन हव्या त्या टेबलापाशी बसत होते. अजयनं त्यांचंच अनुकरण केलं. साधारण पंधरा रुपयांत पोटभर जेवण होत होतं. पदार्थ फॅन्सी नसले तरी चवीस ठीक होते. आपले ताट घेऊन अजय एका कोपऱ्यातल्या टेबलापाशी भिंतीला पाठ लावून बसला. प्रत्येक टेबलावर चारचार पाण्याचे भरलेले ग्लास होते. तेवढे मात्र एक मुलगा मधूनमधून भरत होता, मोकळ्या टेबलावरून उचलून नेत होता. बसल्या जागेवरून अजयला खोलीतल्या सर्व लोकांचं सहजच निरीक्षण करता येत होतं.
टेबलापाशी बसून पाच-सात मिनिटे होतात तोच आणखी एकजण ताट घेऊन अजयच्याच टेबलापाशी आला. वास्तविक आणखी तीन तरी टेबलं रिकामी होती. टेबलापाशी उभं राहत तो गृहस्थ म्हणाला,
'बसू इथे? तुमची काही हरकत नाही ना?
'बसा की!' अजय किंचित घोगऱ्या आवाजात बोलला, तो आवाज त्याने अडकरांचा म्हणून ठरवला होता, 'ही काय खाजगी जागा थोडीच आहे?'
'नाहीकाहींना आवडतंकाहींना आवडत नाही'
'मी न आवडणारांपैकी नाही,' अजय म्हणाला, 'उलट तुम्ही इथे येऊन बसलात याचा मला आनंदच झाला आहे. त्याचं काय आहे, मी इथे नवखा आहे. म्हणजे आजचएवढ्यातचआलो आहे.'
'खरंतर त्यासाठीच इथे आलोचेहरा नवीन दिसला.'
सुरुवातीला अजयला आलेली शंकाच खरी होती. हा गृहस्थ योगायोगाने इथे आला नव्हता. त्याची माहिती काढण्यासाठीच आला होता. मग त्याला त्या आपल्या विचाराचं हसू आलं. त्याने एका छोट्याशा कटात सहभागी व्हायचं ठरवलं होतं ही गोष्ट खरी होती; पण त्याचा अर्थ असा नव्हता, की तो एखाद्या क्लोकअँडडॅगर प्रकारच्या मोठ्या रहस्यमय कारस्थानात सहभागी झाला होता. तेही शेवटी मनाचं एक स्वप्नरंजनच होतं किंवा सतत मनात नाटकाचेच विचार घोळत असल्याने प्रत्येक घटनेलाच एक नाटकी रंग देण्याची मनाची प्रवृतीच झाली होती; पण मग त्याला वाटलंसमजा आपली अटकळ चूक आहे, हा खरोखच एक साधा, सहवासाच्या इच्छेने आलेला असामी आहे; पण तो प्रतिपक्षाचा जासूस आहे, आपल्याबद्दल माहिती काढण्यासाठी आला आहे अशी कल्पना करायला काय हरकत होती? दिवसाच्या प्रखर उन्हात खोलीतले सगळे दिवे लावले की, प्रत्येक वस्तूला एक वेगळी मिती येते, तसंच आता या दुहेरी कोनांपुढे

प्रत्येक शब्दाची रंगत वाढणार होती. अजयने गप्प राहायचं ठरवलं.
काही वेळाने तो गृहस्थ म्हणाला, 'राजवाड्यावर काही काम असलं आणि ते झालं नाही तर लोक इथे एक-दोन दिवस मुक्काम करतात. राजवाड्यात नोकरीवर असणाऱ्यानाही इथे जागा दिली जाते.'
'मग मी दुसऱ्या वर्गातला आहे.' अजय हसत म्हणाला. 'माझं नाव अडकरगोविंदराव अडकर. उद्यापासून मी राजवाड्यातल्या वाचनालयाचा ग्रंथपाल म्हणून काम पाहायला सुरुवात करणार आहे.'
यावर त्या गृहस्थाची काहीच टीकाटिपणी झाली नाही.
'आता तुम्ही सांगातुम्ही कोणत्या वर्गातले आहात?' अजयने विचारलं.
हात हवेत हलवत तो गृहस्थ म्हणाला, 'राजवाड्यात नोकरी मिळण्याचं आमचं भाग्य कोठलं हो! लोकांची राजवाड्यावर काही काही बिलं थकलेली असतातत्यांच्या वसुलीचं काम मी करतोअर्थात माझं कमिशन असतंच; पण आज बरेच दिवस करीत असल्याने राजवाड्यात ओळखी झाल्याहेतत्याचा फायदा होतो.'
त्या गृहस्थाने आपलं नाव सांगितलं नाही हे अजयच्या ध्यानात आलं; पण ती गोष्ट त्याने रेटली नाही.

***

6.

नव्या जागेतली ती पाहिली रात्रअजय केवळ एखाद्या हॉटेलमध्ये किंवा परगावी गेला असता तर त्याला त्याचं काही वाटलं नसतं. इथे केवळ जागा नवी नव्हतीत्याची भूमिकाच नवी होती. इथे राहायला येऊन त्याने एक रेषा ओलांडली होती आणि प्रकरणात प्रत्यक्ष भाग घेतला होता. उद्यापासून त्याच्या नव्या आयुष्याची सुरुवात होणार होती.
त्याची शहरातली खोली मध्यवस्तीत होती आणि तिथे आसपास अगदी पहाटेपासूनच माणसांच्या वावराचे आवाज कानी पडायला लागत. दूधवाले, पेपरवाले गिऱ्हाईकांना हाकारा देत; जिन्यावरून दाणदाण आवाज करीत चढउतार करीत, कित्येक घरांच्या घंटा खणखणत, पहाटेच लवकर कामाला जाणाऱ्याच्या स्कूटर्स, गाड्या यांची घरघर कानावर येई. तेव्हा साडेपाचच्या सुमारास जाग यायची त्याला सवयच झाली होती. तसाच या नव्या जागेतही तो जागा झाला. पण आसपासचा परिसर संपूर्ण शांत होता. कोणतीही वर्दळ नव्हती.
आठ वाजता वाचनालय उघडत असे. त्याआधी त्याला अंघोळनाश्ता इत्यादी सर्व उरकून घ्यावं लागणार होतं. एक संपूर्ण नवा अनुभव. आजपर्यंत त्याने कोठेही नोकरी केली नव्हती. आजपर्यंत घड्याळाच्या वेळा पाळण्याचं बंधन कधीही जाणवलं नव्हतं. मनाचा तसा कल असता तर कोठेही दहा ते पाच अशी नोकरी करून गुजराण झाली असती; पण मनातल्या मनात त्याला ही घड्याळाची गुलामगिरी पसंत नव्हती. मनातल्या मनात त्याला हा काळ म्हणजे अस्वलाला साखळीने फिरवणाऱ्या दरवेशासारखाच वाटायचा आणि आताही घड्याळाच्या काट्याशी शर्यत होती ती गोविंदराव अडकरांची, अजय कर्नाटकीची नाही.
बाथरूममधल्या नळाचं पाणी गारेगार होतं. या पाण्याने दाढीही नीट व्हायची नाही आणि स्नान तर नाहीच नाही. दाढीच्या पाण्याचा मग घेऊन तो खाली कँटीनमध्ये गेला. तिथे एव्हानाच स्वयंपाक सुरू झाला होता. साडेसहा वाजल्यापासून नाश्ता सुरू होत असे. अजयने चहा घेतला, आतून मगभर उकळतं पाणी घेतलं आणि गरम पाण्याची चौकशी करताच त्याला समजलं की, रुपयात बादलीभर गरम पाणी मिळण्याची सोय होती.
साडेसात वाजता कोटपँटीतले अडकर हातात रेक्झीनची बॅग घेऊन कँटीनबाहेर पडले.

***

वाचनालय गेस्टहाऊसपासून जवळच होते. राजवाड्याचा मागचा भाग याच कामासाठी राखून ठेवला होता. तिकडे जाण्यायेण्यासाठी कंपाऊंडच्या मागच्या भिंतीत एक दारही होतं. पाच-सात मिनिटांत ते मधलं अंतर ओलांडून अजय ज्या भागात वाचनालय होतं त्या व्हरांड्यात पोहोचला. शेवटच्या खोलीच्या दाराच्या वरच्या बाजूला भिंतीवर एक जुनी पाटी लावलेली होती. काळ्या बोर्डवर पांढऱ्या रंगाच्या अक्षरात मजकूर होता
जनता वाचनालय
वेळ: सकाळी 8 ते 10 सायंकाळी 6 ते 8.
खालचा दरवाजा बंद होता.
किल्ल्या कोणाकडे असतात, त्याला त्या रोज आणाव्या लागणार आहेत, की त्याच्यापाशीच राहणार आहेत, साफसफाईसाठी कोणा कामगाराची नेमणूक झाली आहे की नाही... अजयला कशाचीच कल्पना नव्हती.
आठ वाजेपर्यंत तो दाराबाहेर थांबणार होता आणि तोपर्यंतही काही हालचाल दिसली नाही, तर मग पुढे

चौकशी करणार होता; पण तो वेळ आलीच नाही. आठला पाच-सात मिनिटं कमी असतानाच पन्नाशीच्या सुमाराचा एक गडी हातात किल्ल्यांचा जुडगा खुळखुळ वाजवीत व्हरांड्यातली एकामागून एक सर्व दारं उघडीत आला. वाचनालयाचं दारही त्याने उघडलं, आणि दार उघडं ठेवून तो अजयकडे वळून पाहत म्हणाला,
'मास्तर अजून आले नाहीत, तोवर थांबा.'
'मास्तर म्हणजे?'
'मास्तर म्हणजे मास्तर! पुस्तकांचं देणंघेणं बघतात ते!'
'अरे मग मीच मास्तर!' अजय हसत म्हणाला.
'काय म्हणता?'
'हो आजपासून मी कामावर रुजू होणार आहे. नाव अडकर.'
'असं करा, तुम्ही इथेच थांबा. मी वर चौकशी करून येतो.'
अजय तिथेच व्हरांड्याच्या पॅरॅपेटला टेकून उभा राहिला.
पाच-सात मिनिटांतच तो गडी लगबगीने परत आला.
'अडकर म्हणालात नाही का? या मास्तरया.'
अजय त्याच्या मागोमाग आत गेला. वाचनालय म्हणजे पंधरा बाय चाळीस या आकाराचा एक प्रशस्त हॉल होता. तीन बाजूंनी उघड्या रॅकमध्ये हजारो पुस्तकं रचलेली होती. मधल्या भागात एक लांबच लांब टेबल होतं आणि त्याच्याभेवती दोन्ही बाजूंनी सुमारे वीस खुर्च्या मांडलेल्या होत्या. दाराच्या आतच उजव्या हाताला एका लाकडी कठड्यामागे सुमारे दहा बाय दहाची जागा बंदिस्त केलेली होती. त्या जागेत एक खूप मोठा टेबल होता. टेबलामागे आणि समोर अशा तीन खुर्च्या होत्या. शेजारी भिंतीत एक मोठं लाकडी कपाट होतं. हे लायब्ररियनचे, त्याच्या शब्दात 'मास्तरचे' ऑफिस होते.
'बघा आता तुम्ही मास्तर.' म्हणून तो गडी निघून गेला.
'अरे थांब! थांब!' अजयने ओरडून सांगितलं. 'अरे, इथे सफाई वगैरेसाठी कुणी आहे की नाही?'
'आहे ना; पण तो असा आठच्या ठोक्याला थोडाच हजर होणार? मागचे मास्तरच आरामात यायचे.'
'बरं आहे, तू जा.'
अजयने सर्व हॉलमधून एक चक्कर मारली. कोपऱ्यातून, रॅकच्या खाली धूळ साचली होती. खिडक्यांची तावदानं धुरकट झाली होती. वरचे व्हेंटीलेटर तर अक्षरश: धुळीने माखून गेले होते. वास्तविक तो काही इथे कायम कामावर राहणार नव्हता; पण काही महिने तरी त्याला अडकर म्हणून इथे वावरावं लागणार होतं आणि अशा गलिच्छ परिसरात रहाणं त्याच्या स्वभावाविरुद्ध होतं. दाराबाहेर येऊन कमरेवर हात ठेवून तो त्या कोणा कामगाराची वाट पाहत उभा राहिला. सुदैवाने लागलीच त्याच्या लक्षात आलं, की हा आक्रमक पवित्रा अडकरांच्या व्यक्तिरेखेशी विसंगत ठरला असता. त्याने हात खाली घेतले, सरळ केलेले खांदे ढिले सोडले. भूमिकेशी चोवीस तास इमान राखायला हवं होतं.
वाचनाचे भोक्तेही कोणी आले नव्हते. बहुतेकांना सवयीने माहीत झालं असावं, की कामाची वेळ आठ असली तरी ती नावालाच होती.
दहा-बारा मिनिटांनी एक सोळा-सतरा वर्षांचा मुलगा खालच्या फरशीवर पादत्राणं घाशीत, स्वत:शी हलकीशी शीळ घालीत सावकाश सावकाश वाचनालयाच्या दिशेने येत होता. दारापाशीच अजयला उभा राहिलेला पाहून तो म्हणाला, 'नवे दिसता, काका! केव्हापासून इथे उभे राहून वाट पाहत आहात?'
काही न बोलता अजयने वरच्या पाटीकडे बोट केलं. त्या पाटीकडे पाहून त्या मुलाने एकदा खांदे उडवले आणि तो तसाच आरामात आत गेला. क्षणभर विचार करून अजय आत गेला आणि त्या लाकडी कठड्याच्या आत जाऊन, मोठ्या टेबलाला वळसा घालून त्या मागच्या खुर्चीवर जाऊन बसला.
पुढे गेलेल्या त्या पोरसवदा तरुणाने मागे वळून पाहिले आणि मग झपाझप ढांगा टाकीत तो अजयजवळ आला आणि म्हणाला,
'अहो! अहो! हे काय! तिथे काय बसता! ती खुर्ची मास्तरांची आहे!'
अजयने बॅग पुढे ओढली, उघडली, आतून त्याच्या नेमणुकीचं पत्र काढलं आणि त्याच्यासमोर धरून तो म्हणाला,
'तुला वाचता येतं का? वाच!'
त्याने कागदावरचा मजकूर सावकाश वाचला.

‘माझं नाव अडकर. गोविंदराव अडकर.’
‘बाप रे! बाप रे! म्हणजे तुम्हीच नवे मास्तर तर!’ दोन्ही हातांनी कानांची पाळी धरत तो अजीजीच्या आवाजात म्हणाला,
‘मास्तर! मला माफ करा! मला माहिती नव्हतं! खरंच माफ करा!’
‘अरे माफी कसली मागतोस!’ अजय जरा हसत म्हणाला,
‘तुला माहीत नव्हतं यात तुझा काय दोष आहे?’
पण मग सगळ्या हॉलवरून हाताने दाखवत अजय म्हणाला,
‘पण इथली ही अस्वच्छता, इथला कचारा हा मात्र तुझाच दोष आहे. साफसफाईचं काम तुझं आहे की नाही?’
‘हो मास्तर.’
‘तुझं नाव काय?’
‘जगदाळे, मास्तर.’
‘तर मग जगदाळे, मी इथे यायच्या आधी काय झालं याच्याशी मला कर्तव्य नाही. आतापासून जसा जसा वेळ मिळेल तशी तशी साफसफाई करायचीभिंती, खिडक्या, काचा, दिवे, व्हेंटीलेटर, सगळं काही.’
‘हो.’
‘मी पुन्हा सांगणार नाही.’
‘ती वेळ यायचीच नाही मास्तर.’ लगबगीने पुढे होऊन त्याने कपाटाच्या वर ठेवलेल्या किल्ल्या काढल्या. एकीने कपाटाचं कुलूप उघडलं, दुसरीने टेबलाच्या खणाला लावलेलं कुलूप उघडलं. कपाटातून एक मोठी पेटी काढून त्याने टेबलावर ठेवली. पेटीत जाडसर पांढऱ्या कार्ड बोर्डची कार्डं होती. नाव, पत्ता, पुस्तक नेल्याची तारीख, परत केल्याची तारीख इत्यादी तपशील कार्डावर होता. कपाटातून आणखी सहासात मोठी बाऊंड पुस्तकं काढून जगदाळेने ती टेबलावर ठेवली. त्या जाड पुस्तकात सर्व याद्या होत्यालेखकांच्या नावानुसार आणि पुस्तकाच्या नावानुसार बनवलेल्यामग पेन, पेन्सिल, पिना, टाचण्या, पट्टी इत्यादी स्टेशनरीचा ट्रे.
साडेआठपासून तुरळक तुरळक माणसं यायला लागली. काही तिथेच बसून पुस्तकं वाचण्यासाठी आले होते. काही पुस्तकं बदलून घेण्यासाठी आले होते. मुख्य गोष्ट ही होती की, सरकारी खर्चाने वाचनालय मोफत चालवलं जात होतं, त्याने पैशांच्या देण्याघेण्याच्या व्यवहाराचा काही प्रश्नच नव्हता.
पावणेदहाच्या सुमारास राणीसाहेबांकडून निरोप आला. दहा वाजता भेटीसाठी बोलावलं होतं. त्यांच्यापर्यंत निरोप पोहोचवण्याची ही नामी संधी आहे, अजयला वाटलं. त्याने एक कादंबरी खाली घेतली.
ड्रॉवरमधला एक कोरा कागद घेऊन त्यावर त्याने लिहिलं,
‘शिवाजी कंट्री अँड स्पोर्टस् क्लबमध्ये बिलीयर्डस्, स्नूकर, घोड्यावर बसणे, हे शिकवण्याची सोय आहे, फायरिंग रेंजही आहे; पण सर्वसामान्यांना प्रवेश अशक्य आहे. आपल्या शब्दांनी काम होईल.’
तो कागद त्याने पान शंभर आणि एकशेएक यांच्यामध्ये ठेवला आणि पुस्तक बॅगमध्ये घातलं. बरोबर दहा वाजता तो निघाला.
‘जगदाळे, मी जातो.’
‘जा, मास्तर. मी जरा वेळ आवराआवरी करतो. दिवसा आपलंच कुलूप लावायचं असतं. सहा वाजता मी इथे हजर आहे.’

***

तळमजल्यावरच्या एका खोलीबाहेर दोघं तिघं उभे होते.
खोलीत माणसं जात होती, येत होती. नवीन नोकरीवर लागलेल्या आणि मध्यम श्रेणीच्या नोकरदारास शोभेल अशा भिडस्त, संकोचाच्या चालीने अजयने खोलीत पाय टाकला. ज्या टेबलामागे बसून राणीसाहेबांनी त्याच्या मुलाखतीचं नाटक केलं होतं त्या टेबलामागे आता एक मध्यमवर्गीय गृहस्थ बसले होते. समोरचं काम भराभर उरकण्याकडे त्याचा कल दिसत होता. अजयला आत आलेला पाहताच ते म्हणाले, ‘हं बोला! नाव काय तुमचं?’
‘अडकर... गोविंदराव अडकर.’
त्या गृहस्थांनी समोरच्या कागदावरची यादी वाचून पाहिली. एका नावापुढे खूण करीत शेजारच्या खोलीकडे बोट करीत ते म्हणाले, ‘जा, जा आत.’

त्यांना अधवट नमस्कार करून अजय खोलीचा पडदा दूर करून आत गेला. बाहेरच्या खोलीच्या मानाने आतल्या खोलीतला प्रकाश खूपच प्रखर होता. खोलीभर एक धावती नजर टाकून अजयने मान खाली केली. खोलीत एका बाजूला टेबल-खुर्ची होती. शिवाय अनेक सोफा दिवाण होते. समोरच्याच सोफ्यावर राणीसाहेब होत्या, शेजारच्या दिवाणावर त्रिपाठी बसले होते; त्रिपाठीजी! त्यांच्या शेजारी आणखी कोणीतरी एक दोन जण बसले होते; पण त्रिपाठीजी! त्याच्या कसबाची चाचणी घेण्यासाठी राणीसाहेबांनी त्याला मुद्दाम बोलावून घेतलं असेल किंवा हा निव्वळ योगायोगही असेल; पण त्याचा पुरेपूर फायदा उठवायला हवा.
दाराच्या आत पावलाभरावरच उभं राहून दोन्ही हातांनी नमस्कार करीत अजय म्हणाला, 'राणीसाहेब, मी अडकर. ग्रंथपाल.'
जरा आठवल्यासारखं करीत राणीसाहेब म्हणाल्या,
'होहोतीनचार दिवसांपूर्वी नेमणूक झाली, हो ना?'
'हो, राणीसाहेब.'
म्हणजे त्याही या नाटकात सामील होत्या तर.
'राणीसाहेब, तुमचा निरोप मिळाला. आपण सांगितलेलं पुस्तक आपल्यासाठी आणलं आहे. पुढे होत वाकून अजयने अगदी अदबीने बॅगमधलं पुस्तक पुढे केलं. पुस्तक घेऊन शेजारी ठेवत राणीसाहेब त्रिपाठीकडे बोट करीत म्हणाल्या,
'अडकर, हे गोवर्धनदास त्रिपाठी, आमचे कारभारी.'
अजयने त्यांनाही नमस्कार केला. त्यांच्याकडे एक जराशी तीक्ष्ण नजर टाकून, मग त्रिपाठींनी त्याच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले.
'आणखी काही राणीसाहेब?'
'हो, ती टेबलावरची दोन पुस्तकं घेऊन जा.'
अजयने ती दोन पुस्तकं बॅगमध्ये घातली आणि मग जास्त काहीही न बोलता खालच्या मानेनेच खोलीबाहेर पाऊल टाकलं. मग इतरांशी काहीही न बोलता तो बाहेरच्या खोलीतून व्हरांड्यात आणि तेथून बाहेर आला. त्रिपाठी येणार हे राणीसाहेबांना माहीत असणारच. त्याच वेळी त्यांनी अजयला बोलावण्यामागे दोन हेतू असू शकत होते. एकतर त्या त्रिपाठीसमोर अजयला उभा करायचात्रिपाठींनी अजयला तीन वेळातरी पाहिला होता आणि त्रिपाठी म्हणजे तीक्ष्ण नजरेचा माणूसत्याच्या नजरेतून फार फार थोडं सुटत असेत्याला जर काही संशय आला नाही, तर अजय त्या वेशांतराच्या कसोटीला पुरता उतरला असं समजायला हरकत नाही. दुसरा हेतू अर्थात त्रिपाठीला अजयचं स्थान समजावं हा होताकदाचित पुढे मागे अजयचा राजवाड्यातला वावर वाढण्याची शक्यता होतीतेव्हा या त्रिपाठींच्या मनात त्याच्याविषयी कोणताही संशय येऊ नये हे आतापासूनच पाहून ठेवावं.
अडकरांच्या देहयष्टीला शोभेल अशा संथगतीने तो गेस्ट हाऊसमध्ये आला, आपल्या खोलीचं दार उघडून आत आला, आपल्यामागे दार बंद केलं आणि मगच खांदे सरळ करून हातापायांना एक मोठा आळस दिला टेबलामागच्या खुर्चीत आरामशीरपणे बसत त्याने बॅगमधील दोन पुस्तकं बाहेर काढली. टेबलावर ठेवली. दोन्हीची शीर्षकं पाहून त्या ठराविक साच्याच्या देमार साहसकथा वाटत होत्या. काही केल्या त्याला हे पटेना की, राणीसाहेब असली पुस्तकं निवडत असतील. मग?
अर्थात! त्यासाठी त्या पुस्तकांत काहीतरी संदेश असणार!
दोन्ही पुस्तकांच्या पृष्ठ क्रमांक 100/101 मध्ये दोन कागद होते. दोन्ही कागदांवरचा मजकूर ठळक, सरळ अक्षरांत होता. इंग्रजीत जशी हस्ताक्षराची ओळख पटू नये म्हणून सांकेतिक निरोप कॅपिटल लिपीत लिहितात तसाच हा प्रकार वाटत होता. एका कागदावर हा मजकूर होता-
'दोन्ही वेळचं जेवण राजवाड्यात घेत जा. राजवाड्यातील सर्वांसाठी खाली खास सोय असते. तिथे निरोप ठेवला आहे.'
दुसऱ्या कागदावर हा मजकूर होता.
'उद्या सकाळी मी आणि गायत्री वाचनालयात येत आहोत.'
वाचून होताच त्याने दोन्ही कागदांचे अगदी बारीक बारीक कपटे करून ते टेबलाखालच्या टोपलीत टाकले. राजवाड्यावर जेवणासाठी जाण्यात काही फायदे होते, काही तोटेही होते. त्याचं पुढे पाहता येण्यासारखं होतं. महत्त्वाची गोष्टत्या उद्या वाचनालयात येणार होत्या. जरी त्या जागेची पाहणी करायला येणार नव्हत्या तरी त्यांच्या डोळ्यासमोर वाचनालयाचे ते ओंगळ रूप येऊ नये अशी त्याची इच्छा होती. त्याला स्वत:ला जरा

काम करावं लागलं तरी चालेल; पण तो आणि जगदाळे उद्या त्यांची यायची वेळ होईपर्यंत वाचनालय आरशासारखे चक्क करणार होते.
बाराच्या सुमारास तो कँटीनमध्ये गेला. कुपनं देऊन आणि तयार थाळी घेऊन तो आदल्या रात्रीच्याच कोपऱ्यातल्या टेबलापाशी येऊन बसतो न बसतो तोच आदल्या रात्रीचा तोच तो गृहस्थ हातात थाळी घेऊन टेबलापाशी आला. अजयने मान वर करून पाहताच म्हणाला,
'बसायला हरकत नाही ना?'
'मी कोण हरकत घेणार? खुशाल बसा की!'
'छान.' तो गृहस्थ बसला. आज अजयने त्याचं जरा बारकाईने निरीक्षण केलं. कपड्यांवरून काही अंदाज येत नव्हता; पण चेहरा मात्र खूपच शार्प होता, नजर तीक्ष्ण होती, हालचाली चपळ आणि सफाईदार होत्या.
'अजून तुमची बिलं वसूल झालेली दिसत नाहीत!' अजय जरा हसत म्हणाला. एक हात हवेत उडवत तो गृहस्थ म्हणाला,
'काही वेळा थोडं मागं पुढं होतं.'
'सौदा जमला नाही असं म्हणा की!'
अजयच्या वाक्याबरोबर त्याची मान झपाट्याने वर आली; पण तो काहीच बोलला नाही. पुन्हा खाली पाहून जेवायला लागला. अजयला वाटलं आता स्पष्ट बोलण्याची वेळ आली आहे.
'माझ्यावर लक्ष ठेवायची सूचना कोणाची आहे?'
त्याचा प्रश्न इतका अनपेक्षित होता, की तो माणूस अक्षरश: दचकलाच. मग जरा हसत, मान हलवीत म्हणाला,
'छे हो! अशा गोष्टी फक्त पुस्तकात आणि सिनेमा नाटकातच होतात!'
त्याच्या शब्दांकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत अजय म्हणाला,
'मी खरोखरच वाचनालयात काम करतो. संध्याकाळी सहा ते आठ ही वेळ आहे. तेव्हा तुम्ही अवश्य वाचनालयात या आणि प्रत्यक्षच पाहा आणि मला परक्या माणसांचा सहवास फारसा आवडत नाही.'
जेवण अर्धवटच सोडून अजय उठला आणि बेसिनकडे हात धुण्यासाठी गेला.

***

7.

संध्याकाळी जगदाळेने बरीच सफाई पुरी केली होती; पण अजयने जेव्हा त्याला सांगितलं की, दुसऱ्या दिवशी सकाळी स्वत: राणीसाहेब वाचनालयात येणार आहेत तेव्हा लवकर यायला तो ताबडतोब तयार झाला.
प्रत्यक्षात राणीसाहेब नऊच्या सुमारास आल्या. त्यांच्याबरोबरची तरुण स्त्री गायत्रीच असली पाहिजे. ती लावण्यवती नव्हती; पण सौंदर्यवती खासच होती. सडसडीत बांधा, विजेसारख्या चपळ हालचाली, शिवाय लावण्यात एक जबरदस्त आत्मविश्वास, सर्वच लक्ष वेधून घेणारं होतं.
त्या दोघी आत येताच अजय खुर्चीवरून उठला, कठड्याबाहेर येऊन उभा राहिला. त्याने राणीसाहेबांना नमस्कार केला. त्यात अदब होती; पण लाचारी नव्हती. गायत्री नवलाने सगळीकडे पाहत होती. मग राणीसाहेबांच्या खांद्याला हलकासा स्पर्श करीत ती म्हणाली, 'आत्या! बघ ना!' तिने हात हवेत चारी बाजूंना फिरवला. राणीसाहेबांनी नुसती मान हलवली. एव्हाना वाचनालयात आलेले सातआठ लोकही उभे राहिले होते.
'अंअडकर-अडकर नाही का?'
'होय राणीसाहेब. मग जगदाळेकडे हात करीत अजय म्हणायला, 'हा फार कामसू मुलगा आहे, राणीसाहेब.'

इतरांच्याकडे हात करीत राणीसाहेब म्हणाल्या, 'तुमची आपापली कामं चालू देत.' मग त्या पुस्तकांच्या रेकजवळून सर्व खोलीभर हिंडल्या. चरित्र विभागातलं एक पुस्तक त्यांनी खाली घेतलं. बाहेर जाता जाता त्यांनी जवळचं एक पुस्तक अजयसमोर ठेवलं आणि त्या गेल्या.
हुश्श! करीत (मुख्यत: लोकांना दाखवण्यासाठी) अजय परत कठड्यामागे आला. लोकांचे व्यवहार पुन्हा सुरू झाले. राणीसाहेबांच्या येण्याचा उद्देश उघड होता. काल जसं त्रिपाठींना तसंच आज गायत्रीला त्यांनी अडकर दाखवले होते. त्याच्या राजवाड्यातल्या वावराचं कोणाला काही आश्चर्य वाटू नये यासाठी ही पूर्व योजना असावी.
मग त्याचं लक्ष हातातल्या पुस्तकाकडे गेलं. अर्थात! त्यांचा त्याच्यासाठी काहीतरी निरोप असला पाहिजे.

पुस्तकाची पानं चाळताच त्याला पान शंभर आणि एकशेएक यांच्यामध्ये तो कागद सापडला.
शहरात सर्वत्र अजय कर्नाटकी या नावाच्या
तरुणाला सर्व सोयी उपलब्ध करून देण्याचे
आदेश देण्यात आले आहेत, याउपरही काही
अडचण आल्यास कळव. कालची मुलाखत
चांगली रंगली.
कागदाच्या बारीक बारीक चिठोऱ्या करता करता त्याला त्यांच्या शब्दांचा अर्थ समजला, मुलाखत रंगली याचा अर्थ त्या गोवर्धनदास त्रिपाठींना कोणतीही शंका आली नाही.

***

सहा वाजेपर्यंत त्याला वेळ मोकळा होता. स्वत:चे रोजच्या वापरातले कपडे त्याने बरोबर आणले नव्हते. ते सर्व खोलीवरच होते. या अडकरांच्या रूपात तर तो कोणत्याही क्लबमध्ये जाऊ शकत नव्हता! आधी खोलीवर जाऊनच त्याला कपडे बदलावे लागणार होते. अडकरांच्यावर त्रिपाठींचे लक्ष नसेल; पण अजय कर्नाटकीवर असण्याची शक्यता होती. अजयवर ती कामगिरी सोपवण्यास असलेला त्यांचा विरोध केवळ राणीसाहेबांच्या हितासाठीच नसावा अशी अजयला शंका येत होती. तिथे काय अंत:स्थ प्रवाह वाहत होते आणि या त्रिपाठींचे हितसंबंध कशाकशात गुंतले होते याची त्याच्यासारख्या परक्या अनभिज्ञ माणसास कल्पना येणं अशक्यच होतं. केवळ ते काम स्वीकारू नको इतकाच सल्ला देऊन ते थांबले नव्हते'माझ्याशी गाठ आहे' अशी प्रच्छन्न धमकीही द्यायला त्यांनी मागेपुढे पाहिलं नव्हतं. राणीसाहेबांचे कारभारी म्हणून त्रिपाठींच्या हातात खूपच सत्ता असली पाहिजे. पैशांची तर असणारच; पण वेगवेगळ्या कारणांची बरीवाईट अशी अनेक माणसं त्यांनी जोडून ठेवलेली असणार. त्यांची धमकी निरर्थक खासच नव्हती. कदाचित प्रत्यक्षात असेल त्यापेक्षाही तो या एकूण प्रकाराला जास्त रहस्यमय रंग देण्याचा प्रयत्न करीत असेलहीमनाचा सतत नाट्यमयतेकडे ओढा असल्यानेही तो प्रकरणाचा रंग होता त्यापेक्षा गडद करीत असेल; पण प्रकरणातली रंगत त्यामुळे वाढत होती यात शंकाच नव्हती. समजा त्याने वाजवीपेक्षा जास्त काळजी घेतली, नुकसान तर काहीच होणार नव्हतं ना?
जुन्या खोलीच्या दाराला एक उत्तम प्रकारचं लॅच लॉक लावून घेण्याचा त्याचा विचार होता. अडकर म्हणूनच तो खोलीत जाणार, समजा अजयच्या रूपात बाहेर पडला किंवा अडकरांच्या रूपात बाहेर पडला, तरी मागे दार लावून घेताच कुलूपबंद व्हायला हवं. अजय कडी कुलूप लावताना दिसला तर त्याचं कोणाला नवल वाटणार नाही; पण अडकर कुलूप लावताना दिसले तर मात्र पाहणाऱ्याच्या भुवया नक्कीच वर जातील! शिवाय आणखी एक चोरटा विचार मनात होतात्याच्या परिस्थितीच्या मानाने बरीच मोठी रक्कम त्याच्या खोलीत होतीतेवढी जास्त सुरक्षितताही येईल.
बाहेरचं जेवण घ्यायचं ठरवून तो बाहेर पडला. अडकरांच्या संथ गतीने खोलीपर्यंत पोहोचायला अर्धा तास लागला. आसपास कोणी पाळत ठेवत नाही याची खात्री करून घाईने कुलूप उघडून तो खोलीत शिरला. एकदा स्वत:चे कपडे घातल्यावर त्याला सुटल्यासारखं झालं. बरोबर हजार रुपये घेऊन त्याने खोली सोडली. लॅचचे कुलूप आणून ते दाराला बसवून घेण्यात सातशे रुपये खर्च झाले आणि एक दीड तासही गेला; पण दाराबाहेर पडून दार मागे लोटून घेताच कुलपाच्या बंद होण्याचा 'खट्'आवाज मोठा समाधानकारक होता.

***

नेहमीच्या खानावळीत तो जेवायला गेला. तो दोन दिवस आला काय आणि नाही आला काय, कोणालाच फिकीर नव्हती. दुपारी तीन ते पाच या वेळात दोन क्लबमध्ये चौकशी केली 'अजय कर्नाटकी'हे नाव सांगताच तिथल्या लोकांनी एकदम सेक्रेटरीकडेच त्याला पाठवलं. ते त्याच्याशी अदबीने आणि सौजन्याने वागत होते! त्याआधी तो जेव्हा इथेच चौकशीसाठी आला होता तेव्हा बाहेरच्या बाहेरच, कारकुनाकरवी त्याची बोळवण झाली होती! पण ती आठवण देण्याची ही वेळ, जागा नव्हती आणि आवश्यकताही नव्हती.
'गोल्फ, बिलीयर्डस्, स्नूकर, रायफल आणि रिव्हॉल्व्हर शूटिंग यांचं अगदी प्राथमिक शिक्षण हवं आहे.' तो शेवटी म्हणाला. सेक्रेटरींनी त्याच्यासमोर तक्ता ठेवला. त्यात वेगवेगळ्या सोयी, त्यांची वेळ, प्रशिक्षकांची उपस्थिती इत्यादीची तपशीलवार माहिती होती. प्रवेश शुल्क किंवा शिक्षणाचे शुल्क याचा उल्लेखही नव्हता. सभासद नोंदणीच्या फॉर्मचीही काही खूण नव्हती. त्याबद्दल विचारताच सेक्रेटरी म्हणाले,
'श्री. कर्नाटकी, तुम्हाला त्याबद्दल फिकीर करण्याचं कारण नाही. तुम्हाला जी वेळ सोयीची असेल त्यावेळी याआम्ही तुमची सर्व काही व्यवस्था चोख करू.'

‘मी आपल्याला भेटेन. मदतीबद्दल आभार.’ एवढं बोलून अजयने त्यांचा निरोप घेतला.
ड्रायव्हिंग स्कूलला भेट दिली तेव्हा हाच अनुभव आला. सेवेसाठी ते अगदी तत्पर होते. ‘माझी एक अडचण आहे,’ अजय म्हणाला, ‘मला माहीत आहे, शिकाऊ लोकांसाठी तुम्ही साध्या गाड्या वापरता. ते शिक्षण झाल्यानंतर अगदी आधुनिक, अगदी खर्चिक महाग अशा गाड्या चालवायचं शिक्षण हवं आहे.’
‘कर्नाटकी आधी साध्या गाडीवर शिका. मग तुम्ही म्हणाल त्या मॉडेलवर आम्ही तुम्हाला प्रॅक्टिसची सोय करू. केव्हापासून येता?’
‘दुपारची कोणती वेळ सोयीची आहे?’
‘कर्नाटकी, वेळ तुम्ही सांगायची आहे.’
अजयने जरा नवलाने त्यांच्याकडे पाहिलं. इकडे तिकडे पाहत आवाज जरा खाली आणत ते म्हणाले, ‘हे काय प्रकरण आहे मला माहीत नाही. मालक सहसा इथे येत नाहीत. त्यांच्यामागे खूपच व्याप आहेत; पण काल संध्याकाळी स्वत: आले. मला बजावून सांगितलं-इथं कर्नाटकी या नावाचे गृहस्थ आले तर त्यांची सर्व कामे बिनबोभाट, जिथल्या तिथे व्हायला हवीत आणि पैशांची गोष्टही काढायची नाही. समजलं?’ आता यावर मी काय बोलणार?’
अजय काही बोलेल अशी त्यांची अपेक्षा असावी.
‘ठीक आहे. मी काहीतरी ठरवून सांगतो. आभार.’
या निमित्ताने या कला तरी निदान त्याला हस्तगत होणार होत्या.

***

खोलीत त्याने कपडे बदलले. अडकरांचा वेश परिधान केला. नुसते कपडे नाही. अंगाचा, खांद्याचा ढिलेपणा, मान किंचित खाली, सर्व काही दाराबाहेर पडताच दार माग नुसतं लोटून घेतलं तरी काम भागत होतं. हे आपल्याला वेळीच सुचलं याचा त्याला अभिमान वाटला.
सहा वाजता तो वाचनालयात आला. जगदाळे आधीच आला होता. टेबल, रॅक इत्यादीवरून फडकं मारत होता अजयला पहाताच त्याच्या बसण्याच्या खूर्चीवर फडकं मारीत तो म्हणाला,
‘यायामास्तरबसा.’
मनाशी नवल करीत अजय टेबलामागच्या खुर्चीत बसला.
‘मास्तर, तुम्ही दोन चांगले शब्द बोललात. खरंतर मी काम नीट करतच नव्हतो. राणीसाहेबांच्या कानावर गेलं असतं तर नोकरीची काही धडगत नव्हती.’
‘जगदाळे, तू इथे किती दिवसांपासून कामाला आहेस?’
‘आता वर्ष होऊन गेलं की मास्तर.’
‘मग राणीसाहेब काय पहिल्यांदाच इथे आल्या होत्या की काय? त्यांच्या महिन्याकाठी तरी चकरा होत असतीलच ना?’
‘नाही मास्तर. मी इथे कामावर लागल्यापासून काल त्या पहिल्यांदाच आल्या.’
‘नशीब मला आधी सूचना दिली होती.’
‘मास्तर, तुमचं काही काम असलं तर सांगा’
‘अवश्य सांगेन.’
मग मुलांची आणि वाचकांची वर्दळ सुरू झाली. मधूनमधून वेळ मिळत होता तेव्हा अजय विचार करीत होताराणीसाहेब अर्थात त्याच्यासाठीच आल्या होत्या आणि तो निरोप देण्यासाठी; पण या अशा दोनदोन, चारचार ओळींच्या निरोपाने नीट काम होत नव्हतं. त्याला राणीसाहेबांशी काही गोष्टींवर सविस्तर बोलायचं होतं.
अजयने ऐतिहासिक कादंबऱ्याच्या सेक्शनमधली एक जाड कादंबरी काढली. शंभरएकशेएक पानांमध्ये एका कागदावर एकच वाक्य लिहून ते त्या दोन पानांत ठेवले.
प्रताप पार्क. सकाळी अकरा वाजता. प्लीज.
‘अरे, जगदाळे,’ तो म्हणाला, ‘जरा इकडे ये.’
जगदाळे जवळ येताच त्याच्या हातात पुस्तक देत अजय म्हणाला, राणीसाहेबांनी हे पुस्तक मागितलं आहे, ते त्यांना नेऊन दे; पण एक ध्यानात ठेव. त्यांच्याखेरीज इतर कोणाच्याही हातात द्यायचं नाही. त्या बाहेर गेल्या असल्या किंवा कामात असल्याकाही कारणाने भेट झाली नाही, तर पुस्तक घेऊन तसाच परत ये. समजलं?’
जगदाळे पुस्तक घेऊन लगबगीने गेला. दहा-एक मिनिटात तो परत येईल अशी अजयची कल्पना होती; पण

त्याला त्यापेक्षा जास्त वेळ लागला. आल्या आल्या तो म्हणाला, 'अगदी तुम्ही सांगेतलंत तसंच केलं. प्रत्यक्ष राणीसाहेबांच्या हातातच पुस्तक ठेवलं आणि मास्तर, त्यांनीही ओळख दिलीतू वाचनालयात काम करतोस, नाही का रे! म्हणाल्या'
आपण त्यांना भेटीसाठी बोलावले ही जरा धाडसाचीच गोष्ट केली हे अजय जाणून होता. फक्त त्याला आशा होती, की अगदी निकड होती म्हणूनच अजयने हे धाडस केलं होतं.
सव्वादहा वाजता राजवाड्यातून बाहेर पडून, खोलीवर जाऊन, कपडे बदलून पार्कमध्ये पोचेपर्यंत अकरा वाजत आलेले होते. लांबूनच त्याला दिसलं की त्याच्या नेहमीच्या भेटण्याच्या जागी राणीसाहेब आधीच येऊन दाखल झाल्या आहेत. अजय जवळ जवळ पळतच तेथपर्यंत पोहोचला. हात जोडून नमस्कार करीत तो म्हणाला,
'तुम्हाला तसदी दिली त्याबद्दल माफी मागतो, राणीसाहेब.'
त्या जराशा हसत म्हणाल्या, 'ठीक आहे. माफ केलं, बोल.'
त्यांच्यापासून जरा अंतरावर बसून अजय म्हणाला, 'राणीसाहेब, राजवाड्यावरच येण्यामागे जो उद्देश होता तो साध्य होण्याची काहीही चिन्हं दिसत नाहीत. गेल्या दोन दिवसांत मला कुमार दिसलेसुद्धा नाहीत.'
राणीसाहेबांच्या चेहऱ्यावरून एक दु:खाची छाया सरकत गेली.
'कसा दिसेल? त्याचं सगळंच उलटं आहे नारात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र! उशिरापहाटेसच जवळजवळकेव्हातरी परत येतो आणि मग दिवसभर पडून राहिलेला असतोत्याला कशाची शुद्ध तरी असते की नाही मला शंकाच वाटते! आणि अजय, आता आताशी त्याचे दोष काढण्याचं किंवा त्याच्या वागण्यावर टीका करण्याचं मला जरासं भयच वाटायला लागलं आहे' त्या गप्प बसल्या. यावर काही बोलण्याची त्याची जागाही नव्हती आणि वयही नव्हतं. तोही गप्प बसून राहिला.
'पण अजय, हे खरं आहे की, इथल्याशिवाय असं मोकळेपणी बोलताच येत नाही. ठीक आहेमी सगळीकडे शब्द पाठवला होतातुझी कामं झाली का?'
'तुमच्या शब्दांशिवाय कामं झालीच नसती' अजय हसत म्हणाला, 'पण त्या एका शब्दाने सर्वकाही व्यवस्थित होणार आहे.'
'छान, बरं तुला जेवायला वाड्यावरच येत जा म्हणून निरोप दिला होता. जास्त उघड चौकशी करणं प्रशस्त नाही; पण मला समजलं की तू आलाच नाहीस. का?'
'राणीसाहेब, मला तिथे आल्याला दोनच दिवस होताहेत. जरा थांबायचं ठरवलं आणि छान झालं. मी सांगितलं नाकुमार मला दिसतसुद्धा नाहीतत्यासाठी दुसरा मार्ग शोधायला हवा.'
त्या नुसत्या त्याच्याकडे पाहत बसून होत्या.
'राणीसाहेब, मला प्रत्यक्ष राजवाड्यातच मुक्कामाला यायला हवं. असं कधी होतं का, की एखाद्या होतकरू तरुणाला राजवाड्यात सरळ नोकरी मिळते?'
'तुझा विचार काय आहे ते तर सांग!'
'समजा शहरातल्या, जिल्ह्यातल्या वा कारखान्याच्या तुमच्या दौऱ्यात तुम्हाला असा एखादा होतकरू तरुण आढळलातुम्ही त्याला सरळ राजवाड्यावरच बोलावून घेतलंतअसं कधी झालं आहे का? म्हणजे असं झालं तर त्यावर टीकाटिपणी होईल का?'
'बिचारे गोविंदराव अडकर!' त्या म्हणाल्या.
'अं?' अजयने नवलानं विचारलं.
'तुझ्या मनात काय आलं ते ध्यानात आलंएखादा नवीन अवतार उभा करायचा तुझा विचार आहे ना?'
'त्याखेरीज काम व्हायचंच नाही'
'म्हणजे या लायब्ररियनच्या नेमणुकीच्या सव्यापसव्यातून पुन्हा एकदा जावं लागणार'
'तसदी होणार आहे खरी, पण'
'ठीक आहे, आवश्यक ते करायलाच हवं.'
'आणखी एक विनंती आहे.'
'सांग.'
'ज्या बैठका किंवा मीटिंगबद्दल आपल्याला अस्वस्थता वाटत होती त्या केव्हा होणार आहेत?'
'दीड एक महिन्यात होतील.'
'तोपर्यंत आपली तयारी पूर्ण झाली नाही, तर मग त्या पुढे ढकलता येतील का?'

‘अर्थात येतील! इतके दिवस कोणाचाच विरोध झाला नसता; पण यावेळी कदाचित होईल. मला अडचणीत आणण्याची संधी शोधत असलेले बैठक लवकर घेण्याची मागणी करण्याची शक्यता आहे; पण सध्यातरी माझा शब्द हाच प्रमाण आहे.’
‘शक्य तितकं लांबणीवर टाका.’
‘ठीक आहे. आता नवा अवतार केव्हा येणार आहे?’ आता तर त्या नक्कीच हसत होत्या.
‘राणीसाहेब, मी नुसती सूचना करण्याचं ठरवलं होतं. आता तुमचा होकार मिळाला आहे. आता नीट विचार करून ठरवतो आणि अर्थात तुम्हाला त्याची त्रोटक माहिती कळवीनच.’
‘तू खरंच अगदी प्रामाणिक प्रयत्न करतो आहेस!’
‘राणीसाहेब, तुम्ही माझ्यावर केवढा विश्वास टाकला आहात! हजारो रुपये माझ्या स्वाधीन केलेत, घराण्यातल्या गुप्तातल्या गुप्त गोष्टी तुम्ही मला सविस्तरपणे सांगितल्यातकेवढा विश्वास आहे हा! त्याला मी सार्थ ठरवायलाच हवं! काय वाटेल ते झालं तरी! राणीसाहेब, माझ्याकडून तरी मी प्रयत्नांची शर्थ करणार आहेएवढीशीही उणीव ठेवणार नाहीहे तुम्हाला वचन दतो!’

***

संध्याकाळी अजय वाचनालयात पोहोचतो ना पोहोचतो तोच एक महान आश्चर्य घडलं. स्वत: गोवर्धनदास त्रिपाठीच वाचनालयात आले. एकदम उठून उभं राहत नमस्कार करीत अजय म्हणाला,
‘त्रिपाठीजी! या ना, या!’ आणि मग मोठ्याने,
‘अरे जगदाळे! खुर्ची आण त्रिपाठीजींसाठी!’
त्रिपाठी खुर्चीवर बसले. दोन्ही पायांमध्ये काठी ठेवून तिच्या चांदीच्या मुठीवर हात ठेवत ते म्हणाले.
‘तुमचं नाव काय?’
‘अडकर, गोविंदराव अडकर, त्रिपाठीजी.’
‘इथे गावात कोणाकोणाच्या ओळखी आहेत?’
‘कोणाच्याही नाही. मी तर एक इथे परका आहे.’
‘पण गावातल्या एका पत्त्यावर तुम्ही दररोज जाता!’
या क्षणाइतका विलक्षण वेगाने विचार अजयने केव्हाही केला नव्हता, म्हणजे अजयच्या खोलीवर त्रिपाठींच्या माणसांचं लक्ष होतं तर! तिथेच जाताना त्यांनी त्याला पाहिलं होतं. लॅचचं कलूप लावण्याची कल्पना किती योग्य होती ते आता त्याला समजलं.
‘हो, त्यांचं नाव अजय कर्नाटकी आहे,’ अजय म्हणाला.
‘त्यांच्याशी काय काम होतं हे सांगू शकाल का?’
‘त्रिपाठीजी, राणीसाहेबांनी मला पाठवलं होतं. आपण स्वत: तर राणीसाहेबांचे कारभारी आहात. आपण राणीसाहेबांनाच हा प्रश्न विचारा. मी उत्तर देऊ शकत नाही.’
‘का?’
‘त्रिपाठीजी, ते राणीसाहेबांचं खाजगी काम होतं.’
थोडीशी धुसफूस करण्यापलीकडे त्रिपाठी काहीच करू शकले नाहीत. एक दोन मिनिटं थांबून मग ते काहीही न बोलता निघून गेले.
‘अजय या भेटीवर स्वत:शी बराच वेळ विचार करीत बसला होता. या त्रिपाठींचं शत्रुत्व त्रासदायक ठरण्याचा संभव होता. आता तर अडकरांच्या प्रत्येक हालचालीवर पाळत ठेवली जाण्याची शक्यता होती आणि राणीसाहेबांना त्याने सांगितलेली गोष्ट खरीच होती. गेल्या जवळजवळ शंभर तासांत त्याला कुमार एकदाही दिसलासुद्धा नव्हता.
तेव्हा हा काळाचा अपव्यय होता. अडकरांना रंगपटावरून दूर करण्याचीच वेळ आली होती.
पुन्हा एकदा एक ऐतिहासिक कादंबरी निवडून त्याने आतल्या शंभरएक शेएक या पानांमध्ये पुढील निरोप लिहिलेला कागद ठेवला
‘आज रात्री अडकर जाणार आहेत, ते परत येणार नाहीत.
आजपासून तीन दिवसांनी सकाळी अकरा वाजता.
आपण मला पार्कमध्ये भेटल्यास पुढची काही कल्पना
देता येईल. तसदीबद्दल क्षमस्व.’
त्याने जगदाळेला बोलावून घेतलं. पुस्तक त्याच्या हाती देत तो म्हणाला, ‘जगदाळे, राणीसाहेबांना हे पुस्तक

द्यायचं आहे आणि मागच्या खेपेचं ध्यानात ठेवहे पुस्तक त्यांच्याच हातात गेलं पाहिजे. त्या नसतील तर पुस्तक परत आणायचं. समजलं?'
'हो मास्तर.'
या खेपेला तो पाच मिनिटांतच परत आला. वरच्या मजल्यावरच्या कॉरिडॉरमध्येच त्याला राणीसाहेब भेटल्या होत्या. अर्थात त्यांनी जगदाळेला ओळखलं होतं. त्याचा त्याला किती अभिमान वाटत होता!
आठ वाजता वाचनालयाचं दार जगदाळेने बंद केलं. सर्व खोल्यांना कुलपं घालणारा कर्मचारी येईपर्यंत अजय दाराबाहेरच थांबला. कर्मचारी येताच त्याने अजयला सलाम ठोकला.
'नमस्कार मास्तर.'
'हं.'
तो कुलूप लावून जाताच अजय बाहेर पडला. गेस्ट हाऊसमधल्या खोल्यांत आला. कोणतंही सामान बाहेर न्यायचं नाही असं त्यानं आधीच ठरवलं होतं. फक्त एका पातळ पिशवीत गडद रंगाचा शर्ट बरोबर घेऊन तो आपल्यामागे दाराला कुलूप नुसतं अडकवून ठेवून बाहेर पडला.
त्याच्या नेहमीच्या संथ चालीने तो राजवाड्याबाहेर पडला.
वास्तविक तो काही एखाद्या रहस्यमय नाटकाचा नायक नव्हता; पण माणसाची कल्पनाशक्ती काही औरच चीज आहे. पश्चिमेस संध्याकाळी साध्या मेघांत कल्पनाशक्ती सुवर्णनगरी साकार करू शकते. रिकाम्या खोलीत उन्हाच्या झोतात पायरवाने उडालेल्या धुळीकणांना ती सुवर्णस्तंभांचा आकार देऊ शकते. अजयने साध्या आयुष्याला कल्पनेने ही सोनेरी झालर जोडली तर अपाय काय होत होता? आयुष्याला रहस्याची एक नवी मिती येत होती आणि तोटा तर काहीच नव्हता.
राजवाडा चौकापासून मुख्य रस्ता सुरू होऊन स्टेशनपर्यंत जात होता. गर्दीने गजबजलेला. दुकानांच्या लखलखत्या दिव्यांनी उजळून निघालेला.
अडकरांचा अध्याय संपला होता. नवीन सुरू व्हायचा होता. या मधल्या कालखंडात तो संपूर्ण मुक्त होता. रस्त्यावरून रेंगाळत, दुकानांच्या मोठमोठ्या काच खिडक्यातून आत पाहत 'विंडोशॉपिंग'करीत तो चालला होता. तिसऱ्याचौथ्या दुकानाच्या मोठ्या प्लेट ग्लास विंडोसमोर उभे राहिल्यावर त्याला ती गोष्ट खटकली आणि मेंदू खडबडून जागा झाला.
तीच ती दुक्कल त्याला तिसऱ्या खेपेस दिसली होती. एक जरासा आडव्या शरीराचा आणि एक जरासा कृश शरीराचा. रस्त्याच्या समोरच्या बाजूस उभं राहून ते त्याच्यावर लक्ष ठेवत होते. पुढच्या मोठ्या खिडकीच्या दुकानासमोर उभं राहताच सर्व शंका फिटली. संशयाला जागाच राहिली नाही. एका रहस्यमय पाठलागाचं त्याचं कल्पनाचित्र प्रत्यक्षातच घडत होतं! तो काही स्वप्नविलास नव्हता! खरोखरच एका रहस्यमय दुनियेत त्याचा प्रवेश झाला होता!

***

जसं एखादं मद्य मस्तकापर्यंत चढावं किंवा जशी खूप उंचीवरची अतिशुद्ध हवा मेंदूला झिणझिणत स्पर्शावी तशी त्याला आपल्या सर्व शरीरातून एखादी विजेसारखी उत्तेजक लहर सरकत गेलीशी वाटली. त्याचं एकाकी, एकसुरी आयुष्य कोठच्या कोठे गेलं होतं. राणीसाहेबांनी त्याच्यावर सोपवलेल्या कामात त्याला यश येवो अथवा न येवोत्याच्या आयुष्याला ही साहसाची, संघर्षाची, कट-प्रतिकटांची, जासूसी कृत्यांची, गुप्त हालचालींची एक आकर्षक सोनेरी किनार आली होती. घाबरून तो मागे सरू शकत होता, कातडी बचावू शकत होता; पण किती गमावणार होता! कारण फार क्वचित येणारी ही लाखमोलाची संधी हातून अशी जाऊ देणार होता?
अर्थात नाही! रस्त्याने तो सावकाश चालत राहिला. अर्थात आता तो काही मोठ्या महत्त्वाच्या गुप्त कामगिरीवर नव्हता. त्या दुक्कलीला पाच-सात मैलांची रपेट घडवून तो राजवाड्यावर परत येऊ शकला असता; पण त्याचा विचार वेगळाच होता.
सगळेच मूर्ख नसतात, सगळेच सहज फसत नाहीत, सारीच सावजं सोपी नसतात हे यांना जरा कळू दे.
त्याच त्या संथ चालीने तो एका सार्वजनिक स्वच्छतागृहात शिरला.
त्याची खात्री होती ती जोडी बाहेरच त्याची वाट पाहत थांबेल.
आताच्या त्याच्या हालचाली शीघ्र झाल्या. त्याने अंगावरचा कोट उतरवून ठेवला. शर्ट काढून त्याजागी गडद शर्ट घातला. डोळ्यावरचा चष्मा उतरवून ठेवला. कोट, शर्ट, चष्मा बरोबरच्या पिशवीत घालून, ती एका हूकला अडकवून ठेवली, आणि दोन्ही खिशात दोन्ही हात घालून, तोंडाने शीळ घालीत तो स्वच्छतागृहातून

बाहेर पडला.
शेजारीच थांबलेल्या त्या जोडीने त्याच्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही. स्वत:शी हसत हसत तो आपल्या वाटेला लागला.

***

8.

गोवर्धनदास त्रिपाठी संध्याकाळी सहानंतर राजवाड्यावर सहसा थांबत नसत. त्यांच्या वापरासाठी सरकारी इतमामाने गावाच्या उच्च वस्तीत एक आलिशान बंगला सजवलेला होता; पण त्या रात्री बरेच उशिरापर्यंत ते आपल्या कार्यालयातच बसून होते. अर्थात आपल्या कृत्यांसाठी कोणतंही समर्थन कोणालाही देण्याची त्यांच्यावर जबाबदारी नव्हती. गेली वीसपेक्षा अधिक वर्षे त्यांची सत्ता (आधी राजेसाहेब आणि मग राणीसाहेब वगळता) सर्वत्र अनिर्बंधपणे चालत आली होती. आधी संस्थानच्या आणि मग इतर गोष्टीत त्यांनी राजघराण्याचं हित पाहिलं नाही असा आरोप त्यांच्यावर त्यांचे कट्टर शत्रूसुद्धा करू शकले नसते.
रात्री दहाच्या सुमारास त्यांच्या कार्यालयात दोन माणसं आली. एक शरीरयष्टीने चांगला आडवा होता, दुसरा त्यामानाने किरकोळच होता. दोघं खोलीत आल्या आल्या दाराच्या आतच नुसते उभे राहिले. काही वेळ वाट पाहून मग त्रिपाठींनीच विचारलं
'काय झालं?'
त्या दोघांनी नुस्ती नकारार्थी मान हलवली.
'माना काय हलवता नुसत्या? सांगा ना!'
'त्यांनी वाटेत आम्हाला गुंगारा दिला,' त्यांच्यापैकी एकजण अगदी खालच्या, शरमिंद्या आवाजात म्हणाला.
'गुंगारा दिला म्हणजे काय? त्याला कळलं कसं की तुम्ही त्याच्या पाठलागावर आहात?'
'कळलं असलं पाहिजे.'
'त्याच्या मागेमागे दाणदाण पावलं टाकीत गेला असाल...'
'नाहीनाही आम्ही सगळी काळजी घेतली होती.'
'कसा काय गुंगारा दिला? पळत पळत दिसेनासा झाला?'
'नाहीनाहीपब्लिक टॉयलेटमध्ये गेलापाच-सात मिनिटं आम्ही बाहेरच थांबलोमग त्याची जशी खूण दिसेना तसे आम्ही आत गेलो. तो आत नव्हता-'
'मागचं दार होतं?'
'नाहीनाही एकच दार होतं.'
'म्हणजे तुमच्या डोळ्यासमोरून गेला.'
'आत एका हूकला त्याची पिशवी होतीपिशवीत कोट, चष्मा आणि शर्ट होता'
'नालायक आहात! साधं काम करता येत नाही!'
त्रिपाठी संतापाने बोलत होते. 'आता उद्या असं करासकाळी तो वाचनालयात आला की सांगा मी त्याला बोलावलं आहे तसाच घेऊन या.'
'हो.'

***

दुसऱ्या दिवशी आठच्या आधीच ते दोघं वाचनालयापाशी हजर होते. खोल्यांची कुलपं उघडणाऱ्या कर्मचाऱ्यालाही समजत होतं की, हे काही पुस्तकांचे वाचक नाहीत. बरोबर आठ वाजता जगदाळे आला. पाचसात मिनिटं वाट पाहून त्या दोघांपैकी एक आत गेला.
'मास्तर आले नाहीत अजून?' त्यानं विचारलं.
'खरं तर रोज बरोबर आठला येतात.' जगदाळे म्हणाला.
साडेआठ वाजायला आले तशी त्या दोघांची चुळबूळ सुरू झाली. मग त्याने जगदाळेला विचारलं,
'मुक्कामाला कोठे असतात रे?'
'गेस्ट हाऊसमध्ये.'
दोघं तसेच गेस्ट हाऊसमध्ये गेले. देखणे एव्हाना हजर झाले होते. वाचनालयाच्या मास्तरच्या खोलीचा नंबर त्याच्याकडून कळताच दोघं वर गेले. आधी त्यांना वाटलं की, दाराला कुलूप लावलेलं आहे; पण कुलपाला हात लावताच त्यांना समजलं, की ते बंद केलंच नव्हतं. कुलूप काढून त्यांनी दार उघडून आत पाहिलं; पण

खोली अथांत रिकामी होती आणि बिछाना रात्री कोणी वापरल्याची खूणही दिसत नव्हती. दार मागे लोटून घेत ते खाली आले आणि तिथून सरळ त्रिपाठींच्या कार्यालयात आले.
'तुम्ही एकटेच? तो अडकर कोठे आहे?' त्यांना पाहताच त्रिपाठींनी विचारलं.
'तो वाचनालयात अजून आला नाही. आम्ही त्याच्या खोलीवर तपास केला. कुलूप नुसतं अडकवलेलं होतं. रात्रीही तो खोलीत आला नसावा असं दिसतं.'
'म्हणजे गायब झाला म्हणयचा!' त्रिपाठी म्हणाले. 'काल संध्याकाळी मी वाचनालयात त्याची गाठ घेऊन काही काही विचारले. त्याने सावध झालेला दिसतोयखरोखरच तुम्ही दोघं मूर्ख आहात! तुमच्या डोळ्यासमोर तो नाहीसा झालाआता कसला परत येतो!'

***

रोज सकाळी दहाच्या सुमारास त्रिपाठी राणीसाहेबांना भेटत असत. चर्चेचे किंवा ठरवण्याचे काहीतरी विषय असायचेच. आज आल्या आल्या त्रिपाठींनी त्या अडकरचा विषय काढला.
'राणीसाहेब, तुम्ही त्या अडकरला वाचनालयावर नेमलं होतं ना?'
'हो, मला चांगला माणूस वाटला?
'चांगला माणूस? अहो, पक्का भामटा होता!'
'अहो त्रिपाठी, तिथे त्याला भामटेगिरी काय करता येणार?' राणीसाहेब म्हणाल्या, 'उलट मी दुसऱ्याच दिवशी वाचनालयाला भेट दिलीगायत्रीही होती माझ्याबरोबरदोन दिवसांत त्याने वाचनालय अगदी आरशासारखं लख्खं केलं होतं!'
'अहो ही सगळी बनवाबनवी! काल मी त्याची जरा कसून चौकशी करताच तो रातच्या रात फरारी झालाय! खोलीत झोपायला आला नाही आणि आज कामावरही हजर झाला नाही!'
जरा नवलाने राणीसाहेब त्रिपाठींकडे पाहत होत्या; पण त्यांची अशी कल्पना झाली की, या बातमीने राणीसाहेबांना फारशी चिंता वाटलेली नाही आहे.
'गोवर्धनदास, मला तर याचा अर्थच समजत नाही!'
'अहो त्याने काहीतरी करून राजवाड्यात प्रवेश मिळवला होता! हे वाचनालयाचं काम वरवर दाखवण्याकरिता असावंत्याचा खरा हेतू काही वेगळाच होता- आणि मला तर शंका येते, की त्याचे आणखीही काही साथीदार यात गुंतलेले असावेत.' आवाज एकदम खाली आणत त्रिपाठी म्हणाले,'
'आणि राणीसाहेब तुम्हाला एक नवीन बातमी सांगतो. तुम्ही त्या अजय कर्नाटकीची पार्कमध्ये भेट घेतली होतीत नाहा अडकर दोन-तीन वेळा तरी त्या कर्नाटकीच्या खोलीवर गेलेला आहे! मी तुम्हाला सुरुवातीपासून सांगत आहे, त्याची भेट घेऊ नका,' त्याला घराण्याच्या गुप्त गोष्टी सांगू नका. कोण कोणत्या माहितीचा कसा उपयोग करील काही सांगता येतं का?'
राणीसाहेबांना वाटलं, या त्रिपाठींना ओरडून सांगावं की, तो अजय अत्यंत प्रामाणिक आहे, इमानदार आहे; पण त्यांनी स्वत:ला वेळीच सावरलं.
'पुन्हा तुम्ही त्याची गाठ घेतली होतीत ना?'
त्रिपाठींचा प्रश्न सूचक होता. त्यांच्या हालचालीवर आपली नजर असते हे त्रिपाठी त्यांना अपरोक्षरीतीने सांगत होते.
'हो भेटले होते. आणखीही एक-दोन दिवसांनी भेटणार आहे. एवीतेवी त्याच्यावर काम सोपवलं आहेचप्रत्यक्ष त्याच्या हातून जोवर काही आगळीक किंवा फसवेगिरीचा प्रकार होत नाही तोवर त्याला दोषी समजण्यात अर्थ नाही. त्रिपाठीजी, एक सांगते. त्याला पहिल्या भेटीत जे सांगितलं तेवढंच. त्याची काही कल्पना असली तर ती तो माझ्या कानावर घालील इतकंच.'
अजयने सुचवलेल्या पुढच्या भेटीचंही राणीसाहेबांनी असं सुतोवाच करून ठेवलं होतं. त्रिपाठींनी त्यांच्या हालचालीवर पाळत ठेवली तरी त्या भेटीने त्यांना आश्चर्य वाटणार नाही.
इतर विषयांवर चर्चा झाल्यावर त्रिपाठी त्यांच्या कामाला गेले. अजयने आधी कल्पना दिली होती म्हणून त्यांना त्या बातमीने धक्का बसला नव्हता. त्रिपाठींना अडकरच्या वागण्याचा संशय आला होता; पण मुळात अडकर ही व्यक्तीच काल्पनिक आहे याचा संशय आला नव्हता.
राणीसाहेब बराच वेळ एकट्याच होत्या. विचार करीत होत्या.
या अजयवर आपण जे काम सोपवलं होतं त्याबद्दल त्यांच्या मनात आता शंका यायला लागली होती. अर्थात त्रिपाठींसारखा त्यांना अजयचा संशय आला नव्हता; पण त्या कल्पनेच्या व्यवहार्यतेबद्दल त्यांची त्यांना शंका

वाटायला लागली होती. अजय प्रयत्न करीत होता; पण प्रकरणाला हे वेळवेगळेच फाटे फुटत होते आणि त्यांनाही समजत होतंत्यांनी शोधलेला उपाय तत्कालीन होता. फार तर एक वर्षभर त्यांना कुमारला त्या अधिकारपदांपासून दूर ठेवता येईल. परत पुढच्या वर्षी हा प्रश्न आहेच आणि समजा त्यांचा प्रयत्न फसला किंवा उघडकीस आलाकेवढी नामुष्की! आणि विरोधकांच्या हातात आयतंच हत्यार! त्यापेक्षाही वाईट गोष्ट म्हणजे कुमारच्या मनातली त्यांच्या विषयीची अढी आणखीनच पक्की झाली असतीत्याच्या दोषाला आता सबळ कारण मिळालं असतं!
फक्त कथाकादंबऱ्यातूनच असे प्रसंग घडतात! आता अजयची गाठ पडली की, त्याला त्याचे सर्व प्रयत्न थांबवायला सांगितले पाहिजेत आणि गायत्रीशी त्या विषयावर चर्चा केली पाहिजे. कुमारशीही सर्वच प्रश्न धसाला लावण्याची वेळ आली होती. हा गुंता फार वाढण्याआधी त्याचा सोक्षमोक्ष करून टाकायला हवा.
त्यांनी गायत्रीला निरोप पाठवला. पाचसात मिनिटांतच ती खोलीत हजर झाली. किती स्मार्ट, तरतरीत, हसतमुख! तितकीच हुशार आणि व्यवहारी! राणीसाहेबांची खात्री होतीजर कुमारशी हिचा विवाह झाला, तर ती सर्व जबाबदाऱ्या अगदी समर्थपणे पेलू शकेल; पण कुमारसारख्या व्यसनी, बेजबाबदार, मगरूर माणसासाठी तिने आपल्या आयुष्याचा असा होम करावा? केवळ मागच्या पिढीतल्या काही भोळ्या किंवा स्वार्थी लोकांनी दिलेल्या शब्दांखातर? तिला त्या वचनातून मोकळी केलीच पाहिजे. तिचं आयुष्य तिच्या मर्जीप्रमाणे जगण्याचा तिचा अधिकार तिला परत दिला पाहिजे.
'काय गं आत्या?'
'बस जराशी. मला तुझ्याशी काही बोलायचं आहे.'
'तू किती गंभीर झाली आहेस, आत्या!'
'हो, विषयही तसाच गंभीर आहे.'
'कुमार आणि माझा विवाह.'
'हो, कुमार आणि तुझा विवाह. गायत्री या प्रश्नाचा एकदा सोक्षमोक्ष करून टाकल्याखेरीज माझ्या जिवाला चैन पडणार नाही. अगदी खरं सांगू का, शपथा आणि आणाभाका यांच्या भलत्या कल्पनेपायी जर तू स्वत:ला या पाशात अडकवून घेतलंस तर मला जन्मभर अपराधीपणाचा बोजा शिरावर वाहावा लागेल. कारण मीच त्या आणाभाका करवल्या होत्या. गायत्री, आता संकोच आणि औपचारिकपणा बाजूला ठेव आणि मनची खरी गोष्ट सांग.'
'आत्या,' गायत्री खाली पायाकडे पाहत म्हणाली, 'कुमार मुळात असा नव्हता. गेली कितीतरी वर्षे मी त्याला पाहते आहे ना?'
'गायत्री, एकदा फळाला कीड लागली की, ते पूर्ववत कधीही होत नाही.'
'आत्या, त्याच्या आत खोल कोठेतरी हा चांगुलपणाचा गाभा असलाच पाहिजे. तू मला भोळीभाबडी समजशील; पण तसं नाही. त्याच्याबद्दल माझ्याही मनात खोल कोठेतरी आपुलकी आहेच.'
'अजूनही तू सत्याला सामोरं जायचं टाळते आहेस.' राणीसाहेब म्हणाल्या, 'आपण आताच भेटूया त्याला.'
त्यांनी भिंतीवरची घंटा दाबली. दहापंधरा सेकंदातच शिवबा खोलीत आला. 'शिवबा, कुमारला बोलावतोस का जरा?' त्याला राणीसाहेबांनी विचारलं. तो नकारार्थी मान हलवत होता.
'छोटे मालक काल रात्री गेलेत ते अजून परत आलेच नाहीत,' शिवबा म्हणाला. राणीसाहेबांनी गायत्रीकडे पाहून एक बोट वर केलं. जणू कुमारच्या गैरवर्तनाचा हा आणखी पुरावाच होता.
'ठीक आहे. तू जा.' त्या शिवबाला म्हणाल्या आणि तो गेल्यावर त्या गायत्रीला म्हणाल्या, 'आता तरी काहीच निर्णय व्हायचा नाही, नाही का?'

***

त्या सबंध दिवसात कुमार परत आलाच नाही. राणीसाहेबांनी दोनतीनदा तरी त्याची चौकशी केली. दुसऱ्या दिवशी सकाळी शिवबा त्यांच्याकडे आला. 'राणीसाहेब,' तो म्हणाला, 'काल रात्री खूप उशिरा छोटे मालक परत आले. तेव्हातर बोलण्याच्या अवस्थेत नव्हतेच. आताही जरा गुंगीतच आहेत. त्यांना उठवू का?'
'नको.' राणीसाहेब म्हणाल्या. आधी तर्र झालेला आणि अजून नशा पुरती उतरलेली नाही. कोणत्याही गंभीर चर्चेला सर्वस्वी अयोग्य अवस्था. काही चांगलं फलित तर निघणार नाहीचशब्दाशब्दी होऊन गोष्टी नको त्या थराला जाण्याचाच धोका जास्त.
'संध्याकाळी बघठिकाणावर असला तर माझा निरोप सांग.'
'हो राणीसाहेब.'

***

संध्याकाळी आठच्या सुमारास कुमार राणीसाहेबांच्या खोलीत हजर झाला. बाहेर जाण्यासाठीचे कपडे केलेले होते. त्याने गेल्या कितीतरी रात्री बाहेरच कोठेतरी काढल्या आहेत! त्यांना नवलाने आणि खेदाने वाटले.

'मातोश्री! कालपासून माझा खूप शोध चालला आहे असं कानावर आलं!' तो उपहासगर्भ नरम आवाजात म्हणाला, 'एवढं महत्त्वाचं काय काम आहे ते तरी कळूद्यात!'

राणीसाहेबांना त्याच्या पहिल्या शब्दापासूनच मनात जन्माला आलेला आणि त्याच्या शब्दाशब्दाबरोबर वाढत जाणारा संताप आणि उद्वेग जाणवत होता. वास्तविक आपण मातापुत्र. असं असायला नको. त्याच्याही मनात असाच पूर्वग्रह आहे याची त्यांना पुरेपूर खात्री होती; पण हे सर्व कडवट विचार दूर ठेवायला हवेत. मनावर संयम ठेवायला हवा.

'जरा बसतोस का कुमार? तुझ्याशी काही बोलायचं आहे.'

तो होता तसाच उभा राहिला. छातीवर केलेली हातांची घडीही तशीच राहिली. मान हलवीत तो म्हणाला, 'मातोश्री, केवळ जरा बसण्याने बोलणं संपणार नाही, माझी खात्री आहे, दोन वाक्यात सांगता येण्यासारखं असेल तर सांगा. मला बाहेर जायचं आहे.'

राणीसाहेबांना मनावर ताबा ठेवायला अतिशय परिश्रम पडले.

'मग तू जा तर. तुला जेव्हा केव्हा वेळ असेल तेव्हा आपण भेटू.'

त्यांच्या आवाजातला काहीतरी वेगळेपणा त्याला जाणवला असावा. आत येऊन एका खुर्चीवर बसत तो म्हणाला, 'ठीक आहे. आताच वेळ आहे, सांगा.'

'कुमार, तुझा उपहास, तुझं तिरकं बोलणं जरा वेळ बाजूला ठेव. मी काय सांगते ते ध्यान देऊन ऐक. मला तुझ्याशी गायत्री संबंधात बोलायचं आहे. जुना इतिहास तुला माहीतच आहे. त्याची पुनरावृत्ती करण्याची गरज नाही. मी बोलते आहेमला मध्ये अडवू नकोस. गेल्या सहा महिन्यांत तुझ्या वागण्यात खूपच बदल झाला आहे. तसं तुझं वागणं आदर्श कधीच नव्हतं; पण तुला लोकांनी, मीसुद्धा, जरा मनमानी करणारा, थोडासा स्वच्छंदी, जरासा वाहवलेला, ज्याच्या डोक्यात सत्तेचं वारं शिरलेलं आहे असा थोडासा बिघडलेला तरुण असंच म्हटलं असतं. ते शब्द आता योग्य नाहीत. अपुरे पडतील. साऱ्या मर्यादा तू ओलांडल्या आहेस. तुझ्या वागण्याला आता काहीच धरबंध राहिलेला नाही. दारूच्या आहारी तर तू गेलेलाच आहेस. आणखी काय काय व्यसनं जडवून घेतली असशील मला कल्पना नाही. कदाचित ड्रगच्याही नादाला लागला असशील. कदाचित लहानमोठा जुगारही खेळत असशील. कदाचित बायकांच्याही नादी लागला असशील. यातले काहीच मला अशक्य वाटत नाही. सुरुवातीस कदाचित ते मला दुखवण्यासाठी असेल; पण आता तू त्याच्या पूर्ण आहारी गेला आहेस. ज्या गोष्टी साधन म्हणून वापरल्यास त्याच आता साध्य झालेल्या आहेत. त्याबद्दलही मी काही बोलत नाहीबोलून काही फायदाही नाही. मला गायत्रीसंबंधात बोलायचं आहे.'

त्या काहीक्षण गप्प बसल्या. मग परत बोलायला लागल्या.

'कुमार, गेल्या एक-दोन महिन्यांत मी गायत्रीशी या बाबतीत दोन-तीनदा तरी बोलले आहे. पूर्वी जे काही वायदे केले होते त्यातून मी तिला पूर्ण मोकळी केली आहे. ती आता कशासही बांधील नाही. मागचं काहीही तिच्यावर बंधनकारक नाही. त्या आणाभाका इतिहासजमा झाल्या आहेत. निरर्थक झाल्या आहेत.'

'छे! छे! हे मी काय ऐकतो आहे?' कुमार जरा नाटकी आवाजात म्हणाला. 'आपण क्षत्रिय वंशी लोक! एकदा शब्द दिला की, तो पाळण्यासाठी प्राणांचीही पर्वा न करण्याचं आपलं ब्रीद! आणि दिलेला शब्द मोडायचा?'

'कुमार, नाटकीपणा पुरे.' राणीसाहेब रागाने म्हणाल्या. 'जर गंभीरपणे बोलणार नसशील तर मग ही मुलाखत इथेच संपवलेली बरी.'

कुमारचा चेहरा प्रथमच गंभीर झाला. 'मातोश्री, गायत्री ही एक चांगली मुलगी आहे. सुंदर आहे. हुशार आहे. व्यवहारी आहे. फक्त आम्ही दोघं एकमेकांना योग्य आहोत का हाच प्रश्न आहे. ती स्वाभिमानी आहेकोणताही अन्याय सहन करणारांपैकी नाही. मला दारूचं व्यसन आहे आणि एकदा का मद्याच्या नशेत गेलो, की हा सारासार विचार कोठच्या कोठे जातो. चांगलं असेल, वाईट असेल सत्य ते सत्यच आणि ते तसंच स्वीकारायला हवं. दारूच्या नशेत असताना गायत्रीशी सभ्यपणाने, संयमाने, सारासार विचाराने वागेनच याची मला खात्री देता येत नाही. ज्या वाटेने जाण्यात असंख्य अडचणी आहेत ती वाट शहाणा माणूस टाळणंच पसत करतो.'

'गायत्रीला पंधरासोळा वर्षांची प्रथम पाहिली तेव्हापासूनच ती माझ्या घरात माझी सून म्हणून यावी अशी

माझी फार फार इच्छा होती.'
राणीसाहेब बोलायच्या थांबल्या.
कुमारचा संमजसपणाचा मूड पाहता पाहता गेला.
'तुम्हाला काय हवं होतं, तुमची काय इच्छा होती या पलीकडे तुमची नजर तरी जाते का मातोश्री? इतरांना काही मतं असतील, इतरांच्या स्वत:च्या काही इच्छाआकांक्षामहत्त्वाकांक्षा असतील याची कधी क्षणभर तरी जाण होते का तुम्हाला?'
'गेलास तू तुझ्या नेहमीच्या वळणावर?'
'मला वाटतं मुलाखत संपवावी हेच छान! मातोश्री, मी जातो. मला निरोप द्यावा.' कमरेपाशी वाकून नाटकी सलाम करीत कुमार एक पाऊल मागे सरला आणि गर्रकन् वळून बाहेर गेला.
कुमारशी संवाद सतत असमाधानकारकच होत असे.

***

राणीसाहेब पार्कमध्ये आल्या तेव्हा अजय बाकावरच बसलेला होता. त्यांना पाहताच तो उठून उभा राहिला आणि मग त्या बसल्यानंतर जरा बाजूस सरळ बसला. 'राणीसाहेब,' अजय म्हणाला. 'हा आजपर्यंतचा एक अहवालच आहे असं समजा. तुम्ही टाकलेल्या शब्दांनी काम सोपं झालं आहेगाडीचं ड्रायव्हिंग चालू आहे; रायफल शूटिंग चालू आहे; घोड्यावर बसणं शिकत आहे; स्पोर्ट क्लबमध्ये तलवार चालवायला शिकवायचीही सोय आहे; पण ते जरा जास्तच झालं असतं. अडकर तिथून अगदी योग्य वेळी नाहीसे झाले. शेवटच्या रात्री माझ्या पाठलागावर दोघं होतेवेळीच ती गोष्ट माझ्या लक्षात आली आणि मी त्यांना गुंगारा दिला. दुसऱ्या दिवशी त्यांनी माझा खासच खूप शोध केलेला असणार.'
राणीसाहेबांनी मानेनेच 'हो'ची खूण केली.
'त्रिपाठीजींचा एवढा विरोध का आहे मला समजत नाही,' अजय म्हणाला. 'अडकरांवर त्यांनी खासच वेडेवाकडे आरोप केलेले असणार.'
त्रिपाठींचे शब्द आठवून राणीसाहेबांना जरासं हसूच आलं.
'राणीसाहेब, तुम्ही म्हणाला होताततुमच्या प्रवासात किंवा कामात एखादा होतकरू तरुण आढळला तर तुम्ही त्याला नोकरी देता.'
'मी प्रत्यक्ष केलेलं नाही; पण सुचवलं आहे. शेवटी अर्थ तोच होतो. तू म्हणतोस तसं होतं खरं.'
'उद्या सकाळी दहाच्या सुमारास आपण मोठ्या दिवाणखान्यात असलात तर बरं होईलमला माझं स्थान माहीत आहेआपल्याला असं करा, तसं करा सांगण्याचा मला काडीचाही अधिकार नाही; पण माझी एकच इच्छा असते कोणत्याही रीतीने आपण अडचणीत येऊ नये.'
'ठीक आहे, उद्या दहा वाजता काय होणार आहे?'
'साखर कारखान्याला भेट देण्यासाठी आपण गेलेल्या असताना सोपान ताटके नावाचा एक हुन्नरी तरुण आपल्याला भेटला. काहीतरी काम देण्याची त्याने आपल्याला विनंती केली. आपला त्याच्याबद्दल एकूण चांगला ग्रह झाला. आपण त्याला केव्हाही राजवाड्यावर आपली गाठ घ्यायला सांगितलं. हा सोपान मूर्ख नव्हता. त्याला माहीत होतं, केवळ त्याच्या शब्दांवर कोणाचाही विश्वास बसणार नाही. त्याने आपल्याला विनंती केली की, आपण 'मला राजवाड्यावर भेट'अशी आपल्या हस्ताक्षरातली चिठ्ठी द्यावीत्याप्रमाणे आपण ती दिलीतमग जरा वेळ थांबून अजय जरासा हसत म्हणाला, 'तशी चिठ्ठी मला द्या, राणीसाहेब.'
खिशातून एक लहानशी डायरी आणि पेन काढून अजयने ते समोर केलं.
डायरीतल्या एका कागदावर राणीसाहेबांनी लिहिलं
'सवडीने मला राजवाड्यावर भेट.'
आणि त्याखाली त्यांची खास पीएसची आद्याक्षरं काढली.
अजयने डायरी खिशात ठेवली.
'आणखी काही?' राणीसाहेबांनी विचारलं.
'यावेळी तरी मला प्रत्यक्ष कुमारांचं चालणं, बोलणं- वागणं, हावभाव इत्यादी पाहायला मिळालं तरच या साऱ्या खटाटोपाचा फायदा.'
'पाहू, पाहू. मी काहीतरी सोय करीनच. झालं?'
'हो, आणि राणीसाहेब, आपला फार आभारी आहे.'
त्याचे शब्द एका हाताने हवेत उडवत त्या उठल्या आणि खांद्यावरची शाल सावरून नीट करून त्या आपल्या

वाटेने गेल्या.
त्या येतील का नाही याची त्याला मनातून जरा शंकाच होती. आपण यात एवढ्या जिद्दीने का भाग घेत आहोत हे त्याचं त्यालाही नीटसं उमगलं नव्हतं. कदाचित त्याच्या क्षमतेला तो हे आव्हानच समजून चालला असेल; पण त्याखेरीज आणखीही काही अंत:स्थ अनाकलनीय हेतू असू शकतील.
सोपान ताटकेची व्यक्तिरेखा त्याने आधीच मनातल्या मनात साकार केली होती. खांद्यावर जरा पॅडिंग घालताच खांदे रुंद दिसत होते. ओठांवर खोटी मिशी लावताच नवा चेहरा आकारत होता. गव्ह्यात काव्ह्या गोफात ओवलेला लांबट लाल तावीज आणि जरासा जाड़सर कापडाचा उघड्या गव्ह्याचा शर्ट; पण हे तर बाहेरचं झालं. खरा बदल चालण्याच्या, उभं राहण्याच्या, बोलण्याच्या पद्धतीत होता.

***

दुसऱ्या दिवशी सकाळी पावणेसहाच्या सुमारास हा सोपान ताटके राजवाड्याच्या दाराशी हजर झाला. आतल्या चावडीत पहारेकरी होता. मोठ्या दारापाशी कुतूहलाने उभे राहणारे अनेक लोक त्याने पाहिले होते. दोन-चार मिनिटं थांबत, आणि पुढे निघून जात; पण हा गडी हलण्याची काही चिन्हे दिसेनात. पाच-सात मिनिटं झाल्यावर तर तो मोठ्या दरवाजातून आतच आला. आता मात्र पहारेकरी सावध झाला. या माणसाचा वेश तसा साधाच होता. जरा गडद रंगाचा, उघड्या कॉलरचा शर्ट, काळी पँट, खांद्याला शबनम थैली. तो जसा आतल्या कमानीपर्यंत येऊन पोहोचला तसं त्यांला पहारेकऱ्याने हटकलं
'कुठे निघालात राव?'
'राणीसाहेबांना भेटायचं आहे.'
'बाहेर उजवीकडे दरबाराचं ऑफिस आहे. तिथे काम सांग. मग भेटीची वेळ देतील.'
'नाहीनाही, मला राणीसाहेबांनी स्वत:च सांगितलं आहे, केव्हाही येऊन भेट.'
आणि एवढं बोलून तो इसम झपाट्याने आतल्या दाराकडे निघालासुद्धा! हे इतकं अनपेक्षित होतं की, पहारेकऱ्याच्या प्रतिक्रियेला दहा-बारा सेंकद लागलेच. त्या इसमाजवळ जाऊन त्याला थांबवेपर्यंत तो मोठ्या दारापाशी पोहोचलासुद्धा होता.
'राव सांगितलेलं समजत नाही का तुम्हाला?' त्याचा खांदा धरून पहारेकरी म्हणाला. 'जा, आल्या पावली परत आणि ऑफिसमध्ये भेटाजा.'
त्याचा हात झिडकारून टाकीत तो इसम ओरडला
'अंगाला हात लावू नका!'
त्याबरोबर पहारेकऱ्याचाही आवाज चढला,
'बऱ्या बोलाने जातोस का दाखवू इंगा?'
बऱ्याच जणांचं या आरडाओरड्याकडे लक्ष गेलं. तेवढ्यात स्वत: राणीसाहेबच मोठ्या दारात आल्या.
'अरे! काय गोंधळ आहे?' त्यांनी विचारलं.
'राणीसाहेब, हा इसम घुसून इथपर्यंत पोहोचला आहे.'
त्या इसमाने राणीसाहेबांना वाकून नमस्कार केला आणि शर्टच्या खिशातून एक मळलेली, चुरगाळलेली कागदाची घडी काढली. ती घडी उघडून त्याने तो कागद पहारेकऱ्याच्या हातात दिला आणि तो कागद राणीसाहेबांना देण्याची खूण केली.
राणीसाहेबांनी पुढे केलेल्या हातावर पहारेकऱ्याने कागद ठेवला.
राणीसाहेबांनी तो कागद वाचला आणि त्या इसमाकडे पाहत त्या म्हणाल्या, 'तूच सोपान ताटके?'
'हो, राणीसाहेब.'
'येऊ देत रे त्याला आत.'
त्या आत गेल्या. पहारेकऱ्याने हातानेच त्या इसमाला आत जाण्याची खूण केली आणि तो आपल्या जागेकडे गेला.
तो इसम दिवाणखान्यात दोन पावलं आत येऊन अंग चोरून उभा होता. त्याच्याकडे पाहत राणीसाहेबांनी विचारलं,
'पुन्हा नाव सांग?'
'सोपान ताटके.' (आणि मग अगदी खालच्या आवाजात) 'ओंकार.'
राणीसाहेबांनी एकदा मान हलवली आणि त्यांनी हाक मारली. 'शिवबा.'
पन्नाशीच्या सुमाराचा गृहस्थ लगबगीने आतून आला.

‘शिवबा, हा सोपान आजपासून इथे कामावर राहणार आहे. तुझ्या हाताखाली घे त्याला सगळं समजावून सांग.’
‘जी राणीसाहेब.’ आणि सोपानला म्हणाला, ‘चल.’
सोपान शिवबाच्या मागोमाग चालत मागच्या बाजूला गेला. मुख्य इमारतीच्या मागेच सेवकवर्गासाठी खोल्या बांधलेल्या होत्या. त्यातल्या शेवटच्या खोलीत शिवबा सोपानला घेऊन गेला. शिवबाने आधी त्याला नाव विचारलं आणि मग राजवाड्यावर नोकरीसाठी कसा काय आला ते विचारलं. तीच ती कहाणी सोपानने सांगितली. साखर कारखान्याला दिलेल्या भेटीत त्याच्याकडे राणीसाहेबांचं लक्ष कसं गेलं आणि जरा वास्तपुस्त करताच त्यांनी ती चिठ्ठी कशी दिली याचं वर्णन.
‘सोपान, इथे कामं खूप आहेत. माळी काम आहे. तिथे माळी बुवांच्या हाताखाली चार-पाच जण असतात. आतलीबाहेरची सफाई करणारे पाच-सहा आहेत. स्वयंपाकघरात आचारी बुवा आहेततिथे दोघं तिघं आहेत. बाकी बाया आहेत त्या वेगळ्याच. तुला पाठवलंच आहे तेव्हा राणीसाहेब विसरायच्या नाहीततुला काय काम द्यायचं ते त्यांच्याकडून समजेलच.’
शिवबाने आचार्याकडून दोन कप चहा आणला. मग तो म्हणाला, ‘माझ्याकडे कुमारांचं सगळं काम असतं. बघून येतो स्वारी जागी झालीय का नाही, तू इथेच थांब.’
दहा-पंधरा मिनिटांत तो परत आला. मान हलवत म्हणाला, ‘अजून ढाराढूर झोप चाललीय स्वारीची आणि राणीसाहेब नशिबाने तिथेच भेटल्या. त्यांनी तुला कुमारचंच काम पाहायची आज्ञा दिली आहे. मग छान झालंआपण दोघं बरोबरच असणार.’
‘पण काम मोठं जिकिरीचं आहे बघ सोपान! या कुमारांची मर्जी सांभाळायची म्हणजे तारेवरची कसरत बघ! कधी अगदी गोडीत असतील, नाहीतर कधी एवढ्यातेवढ्याने डोक्यात राख घालून घेतील. आता तुला काम करायचंच आहे, तेव्हा कळतीलच एकेक तर्हा! जरा वेळाने आपण दोघं जाऊ. कुमारांना जाग आली असली तर तुझं नाव सांगून ठेवतो आणि एकदा ते तुला प्रत्यक्ष पाहतील. मग सांगेन काय काय आणि केव्हा करायचं ते.’
कोणत्याही गोष्टीची आपण होऊन चौकशी करायची नाही असं अजयने ठरवलं होतं. डोळे उघडे ठेवून वावरलं की सर्व काही आपोआप समजणार होतं. मुख्य म्हणजे कुमारांचं अगदी जवळून निरीक्षण करण्याची त्याला हवी होती ती संधी मिळाली होती. आणखी एक फायदा होता, राणीसाहेबांशी दोन शब्द केव्हाही बोलता येण्यासारखे होते. त्या कुमारांच्या खोलीत आल्या आणि त्याच्याशी दोन शब्द बोलल्या तरी कोणालाही त्यात नवल वाटण्यासारखं काही नव्हतं. आता मागच्या खेपेसारखी पुस्तकामधून दोन-दोन चार-चार ओळींचे निरोप पाठवण्याची बादरायणी मार्गाची आवश्यकता नव्हती आणि त्यातला धोकाही आपोआप टळला होता.
बारा-साडेबाराच्या सुमारास शिवबा म्हणाला, ‘सोपान, चल पुन्हा एकदा बघून येऊया.’
दोघं मोठ्या जिन्याने वर गेले. जिना वळून तिसऱ्या मजल्याकडे गेला होता. दुसऱ्याच मजल्यावर मागच्या बाजूला कुमारच्या खोल्या होत्या. मोठं दार उघडून शिवबा, त्याच्या मागोमाग सोपान आत आले. सोफासेट होता, दिवाण होता, भिंतीच्या मोठ्या लाकडी उघड्या रॅकमध्ये टीव्ही होता, वेडीवाकडी रचलेली पुस्तकं होती. मधल्या टीपॉयवर पुस्तकं, मासिकं पडली होती. मासिकं ग्लॉसी कागदाची होतीबहुतेक सर्व सिनेमाफॅशनखेळ इत्यादीची होती. टीपॉयवर सिगारेटचं पाकीट, लायटर टाकला होता.
तिच्यामागची खोली खाजगी वापरासाठी वाटत होती. तिथेच एका कोपऱ्यात बूट काढून टाकले होते. त्याच्या आतील खोली झोपण्याची खोली होती. खिडक्या सताड उघड्या होत्या. वाऱ्यावर पडदे फडफडत होते. लख्ख प्रकाश पडला होता आणि अतिशय प्रशस्त बिछान्यावर कुमार पाठमोरा झोपला होता. बिछान्यापर्यंत लहान टेबल होतं. टेबलावर दारूची बाटली होती. शेजारीच अर्धा भरलेला ग्लास होता. व्हिस्की.
अजय काही वेळ कुमारकडे पाहत राहिला. त्याला एक जाणवलं या कुमारसंबंधात त्याच्या मनात मित्रत्वाची किंवा शत्रुत्वाची, कोणतीच भावना नव्हती. राणीसाहेबांनी त्याच्यावर एक काम सोपवलं होतं. ते काम योग्य रीतीने पार पडण्यासाठी कुमारचं जवळून निरीक्षण आवश्यक होतं. तेवढ्यापुरताच त्याचा कुमारशी संबंध येणार होता. त्याचं काम यशस्वी झालं, की तो यांच्या या राजेशाही आयुष्यातून नाहीसा होणार होता.
तरीही त्याला दिसत होतं की, कुमार आपल्या आयुष्याची नासाडी करून टाकत होता. त्यामागचं मानसशास्त्रीय कारण कोणतंही असोहे वागणं सर्वथा असमर्थनीय होतं. कारण हे गेलेले दिवस, ही गेलेली वर्षे पुन्हा कधीही परत येणार नव्हती. कोणत्याही क्षेत्रात प्रावीण्य मिळवण्यासाठी आवश्यक ती संधी, साधनं आणि काल, सर्व काही कुमारसाठी उपलब्ध होतं; पण तो आपलं आयुष्य ख्यालीखुशालीत चंगीभंगीपणात,

दारूजुगार असल्या निरर्थक सवयींमागे लागून मातीमोल करून टाकत होता. वास्तविक भविष्यात त्याच्यावर येणाऱ्या जबाबदाऱ्यांसाठी त्याने स्वत:ला घडवायला हवं होतं. झपाट्याने बदलणाऱ्या जगातल्या नव्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी स्वत:ची मानसिक क्षमता वाढवायला हवी होती. त्याऐवजी... अजयने विचार इथेच थांबवले. तो काही या कुमारच्या सुधारणेसाठी इथे हजर झाला नव्हता.
'शिवबाने कुमारच्या खांद्याला हलकासा स्पर्श केला.
'छोटे मालक! छोटे मालक!' तो हलक्या आवाजात हाका मारीत होता. हे नाटक रोजच चालत असलं पाहिजे, अजयला वाटलं.
दोन-तीनदा हलवल्यावर कुमारला जाग आली.
'कोण शिवबा का? आलास का डोकं खायला?' पडल्या पडल्याच कुमारने त्रासिक आवाजात विचारलं.
'एक वाजायला आला, छोटे मालक.'
'वाजायचाच, जरा थांबलास तर दोन वाजतीलमग तीन वाजतीलजा बाबा जापडू दे जरा'
'छोटे मालक, हे बरोबर नाही...'
कुमार ताडदिशी उठून बसला आणि रागाने म्हणाला,
'हे बघ शिवबा, हा उपदेशाचा डोस जर थांबवला नाहीस तर...'
मग त्याचं लक्ष अजयकडे गेलं. शिवबाचा खांदा हलवत कुमार म्हणाला, 'शिवबा, तुला सांगितलं होतं ना, की तुझ्याखेरीज इतर कोणीही माझ्या खोलीत यायचं नाही म्हणून? हा कोण आहे?'
'छोटे मालक, याचं नाव सोपान. राणीसाहेबांनी त्याला नव्यानेच कामावर ठेवून घेतलं आहे.'
अजयने जरा वाकून दोन्ही हातांनी कुमारला नमस्कार केला.
'राणीसाहेबांना हवी तेवढी माणसं ठेवून घेऊ देत! पण त्याला इथे कशासाठी आणला आहेस?'
'छोटे मालक, राणीसाहेबांनी त्याला माझ्याच हाताखाली काम दिलं आहे.'
डोळे बारीक करून अजयकडे पाहत कुमार म्हणाला,
'अरे, तुला नावबीव काही आहे का नाही?'
'माझं नाव सोपान आहे, मालक.'
'सोपान म्हणजे जिनाजिनातुला माहीत आहे का?'
'नाही, मालक.'
'आता या जिन्याने राणीसाहेब मला कोठे पोहोचवायला निघाल्या आहेत देवासच ठाऊक!'
'छोटे मालक, असं बोलणं बरं नाही.'
'चला! एवीतेवी झोप मोडलीच आहेस... कॉफी आण!'
'हो, छोटे मालक.' शिवबा वळला आणि अजयही त्याच्या मागोमाग जायला निघाला.
'तुम्ही थांबा, सोपानराव!' कुमारची आज्ञा आली. अजय तसाच थांबून उभा राहिला.
'राणीसाहेबांना तुमचं रत्न कोठे सापडलं?'
'मालक, राणीसाहेब साखर कारखान्याला भेट द्यायला आल्या होत्या तेव्हा मीच त्यांची भेट घेऊन काही काम द्यायची विनंती केली.'
'आणि लगोलग त्यांनी तुला इथे आणलं?'
'नाही मालक. भेटीला दोन महिने होऊन गेले. तिथली छोटीमोठी कामं संपवली आणि मग राजवाड्यावर आलो. 'राणीसाहेबांनी एक चिठ्ठी दिली होती ती घेऊन यायला सांगितलं होतं.'
तेवढ्यात शिवबा कॉफी घेऊन आला. कुमारने हातानेच त्या दोघांना जायची खूण केली. ते दोघं जिन्याने खाली उतरत असताना वरच्या मजल्यावरून गायत्री खाली आली.
'शिवबाऽ!' तिने हाक मारली.
'जी बाई?'
'कुमार उठला आहे का?'
'आताच उठलेत; पण बाई'
'काय रे?
'एवढ्यात भेटायला जाऊ नकाअजून जरा...'
'नशेतच आहे की काय?'
'नाहीनाही; पण तशी झोप उतरलेली नाही आहे.'

गायत्री सोपानकडे निरखून पाहत होती.
‘याला कधी पाहिल्याचं आठवत नाही.’
‘बाई, हा सोपान, आजपासून कामावर ठेवला आहे.’
अजयने गायत्रीला दोन्ही हात जोडून नमस्कार केला. एकवार मान हलवून ती खाली निघून गेली.
‘राणीसाहेबांच्या भाची लागतात,’ शिवबा हलकेच म्हणाला. ‘पुढे मागे छोट्या मालकांशी लग्न होणार आहे असं कानावर आलं आहे.’
ते दोघं खाली आणि मागं आले. सेवकवर्गासाठी मोठं जेवण घर होतं. वरच्या लोकांची जेवणं आटोपली की खाली जेवणं होत. शिवबा आणि अजय इतरांबरोबर जेवायला बसले. भातभाजीपोळीभाकरीचटणीदहीताक आणि अर्थात वरच्या भोजनासाठी काही खास बनवलं असेल तर तेही.
मागच्या बाजूच्या एका बंद खोलीच्या कुलपाची किल्ली सोपानच्या हातात देत शिवबा म्हणाला, ‘राणीसाहेबांनी तुला स्वतंत्र खोली द्यायची सूचना दिली आहे.’
किल्लीने कुलूप उघडून अजय खोलीत आला. राणीसाहेबांनी त्याची गरज बरोबर जाणली होती. तशी खोली प्रशस्त नव्हती; पण काही दिवसांपुरती ठीक होती. विशेष म्हणजे खोलीला मागच्या व्हरांड्यात उघडणारं आणखी एक दार होतं. इतरांच्या नजरेआड येजा करायला सोयीचं.
अजयने खाटेवर अंग लोटून दिलं.
हव्या त्या ठिकाणी त्याचा प्रवेश तर होता. आता पुढचे बेत आखायचे होते. शिवबा कुमारला लहान वयापासून पाहत होता. अशा वेळी घरगडी मालकांच्या मुलावर मनापासून प्रेम करतात. शिवबाच्या मनात कुमारबद्दल अशी आपुलकी असण्याची शक्यता होती; पण रोज रोज जर आजच्या सकाळच्या प्रसंगाचीच पुनरावृत्ती होत असेल तर त्यानेही कुमार कधीकाळी सुधारण्याची आशा सोडली असेल आणि रोजचा हा कार्यक्रम त्यालाही कंटाळवाणा वाटत असेल. कुमारची जास्तीत जास्त कामं त्याला स्वत:कडे घेणं आवश्यक होतं.
चारच्या सुमारास तो खोलीबाहेर आला.. गडीमाणसांची आसपास वर्दळ चाललीच होती. त्याच्याकडे इतरांचं लक्ष होतं; पण प्रत्यक्षच कोणी विचारल्याखेरीज तो एक शब्द बोलणार नव्हता. तो शिवबाचा शोध घेत होता. कदाचित तो वर कुमारच्या खोलीतही असेल आणि आता तो स्वत:च राजवाड्यात कामावर असल्याने आणि राणीसाहेबांनी स्वत:च कुमारचं काम त्याच्यावर सोपवलेलं असल्याने तो उघड उघड वर जाऊ शकत होता.
शिवबा खरोखरच कुमारच्या खोलीत होता. अजयला पाहताच तो म्हणाला, ‘आलास का? बघ आता.’
शिवबाची खोलीत आवराआवर चालली होती.
‘शिवबा, उद्यापासून तुम्ही हे सारं माझ्यावरच सोडा.’
‘धाकट्या मालकांचा स्वभाव तुला माहीत नाही, सोपान.’
‘दोन शब्द ऐकून घ्यावे लागतील इतकंच ना?’ अजय म्हणाला.
‘राणीसाहेबांनी शब्द पाळलाआता काम नको का करायला?’
अजयला कुमारच्या खोलीत आणि सहवासात जास्तीत जास्त वेळ काढायचा होता. ‘खरंच सांगतो, शिवबा,’ तो म्हणाला.
‘बरं, तू म्हणतोस तर तसं. मी आहेच,’ शिवबा म्हणाला आणि खोलीतून निघून गेला. शिवबाचं आवरणं आणि अजयचं आवरणं यांच्यात खूपच फरक होता आणि तो खोलीत आवराआवर करीत असतानाच राणीसाहेब खोलीत आल्या; पण त्यांचा पायरव अजयच्या कानावर आधी आला होता. खोलीत पाय टाकताच त्या काय म्हणणार याची त्याला पूर्ण कल्पना होती. म्हणून त्या आत येताच एक हात वर करून तो म्हणाला,
‘सोपान, राणीसाहेब... सोपान.’
‘हो, सोपान. कुमार परत नाही आला?’
‘नाही.’
‘त्याची गाठ पडली?’
‘हो, दुपारी त्यांना जाग आली तेव्हा’अजय म्हणाला. ‘माझी एक सूचना आहे, राणीसाहेब सांगू का?’
‘हो.’
राजवाड्यावरच्या गड्यांनानोकरांना वर्षातून कधी रजा मिळते का?’

‘रजेचं असं औपचारिक नाही; पण त्यांना गावचं नाही तर दुसरं लग्नाचं वगैरे काम निघाल्यास पाच-सात दिवस कोठेही जाण्याची परवानगी खासच मिळते.’
‘हा शिवबा? त्याचं काय?’

‘गावाकडे कुठेतरी शेती आहेमुलगा तिकडे असतो.’
‘त्याने कधी गावाकडे जायची परवानगी मागितली होती?’
‘कुमारसाठी तो जात नसावा.’
‘आता जर आपण त्याला सुचवलंत तर? आपण सांगू शकताकुमारांकडे लक्ष द्यायला आता सोपान आहे.’
‘त्याला सांगून पाहते; पण का?’
‘मला कुमारांच्या सहवासात राहता येईल.’

***

राणीसाहेबांनी त्याच रात्री शिवबापाशी तो विषय काढला असावा आणि जरासा आग्रहही केला असावा. कारण दुसऱ्याच सकाळी शिवबा म्हणाला, ‘सोपान, तुझ्यावर राणीसाहेबांची भलतीच भिस्त दिसते! आता धाकट्या मालकांचे पहायला तू आहेसतेव्हा मला पाच-सात दिवसांची रजा मिळाली आहे सगळं ध्यानात ठेव बरं का.’
‘तुम्ही काही काळजी करू नका शिवबा,’ सोपान पुऱ्या आत्मविश्वासाने म्हणाला. ‘आणि शिवबा, कुमारांची परवानगी घेण्याच्या फंदात पडू नका. ते जर जाऊ नका म्हणाले तर? इकडे आड आणि तिकडे विहीर अशी तुमची अवस्था व्हायची. तुमची वेळ झाली की तुम्ही मुकाट जामी कुमारांना सांगतो.’
याबद्दल मात्र शिवबा साशंक होता; पण अजयने दोन-दोनदा सांगितल्यावर शेवटी तो तयार झाला आणि कुमार परत येण्याच्या आधीच आपलं सामान घेऊन गेला. ‘जास्तीत जास्त एक आठवडा!’
जाताना तो अजयला सांगून गेला. ‘त्यावर एक दिवस जास्त नाही!’

***

बाजूबाजूला राहून काहीच साध्यं होणार नव्हतं. जरा धीटपणा दाखवून संधी उपलब्ध करून घ्यायला हवी होती. ती आता हातात आली होती. सर्व नोकरवर्गाची जेवणं रात्री नऊच्या सुमारास (कधी कधी वर एखादी पार्टी झाली तर मग खूपच उशिरा) होत; पण आठच्या सुमारासच अजय स्वयंपाकघरात गेला. आचारी आणि त्याच्या हाताखालचे लोक स्वयंपाकघरात गुंतलेले होते. स्वयंपाकघर ही आचारी आपली हक्काची इनामी जमीन समजत असे. तेथे कोणाचा पदक्षेपही त्याला सहन होत नसे. अजयला आत आलेला पाहताच तो खेकसला, ‘काय काम आहे?’
‘काय काम असणार शिवरामपंत? इथे चार घासांसाठीच येणार.’
दोन्ही हात कमरेवर ठेवून शिवरामपंत म्हणाले,
‘तू तो नवा सोपान, नाही का?’
‘हो.’
‘राणीसाहेबांच्या वशिल्याने लागलेला, हो की नाही?’
‘हो.’
‘तो वशिला असला तर बाहेर! इथे आगाऊपणा चालायचा नाही!’
‘शिवरामपंत, तुम्ही मला बोलूसुद्धा देत नाही?’
‘माहीत आहे काय सांगणार ते! हं, काय? झटपट सांग!’
‘शिवरामपंत, शिवबा पाच-सात दिवसांसाठी गावाकडे गेला आहे, माहीत आहे ना तुम्हाला?’ ‘हो माहीत आहे, पुढे काय?’
‘म्हणजे कुमारांची जबाबदारी माझ्यावरच आली की नाही?’
‘ते तर आहेच, मग मी काय करू म्हणतोस?’
‘शिवरामपंत माझी काही तक्रार नाहीकोणाबद्दल काहीही बोलायचं नाहीपण रात्री कुमार केव्हाही येतात, हो ना?’
‘हो, पुढे काय?’
‘मला त्यांच्यासाठी जागत राहायला हवंतेव्हा तुम्हाला जरा सांगायला आलो होतोकाही शिल्लक असलं तर दोन घास द्या आणि दोन कप कडक कॉफी करून थर्मासमध्ये भरून द्याएकदा कुमार आले, की मला तिथेच राहावं लागेलएवढीच मदत हवी होती.’
‘अरे मग आधी नाही का सांगायचंस?’ उलट्या तर्कशास्त्राने शिवरामपंत म्हणाले. अजयची जेवणाची व्यवस्था तर झालीच आणि कॉफीही तयार करून मिळाली.

***

साडेअकरा वाजले तरी कुमारचा पत्ता नव्हता. कधी कधी तो सबंध रात्रभरही बाहेर राहायचा हे राणीसाहेबांनीच सांगितलं होतं. अजयची सर्व प्रसंगांना सामोरं जाण्याची तयारी होती. दिवसभराच्या धावपळीने त्याला जराशी पेंग यायला लागली; तेव्हा कडक कॉफीचे दोन घोट उपयोगी पडले.
साडेबारा वाजता बाहेर गाडीचा आवाज आला. अजय घाईने मोठ्या दारापाशी आला.
कुमारच आला होता; पण गाडीतच स्टिअरिंगवर डोकं ठेवून बसला होता. अजय पायऱ्या उतरून गाडीच्या दारापाशी गेला.
'कुमार! चलता ना आत?'
दारूने तारवटलेल्या नजरेने कुमारने त्याच्याकडे पाहिले.
'अरे! तू कोण? मी आलो आहे तरी कुठे?'
'कुमार, मी सोपान. नवा नोकर. तुम्ही राजवाड्यावरच आला आहात.'
'शिवबा कुठे आहे?'
'तो दोन दिवस गावाकडे गेला आहे; पण मी आहे की!'
'छे! आतापासून येऊन काय करायचं? किती वाजलेत?'
'एक वाजायला आला आहे.'
'छे! मी एक चक्कर मारून येतो.'
'मी येऊ का बरोबर?'
'तू? तू? हा हा! शिवबाला हे कधी सुचलं नव्हतं!'
'कुमार, एक मिनिट थांबता का? कॉफी तयार ठेवली आहे. ती घ्या आणि मग जा चक्कर मारायला.'
'ठीक आहे, आण.'
अजय घाईघाईने जाऊन खोलीतला थर्मास घेऊन आला. गाडीच्या पुढच्या सीटवर बसून त्याने अर्धा कप गरम गरम कॉफी कुमारच्या पुढे केली. कॉफीचे घोट घेता घेता कुमार अजयकडे पाहत होता.
'हे पण शिवबाला कधी सुचलं नाही.' अजय काहीच बोलला नाही.
'चक्कर मारायला येतो म्हणाला होतास ना? चल! लाव दार!'
अजयने दार लावून घेताच कुमारने गाडी सुरू केली.
कडक कॉफीने नशा जराशी उतरली असावी आणि मध्यरात्रीचा गारेगार वारा अंगावरून सपाट्याने जात होता. काही वेळातच कुमार पुरा पुरा शुद्धीवर आला.
मद्याच्या कैफात असतानाही त्याच्या गाडी चालवण्याच्या कौशल्यावर काही परिणाम झाला नव्हता. आता तर तो अतिशय सफाईदारपणे गाडी चालवत होता.
रात्री रस्ते रिकामे होते. वेगाचाही एक कैफ होता. काही काही सरळ रस्त्यावर वेग नव्वदपर्यंत पोहोचला होता.
मानसशास्त्रज्ञांनी कुमारच्या या वागण्याला अनेक कारणं दिली असती. त्याला त्याच्याशी कर्तव्य नव्हतं. तो काही न बोलता नुसता बसून होता. गाडीचा वेग चाळीसपर्यंत खाली आल्यावर कुमार म्हणाला,
'शिवबा तुझ्या जागी असता तर दहादा म्हणाला असता, 'अहो छोटे मालक! इतकी फास्ट काढू नका गाडी!'
'त्याला तुमची काळजी वाटते, कुमार.'
'आणि तुला नाही वाटत?'
'आता, याक्षणी वाटत नाही. तुम्ही पूर्ण सावध आहात. मद्याच्या नशेखालीसुद्धा तुम्ही गाडी उत्तम चालवता. आता तर प्रश्नच नाही.'
'सोपान, सोपान नाव नाही का तुझं?'
'हो.'
'अस्सं.'
काही न बोलता गाडी वळवून कुमारने परत राजवाड्यावर आणली. मोठ्या गॅरेजमध्ये ठेवली. अजय वळला तसा तो म्हणाला,
'सोपान, जरा वर ये माझ्याबरोबर.'
'हो.'
जिना चढल्यावर पुढे होऊन अजयने खोलीचं दार उघडून आत जाऊन दिवे लावले. त्याच्या मागोमाग कुमार खोलीत आला. खोलीवरून त्याने एक नजर टाकली. मग तो आतल्या खोलीत गेला. अजय बाहेरच्या

खोलीतच थांबला. आतल्या बेडरूममधून कुमारचा हाक आला.
‘सोपाऽन!’
सोपान दोन खोल्या ओलांडून बेडरूमच्या दारापाशी पोहोचला. खोली स्वच्छ आवरलेली होती. पलंगावर रात्री वापरायचे कपडे काढून ठेवले होते.
‘हे सगळं तुझं काम?’ कुमारने विचारलं.
‘हो.’
‘तू नव्यानेच नोकरी करतो आहेस?’
‘तशी लहानमोठी कामं केली आहेत; पण राजवाड्यात प्रथमच.’
‘वाटलंच, मालक, छोटे मालक म्हणत नाहीस तेव्हाच ओळखलं.’
‘आपली बेअदबी करण्याची माझी अजिबात इच्छा नाही.’
‘सोपान’ मला हे साहेब, मालक, सरकार असलं अजिबात आवडत नाही. तेव्हा ते विसरून जा.’
दोन मिनिटं तसाच उभा राहून शेवटी अजयने विचारलं,
‘माझं काम झालं? जायला परवानगी आहे?’
‘नाही, जरा आत ये.’
पलंगावर बसून खुर्चीकडे बोट दाखवीत कुमार म्हणाला,
‘बस.’
‘नाही, मी उभाच राहातो. काही सांगायचं असलं तर सांगा.’
‘मी तुला खुर्चीत बसायला सांगतो आहे- मी.’
‘तो आपला मोठेपणा आहे, कुमार; पण मी जर खुर्चीवर बसलो तर तो माझा मूर्खपणा होईल.’
‘मग मघाशी गाडीत का नाही उभ्याने प्रवास केलास?’
जरासं हसत अजय खुर्चीच्या कडेवर बसला.
‘सोपान, गेल्या कितीतरी दिवसात असं झालेलं मला आठवत नाही की, मी रात्रीचा खोलीवर आहे आणि शुद्धीवर आहे, झिंगलेलो नाही.’
अजय काहीच बोलला नाही.
‘काय करायचं ते समजतच नाही.’
अजय तरीही काहीच बोलला नाही.
‘तू गप्प का?’
‘मी काय बोलणार, कुमार? ज्या गोष्टीचा आपल्याला काही अनुभवच नाही त्याबद्दल बोलणं हा मूर्खपणाच होईल.’
‘तू किती शिकला आहेस?’
‘दहावी झालो. मग बंद.’
‘पण बोलण्यात चलाख आहेस.’
‘व्यवहार आणि अनुभव यांच्यासारखे शिक्षकच नाहीत.’
‘वयाने तू किती असशील?’
‘सव्वीससत्तावीस.’
‘म्हणजे माझ्याएवढाच की वयाने!’
‘हो, शक्य आहे.’
अजय मुद्दाम जरा कडवट आवाजात बोलला.
‘सोपान, मला समजतं, माझा जन्म अशा घराण्यात झाला आहे की, माझं बालपण, शिक्षण, छंद, सर्व काही जरा अपवादात्मकच म्हणायला हवं.’
‘हे ज्याचं त्याचं नशीब आहे, कुमार.’
‘तुझ्या मनात माझ्याबद्दल द्वेष असेल?’
‘द्वेष? तो का म्हणून कुमार? आपण ज्या ज्या परिस्थितीत जन्मलो ती काय तुमच्या हातची गोष्ट होती? का माझ्या इच्छा-अनिच्छेचा प्रश्न होता?’
‘शक्य असतं तर तू माझ्यासारखं आयुष्य निवडलं असतंस?’
अजय काहीच बोलला नाही.

‘सांग ना, मोकळेपणाने बोलू शकतोस.’
‘आपल्याला आपल्या या सर्व भाग्याचा काय फायदा झाला आहे?’
कुमार जरा चमकून म्हणाला,
‘म्हणजे काय?’
‘मोकळेपणाने बोलायला सांगितलंत म्हणून बोलतो. एवढ्या सर्व संधी उपलब्ध असून आपण आयुष्यात काय साध्य केलं आहे?’
‘तू राणीसाहेबांचीच री ओढणार!’
‘पण ते खोटं आहे का? मला राजवाड्यावर येऊन तीनच दिवस झाले आहेत; पण ज्याचे कान उघडे आहेत त्याला तेवढे पुरेसे आहेत.’
‘म्हणजे माझ्याबद्दल सगळीकडे टीकाटिंगल चालते?’
‘का नाही चालणार? मोकळेपणाने बोलतो त्याबद्दल क्षमा करा. कदाचित उद्या आपल्याला हे संभाषण आठवलं तर मला नोकरीवरून हाकलूनही द्याल. पण सांगतो. आज ना उद्या राणीसाहेबांच्या सर्व कारभाराची, सर्व व्यापांची, सर्व उपक्रमांची जबाबदारी आपल्याच खांद्यावर येणार आहे. ती जबाबदारी पेलण्यासाठी आपण स्वत:ला घडवलं आहे का? मानसिक, बौद्धिक, व्यावसायिक, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीयअनेक आघाड्यांवर आपल्याला सामना करावा लागणार आहे. सर्वच स्तुती करणारे असले तरी काही नुसते तोंडपुजे स्तुतिपाठक असतात. आतून कटकारस्थाने करणारे असतात. छोट्यामोठ्या गफलतीचा, जरा कोठे दुर्लक्ष झालं तर त्याचा फायदा घेण्यासाठी टपलेले असतात आणि कुमार, हे काही पुस्तकी ज्ञान नाही. मी कसला पुस्तकांपर्यंत पोचणार? पण हा कठोर व्यवहार आहे.’
हात वर करून कुमारने त्याला थांबवलं.
‘बापरे! बापरे! खूपच ऐकवलंस! पण तुला तरी दोष का द्यायचा? मीच बोल म्हणालो आणि हे आपणच ओढवून घेतलं!’
‘तरीही ते खोटं नाही, कुमार.’ डोळे मिटून वर आढ्याकडे पाहत अजय म्हणाला, ‘कुमार, मला तुमचा हेवा वाटतो. ध्यानात घ्या. द्वेष नाहीहेवा वाटतो. सर्व काही हस्तगत करण्याची संधी...’
‘तू जरा अफलातून असामी आहेस, नाही का, सोपान?’ कुमार म्हणाला. ‘या आपल्या बोलण्याचा उद्या मला पश्चात्ताप होणार आहे; पण आता मध्ये थांबायला नको. बोल, मी तुझ्यासाठी काय करू शकतो?’
नवलाचा आविर्भाव करीत अजयने मोठ्या डोळ्यांनी कुमारकडे पाहिलं. जणूकाही त्याचा त्याच्या कानांवर विश्वासच बसत नव्हता.
‘खरंच विचारतो, मी तुझ्यासाठी काय करू शकतो?’
‘कुमार, लहानपणापासून साहसकथा वाचण्याची मला विलक्षण हौस आहे. शक्तिशाली गाड्या तुफानी वेगाने चालवणारे, विजेच्या गतीने, डोळ्याचं पातं लवतं ना लवतं तोच कमरपट्ट्यातलं रिव्हॉल्व्हर हातात आणणारे, वाऱ्याच्या वेगाने घोडदौड करणारे, निधड्या छातीचे नायक म्हणजे माझे देव! संकटात सापडलेल्या सौंदर्यवतींची सुटका करण्याची त्यांच्यासारखी संधी कदाचित येणार नाही; पण या कला हस्तगत करता आल्या तर...’
‘कबूल! उद्यापासून!’
‘काय कबूल? काय उद्यापासून?’ अजयने नवलाने विचारलं.
‘सोपान, गेल्या कितीतरी दिवसात या राजवाड्यात माझ्याशी असं प्रामाणिकपणे, नि:स्वार्थीपणाने कुणी बोललेलं नाही. मला तुझा स्वभाव एकदम पसंत पडला आहे. अरे गाडी चालवायला शिकणं काय, रिव्हॉल्व्हर वापरायला शिकणं काय, अश्वारोहणाची विद्या काय, अगदी साध्या गोष्टी आहेत. आपल्या इथे सर्व सोयी आहेत, त्या सर्व तुला शिकवण्याची मी व्यवस्था करतो बस?’
‘कुमार, मघाशी बोलताना...’
‘बोलताना प्रामाणिक होतास ना?’
‘हो, प्रामाणिक होतो ही गोष्ट खरी...’
‘मग ठरलं तर.’
‘कुमार, एक ऐका. तुमच्या सर्व कामासाठी माझी नेमणूक झाली आहे. मी जर अशा फालतू गोष्टीवर वेळ दवडला...’
‘पण ते माझ्याच सांगण्यावरून करतो आहेस!’

‘पण तुमच्याकडे दिवसभर लक्ष कोण देणार? तुम्हाला काय हवं, काय नको कोण पाहणार?’ आणि मग जरा वेळ थांबून जराशा कडवट आवाजात, ‘कुमार, उद्या तुम्हाला या उदारपणाचा पश्चात्ताप होईल!’
‘पश्चात्ताप झाला तर सर्व बंद करून टाकीन, नाहीतरी लहरीपणाबद्दल माझी ख्याती आहेच.’
रात्रीसाठी बदलायचे कपडे एका हातात घेऊन कुमारने अजयला दुसऱ्या हाताने जायची खूण केली.
झाली ही गोष्ट चांगली की वाईट याचा अजयला काही उलगडाच होत नव्हता. शेवटी व्यवहारीपणा यात होता की, अनायासाने समोर चालत आलेल्या संधीचा जास्तीत जास्त फायदा घेणं.

***

9.

सकाळी आठच्या सुमारास अजय कुमारच्या खोलीकडे गेला. दारातून त्याने आत डोकावून पाहिलं. कुमार झोपलेलाच होता. टीपॉयवर दारूची बाटली होती. पावलांचा आवाज न करता अजय पलंगापाशी गेला आणि त्याने ग्लास उचलून त्याचा वास घेतला. दारूचा वास येत नव्हता. निदान काल रात्री तरी कुमारने दारू घेतली नव्हती.
रात्री एकनंतर केव्हातरी कुमार झोपला असणार. एवढ्यात त्याला जाग यायची शक्यता नव्हती. आता अजयला इतरत्रही काही काम नव्हतं. सावकाश सावकाश तो खालच्या दिवाणखान्यात आला. मोठ्या दारातून तो बाहेर आणि बागेत आला. सकाळपासूनच माळीबुवा आणि त्यांच्या हाताखालची माणसं कामात गुंतली होती.
‘सोपाऽन!’ राणीसाहेबांची हाक आली.
त्याने वळून पाहिलं. एका छोट्या कृत्रिम धबधब्याच्या माथ्यावर राणीसाहेब उभ्या होत्या. त्याचं त्यांच्याकडे लक्ष जाताच त्यांनी हाताने खूण करून त्याला बोलावून घेतलं.
अजय त्यांच्यापासून दोनतीन पावलांवर थांबला.
‘रात्री कुमार उशिरा परत आला ना?’
‘हो, बाराच्या सुमारास आले.’
‘पुन्हा बाहेर गेला वाटत?’
‘हो, मीही त्यांच्याबरोबर होतो, राणीसाहेब.’
‘कुठे? पुन्हा एखाद्या अड्ड्यावर?’
‘नाही. एक मोठी चक्कर मारून ते परत आले.’
‘मग?’
‘झोपले. अजूनही झोपलेलेच आहेत.’
‘पुन्हा झोकली असेल रात्री?’
‘नाही.’
‘तू कसं सांगू शकतोस?’
‘पलंगापाशी टीपॉयवर बाटली आणि ग्लास आहे; पण ग्लासला दारूचा वास येत नाही.’
‘नवलच म्हणायचं!’ अजयकडे निरखून पाहत राणीसाहेब म्हणाल्या.
अजय त्यांना संभाषणातला एक भाग फक्त सांगणार होता.
‘राणीसाहेब, एक सांगायचं आहे.’
‘सांग.’
‘तुम्हाला कदाचित अयोग्य वाटेल. रात्रीची गार हवेतली चक्कर मारण्याने कुमार पुढे शुद्धीवर आले होते. मला त्यांनी खोलीत काही वेळ बसवून घेतलं. बोलण्याच्या ओघात मी त्यांना सुचवलं की, मला लहानपणापासून साहसकथांचा शौक आहेत्या साहसी नायकांसारखं गाड्या-घोड्यातून हिंडण्याचं, गोळीबार करण्याचं स्वप्न मी नेहमी पाहत असतो.’
‘पुढे?’ राणीसाहेबांची उत्सुकता उघड दिसत होती.
‘त्यांना काय वाटलं कोणास ठाऊक; पण मला ड्रायव्हिंग, रायडिंग, शूटिंग शिकवायला ते स्वत: तयार झाले.’
‘कुमार?’
होय, राणीसाहेब, पुढे मागे कदाचित मला जी भूमिका वठवावी लागेल त्या दृष्टीने या कला मला येणं आवश्यक आहे. हे मी मागच आपल्याला सुचवलं होतं. कुमारांच्या मर्जीचं काही सांगता येत नाही; पण

कालचा त्यांचा विचार आजही कायम असला तर मी कदाचित त्यांच्याबरोबर गाडीतून जाताना तुम्हाला दिसेन. त्यामागची पार्श्वभूमी आपल्याला कळावी यासाठी हे सांगितलं.'
'सोपान, दिवसादिवसागणिक मला तुझं जास्त जास्त नवल वाटायला लागलं आहे.' राणीसाहेब म्हणाल्या.
'राणीसाहेब, आपण सोपवलेली कामगिरी जितकी उत्तम प्रकारे पार पाडता येईल तितका मी प्रयत्न करीत आहे.'
'अंऽऽ सोपान, मी कुमारांकडे येऊ?'
'मी काय सांगणार आपल्याला?'
'वेड पांघरू नकोस! सांग!'
'आपण आताच आला नाहीत तर ते बरं होईल, राणीसाहेब.'
अजय जरा अडखळत म्हणाला.
'ठीक आहे. तू जा.'

***

अजय वर कुमारच्या खोलीत आला. दार लोटून घेतलं होतं तसंच होतं. तो आतल्या बेडरूममध्ये आला. कुमार जागा होता. पलंगावर पडल्या पडल्या हातांची छातीवर घडी करून वर छताकडे पाहत होता. अजयच्या पावलांचा आवाज येताच त्याची नजर अजयकडे वळली. अजय काही न बोलता पलंगापासून दोन पावलांवर नुसता उभा रहिला.
'सोपान, आपण काल रात्री गाडीतून चक्कर मारली का?'
'हो.'
'परत आल्यावर इथे, या खोलीत, बोलत बसलो का?'
'हो.'
'तुला ड्रायव्हिंग, रायडिंग, शूटिंग शिकवायची मी तयारी दाखवली?'
'हो.'
'म्हणजे ते स्वप्नं नव्हतं. सोपान, कितीतरी दिवसात मला अशी नैसर्गिक, जाग येत आहे. कितीतरी दिवसात अशी सकाळ येते आहे की, माझं डोकं कलकलत नाही. रात्रीच्या मद्यपानाचा हँगओव्हर नाही, जिभेवर घाणेरडी चव नाही, चांगली भूक लागली आहे.'
'आमच्यासारख्यांची ही रोजचीच जाग आल्याक्षणाची लक्षणं आहेत. ती तुम्हाला आज अनुभवायला मिळत आहेत.' अजयच्या आवाजात उपहासाचा लवलेशही नव्हता. 'मी तुमचा नाश्ता आणू का?'
'शिवबा असता तर आनंदाने नाचला असता.'
अजय काहीच बोलला नाही.
'ठीक आहे, नाश्ता आण आणि तयार हो. आपल्याला बाहेर जायचं आहे. गाडीचं ड्रायव्हिंग शिकायचं आहे ना तुला?'
'म्हणजे, काल तुम्ही सीरियस होतात, कुमार?'
'सोपान! तू सीरियस शब्द वापरलास!'
'कुमार, हे शब्द अंगवळणी पडायला काही कॉलेजात जावं लागत नाही! सीरियस काय, रेडी काय, परफेक्ट काय, चॅलेंज काय, बेस्ट काय, हे शब्द सर्वसामान्यपणे वापरात आलेत, कुमार.'
'ठीक आहे. नाश्ता.'

***

कुमारच्या वापरासाठी एक मर्सिडीज होती, एक इंपाला होती, एक इस्टेट व्हॅन होती. गॅरेजपाशी ते दोघं पोहोचताच ड्रायव्हर लगबगीने पुढे आला. त्याच्यापुढे हात करीत कुमार म्हणाला,
'अरे मला किल्ल्या दे! मीच चालवणार आहे.'
राजवाड्यापासून सुमारे नऊ दहा किलोमीटर अंतरावर, शहरापासून बरंच दूर असं फार्म हाऊस होतं. तिथे घोड्यांची रँच होती. शूटिंग रेंज होती. राजेसाहेबांनी पूर्वापार चालत आलेले सर्व छंद जोपासले होते आणि कुमार चौदापंधरा वर्षांचा होताच त्याला सर्व शिकायला लावलं होतं. त्यांच्या करड्या शिस्तीपुढे कुमारला सर्व विरोध बाजूला ठेवून सर्व शिकावंच लागलं होतं.
इस्टेटच्या मोठ्या फाटकातून वळण घेऊन गाडी आत शिरली. लांबवर फार्म हाऊसची बैठी, लांबच लांब पसरलेली इमारत दिसत होती. गाडीचा वेग कमी झाला होता. वेगवेगळ्या कामात गुंतलेले लोक गाडी

जाताना कुमारला सलाम करीत होते. गाडी इमारतीपाशी पोहोचली. दर्शनी भागाला लांबच लांब व्हरांडा होता. व्हरांड्याला लाकडी रेलिंग होतं. अजयला एकाएकी वेस्टर्न सिनेमातील रँच हाऊसेस आठवली.
गाडी थांबताच आतल्या खोलीतून एक मध्यमवयीन गृहस्थ बाहेर आले. कुमारच्या चेहऱ्यावर आता प्रथमच जरा आपुलकीचे हास्य आले.
'शिंदेकाका,' तो म्हणाला, 'हा सोपान, नव्यानेच कामाला ठेवला आहे. मोठा हौशी आहे. त्याला रायडिंग शिकायचं आहे. जेव्हा जेव्हा त्याला वेळ मिळेल तेव्हा तो येईल. तेवढं बघाल?'
'अगदी अवश्य'शिंदे म्हणाले.
'चल रे सोपान,' खोलीत शिरत कुमार म्हणाला. अजय त्याच्या मागोमाग आत गेला. आतली टेबलं, खुर्च्या, कपाटं साधी होती; पण सर्वत्र एक विलक्षण स्वच्छता होती.
शेजारच्या खोलीचं कुलूप काढत कुमार म्हणाला, 'ही गनरूम आहे.'
आत पाय टाकताच अजयला भिंतीला काचेच्या कपाटातून व्यवस्थित ठेवलेल्या गन, रायफल, शॉटगन दिसल्या. कपाटातल्याच एका लांबट लाकडी पेटीत चार-पाच पिस्तुलं होती. त्यातलं एक एक उचलून हातात घेत कुमार म्हणाला, 'तुला यातच स्वारस्य आहे नाही का? मग चल' भिंतींना हुकला कमरपट्टे लावले होते. त्यातला एक कुमारने स्वत: बांधला आणि दुसरा अजयला बांधायला शिकवलं. उजव्या हाताला, मांडीच्या मागच्या भागावर रिव्हॉल्व्हरची पिशवी येत होती. रिव्हॉल्व्हर त्यात अडकवलं आणि हात मागे केला, की पंजा बरोबर रिव्हॉल्व्हरच्या मुठीपाशी येत होता.
'हे बघ!' कुमार म्हणाला. त्याचा हात विलक्षण चपळाईने हलला; हात पुढे आला तेव्हा हातात पिस्तूल होतं, ते अजयवर रोखलेलं होतं.
'सोपान, आज तू फक्त पिस्तूल बाहेर काढण्याची प्रॅक्टिस कर. मागाहून त्यातले बारकावे तुला शिकवीन. मी घोड्यावरून एक रपेट मारून येतो. मग गाडीचं पाहू.'
कुमार मागच्या दारातून बाहेर गेला आणि अजय खरोखरच त्या पिस्तूल बाहेर खेचण्याच्या क्रियेचा सराव करीत उभा राहिला. सुरुवातीला हात नुसताच होस्टरवर आपटायचा. कधी कधी पिस्तूल हातात यायचं; पण बाहेर काढताना अडकायचं. एकूण ती गोष्ट अजिबात सोपी नव्हती. कुमारला विनंती करून पाहायची आणि पिस्तूल राजवाड्यावर नेण्याची कल्पना त्याच्या मनात आली. काही वेळाने त्याचा उजवा हात अगदी अवघडला. त्याने पिस्तूल पेटीत ठेवलं, कमरपट्टा काढून हूकला लावला आणि तो बाहेरच्या व्हरांड्यात एका खुर्चीवर येऊन बसला.
कुमार परत आला तेव्हा वाऱ्याने आणि उन्हाने त्याच्या चेहऱ्यावर एक लाली आली होती. तो अगदी खुशीत दिसत होता.
ते दोघं गाडीत बसले.
'तुला गाडीची कितपत माहिती आहे?' कुमारने विचारलं.
'ब्रेक, अॅक्सिलेटर, क्लचची थोडीशी माहिती आहे. साध्या साध्या गाड्यांवर मी थोडी प्रॅक्टिस केली आहे.'
'मग तुला हे फारसं कठीण जाणार नाही.' कुमार म्हणाला.
त्याने गाडी सुरू केली. हँडब्रेक सोडला आणि खाली उतरून तो सोपानला म्हणाला, 'बस ड्रायव्हरच्या जागेवर.'
कुमार वळून शेजारच्या सीटवर येऊन बसला.
'हं, जाऊ दे.'
अजय ज्या गाड्यांवर शिकत होता त्यांच्यापेक्षा ही गाडी फारच शक्तिशाली होती आणि वेग तर इतक्या झपाट्याने घेत होती की, सुरुवातीस क्लच आणि ॲक्सिलेटर आणि गिअर यांचं गणितच जमेना आणि गाडी गचके खात खात बंद पडली.
पण मग एकदाची सुरू झाली. समोर मोकळं मैदान होतं, तेव्हा कठीण वळणं नव्हती. अजयने दोन चकरा मारल्यावर कुमारने त्याला गाडी थांबवायला सांगितली आणि गाडी थांबताच तो खाली उतरला.
'हं, चालव,' तो म्हणाला.
'मी? मी एकटाच?' अजय थोडासा नर्व्हस होऊन म्हणाला.
'चालव! काही होत नाही! बंद पडेल एवढंच ना? पडू दे!'
पण गाडी बंद पडली नाही. डावीउजवीकडून दोन्ही बाजूंनी अजयला ती वळवता यायला लागली.
शेवटी इमारतीसमोर आणून त्याने ती थांबवली.

कुमार गाडीपाशी येताच अजय शेजारच्या सीटवर सरकला. गाडी राजवाड्यावर परत आली.
मोठ्या दारासमोर गाडी उभी करून कुमार आत गेला.
गॅरेजमध्ये गाडी ठेवण्यासाठी ड्रायव्हर आला. तोपर्यंत अजय गाडीतून उतरला होता.

***

आता दुपारी चार वाजेपर्यंत आपण वर कुमारच्या खोलीत जायचं नाही असं ठरवून अजयने आपलं जेवण उरकलं आणि तो आपल्या खोलीत खाटेवर जरा आडवा झाला.

***

राणीसाहेब आणि गायत्री जेवणासाठी डायनिंग हॉलमध्ये आल्या. तिथल्या गड्याला राणीसाहेबांनी कुमार असतील तर त्यांना जेवण्यासाठी बोलावण्यास पाठवलं. त्यांच्याबरोबर तो फारच क्वचित जेवण्यासाठी बसत असे. आजही तो येईल असं त्यांना वाटत नव्हतं.
पण मिनिटाभरात कुमार आला आणि काही न बोलता टेबलाच्या एका बाजूच्या सीटवर बसला.
राणीसाहेबांनी टेबलावरची घंटी वाजवताच गडी एकामागून एक अशा थाळ्या आणून ठेवायला लागले. सगळं मांडून झाल्यावर दोघं गडी आत गेले.
राणीसाहेब कुमारकडे पाहत म्हणाल्या,
'तू म्हणे आज त्या सोपानला गाडीतून घेऊन गेला होतास?'
'हो, त्याला इस्टेटवर नेलं होतं.'
राणीसाहेब काहीच बोलल्या नाहीत.
'मातोश्री, पुढचं ऐकून आपल्याला नवल वाटणार आहे.'
कुमार बोलला. राणीसाहेबांना तो नेहमीच जराशा उपहासाने 'मातोश्री'अशी हाक मारीत असे. 'किंवा कदाचित वाटणारही नाही. माझ्या वागणुकीबद्दल नवल करण्याचं आपण सोडूनही दिलं असेल.'
काही विचारणं म्हणजे विनाकारण होनाहीची वेळ येते हे माहीत असल्याने राणीसाहेब गप्प बसल्या.
'मातोश्री, मी या सोपानला गाडी चालवायला, घोड्यावर बसायला, पिस्तूल वापरायला शिकवणार आहे.'
कुमार अपेक्षेने त्यांच्याकडे पाहत होता. गायत्री काही न बोलता जेवण करीत होती, या दोघांकडे आळीपाळीने पाहत होती.
'तुझ्या वागण्याचं नवल वाटतं आणि वाटतही नाही; पण ते राहू दे. तू या सोपानला काल रात्री पहिल्यांदाच पाहिलास. त्याने अशी काय जादू केली की, तू त्याच्यासाठी एवढं करायला तयार झालास? माणसाची पारख झाल्याशिवाय त्याच्यावर एवढा विश्वास टाकणं चांगलं का?'
'आपण नाही का पाच-दहा मिनिटांच्या बोलण्यावर त्याला या इथे, राजवाड्यावर बोलावून घेतलं?'
'हां, ते खरं आहे; पण मी त्याला अगदी साधी नोकरी देणार होते. इतर चारचौघांसारखाच तो इथे वावरला असता.'
'मातोश्री, या सोपानचं मला नवल वाटतं. त्याच्यात लाचारी मुळीसुद्धा नाही. तो मला मालक, हुजूर, सरकार असं काहीही हाक मारीत नाही. साधं 'कुमार'म्हणतो. गोष्ट अप्रिय असली तरी सांगायला मागेपुढे पाहत नाही आणि त्याचं बोलणं अडाण्यासारखं वाटत नाही'.
गायत्रीशी कुमारसंबंधात झालेलं संभाषण राणीसाहेबांना आठवलं. अनायासे कुमार हजर झाला होता. त्या दोघांना एकमेकांशी काही बोलायचं असलं तर त्यांना ही संधी योग्य होती. राणीसाहेबांनी आपलं भोजन लवकर आटोपलं आणि उठता उठता त्या म्हणाल्या,
'तुमचं दोघांचं सावकाश होऊ दे.'
आणि त्या खोलीतून निघून गेल्या.

***

जराशी हसत गायत्री म्हणाली, 'आत्याचं वागणं किती पारदर्शक असतं! आपल्या दोघांना एकांतात बोलता यावं यासाठी हे नाटक!'
'आणि असं काय खाजगी बोलणं असणार की, ते मातोश्रींच्या समोर बोलता येणार नाही?'
'कुमार, आत्याचा विचार करतानासुद्धा तो विचार 'मातोश्री'असा येतो?
'तुला नक्की काय म्हणायचं आहे?'
'आत्याला, तू विनाकारण दुखावतोस.'
'केवळ 'मातोश्री'अशी हाक मारण्याने?'

‘तुझ्या हाक मारण्यात आदर तर नसतोच, उलट एक प्रकारचा उपहासच असतो.’
‘आज तरी माझ्या मनात ते नव्हतं; पण वर्षावर्षांच्या सवयी अशा सहजासहजी सुटत नाहीत.’
‘ते असू दे. आत्या का गेली माहीत आहे का? कुमार, तुला माहीत आहे की, आत्याने तुझ्यासाठी माझ्या वडिलांकडे माझी मागणी घातली होती; आणि वडिलांनी त्या मागणीला होकार दिला होता.’
‘बरं मग? पुढे?’
‘बरं मग काय? तू त्यावर कधी विचार तरी केला आहेस का? आणि आता विचार करण्याची वेळ आली आहे असं नाही का तुला वाटत?’
‘आपल्या विवाहसंबंधात बोलते आहेस; पण किती कोरड्या भाषेत?’
‘आडून आडून बोलण्यापेक्षा स्पष्ट बोललेलंच चांगलं. प्रेम, आकर्षण, रोमान्स हे सर्व बोलायला ठीक आहे. आयुष्यातलं यश हे व्यावहारिक दूरदृष्टीवर अवलंबून असतं. भाबड्या भावनांवर नाही. नाहीतरी आपल्याकडे अजून जवळजवळ सर्व विवाह अशा पारंपरिक पद्धतीनेच ठरवले जातात. आपण नात्यातले आहोत, लहानपणापासून दोघं एकमेकांना ओळखत आहोत; पण समजा तसं नसतं. तुझ्यासाठी वधूचा शोध करताना समजा राणीसाहेबांना-कारण त्या परिस्थितीत ती माझी आत्या नसणार-तेव्हा समजा राणीसाहेबांना माझी माहिती मिळाली असती-आणि त्यांनी आपली दोघांची गाठ घालून दिली असती-तर भावी पत्नी या नात्याने तू मला होकार दिला असतास?’
‘तुझा प्रश्न बरोबर नाही, गायत्री एकदा माहीत असलेली गोष्ट माणूस कधीही विसरू शकत नाही. मी तुला लहानपणापासून ओळखतो. इतक्या हजारो आठवणी मनात असताना तुझा विचार मी एखादी संपूर्ण अपरिचित व्यक्ती या नात्याने कसा करू शकणार?’
जराशी हसत गायत्री म्हणाली, ‘कुमार, तुझ्याही शब्दात भावनेचा लवलेशही नाही!’
‘नाहीतरी आपण व्यवहाराच्या दृष्टीनेच विचार करीत आहोत, हो की नाही? कृती करण्यापूर्वी भविष्याचा विचार करायलाच हवा, हो की नाही? आपण समजा विवाह केला, भावी आयुष्य कसं असेल याचा मी विचार करीत आहे.’
‘अवश्य कर. याक्षणी निकड नाही.’ गायत्री म्हणाली. ‘कुमार, मघाशी तू या सोपानबद्दल आत्याला सांगत होतास ते मी ऐकत होते आणि आत्याचाच इशारा मीही देते. एखाद्यावर एकदम असा आंधळा विश्वास टाकणं योग्य नाही. तसे आपण काही महानथोर असे नाही आहोत; पण आत्या आणि तूदोघांच्याही हातात सत्ता आहे, संपत्ती आहेतेव्हा हितशत्रू असणारच. सावधगिरीने वागायला हवं एवढीच सूचना करायची होती.’
गायत्रीचं जेवण झालं होतं. ती उठून गेली.
कुमार टेबलाशी एकटाच बसून होता. राणीसाहेबांनी त्याला गायत्रीसंबंधात अर्थात पूर्वीच सांगितलं होतं. आज तो विषय पुन्हा एकदा चर्चेत आला होता; पण यावेळी त्यात गायत्रीने स्वत: काही काही भर घातली होती. तिच्या बोलण्यावरून वाटत होतं की, या नात्याचा स्वीकार करण्याकडे तिचा कल आहे. कुमारने फक्त होकार द्यायचा अवकाश होता, की ही बात पक्की झाली असती.
तो जसा तिला लहानपणापासून ओळखत होता तशीच तीही त्याला ओळखत होती. राजेसाहेबांच्या करड्या शिस्तीखाली काही काही वेळा त्याला मनाविरुद्ध वागावं लागलं होतं. मनातून इच्छा नसताना त्यांच्या शब्दाप्रमाणे वागावं लागलं होतं. राजेसाहेब गेल्यानंतरचं त्याचं वागणंही तिला माहीत होतं. त्याला स्वत:ला स्वत:च्या वागण्यात काही दोष दिसो वा न दिसो, इतरांना दिसतात हे उघड सत्य होतं. तिच्या मनात त्याची प्रतिमा जर एक व्यसनी, छंदीफंदी, निरुद्योगी, पैशांची मनमानी उधळपट्टी करणारा तरुण अशी असेल तर पतीबद्दल पत्नीच्या मनात जो एक आदर असायला हवा तो तिच्या मनात असेल का? या प्रश्नाचं उत्तर द्यायला कोणी महापंडित नको होता.

***

खोलीत पडल्या पडल्या अजय विचार करीत होता. कुमारचं अगदी जवळून निरीक्षण करण्याची संधी आपोआपच त्याच्याकडे चालत आली होती. आता त्या संधीचा जास्तीत जास्त लाभ उठवणं त्याच्या हातात होतं. राणीसाहेबांनी सोपवलेलं काम यशस्वी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी तो करणार होता. मग भले त्यांच्यात काहींना फसवणूक दिसेल, बेकायदेशीरपणा दिसेल, लबाडी दिसेल. त्याचा स्वत:चा हेतू नि:संशय शुद्ध होता. कुमारांच्या खोलीत टेपरेकॉर्डर ठेवला पाहिजे म्हणजे एकटेपणी कुमाराचा आवाज ऐकून त्याला त्या आवाजाची सही सही नक्कल करता येईल. फक्त तो ही गोष्ट राणीसाहेबांच्या कानावर घालणार होता.

ठरल्याप्रमाणे तो कुमारच्या खोलीत चार वाजता गेला.
कुमार टीव्हीवरचा काहीतरी कार्यक्रम पाहण्यात दंग झाला होता.
अजय येताच त्याने टीव्ही बंद केला.
'सोपान, तुला माहीत आहे का, की सर्वांना तुझा संशय येतो?'
अजयने नुसतंच त्याच्याकडे पाहिलं.
'तुला मी ड्रायव्हिंग शिकवणार, रायडिंग शिकवणार, शूटिंग शिकवणार हे ऐकताच मातोश्री आणि गायत्रीदोघींनी सल्ला दिला की, केवळ चोवीस तासांच्या ओळखीवर मी तुझ्यावर इतका आंधळा विश्वास टाकू नये.'
'कुमार, तुम्ही माझ्यावर कोणताही आंधळा विश्वास टाकत नाही आहात.' अजय म्हणाला, 'मात्र हे खरं आहे, की तुम्ही देत असलेल्या संधीचा मी गैरफायदा घेऊ शकेन. लोकांना हे दिसेल की, तुम्ही मला तुमच्याशी बरंच सलगीने वागण्याची परवानगी देताहात. त्यामागची कारणं लोकांना कळणार नाहीत. राणीसाहेब आणि गायत्रीदेवी तुमच्या हिताचा विचार करूनच तसा सल्ला देत असतील.'
'तुझ्यावर केलेल्या आरोपांचा तुला राग आलेला दिसत नाही! छे छे! मी त्यातला नाही! असा तू स्वत:चा बचावही करीत नाहीस!'
अजय जरासा हसत म्हणाला, 'कुमार, शंभर शब्दांपेक्षा एखादी लहानशी कृतीच जास्त बोलकी असते! आणि या गोष्टी काही अशा नाहीत की, त्या तुम्ही मला कायमच्या देऊन टाकल्या आहेत. कोणत्याही क्षणी या सवलती तुम्ही बंद करू शकता!'
कुमार उठला, आतल्या खोलीत गेला, पाच-सात मिनिटांत बाहेर आला. तो बहुधा क्लबवर जाणार असावा.
'सध्या तरी त्या सवलती बंद करण्याचा माझा विचार नाही,' कुमार म्हणाला, 'चल मी तुला फार्मवर सोडतो. शिंदेकाकांना सांगून ठेवलंच आहे. तुझा तू पॅलेसवर परत ये.'
काही न बोलता अजय त्याच्याबरोबर निघाला.
इस्टेटच्या गेटपाशीच कुमारने त्याला सोडले.

***

शिंदे व्हरांड्यातच बसले होते. अजयला त्यांनी लांबूनच पाहिलं असलं पाहिजे; पण तो व्हरांड्याच्या पायऱ्याशी पोहोचेपर्यंत ते काहीही बोलले नाहीत.
'कुमारनी मला गेटपाशी सोडलं.'
'ते परत येणार आहेत?' शिंदेकाकांनी विचारलं.
'नाही.'
शिंदेकाका काहीच बोलले नाहीत.
त्यांना नमस्कार करीत अजय म्हणाला,
'शिंदेकाका, सकाळी कुमारांनी आपल्याला रायडिंग संबंधात काही सांगितलं होतं. त्यासाठी मला त्यांनी इस्टेटवर सोडलं आहे.'
'मला स्वत:ला त्यांनी प्रत्यक्षच सांगितलं आहे, नाहीतर माझा विश्वासच बसला नसता'शिंदेकाका अजयकडे जरा अविश्वासाने पाहत होते. राणीसाहेब, गायत्री, शिंदेकाकासर्वांचीच प्रतिक्रिया बोलकी होती. कुमारच्या कोणत्याही निर्णयाची शंका येत होती. त्याला आपलं हित कशात आहे हे समजत नाही असाच सर्वांचा ग्रह होता. तसा होण्यासाठी कदाचित पूर्वी काही कारणं झालीही असतील. जेथे पैसा आणि सत्ता आहे अशा स्थानाभोवती भामटे, स्वार्थी, संधिसाधू, लुच्चे लोक सतत घिरट्या घालीत असणार हे एक व्यावहारिक सत्य होतं. तेव्हा त्याच्यावर संशयाची सावली पडली याचा राग करण्यात काय अर्थ होता?
स्वत:शीच मान हलवत त्यांनी एक सुस्कारा सोडला.
'कुमारनी सांगितलं आहे तेव्हा ऐकायलाच हवं.' त्यांची नाराजी उघड दिसत होती. 'पूर्वी कधी घोड्यावर बसला होतास का?'
'मी?' अजय हसत म्हणाला. 'आजवर घोड्याला हातसुद्धा लावलेला नाही.
'ठीक आहे ये,' शिंदेकाका उठून व्हरांड्याच्या पायऱ्या उतरून खाली आले आणि इमारतीला वळसा घालून मागच्या बाजूला आले. घोड्यांचे तबेले आणि सरावाची जागा मागे होती. तिथे कामावर असलेल्यापैकी एकाला घेऊन ते मागे तबेल्यात गेले. ते बाहेर आले तेव्हा त्यांनी बरोबर मध्यम आकाराचा घोडा आणला.
'सोपान... सोपान नाव नाही का तुझं? तर सोपान हा अगदी मवाळ घोडा आहे. नवशिक्यालासुद्धा सांभाळून

घेतो. ये.'
रिकिबीत सोपानचा डावा पाय अडकवून शिंदेकाकांनी त्याला मागून रेटा देऊन घोड्यावर बसवलं.
'रघूऽ!' त्यांनी हाक मारली. एक चुणचुणीत पोरसवदा तरुण बाहेर आला. शिंदेकाकांनी लगाम त्याच्या हातात दिला.
'सोपान, शरीर ताठ ठेवू नकोस. ढिलं सोड- जा.'
रघूला नवशिक्यांना घेऊन घोड्यावरून फिरवायची सवय असावी. दोन लहान चकरा मारल्यानंतर त्याने लगाम सोपानच्या हातात दिला. घोड्याच्या पुठ्ठ्यावर त्याने थाप मारताच घोडा संथ गतीने चालायला लागला. रघू त्याच्याबरोबरच धावत होता. हळूहळू सोपानला तंत्र जमायला लागलं. तिसरी चक्कर होताच रघूने घोडा थांबवला.
शिंदेकाका म्हणाले, 'आज एवढं पुरेआता मजा वाटेल; पण पाठ अशी बोलायला लागेल की पाहा!'
सोपानला खाली उतरायला त्याने मदत केली.
'पुन्हा आलास की मागे जा- मी सगळ्यांना सांगून ठेवलं आहे, की तुला शिकवायचा कुमारांचा हुकूम आहे.'
आभाराचे शब्द अगदी शेवटच्या क्षणी सोपानने मागे घेतले. या गड्यांच्या संस्कृतीत त्यांना स्थान नव्हतं
'मी जातो. कुमारांना सांगतो की, तुमची खूप मदत झाली.'

***

बसने तो परत राजवाड्यावर आला. त्याच्याकडे फक्त कुमारचेच काम असल्याने आता तो रिकामाच होता. स्वयंपाकघरावरून जात असताना त्याला आचाऱ्याने हाक मारली.
'चहा, सोपानराव?' आचाऱ्याने विचारलं.
'सोपानचा सोपानराव'झाला होता तर! कुमार सोपानला स्वत:बरोबर गाडीतून नेतो ही गोष्ट बाकीच्यांच्या नजरेतून सुटली नव्हती.
अजयने चहा घेतला.
त्याच्या डोक्यात टेपरेकॉर्डरचे विचार पुन्हा आले. आताची वेळ चांगली होती. मुख्यत: तो कुमारच्या खोलीत गेला तरी कोणालाही काही संशय येणार नव्हता; कारण ते त्याचं कामच होतं.
बाहेरच्या खोलीतच टेपरेकॉर्डर होता. त्याने प्रयोग करून पहिला. साधारण सहा फुटांपर्यंतचा आवाज चांगला रेकॉर्ड होत होता. ते मशीन उचलून त्याने आतल्या खोलीत नेऊन कुमारच्या नेहमी बसण्याच्या सोफ्यापासून सहा फुटांवर ठेवलं. त्याच्या आसपास काय काय सामान आहे आणि त्याची मांडणी कशी केली आहे याची कुमारला काही कल्पना तरी होती का नाही देवासच माहीत! तेव्हा हा बदल त्याच्या लक्षात खासच येणार नव्हता.
बाहेरच्या दोन्ही खोल्या आवरून झाल्यावर अजय आत बेडरूममध्ये गेला. खुर्चीवर, पलंगावर कपडे अस्ताव्यस्त पडले होते. त्याने पँट उचलली तर खिशात नाण्यांचा खुळखुळ आवाज आला. त्याने सहज खिशात हात घातला तर तीस पस्तीस रुपयांच्या नोटा आणि काही चिल्लर नाणी निघाली. हातातल्या रकमेकडे तो आश्चर्याने पाहत होता. मग त्याची नजर समोरच्या उघड्या अलमारीकडे गेली. मॅनिले, शर्ट, पँट, सूट यांच्या रांगाच्या रांगा होत्या.
एकेक कपडा बाहेर काढून त्याने खिसे तपासलेबहुधा काही ना काही रक्कम असायचीच. मधल्या टेबलावर नोटांचा हा ढीग साचला होता! सहज हजाराच्या आसपास रक्कम असेल!
त्याने सर्व पैसे ड्रॉवरमध्ये ठेवले. कपडे परत अलमारीत व्यवस्थित लावले. पलंगपोस बदलला. रात्रीचे वापरायचे कपडे पलंगावर काढून ठेवले. मागे दिवे बंद करून खोलीचं दार बंद करून तो बाहेरच्या खोलीत, तिथून बाहेर आणि खाली आला.

***

इतर सर्व कामांपेक्षा या कुमारच्या परत येण्याची वाट पाहत राहणं या एका गोष्टीनेच आपल्या स्वभावाचा कस लागणार आहे, अजयला वाटलं; पण शेवटी हेही एक शिक्षणच होतं, इतर गड्यांच्या मानाने त्याला अगदी नाममात्र काम होतंशिवाय मालकांबरोबर गाडीतून हिंडायचं. हे काम घेण्यासाठी इतर नोकरांच्या उड्या पडल्या असत्या. असं आरामाचं काम मागून मिळणार नाही. तेव्हा त्याने चिडचिड किंवा उतावळेपणा दाखवला तर तो स्वभावाला सोडून झाला असता.
आदल्या रात्रीसारखीच आचाऱ्याकडून चार-पाच कप कडक कॉफी बनवून घेऊन तो आपल्या खोलीत येऊन बसला. शिंदेकाका म्हणत होते ती गोष्ट खरी होती. कंबर, खांदे आणि पाठ अवघडली होती. तेव्हा

घोड्यावर रपेट करताना मजा वाटली होती.शिंदेकाकांनी इशारा दिला नसता तर तो आणखी चकरा मारीत राहिला असता आणि मग हलणं मुश्कील झालं असतं.
मध्येच त्याला एक डुलकी लागली. कसल्याशा आवाजाने त्याला दचकून जाग आली. कुमार आला आहे का याचा त्याने कानोसा घेतला. सर्वत्र शांतता होती. घड्याळ साडेबाराची वेळ दाखवत होतं. अर्धा कप कॉफीने डोळ्यावरची झोप जराशी उतरली. तो खोलीबाहेर आणि मोकळ्यावर आला. गारव्याने उरली झोप गेली. मधल्या मोकळ्या जागेतच तो येरझारा मारीत राहिला.
एक वाजता कुमारची गाडी गेटमधून येताना दिसली. ती मोठ्या दारासमोर येऊन थांबली, तेव्हा अजय तिथपर्यंत पोहोचला होता. गाडी कुमारच चालवत होता. गाडीत तो एकटाच होता. वरच्या मोठ्या दिव्याचा प्रकाश गाडीवर पडत होता. त्या प्रकाशात अजयला दिसलं की, बॉनेटच्या उजव्या बाजूला एक खूप मोठा पोचा आला आहे. गाडीने वाटेत कशालातरी धडक दिली असावी. गाडी राजवाड्यापर्यंत सुखरूप पोहोचली हेच नवल म्हणायला हवं. कुमार दारूच्या कितपत नशेत होता हे अजय पाहत होता. पावलं टाकता आली नाहीत तर त्याला प्रत्यक्ष खांद्यावर उचलूनच वर न्यावा लागला असता.
गाडीत प्रकाश कमी असूनही कुमारचा हात अगदी नेमका किल्लीकडे गेला. इंजिन बंद होताच एकदम शांतता झाली. दाराच्या मुठीकडेही हात बरोबर गेला. दार उघडल्यावर बाहेर येताना मात्र कुमारचं पाऊल अडखळल्यासारखं झालं. गाडीच्या टपाचा आधार घेऊन कुमार लटपटत्या पावलांवर उभा राहिला.
खिडकीतून वाकून आत हात घालून अजयने गाडीची किल्ली काढून घेतली, ती कुमारच्या मॅनिल्याच्या खिशात टाकली आणि एक हात पुढे करत तो म्हणाला, 'चला.'
अजयला आधी शंका आली होती तीच खरी ठरली. चालताना जरी कुमारची पावलं अडखळत होती तरी आधारासाठी त्याच्या खांद्याला लावलेल्या हातावर भार मुळीच पडत नव्हता. कुमार स्वत:ला व्यवस्थित पेलत होता. तेव्हा दारूच्या नशेची ही नक्कल होती.
खोलीत पोहोचून कुमार सोफ्यावर आरामात बसेपर्यंत अजय काहीच बोलला नाही. आतल्या खोलीतला एक ग्लास आणून त्याने तो कॉफीने भरला आणि कुमारपुढे केला.
'वास्तविक कॉफीची आज तुम्हाला गरज नाही'अजय म्हणाला. म्हणजे रात्रीची कॉफी घ्यायला हरकत नाही; पण रोजच्यासारखी धुंदी उतरायला जरूरी नाही; कारण आज तुम्ही नशेत नाही आहात.'
कुमार सोफ्यावर एकदम सरळ बसला.
'तू म्हणतोस ते खरं आहे; पण तुझ्या बरोबर ध्यानात आलं याचं मात्र नवल वाटतं.'
'तुमच्या चालण्यावरूनच समजत होतं, की तुमचा तोल अगदी व्यवस्थित आहे; पण ही नक्कल कशासाठी?'
'एकदा पोझ घ्यायची सवय झाली की ती सुटत नाही'कुमार कॉफीचा घोट घेत म्हणाला. 'आज जास्त घेतली नाही ही गोष्ट खरी आहे; पण म्हणजे माझ्यात सुधारणा झालीमी अगदी संयमाने वागण्याची शपथ घेतली असं नाहीकदाचित उद्या मी अगदी झिंगल्या अवस्थेत परत येईन.'
दिवा लावायच्या निमित्ताने अजय भिंतीपाशी गेला होतातिथेच त्याने टेपरेकॉर्डर सुरू केला. वास्तविक हे धोक्याचं होतंजर का कुमारच्या लक्षात ती गोष्ट आली तर तो त्याचक्षणी सोपानची हकालपट्टी करील यात तिळमात्रही संशय नव्हता; पण थोडा बहुत धोका पत्करायलाच हवा होता.
अजय कुमारच्या समोर येऊन उभा राहिला.
'आज फार्मवर गेला होतास?'
'हो. शिंदेकाका मला रायडिंग शिकवायला जरा नाराजच होते; पण प्रत्यक्ष तुम्ही त्यांना सांगितलं असल्याने त्यांचा नाईलाज झाला.'
'मग केली का सुरुवात?'
'हो. एक गोष्ट ध्यानात आलीते वाटतं तितकं सोपं नाही.'
एकदोन सेकंद थांबून अजय म्हणाला,
'तुमचे कपडे आत काढून ठेवले आहेत. आता जर माझं काही काम नसलं तर मी खाली जाऊ का?'
आठवल्यासारखं करून अजय म्हणाला,
'होएक गोष्ट तुम्हाला दाखवायची होती.'
पुढे होऊन त्याने ड्रेसरचा ड्रावर पुढे ओढला. आतला नोटांचा गठ्ठा दोन्ही हातात घेऊन त्याने तो कुमारपुढे धरला.
'हे कसले पैसे?' कुमारने नवलाने विचारलं.

‘तुमच्याच मॉनेल्यांच्या आणि पॅटॉंच्या खिशात होते, कुमार.
यापूर्वीही राहिले असतील आणि कपडे तसेच परटाकडे गेले असतील.’
‘सोपान, तू जरा थांब.’ कुमार उठला. त्याने कपाटातली व्हिस्कीची बाटली काढली. अजय आतल्या फ्रीजमधून बर्फाचा ट्रे आणि ग्लास घेऊन आला. मनासारखं ड्रिंक तयार झाल्यावर ते घोटा घोटाने घेत कुमार आरामात सोफ्याला रेलून बसला. जरा वेळाने त्याला ड्रिंक सौम्य वाटलं असावंत्याने त्यात थोडीशी व्हिस्की घातली.
कुमारने जा म्हणून आज्ञा दिल्याखेरीज अजयला तिथून हुलता येत नव्हतं. पाहता पाहता ड्रिंकचा एक ग्लास संपला, दुसरा तयार झालापहिल्यापेक्षा जरा जास्त स्ट्रॉंग. शेवटी रोजच्या सवयीचाच विजय झाला होता. कोणतीही टीका करण्याचं अजयचं स्थान नव्हतं. कुमारने विचारल्याखेरीज तो काही बोलणार नव्हता; पण बोलायची वेळ आली तर मात्र खरं तेच निर्भीडपणे बोलणार होता.
‘शिवबा असता तर म्हणाला असताछोटे मालक! हे चांगलं नाहीपुरे आता’
अजय काहीच बोलला नाही.
‘तू काहीच बोलत नाहीस सोपान.’
‘माझी ती जागा नाही, कुमार.’
‘ही गुलामी तुला पसंत आहे?’
‘कसली गुलामी?’
‘माझे सगळे हुकूम शब्दश: पाळण्याची गुलामी? ये म्हटलं की यायचं, जा म्हटलं की जायचं’
आता शंका नव्हती की दारूचा कैफ चढायला लागला होता.
‘ही गुलामी नाहीही नोकरी मी आपण होऊन घेतली आहे. अणि या येजा करण्यासाठीच तर मला पगार मिळतो.’
‘फार व्यवहारी आहेस. फार फार व्यवहारी आहेस.’ कुमारचे उच्चार जड व्हायला लागले होते. ‘तसे सगळेच व्यवहारी आहे. मी सोडून, हो की नाही?’
अजय काहीच बोलला नाही.
‘आपली गायत्री आहे ना?’
‘कुमार, त्यांच्याबद्दल काही बोलू नका.’
‘काही बोलू नका म्हणजे माझ्याशी बोलू नकाया गोष्टी ऐकण्याची माझी जागा नाही.’
‘तुला माहीत आहे ना आमच्या मातोश्रींनी आमच्या दोघांचा विवाहाचा घाट घातला आहे?’
‘कुमार, पुन्हा सांगतोया गोष्टी बोलू नका.’
‘ही गायत्री मोठी स्मार्ट. शिकलेली. स्पोर्टमध्ये टॉप. मी कसा ते कोणी सांगायला नको; पण तरीही ती माझ्याशी विवाह करायला तयार आहे. नवल आहे, नाही?’
अजय काहीच बोलला नाही.
‘मोठी चलाखी आहे ही सोपान. आमचा विवाह झालापुढे काय होणार ते दिसतंच आहेमतभेद, वादावादी, तंटेबखेडे, शब्दाशब्दी, मानापमानशेवटी एकत्र राहणं अशक्यप्रकरण अगदी या थराला गेलं नाही तरी माझा स्वभाव सुखलोलुप आहे, मानसिक कष्टाची तयारी नाहीतेव्हा सर्व कारभार आपोआपच तिच्या हातात येणार नाही का? मी सदान्कदा झिंगून पडलेला. तिच्याशी विवाह करून मी सगळं स्वातंत्र्य गमावून बसेन आणि ते परत मिळवायचं तर फार फार मोठी किंमत मोजावी लागेलती गायत्री मोठी हुशार आहेती पुरी पुरी किंमत वसूल करून घेईल. फक्त आमच्या मातोश्रींना या कशाची कल्पना नाहीत्यांना वाटतंय ही पितृभक्त कन्या आपल्या वडिलांनी दिलेला शब्द पाळण्यासाठी आपल्या साऱ्या सुखावर, हौशीवर पाणी सोडायला तयार झाली आहे!’
कुमारचे हे सर्व शब्दच इतके अनपेक्षित होते की, अजयची अवस्था मोठीच विलक्षण झाली. कुमार दम घेण्यासाठी जरा थांबताच अजयने दोन्ही हातांनी त्याला नमस्कार केला आणि तो म्हणाला,
‘कुमार! मला या गोष्टी सांगू नका! मला यातलं काहीही ऐकवू नका! मी कोण, तुम्ही कोण हे तुम्ही आता विसरला आहातस्वत:ला आवराजास्त काही बोलू नका.’
‘मी दारूच्या नशेत बडबडतो आहे असं तुला वाटतं?’
‘कुमार, मी तुमचा नोकर आहे, गडी आहेया गोष्टी तुम्ही माझ्यादेखत बोलता कामा नयेमाझं ऐकाआता झोपामला जाऊ द्यात.’

एव्हाना कुमार मद्याच्या नशेत पुरा पुरा गेला होता. सोफ्यावरून उठून अडखळत्या पावलांनी अजयपाशी येऊन त्याच्या खांद्यावर एक हात ठेवून दुसऱ्या हाताचं बोट अजयच्या तोंडापुढे हलवत तो म्हणाला,
'सोपान, तूही इतरांसारखाच सल्ला द्यायला लागलास! सगळे म्हणतातआता बडबड पुरे! आता झोपा! असं वाटलं होतं तू तरी जरा ऐकून घेशील.'
'कुमार, असल्या गुप्त गोष्टी भलत्यासलत्यासमोर बोलायच्या नसतातत्यांचा कोण कसा दुरुपयोग करील सांगता येत नाही! कुमार दीड वाजून गेला आहेतुम्ही आता झोपायला जामी येऊ का मदत करायला?'
'काही जरूर नाही! जा!'
लटपटत्या पावलांनी कुमार बेडरूममध्ये गेला.
अजयने रेकॉर्डर बंद केला, आतली कॅसेट काढून ती खिशात टाकली आणि खोलीतले दिवे बंद करून तो बाहेरच्या खोलीत आला. तिथले दिवे बंद करून तो बाहेर आला. आपल्यामागे दार लावून घेतले. लॅचचा खट् आवाज झाल्याची खात्री होताच तो जिन्यावरून खाली आणि मग बाहेर आपल्या खोलीत आला.

***

10.

कुमारचं बोलणं ऐकून अजयला नवल वाटलं होतंदोन गोष्टीचं नवल वाटलं होतं. एक अशासाठी की कुमारने या दिशेने इतका विचार केला असेल याची त्याला कल्पना नव्हती आणि दुसरं अशासाठी, की त्याने स्वत: या शक्यतेचा विचारच केला नव्हता. वास्तविक पाहता या राजघराण्यातल्या माणसांच्या बोलण्याचालण्याशी, त्यांच्या हेतूंशी त्याला काडीइतकंही कर्तव्य नव्हतं; पण कुमार जे बोलला होता ते दुर्लक्ष करण्यासारखं खास नव्हतं. गायत्री त्याच्याशी विवाह करायला खरोखर तयार झाली असेल तर कुमारच्या शब्दांचा विचार करायलाच हवा.
त्याच्यासाठी या गोष्टीला अशासाठी महत्त्व होतं की, पुढेमागे समजा खरोखरच त्याला कुमारची भूमिका वठवायची वेळ आली, तर तो गायत्रीशी कसा वागतो हे अजयला माहीत असायला हवं होतं. बाह्यत: मित्रत्वाची, थोड्याशा सलगीची (नात्यामुळे आपोआपच आलेली) पण भावनांची विशेष आपुलकी वा ओलावा नसलेली ही भूमिका होती. अडचण ही होती की, एकटे असताना ते कसे वागतात हे पाहायला मिळणंच मुश्किल होतं; कारण निरीक्षक आला की एकांत संपलाच!
त्याला सकाळी खूप उशिरा जाग आली. तो राजवाड्यावरचा साधा नोकरगडी असता तर हा गलथानपणा अजिबात खपवून घेतला गेला नसता; पण त्याची केस स्पेशल होती. सर्वांच्या देखत कुमार त्याच्याशी ज्या सलगीने वागत होता तिकडे कोणीही दुर्लक्ष करू शकत नव्हते; पण राजवाड्यातल्या अंत:स्थ प्रवाहांची त्याला अजून कल्पना आली नव्हती. त्याला कल्पना नव्हती की, या गोष्टी पार त्रिपाठींच्यापर्यंत पोहोचल्या असतीलसकाळी अकराच्या सुमारास एक गडी त्याच्याकडे आला.
'सोपानराव, कारभाऱ्यानी तुम्हाला बोलावलं आहे.'
विशेष विचार न करता अजय त्याच्या मागोमाग निघाला. त्रिपाठींना सारे कारभारी म्हणत असतील ही त्याला कल्पनाच नव्हती. दारावर 'श्री. गोवर्धनदास त्रिपाठी, सेक्रेटरी'अशी मोठी पाटी दिसली तसा तो एकदम सावध झाला. तेवढा सेकंदभरच वेळ मिळाला.
गड्यामागोमाग आत जावंच लागलं.
खूप मोठ्या टेबलामागे त्रिपाठी बसले होते. गडी दूर होताच अजयने दोन्ही हात जोडून जरा वाकून त्रिपाठींना नमस्कार केला.
'मी सोपान ताटके, मालक.'
तीक्ष्ण नजरेने त्रिपाठी त्याचं निरीक्षण करीत होते. त्यांनी गड्याला खोलीबाहेर जायची खूण केली.
कोणत्याही प्रश्नाचं जेवढ्यास तेवढंच उत्तर द्यायचं असं अजयने ठरवलं होतं. घुम्या, अबोल, जरासा ताठर वाटला तरी चालेल; पण हांजी हांजी करणारा खुशमस्कऱ्या वाटायला नको.
'किती दिवस झाले रे लागल्याला?'
'आज पाचवा दिवस आहे मालक.'
'म्हणे राणीसाहेबांनी तुला कारखान्यावर पाहिलं?'
'हो मालक.'
'आणि काय काम करतोस?'

‘राणीसाहेबांनी शिवबांच्या हाताखाली पाठवलं होतंआता दोन दिवस झाले शिवबा गावाकडे गेले आहेतमग मीच कुमारांचं सगळं काम करतो.’
त्याच्या बोलण्यावागण्यात त्रिपाठींना काहीतरी खटकलं असावंजरी त्यांना त्याच्यावर नेमकं बोट ठेवता येत नसलं तरी त्यांच्या अनुभवी नजरेला अजयच्या वागणुकीतला वेगळेपणा जाणवत होता; पण काही केल्या त्याला वागण्यात लाचारी आणणं जमलंच नसतं.
‘कुमारांच्यावर नीट ध्यान ठेव बरं का’ त्रिपाठी म्हणाले आणि त्यांनी मुलाखत संपवली.

***

त्रिपाठींच्या खोलीतून अजय निघाला तो सरळ कुमारच्या खोलीकडे गेला. स्वत:जवळच्या किल्लीने त्याने बाहेरच्या खोलीचं दार उघडलं. आत सर्व सामसूम होती. मधल्या खोलीच्या दारातून त्याने कुमारच्या खोलीत हलकेच डोकावून पाहिलं. कुमार पलंगावरच होता; पण जागा झालेला दिसत होता.
‘कोण सोपान का रे?’ कुमारने विचारलं.
सोपान आत जाऊन पलंगापाशी उभा राहिला. त्रिपाठींशी भेट झाल्यापासून अजय त्या भेटीबद्दल कुमारला काही सांगावं का नाही याचा विचार करीत होता. कुमार आणि त्रिपाठी यांचे परस्परसंबंध कसे होते याची त्याला काहीही माहिती नव्हती.
‘कुमार, मी तुम्हाला काही सांगणार आहे त्याचा राग मानू नका.’
‘हं.’
‘आपले गोवर्धनदासजी त्रिपाठी, कारभारी आहेत ना?’
‘आहेत.’
‘त्यांनी मला आज सकाळी त्यांच्या ऑफिसात बोलावून घेतलं होतं. माझी चौकशी करीत होते. राजवाड्यातली प्रत्येक लहान मोठी गोष्ट त्यांच्या कानापर्यंत पोहोचते असं दिसतं. तुमच्या हालचालीवरही त्यांची नजर असावी असा मला संशय येतो. हे बोलण्याची माझी जागा नाही. माझी चूक होत असली तर मला माफ करा आणि मी काही बोललो आहे हेही पार विसरून जा.’
‘सोपान, ऐकलेली कोणतीही गोष्ट विसरून जाता येत नाही हेच मी काल कोणाला तरी सांगत होतो; पण आता तेही आठवत नाही.’ कुमार पलंगावर उठून बसला. ‘हे त्रिपाठीजी राणीसाहेबांचे कारभारी आहेतत्यांचे खूप कारभार चालतात’
‘चहा, कॉफी काही आणू का? त्याच्याबरोबर काही आणू का?’ अजयने कुमारला विचारलं.
‘बारा वाजत आले नाही का?’ कुमारने विचारलं.
‘हो.’
‘मी बाहेरच कोठेतरी जाईनतिथेच जेवण वगैरे करून तसाच परस्पर क्लबवर जाईनसंध्याकाळी वाटलं तर इस्टेटवर जा.’
जरासं धाडस करून अजय म्हणाला,
‘कुमार, एक विनंती करू का?’
‘बोल.’
‘इस्टेटवर रायडिंगची शिकवण मिळते; पण तुम्ही स्वत: हजर असल्याखेरीज शूटिंगचं शिक्षण मिळणार नाही. एक विनंती आहे. जमलं तर इथेच एखादं पिस्तूल आणून ठेवाल का? फावल्या वेळात मला ते पट्ट्यातून काढण्याचा तरी सराव करता येईलमग प्रत्यक्ष तुमच्या हजेरीत गोळ्या झाडण्याचं शिक्षण घेता येईल.’
‘अरे इथे एक रिव्हॉल्व्हर आहे की! ये इकडे!’
कुमारमागोमाग अजय त्याच्या बेडरूममध्ये गेला. अलमारीच्या आतला लॉकर उघडून आतून कुमारने एक रिव्हॉल्व्हर काढले आणि भिंतीतल्या एका कपाटातून कमरपट्टा काढला. रिव्हॉल्वरची नळकांडी फिरवून आतल्या सहा गोळ्या त्याने काढून घेतल्या आणि रिकामा रिव्हॉल्व्हर अजयच्या हातात दिला.
‘घे, ही तुझी कल्पना छान आहे. गोळ्या आत ठेवत कुमार म्हणाला. अजयने रिव्हॉल्वर तिथेच टीपॉयवर ठेवला आणि बाहेर जाता जाता तो म्हणाला,
‘तुमची मेहरबानी आहे, कुमार.’
मग तो सरळ खाली आपल्या खोलीकडे गेला. स्वत:शी तो विचार करीत होता. एखाद्यावर मर्जी बसली की, त्याच्यावर संपूर्ण विश्वास टाकण्याचा कुमारचा हा स्वभाव त्याला योग्य वाटत नव्हता; कारण कुमारचं समाजातील स्थानच असं होतं की, त्याच्या विश्वासाचा गैरफायदा उठवणारे काही कमी निघणार नाहीत.

हा स्वभाव आताच्या क्षणी त्याच्या पथ्यावरच पडला होता. आता त्याला पिस्तुलाच्या वापराचा सराव करता येईल; शिवाय आता त्याच्यापाशी ती कॅसेट होतीकुमारच्या आवाजातील बारकावे ध्यानात ठेवून त्यांचा वापर करायचा सरावही करता येईल. त्याच्याबद्दल काहींच्या मनात, यात त्रिपाठी, गायत्रीदेवी हे होतेच, संशय आला तर त्याला त्याचं नवल वाटणार नव्हतं आणि रागही येणार नव्हता. त्याने स्वत:ही अशा एखाद्या परक्या माणसावर असाच संशय घेतला असता. तो स्वत: प्रामाणिक होता, इमानी होता; पण हे गुण काही मोरपिसांसारखे डोक्यात खोचून दाखवता येत नाहीत.

***

जेवण झाल्यावर दोनच्या सुमारास तो वर आला. त्याला कल्पना नव्हती 'गायत्रीने आपल्याला पाहिलं आहे' आणि आपल्या मागोमाग ती येत आहे. त्याने जवळच्या किल्लीने कुमारच्या खोलीचं दार उघडलं. आत येऊन त्याने दार आपल्यामागे लोटून घेतलं आणि रोजच्या शिरस्त्याप्रमाणे एकामागून एक खोल्यांची सफाई सुरू केली.

बाहेरची आणि मधली खोली आवरून तो बेडरूम आवरत होता. हल्ली तो आदल्या दिवसांच्या कपड्यांचे खिसे नेहमी चाचपून पाहत आहे. पैसे तसेच खिशात ठेवण्याची कुमारची सवय फार जुनी होती आणि ती अशी एकाएकी सुटणार नव्हती.

'वा! छान चाललं आहे!'

आवाज इतका अचानक आला की, तो दचकून मागे पाहू लागला.

बेडरूमच्या दारातच गायत्री उभी होती. दोन्ही हातांची छातीवर घडी घालून त्याच्याकडे एकटक पाहत होती. क्षणभर त्याला विलक्षण संताप आला; पण तो लागलीच विरून गेला. तिची काय चूक होती?

'आपला काहीतरी गैरसमज आहे, बाईसाहेब.' अजय म्हणाला.

'मालक खोलीत नसताना त्याच्या अपरोक्ष त्याच्या शर्ट-पँटचे खिसे चाचपणे यातून एकच अर्थ निघू शकतो, नाही का?'

'हो, खिशात काही पैसे आहेत का ते पाहणं.'

'त्याचं उत्तर तिला सर्वस्वी अनपेक्षित होतं.

'बाईसाहेब, जरा पुढे याल का?'

जरा प्रश्नार्थक चेहऱ्याने गायत्री पुढे आली. ती जवळ येताच अजयने ड्रेसरचा ड्रॉवर उघडला. म्हणाला,

'आत पाहा, बाईसाहेब.'

आत तो नोटांचा गठ्ठा आणि नाण्यांचा ढीग तसाच होता.

'अगं बाई!' तिच्या तोंडून नकळतच तो उद्गार निघाला.

'कुमार खिशातून पैसे काढून ठेवायचे नेहमीच विसरत असतात. मी इथे आल्यापासून सर्व खिसे चाचपले तेव्हा एवढी रक्कम सापडली. कुमारांना ती दाखवलीसुद्धा.'

'त्यांना तू नुसतं कुमारच हाक का मारतोस?'

'पहिल्याच भेटीत 'साहेब'हाक मारली तर त्यांनीच मला दटावलंहे साहेब प्रकरण बंद, साधं 'कुमार'म्हणत जा.'

'तुला पगार किती मिळतो?'

'राणीसाहेब अजून काही बोलल्या नाहीत, बाईसाहेब.'

'आणि तसाच नोकरीवर राहिलास?'

'तुम्हाला खरं सांगतो बाईसाहेब, शहरात राहायला मिळतंय. राहायला जागा आहे. दोन्ही वेळचं जेवण आहे. शिवाय राजवाड्यावर कामाला आहे म्हटलं की लोक जरा सांभाळूनच वागतात. आता तरी माझी काही तक्रार नाही, बाईसाहेब.'

गायत्रीचं समाधान कितपत झालं कळायला मार्ग नव्हता; पण आता विचारण्यासारखं किंवा टीका करण्यासारखं काही राहिलंच नव्हतं. एक-दोन सेकंद थांबून ती गर्रकन् वळली आणि झपाझप चालत निघून गेली.

अजयच्या चेहऱ्यावर एक अगदी मंद हास्य आलं.

***

कुमारने शिकवला होता तसा अजयने कमरेभोवती तो पट्टा बांधला. आता तो आरशासमोर उभा राहून रिव्हॉल्व्हर काढण्याचा सराव करू शकत होता. अजूनही हालचालीत सफाई नव्हती; पण सुरुवातीस अगदी

गोंधळ होत होता तो आता खूपच कमी होत होता. त्याची खात्री होती की, ही कला त्याला लवकरच साध्य होण्यासारखी आहे.
उजवा हात जेव्हा अवघडला तेव्हा त्याने तो सराव थांबवला.
खिशातली कॅसेट काढली, ती प्लेअरमध्ये सरकवली आणि प्लेअर सुरू केला. कुमारच्या आवाजातले चढउतार, बारकावे यांची तो मनात साठवण करून घेत होता. बोलण्यातला काही भाग कुमार चांगला शुद्धीवर असतानाचा होता, काही भाग कुमार दारूच्या अमलाखाली गेल्यानंतरचा होता. दोन्ही प्रकारच्या आवाजाचं आपोआपच रेकॉर्डिंग झालं होतं.
रेकॉर्डमध्ये कोरी टेप घालून त्याने काही काही वाक्य कुमारच्या आवाजात उच्चारली आणि तो आवाज स्वत: ऐकला. पुन्हा एकदा प्रयत्न, पुन्हा एकदा चाचणी. हे काम वेळ घेणारं होतं, कष्टाचं होतं; पण त्यात चूक होता उपयोगी नव्हती. कुमारला जवळून वर्षानुवर्षे ओळखणारे लोक इथे वावरतातनिदान काही वेळ तरी त्यांच्या मनात कोणताही संशय येता कामा नये.

***

संध्याकाळी पाच वाजता तो फार्महाऊसवर पोहोचला.
शिंदेकाका बाहेर दिसले नाहीत. अजय इमारतीच्या मागच्या बाजूला गेला. तिथेही शिंदेकाका नव्हते; पण त्याला आदल्या दिवशी स्वारी शिकवणारा तरुण तिथे होता. अजयला पाहतच तो पुढे आला.
'तुम्ही सोपानराव नाही का?'
'हो.'
'शिंदेकाकांनी सांगून ठेवलं आहेतुम्ही केव्हाही आलात तरी घोडा द्यायचा. आज रपेट मारायची आहे?'
'तुला वेळ असला, तर.'
'आहे ना. चला.'
आदल्याच दिवसाच्या कार्यक्रमाची पुनरावृत्ती झाली.
सातच्या सुमारास तो राजवाड्यावर परत आला.
दुपारच्या पिस्तुलाच्या सरावाने उजवा खांदा आणि संध्याकाळी घोड्यावरच्या रपेटीने कंबर आणि मांड्या, सर्व शरीर अवघडलं होतं. वरवर पाहता एखाद्याला त्याची ही राजवाड्यातली नोकरी अगदी आरामाची वाटली असती. दोन वेळा जेवावं, कुमारांच्या बरोबर गाडीतून हिंडावं, जरा साफसफाई करावी की बस! खरा प्रकार किती वेगळा होता याची कोणालाच कल्पना नसणार. ज्यांच्यासाठी तो हे सर्व करत होता त्या राणीसाहेबांना तरी होती का नाही देवासच माहीत!

***

11.

रात्री अकराच्या सुमारास आचाऱ्याकडून कडक कॉफी बनवून घेणं ही आता रोजचीच बाब झाली होती. आतापर्यंतच्या त्याच्या आयुष्यात असं रात्रीमागून रात्री जागत बसायची वेळ आली नव्हती; पण लगोलग एक जरासा गमतीचा विचार मनात आलासमजा त्याची इच्छा सफल झाली असतीकारण नटाचं ते आयुष्यच असतं. खेद एवढाच होता की, या सत्य 'नाटका'त त्याची भूमिका उत्तम वठली तर केवळ आत्मसमाधानाशिवाय काहीही हाती येणार नव्हतं.
साडेअकराच्या सुमारास तो बाहेरच्या खुल्या दिवाणखान्यातच आला आणि डोळ्यावरची झोप उतरवण्यासाठी तिथेच येरझारा मारू लागला. आता एवढ्यात केव्हातरी कुमार येईलझिंगलेल्या अवस्थेत आणि मग त्याच मद्यांच्या तारेत उद्या दुपारपर्यंत लोळत पडणार, की गेला आयुष्याचा आणखी एक दिवस वाया. चणे आहेत तिथे दात नाहीत हीच गोष्ट खरी.
कुमारबद्दल आपल्या मनात नेमकी कोणती भावना आहे याची त्याला कल्पना येत नव्हती. जराशी सहानुभूती होती. इतरांशी बेमूर्वत खोटेपणे वागण्याचा राग होता आणि जराशी कीवही होती; पण दारूच्या नशेत कुमारने, गायत्रीसंबंधात जे विचार उघडपणे बोलून दाखवले होते ते खासच विचार करायला लावणारे होते.
गाडीच्या आवाजाने त्याची विचारांची तंद्री भंग पावली.
ड्राइव्हचं वळण जोरात घेऊन गाडी ब्रेकचे आवाज करीत मोठ्या दारासमोर थांबली. हूडवर तोच तो वरच्या दिव्याचा प्रकाश पडत होता. आधीचाच तो एक मोठा पोचा होता. त्यात आणखी भर पडली नव्हती.
एखादा मिनिटभर थांबून, कुमारने स्वत:च गाडीचं दार उघडलं नाही तरच अजय खाली जाणार होता; पण

गाडीचं दार उघडण्याइतका कुमार शुद्धीवर होता. बाहेर आल्यावर तो तसाच गाडीला रेलून उभा राहिला. तेव्हा अजय खाली गेला.
'सोपान का रे?'
'हो.'
'किती बारा वाजले का रे?'
'हो.'
'कॉफी आणली आहेस?'
'आणतो हवी तर.'
'आण, गाडीतच आण.'
'कुमार परत गाडीत बसला. अजय खोलीतून कॉफीचा थर्मास घेऊन आला. शेजारचं दार उघडत कुमार म्हणाला,
'बस आत. इथेच कॉफी दे. दार लावून घे.'
अजय आत बसताच गाडी सुरू झाली. गाडी सावकाश चालत असतानाच अजयने कॉफीचा कप कुमारच्या हातात दिला. एक हात स्टिअरिंगवर ठेवून कॉफी पिता पिता कुमार म्हणाला,
'सोपान'तुझा तो ड्रॉवरमधला नोटांचा गठ्ठा आज बरोबर न्यायला हवा होता.'
'पैसे बरोबर नव्हते?'
'होते; पण संपले.'
अजय काहीच बोलला नाही.
'इतर कोणताही नाही तरी एक नियम मी पाळला आहे. पैसे संपले तर खेळ बंद. उधार घ्यायचे नाही. आय ओ यू वर घ्यायचे नाहीत. अगदी पक्का नियम. कधीही मोडत नाही.'
सगळ्याच शहाणपणा गमावून बसलेला नाही तर! अजयला वाटलं.
'आणखी एक गंमत कानावर आली. तुला का सांगावीशी वाटते कळत नाही. अर्थात तुझ्याखेरीज वाड्यावर मी कोणाशी बोलतही नाही म्हणा! तुझ्याजागी शिवबा असता तर खासच सांगितली नसतीआपल्या त्रिपाठीसंबंधात आहे.'
'कुमार, माझी एक विनंती आहे. मी परका आहे. आपल्या या परिवारातलं काही मला सांगू नका. राणीसाहेबांनी आणि गायत्री देवींनी तुम्हाला माझ्याबद्दल दिलेला इशारा विसरू नका.'
'अरे ती गोष्ट बऱ्याचजणांना माहीत आहेमलाही शंका होतीती खरी ठरली एवढंच. आपले त्रिपाठीजी मोठे गुलहौशी आहेत. आपल्या क्लबमध्ये लिली नावाची एक नवी डान्सर आली आहेती सांगत होती.'
'कुमार, तुम्हाला एकट्याला सांगत होती का सर्वांनाच?'
'अंहोमला एकट्यालाच सांगत होती.'
'त्रिपाठींचा विषय कसा निघाला?'
'मला सगळे ओळखतात की!'
'म्हणजे मुद्दाम तुम्हाला एका बाजूला घेऊन सांगितलं...'
'हो तसंही असेल.' कुमार बेफिकीरपणे म्हणाला; 'पण तुला त्यात काही स्वारस्य कसं नाही?'
'कुमार, तुम्ही विसरता, की मी एक अगदी साधा नोकर आहे.'
'कुमारने गाडी थांबवली.
'तू चालव, सोपान.' कुमार म्हणाला.
'मी? शहरात? रात्रीचा?'
'होत्यात काय कठीण आहे? मी आहे ना बरोबर? आणि आता सगळे रस्ते रिकामे आहेतकम ऑन!'
जरा बिचकतच अजयने ड्रायव्हरची सीट घेतली. मग त्यानं विचार केलाहेही एक आव्हानच आहे. कुमारांची भूमिका वठवण्याचं एवढं मोठं आव्हान आपण स्वीकारलं आहेत्याच्यापुढे हे काय मोठं?
गाडीचा वेग पंचवीसच्या पुढे अजिबात जाऊ न देता अजय गाडी चालवत होता. कुमारची मान मागे टेकली आणि पाहता पाहता त्याला झोपही लागली! आता आली का पंचाईत?
क्षणभरच अजय गांगरलामग त्याने नेट लावला.
ही त्याच्या आत्मविश्वासाचीही कसोटी होती.
जवळजवळ अर्धा तास तो गाडी शहराच्या वेगवेगळ्या रस्त्यांवरून फिरवत होता आणि मग शेवटी त्याने

गाडी परत राजवाड्यावर आणली आणि मोठ्या दारासमोर उभी केली. गाडीला वळसा घालून तो डाव्या बाजूला आला आणि खिडकीतून कुमारचा खांदा जरासा हलवत म्हणाला, 'कुमार! कुमार! जागे व्हा!'
एकदोनदा खांदा हलवल्यावर कुमारला जाग आली. गाडीच्या किल्ल्या त्यांच्या मॅनिल्याच्या खिशात टाकून अजयने दार उघडलं.
कुमार गाडीतून खाली उतरला, जरा वेळ इकडेतिकडे पाहत उभा राहिला आणि मग नुसता एक हात हलवून तो आत निघून गेला. अजयच्या लक्षात आलं होतं की, एखाद्या साध्या गडी माणसाशी वागावं तसा कुमार आपल्याशी वागत नाही. अजयला एवढं समजू शकत होतं, की कुमार एका अपवादात्मक स्थानावर आहे. हांजीहांजी न करणाऱ्या, स्पष्ट बोलणाऱ्या, स्वत:चा कोणताही स्वार्थ नसलेल्या अजयसारख्याचा सहवास त्याला आवडत असावा.
त्रिपाठींबद्दलची माहिती नवी असली तरी आश्चर्यकारक नव्हती. सत्तेचा दुरुपयोग न करणारेच विरळा; पण अजय हे विसरू शकत नव्हता की, हे त्रिपाठी प्रथमपासून त्याच्या विरुद्ध होते. तेव्हा त्यांच्या विरुद्ध वापरण्यासारखं एखादं हत्यार हाताशी आलं तर फायद्याचंच होणार होतं. त्याची इच्छा असो वा नसोया राजवाड्यातल्या राजकारणात त्याचा प्रवेश झालाच होता आणि अलिप्त राहूच शकणार नव्हता.
कुमारची सर्व व्यवस्था पाहायचीच होती. अजय वर गेला.
त्याची अटकळच खरी ठरली.
कुमारजवळ दाराची किल्ली नव्हती.
अजयने त्याला दार उघडून दिले. कुमारच्या मागोमाग तो आत गेला. सर्व खोल्या साफ होत्याच. पलंगावर कुमारचे रात्रीचे कपडेही काढून ठेवलेलेच होते. कपडे बदलून कुमार बाहेर आला.
'अरे हो सोपान'तुला एक सांगायचं राहूनच गेलं होतं. उद्या आमचा पाच-सात जणांचा ग्रुप दोन दिवसांच्या ट्रिपवर जाणार आहे. उद्या दुपारी जाणार आहोत. तेवढी बॅग भरून ठेव.'
'हो, उद्या सकाळी करतो ते काम. आता मी गेलो तर चालेल?'
'सोपान, अगदी कोणी कुमार दिसत नाही असं म्हटलं तरच त्यांना सांग की, मी दोन दिवस इथे नाहीनाहीतर कोणालाही काही सांगायची जरूरी नाहीनाहीतरी मी आहे की नाही याची पर्वा तरी कोणाला असते?'
'जसं तुम्ही म्हणता तसं, कुमार.'
'मग ठीक आहे. तू गेलास तरी चालेल.'

***

पलंगावर पडल्या पडल्या अजय विचार करीत होता की, ही नामी संधी आली आहेएक धाडसी विचार त्याच्या मनात आला होता कुमारची भूमिका कितपत वठवता येते हे एकदा पाहावं लागणारच होतं. आता त्याखेरीज कोणालाही माहीत असणार नव्हतं की, कुमार शहराबाहेर गेला आहे. थोडासा धोका होता; पण धोका घेतल्याखेरीज काय साध्य होतं?
त्याला आठ वाजता जाग आली. रात्रीचं जागरण पाहता हे नैसर्गिकच होतं. गेल्या एक-दोन दिवसांत त्याची राणीसाहेबांशी एकांतात अशी गाठ पडलीच नव्हती. त्या बागेत असतील अशा अंदाजाने तो बागेत आला. माळी आणि इतरांची रोजची कामं चाललीच होती. अजयला मात्र राणीसाहेब बागेत कोठेच दिसल्या नाहीत. एकाएकी त्याला त्या मोठ्या दाराबाहेरच्या पेटीची आठवण झाली. इतर काही जमलं नाही तर मग शेवटी त्या पेटीतूनच त्याला त्यांच्यापर्यंत निरोप पोहोचवावा लागणार होता.
अकराच्या सुमारास तो वर कुमारच्या खोलीत आला. कुमार नुकताच जागा झाला होता. अजयने त्याच्यासाठी चहा आणला. कुमारची दाढी वगैरे होत असताना अजयने अलमारीतले तीन मॅनिले, तीन पँट, चारपाच रुमाल, इतर कपडे, टॉवेल इत्यादी सामान पलंगावर काढून ठेवले होते.
अलमारीवर रिकाम्या बॅगा होत्या. त्यातील योग्य आकाराची बॅग त्याने खाली काढून ठेवली. कुमारने त्यावरून एकदा नजर टाकून मानेने पसंती दाखवताच अजयने पॅकिंग पुरं केलं.
कुमारला काय वाटलं कोणास ठाऊक. तो म्हणाला,
'मातोश्रींना निरोप दे की, मी आज जेवायला त्यांच्याबरोबर आहे.'
'हो,' म्हणत अजय खोलीबाहेर पडला.

***

राणीसाहेबांशी बोलण्याची संधी आपोआपच चालून आली होती. कुमारचा निरोप देण्यासाठी तो राजरोसपणे त्यांची गाठ घेऊ शकत होता. चौकशी केल्यावर त्याला समजलं की, त्या त्यांच्या नेहमीच्या कामाच्या

खोलीतच आहेत. एका कागदाच्या चौकोनावर 'प्रताप पाके. उद्या सकाळी अकरा वाजता.'एवढा मजकूर लिहून त्याने त्या कागदाची घडी करून ती हातात ठेवली आणि तो त्यांच्या खोलीत गेला. राणीसाहेब एकट्याच होत्या. त्यांना नमस्कार करीत अजय म्हणाला, 'कुमारांचा निरोप आहे, की ते आज जेवायला तुमच्याबरोबरच असणार आहेत.' बोलता बोलता त्याने हातातील कागदाची घडी त्यांच्या समोरच्या टेबलावर ठेवली आणि तो दोन पावलं मागे सरला. राणीसाहेबांनी कागदाची घडी उलगडून त्यावरचा मजकूर वाचला, मानेनेच 'हो'ची खूण केली आणि त्या म्हणाल्या, 'ठीक आहे.'

***

अजय पुन्हा वर कुमारच्या खोलीपाशी येऊन थांबला. कुमारने त्याला आत बोलावलं.
'सोपान, या दोन बॅगा खाली ने आणि गाडीच्या डिकीमध्ये नेऊन ठेव. रशीद तिथे असेल; पण किल्ल्या घेऊनच जा.'
अजय दोन्ही बॅगा घेऊन खाली गेला. इंपालाच्या मागच्या भागालाही मोठा पोचा आला होता. आता केव्हातरी रिपेअरसाठी जाईल तेव्हा दहाबारा हजारांचं बिल येईल. राजवाड्यावरची गाडी!
त्याने बॅगा डिकीमध्ये ठेवल्या. आताच्या वेळी गॅरेजमध्ये कोणीच नव्हतं. तिथून तो तसाच स्वयंपाकघरात गेला. त्याला पाहताच आचारी म्हणाला, 'या सोपानराव.'
अजयने रॅकमधली थाळी काढली आणि ती पुढे केली.
'थोडी भाजी-पोळी द्या. जेवायचं मागाहून पाहीन.'
कुमार जेवायला जाईपर्यंत त्याला वर थांबायला हवं होतं. पोटाला काहीतरी आधार हवा होता. गडीमाणसांच्या जेवणाखाण्याची चौकशी ही मालक माणसं कधीच करणार नाहीत.
तो परत वर गेला. कुमारच्या बाहेरच्या खोलीत दारापाशी एका स्टुलावर बसून राहिला.
साडेबारा वाजता माणूस जेवणाचा निरोप घेऊन आला. त्याला घेऊन अजय आतल्या खोलीत गेला.
पण कुमारची लहर बदललेली दिसली.
'सोपान, त्याला सांग मी इथेच जेवण घेणार आहे. खाली येत नाही; आणि माझं ताट घेऊन ये.'
'हो.' अजय म्हणाला. त्याने त्या गड्याला हातानेच जायची खूण केली. बाहेरच्या खोलीतला टीपॉय मध्ये घेतला, त्यावर पांढरा कपडा टाकला. फ्रीजमधली गार पाण्याची बाटली आणि ग्लास टीपॉयवर ठेवला.
मग तो खाली गेला. स्वयंपाकघरात त्याने मोठं ताट टेबलावर घेतलं.
वर बोट करताच आचारी काय समजायचं ते समजला.
ताट घेऊन अजय वर आला. ताट बाहेरच्या टीपॉयवर ठेवून त्याने आत जाऊन कुमारला जेवण तयार असल्याची वर्दी दिली.
कुमार खुर्चीवर येऊन बसताच अजय म्हणाला,
'काही हवं का आणखी? मी आणतो.'
'नाही. ठीक आहे.' कुमार बोलला खरा; पण त्याचं खरोखरच समोर लक्ष होतं की नाही कोणास ठाऊक. त्याने जेवायला सुरुवात करताच अजय परत खाली गेला आणि दुसऱ्या वाढीसाठी सर्व जिन्नस आणि गरम भात घेऊन परत वर आला. कुमारचं जेवण होईपर्यंत तो तिथेच थांबला. कुमार हात धुवायला उठताच तो ताटाची आवराआवर करायला लागला.
'सोपान, तू आता परत वर नाही आलास तरी चालेल. मी आता माझी वेळ झाली की, परस्परच जाणार आहे. सामान गाडीत ठेवलंस ना?'
'हो.'
'कोणाला सांगितलं नाहीस ना?'
'नाही; पण कुमार, राणीसाहेबांनी विचारलं तर?'
'मला माहीत नाही म्हणून सांग.'
'हो'
'ठीक आहे.'
अजय खाली गेला. ताट स्वयंपाकघरात नेलं तर बाकीची गडीमाणसं जेवायला बसतच होती. एक दोघांनी त्याच्यासाठी जागा केली.
'या, सोपानराव या.'
'वाढप्याने त्याच्यापुढे ताट ठेवलं.'

‘मजा आहे बुवा सोपानराव तुमची!’ एकजण म्हणाला.
‘मजा? अहो ते शिवबा केव्हा परत येताहेत याची वाट पाहतो आहे. शिवबा जुनेत्यांना छोट्या मालकांना केव्हा काय लागतं सगळं माहीत. माझी अशी धावपळ होते आणि रोज रात्रीचं जागरण.’
‘पण काम हलकं की नाही?’
‘हलकं भारीकाम ते काम; पण तुमचं बरं नाही का? सकाळी नऊला गेलात, सांगितलं ते काम केलं. पाचला मोकळे. आमचं तसं आहे का? आमची ड्यूटी चोवीस तास.’
‘आणि छोटे मालक कधी कधी’ त्या माणसाने बोट डोक्याभोवती फिरवून शुद्धीवर नसल्याची खूण केली. उघड होतं की, या सोपानकडून काही खास खमंग बातमी मिळाली तर ती त्यांना हवी होती.
‘ते साऱ्या जगाला माहीत आहे.’ अजय म्हणाला.
‘गाडीतनं काय क्लबात नेलं होतं का सोपानराव?’
‘मला? छे हो! आणि नेलं तर काय आत नाचगाण्याला नेणार आहेत की काय? बाकीच्या ड्रायव्हरगडी लोकांबरोबर आम्ही आपले बाहेरच थांबणार, हो की नाही?’
‘होतेही बरोबर म्हणा.’
‘कधी कधी छोट्या मालकांच्या मित्रमैत्रिणीही असतील बरोबर गाडीत?’
अजयच्या ध्यानात आलं, की हा एकच इसम कुमारसंबंधात सारखे प्रश्न विचारत होता. त्याला एवढं स्वारस्य का? लगोलग प्रश्नाचं उत्तरही आलंत्याला. स्वारस्य नसेल; पण आणखी कोणाला तरी होतं अर्थात अजयला या प्रश्नाचं उत्तर सरळ सरळ नाही म्हणून देता आलं असतं; पण एक जरासं छद्मी हास्य चेहऱ्यावर आणत तो म्हणाला,
‘तुम्हाला ती तीन माकडं माहीत आहेत ना? एकाने कानावर हात ठेवला आहे, दुसऱ्याने डोळ्यांवर हात ठेवला आहे आणि तिसऱ्याने तोंडावर हात ठेवलेला आहे. आपण काही पाहत नाही, काही ऐकत नाही.’
तो इसम किंवा त्याच्या मागे जे कोणी होतं ते त्यांची उत्सुकता खासच चाळवली जाणार होती; पण त्याला स्वत:ला मात्र सतत सावध असायला हवं होतं.
तो इसम गप्प बसणाऱ्यापैकी नव्हता. तो पुढे बोलतच राहिला.
‘सोपानराव, तुम्ही म्हणे इस्टेटवर घोड्यावर बसता?’
‘दोघांना धरून ठेवावं लागतं; पण बसतो.’ अजय जरा हसत म्हणाला. ‘अहो, तिथे इस्टेटवर शिंदेकाका म्हणजे राजे. छोट्या मालकांखालोखाल त्यांचाच शब्द म्हणजे ऑर्डर. माणूस तगडा, बोलणार फाडफाड, वागणारही तसाच; पण स्तुतीने कोण खुश होत नाहीविशेषत: स्तुती खरी असली तर? हे शिंदेकाका खूश झाले अन् त्यांनी एका पोराला घोडं आणायला सांगितलं की या सोपानरावांकरिता! आम्ही कधी घोडदौड करणार हो! आता इथेच पाहा की, आचारीबुवांची जरा स्तुती केली की मिठाईची वडी पडलीच पानात!’
खूप हशा पिकला आणि आचार्याने जेव्हा का पोराला मिठाईचा ट्रे आणायला सांगितला तेव्हा तर दुप्पट हशा पिकला.
याच लाटेवर अजयने जेवण संपवून बाहेरची वाट धरली.

***

चारच्या सुमारास आपल्याला कोणीही पाहत नाही अशी पूर्ण खात्री करून घेऊन अजय कुमारच्या खोलीत गेला. आतापर्यंतच्या त्याच्या सर्व क्रिया त्याच्या कामात बसणाऱ्याच होत्या. आता मात्र तो त्या मर्यादिचे उल्लंघन करणार होता.
अलमारीतला एक चेक्सचा मॅनिला अजयने अंगात घातला. सोपानचे केस चोपून चोपून बसवलेले असायचेते दोन्ही हातांनी जरा विस्कटले आणि तो आरशासमोर उभा राहिला.
त्याच्यासमोर कुमार उभा होता!
आपल्या दोघांच्या चेहऱ्यात किती साम्य आहे याची त्याला या क्षणापर्यंत कल्पना नव्हती. चेहरा जरासा त्रासिक केला आणि डोळ्यात आणि नाकाच्या शेंड्यावर जराशी लाली आणली की साम्य पूर्ण होणार होतं.
त्याने मॅनिला काढून काळजीपूर्वक होता तसा ठेवून दिला.
जरावेळ पिस्तुलाच्या ड्रॉचा सराव केला. आता त्याच्या हालचाली खरोखरच सफाईदार व्हायला लागल्या होत्या.
खोलीत आलाच होता तर त्याने सफाईचं काम उरकून घेतलं.
मग इस्टेटवर घोडेस्वारीचा सराव. आता त्याचं त्याला घोड्यावर बसायला- उतरायला यायला लागलं होतं.

घोड्यावर अंमलही बऱ्यापैकी बसायला लागला होता. संध्याकाळी तो परत आला तेव्हा त्याला खरोखरच वाटलं की दिवसाचं चीज झालं आहे.

***

12.

सोपानच्या जागी अजय येणार होता. एका सार्वजनिक स्वच्छतागृहात हा बदल झाला. रुंद खांद्याचा, तपकिरी पैरणीतला, गळ्यात लाल ताईत असलेला सोपान आता गेला आणि पांढऱ्या शुभ्र शर्टातला, गॉगल लावलेला अजय बाहेर आला.

अजय पावणे अकरा वाजताच पार्कमध्ये पोहोचला. ज्यांना कोणाला त्याच्या हालचालीत स्वारस्य होतं त्यांना माहीत होतं की, राणीसाहेब त्याला इथे नेहमी भेटतात. तेव्हा गुप्तता राखण्याचं काही कारण नव्हतं.

लांबवरून राणीसाहेब येताना दिसताच अजय उठून उभा राहिला. त्या बाकावर बसल्यावर तो जरा दूर, अदबीने बसला.

'कुमार आज सकाळी दिसला नाही?'

'नाही.' अजयने खरं तेच उत्तर दिलं. 'ते असे कधी रात्रीचे बाहेर राहिले आहेत का?'

'कितीतरी वेळा!' राणीसाहेब म्हणाल्या. 'त्याच्या वागण्याला काहीच धरबंध नाहीआणि आता काही तो लहान नाही!'

'राणीसाहेब, दोन-तीन कारणासाठी आपल्याला इथे येण्याची तसदी दिली. तिथे मोकळेपणाने एक शब्दसुद्धा बोलता येत नाही. माझ्या ध्यानात आलं आहे की आपल्या, तसेच कुमारच्या हालचालीवरही कोणाचं तरी बारीक लक्ष असतं. आता आपण भेटत आहोत हे सुद्धा कोणापर्यंत तरी पोहोचणारच आहे, म्हणून इथे यायची विनंती केली.'

'दुसरी गोष्टआपण ज्या मीटिंग्ज म्हणत होतात त्यांना अजून किती अवकाश आहे?'

'खरंतर त्या या आठवड्यात व्हायच्या होत्या; पण माझ्या खास अधिकारात मी त्या पंधरा दिवस पुढे ढकलल्या आहेतम्हणजे अजून वीस दिवस आहेत.'

'छान आहे. आपण आश्वासन दिल्याप्रमाणे आपला शब्द सर्वत्र पोहोचला आहे. ज्या ज्या क्लबमध्ये मी चौकशी केली तिथे तिथे मला सर्व सुविधा देण्याची तयारी दाखवण्यात आली.'

'तुझ्या ड्रायव्हिंगचीही व्यवस्था केली आहे.'

'हो, शूटिंग रेंजबद्दल विचारायचं होतं. सरावासाठी लागणारं ऑम्युनेशन फारच महाग असतं असं मला समजलं.'

'अजय, मी सर्वत्र शब्द ठेवला आहे ना? तुला कोणत्याही खर्चाची काळजी करण्याचं कारण नाही.'

'आपला शतश: आभारी आहे.'

'अजय, माझ्याही मनात तुला भेटाचंच होतंते अशासाठी की कुमारशी हल्ली जवळजवळ संबंधच राहिलेला नाही. खरंतर मायलेकांतला इतका दुरावा सहन होत नाही; पण त्याला यातलं काहीही समजणार नाहीतेव्हा तुला एक विचारायचं आहे.'

'अवश्य विचारा.'

'खरी उत्तरं द्यायचीतोंडदेखली उत्तरं द्यायची नाहीत.'

'मान्य आहे.'

'तूच त्याच्या जास्त सहवासात आहेस. आम्ही सर्वांनी त्याला लहरी, हेकेखोर, ख्यालीखुशालीत रमणारा, बेजबाबदार असाच ठरवला आहे. तुझा अनुभव काय आहे? वास्तविक ही आमच्यातली अगदी खाजगी बाब; पण का कुणास ठाऊकतू तिर्हाईत वाटतच नाहीसम्हणून तुला विचारते.'

'राणीसाहेब, पुढे मागे मला हे करावं लागणार आहे त्यासाठी मी कुमारांचं वागणं, बोलणं, चालणं सर्व काही बारकाईने पाहत आहे. त्यांनी माझ्यासमोर कोणाबद्दल एकही अपशब्द उच्चारलेला नाही. मी त्यांची कोणतीही वकिली करीत नाही; पण त्यांचा स्वभाव हिणकस नाही हे खास. त्यांच्या स्वभावात इतर दोष असतीलही आज तुम्ही सर्वजण त्यांना इतकी वर्षे ओळखत आहातराणीसाहेब, दुसरीही एक गोष्ट ऐकात्यांनी बोलता बोलता मला सांगितलंत्यांना जुगाराचा नाद आहे; पण जुगारासाठी ते कधीही कोणाकडून उधार घेत नाहीत कोणत्याही चिठ्ठीचपाटीवर सही करीत नाहीत आणखी'

अजय गप्प बसला. त्याला आणखी काहीतरी सांगायचं होतं हे अगदी उघड दिसत होतं.

‘आणखी काय? सांग ना!’
‘वास्तविक हे तुम्हाला सांगावं का नाही याचा मला उलगडाच होत नाहीगायत्रीदेवींसंबंधात आहे.’
‘तिच्या संबंधात? ते काय?’
‘तसं काही वाईट नाहीकाळजी करण्यासारखंही नाही कुमार हे जेव्हा बोलले तेव्हा जरासे नशेत होतेते स्वत:शीच नवल करीत होतेगायत्रीदेवी इतक्या शिकलेल्या, महत्त्वाकांक्षीकुमारांसारख्या त्यांच्याच शब्दातऐदी, ख्यालीखुशालीत मश्गुल असणाऱ्या, व्यसनी अशा माणसाशी विवाह करायला त्या कशा काय तयार झाल्या?’
‘कुमार असं म्हणत होता?’
‘हो, मला माफ करा. घराण्याच्या या खाजगी बाबींशी माझा काडीइतकाही संबंध नाहीकेवळ योगायोगाने हे शब्द माझ्या कानांवर आले ते तुमच्यापर्यंत पोहोचवले इतंकच.’
राणीसाहेब विचारमग्न अवस्थेत बसून होत्या. मग एकाएकी आपण कोठे आहोत याची त्यांना जाणीव झाली. खांद्याभोवतीची शाल जरा सावरत त्या उभ्या राहिल्या.
‘अजय, ही भेट झाली ही गोष्ट चांगलीच झाली. काही काही गोष्टींचा खुलासा झाला. काही नव्याने समजल्या. ठीक आहे.’
त्या दिसेनाशा होईपर्यंत अजय थांबला आणि मग तोही आपल्या वाटेने निघाला.

***

तो ड्रायव्हिंग स्कूलमध्ये आला होता. राणीसाहेबांचा शब्द कोठपर्यंत पोहोचतो याची त्याला एक परीक्षाच घ्यायची होती.
ड्रायव्हिंग स्कूलमध्ये तेच मागच्या वेळेचे मॅनेजर होते.
आधी त्यांना अजयची ओळख पटली नाही.
‘तुम्हाला कोठेतरी पाहिल्यासारखं वाटतं...’ ते म्हणाले.
‘अजय कर्नाटकी. नाव ओळखीचं वाटतं?’
‘कर्नाटकी? अजय कर्नाटकी? अरे हो! हो!’
ते एकदम टेबलामागून उठून वळसा घालून पुढे आले.
‘कर्नाटकी? वा! वेलकम! मी काय करू शकतो?’
‘मला जरा एक्स्पेन्सिव्ह गाडी चालवायची होती.’
‘अवश्य! कोणती हवी? झेन आहे, एस्टीम आहे.’
‘मर्सिडीज?’
‘हो तीही आहे.’
‘आता उपलब्ध आहे?’
‘हो, आहे की!’ ते म्हणाले, ‘जरा थांबा हं.’
ते ऑफिसबाहेर गेले. पाच-सात मिनिटांत परत आले आणि दारातूनच म्हणाले,
‘कर्नाटकी! या’
ऑफिसच्या दारासमोर एक जवळजवळ नवी चकाकती पांढरी मर्सिडीज उभी होती.
‘अर्धा तास?’ अजयने विचारलं...
‘अवश्य!’
अजय गाडीत बसला. ड्रायव्हरला त्याने गाडी ग्राऊंडवर घ्यायला सांगितलं. मग तो म्हणाला,
‘मला ड्राईव्ह करायची आहे. तुम्ही इकडे बसा.’
ड्रायव्हरची तशी अजिबात इच्छा नव्हती. त्याची नाराजी उघड दिसत होती. अजय जरा खालच्या आवाजात म्हणाला,
‘मी सांगतो तसं करा, वाटलं तर रस्त्यावरच्या स्टोअरमधून ऑफिसमध्ये फोन करून खात्री करून घ्या.’
त्याच्या शब्दाशब्दात इतका आत्मविश्वास होता, की शेवटी ड्रायव्हर डावीकडे सरकला. एकदा गीअरची पोझिशन लक्षात येताच ही गाडी आणि इंपाला दोन्हीत फारसा फरक नव्हता. ड्रायव्हर मनाशी खासच नवल करीत असेल हा परका इसम येतो काय, इतकी पाच-सात लाखांची गाडी चालवायला मागतो काय, साहेब त्याला परवानगी देतात काय, सगळंच गौडबंगाल आहे. गाडीवर बऱ्यापैकी ताबा आला आहे अशी खात्री होताच अजयने गाडी थांबवली.

तो गाडीतून खाली उतरला. ड्रायव्हरला म्हणाला,
'तुम्ही गाडी परत नेलीत तरी चालेल आणि तुमच्या साहेबांना सांगाकर्नाटकींचे आभार आहेत. अच्छा.'
त्याच्याकडे पाठ फिरवून अजय चालायलाही लागला.

***

शूटिंग रेंजमधला अनुभव काही फारसा वेगळा नव्हता. कदाचित सकाळच्या भेटीनंतर राणीसाहेबांनी त्यांना पुन्हा एकदा सूचना केली असावी; कारण त्यांची आठवण अगदी ताजी होती.
'कर्नाटकी'म्हणताच ते खाडकन् उभे राहिले.
'यायाकर्नाटकीया. काय काम आहे आपलं?' लगेच ते जरा घाईनं म्हणाले, 'म्हणजे, आपल्याला शूटिंगचं प्रॅक्टिस करायचं आहे हा निरोप आमच्यापर्यंत पोहोचला आहेफक्त नक्की काय हवं ते सांगा.'
अजय त्यांच्यासमोरच्या खुर्चीवर बसला.
'मला काही हँडगन्सचा सराव करायची इच्छा आहे त्यातील काही मला दाखवाल का? मग मी त्यातून निवड करीन.'
'होहोअवश्य. या ना माझ्याबरोबर.'
ते अजयला घेऊन मागच्या दालनात गेले. कुलूपबंद काचपेट्यातून तर्हेतर्हेची हत्यारं मांडलेली होती.
'इकडे या' त्यांनी अजयला एका बाजूला नेलं. तिथे पिस्तुलं, ऑटोमॅटिक्स रिव्हॉल्व्हर्स ठेवले होते. कुमारचं पिस्तूल अजयच्या लक्षात होतं. ते त्याने निवडलं.
'छान, चला.' ते म्हणाले.
मागच्या बाजूला खाली जाणारा जिना होता. तो तळघरात पोहोचत होता. साधारण वीस फूट रुंदीच्या खोलीत एका भिंतीस लागून टार्जेटस् होती. बरोबर त्या गृहस्थांनी अम्युनिशनच्या दोन पेट्या आणल्या होत्या. त्या उघडून त्यांनी पेटी काऊंटरवर ठेवली.
'या सहा ठिकाणी सहा गोळ्या असतात आणि चेंबरमध्ये एकअशा सात गोळ्या असतात.' गोळ्या भरता भरता ते सांगत होते. 'ही सेफटी आहे. जोपर्यंत ही ऑन आहे तोपर्यंत फायर होत नाही. सेफटीवरून आधी रिव्हॉल्व्हर काढायचं... असं... आणि मग चाप दाबायचा. ओढायचा नाही, समजलं? दाबायचा'
त्यांनी रिव्हॉल्व्हर अजयच्या हाती दिलं.
'समोर पॉइंट करा आणि चाप दाबा. आता नेम वगैरेचा विचार करू नका नुसता चाप दाबा. हे पाहा, प्रत्येक शस्त्राचा काहीतरी रिकॉइल असतो. हाताला किंवा खांद्याला शस्त्र मागे रेटतं. त्याचा तुम्हाला अंदाज यायला हवा. हं, करा फायर.'
अजयने रिव्हॉल्व्हर समोर धरलं आणि चाप दाबला.
त्या बंदिस्त जागेत तो आवाज प्रचंड वाटला. हातालाही मागे झटका बसला.
'आणखी एकदा फायर करा.'
अजयने पुन्हा गोळी झाडली.
'आली कल्पना?' आता नेम धरायचं पाहाअशी कल्पना करा की, तुम्ही उजव्या हाताच्या तर्जनीने त्या वस्तूकडे बोट दाखवीत आहातजिथे तुम्हाला गोळी झाडायची आहेसुरुवातीस यावर ध्यान ठेवावं लागेलमग सगळं आपोआप होतंबघाया दोन पेट्यांत दोनशे अठ्ठ्यांशी गोळ्या आहेततुम्हाला हव्या तितक्या तुम्ही वापरू शकता मी जाऊ वर?'
'आता गोळी नसली आणि नुसता चाप दाबला तर?'
'तर काय? नुसतं क्लिक होईल'
'काहीही होणार नाही! ठीक आहे.'
अजयने आधी पिस्तुलातून गोळ्या काढण्याची आणि परत आत घालण्याची प्रॅक्टिस केली. मग सेफटी ऑन आणि ऑफ करून पाहिली. सेफटी ऑफ असताना चाप दाबून पहिला आणि मग खऱ्या शूटिंगला सुरुवात केली. अपेक्षित ठिकाणावर फूट-दोन फूट डावी-उजवीकडे गोळ्या लागत होत्या. अर्थात त्यालाही माहीत होतं ही काही लगोलग हस्तगत करण्यासारखी कला नाही. ती हस्तगत करायला खूप अभ्याससराव आवश्यक होता; पण निदान पिस्तुलाच्या बाबतीत तो अगदी अडाणी तरी राहणार नव्हता.
त्या दिवसापुरता सराव पुरेसा झाल्यावर रिव्हॉल्व्हर आणि उरलेल्या गोळ्या घेऊन तो वर आला. ते गृहस्थ बाहेरच्या ऑफिसमध्ये होते. अजयने दोन्ही त्यांच्यासमोर ठेवलं.
अजयने खिशातून नोटांचं बंडल काढलं.

‘अहो हे काय? हे काय भलतंच?’ ते गृहस्थ म्हणाले.
‘तुमचे पैसे नकोत का द्यायला?’
‘अहो पैसे कसले देता! ही सर्व सेवा आम्ही तुम्हाला अगदी मोफत दिली आहे! आमच्या कॉम्प्लिमेंटसह! अगदी खरं! पैशाचं नावही काढू नका!’
‘तुम्ही म्हणताच आहात तर’
‘म्हणतो नाही, आग्रह करतो आणि हे पाहा, पुन्हा केव्हाही यावंसं वाटलं तरी बिनदिक्कत यातुमचं समाधान झालं ना?’
‘हो आणि थँक्यू.’
राणीसाहेबांच्या शब्दाला केवढा मान आहे याची त्याला याक्षणी खरी कल्पना आली.

***

एकदा त्याच्या मनात विचार आलाखोलीवर जाऊन यावं; पण तो त्याने दूर केला. त्याच्या खोलीवर कोणाचं तरी लक्ष असण्याची शक्यता होतीतो दृष्टीस पडला तर पाठलाग सुरू होणारसध्या तो अज्ञातवासात होता तेच चांगलं होतं.
एका स्वच्छतागृहात अजयचा परत सोपान झाला.
संध्याकाळी सोपान राजवाड्यावर परत आला.

***

आधी इच्छा असती तर त्याला जेवण करून घेता आलं असतं; पण इतरांत मिसळणंच योग्य होतं. आधीच त्याला मिळणाऱ्या ‘खास’सवलतीमुळे बाकीची गडीमाणसं त्याच्यावर नाराज होती, कदाचित थोडाबहुत हेवाही करीत असतीलत्यात भर पडायला नको होती. शिवाय तो चौकस इसम आजही हजर होता का हेही पहायला हवं होतं.
तो हजर होता आणि त्याची जीभही तशीच वळवळत होती.
‘काय सोपानराव! आज सारा दिवस गायब होतात!’
‘छोट्या मालकांची कामं होती,’ अजय आवाज शांत ठेवून म्हणाला.
‘छोटे मालक आज दिसलेच नाहीत?’
‘त्यांच्यावर पहारा करायला तुला ठेवलं आहे की काय?’
अजय सहज म्हणाला. एका अर्थी जरा निरर्थक प्रश्न; पण दुसऱ्या अर्थाने अंधारात सोडलेला बाणच. त्या माणसाची प्रतिक्रियाच बोलकी होती. अजयचा अंदाज चुकला नव्हता. या माणसाची पुरी माहिती काढायला हवी होती.
कुमारचं वागणं जर नेमस्त असतं, त्याच्यासाठी ठराविक वेळी ठराविक गोष्टी कराव्या लागल्या असत्या तर त्याची गैरहजेरी ताबडतोब जाणवली असती. त्याबद्दल विचारण्याची कोणाचीही हिंमत झाली नसती; पण लोकांनी मनातल्या मनात नवल केलं असतं. आता तो प्रश्नच नव्हता.
जेवण करून सगळे निघून गेले तरी अजय मागे रेंगाळत थांबला होता.
हॉल मोकळा झाल्यावर तो मधल्या टेबलापाशी आला.
‘शिवरामपंत!’ त्याने आचाऱ्याला हाक मारली. ‘जरा एक सेकंद इकडे येता का?’
ते जवळ आल्यावर अजय म्हणाला,
‘माझ्या डाव्या हाताला बसलेला काळा, शिडशिडीत माणूस तुम्ही पहिलात का?’
‘हो.’
‘कोण आहे हो?’
‘का?’
‘जरा फाजीलच चौकशा करीत असतो.’
‘कसं बोललात सोपानराव! सगळेच म्हणतात, नाही तिथे नाक खुपसत असतो; पण बोलणार कोण? तो आपल्या त्रिपाठी कारभारी साहेबांच्या हाताखाली असतो ना?’
‘अस्सं. मग बरोबरच आहे. नाव माहीत आहे का?’
‘जेधे.’
‘किती दिवस आहे कामावर?’
‘गेले सहा महिने तर आहेच आहेत्याआधीचं माहीत नाही.’

‘छान. ठीक आहे.’
म्हणजे त्याची अटकळ बरोबर होती. या त्रिपाठींची माणसं सगळीकडे पेरलेली होती. त्यांच्यावरच्या जबाबदारीच्या दृष्टीने ते घेत असलेली काळजी आवश्यकही असेलफक्त ते मिळालेल्या माहितीचा उपयोग कसा आणि कोठे करतात हे महत्त्वाचं होतं.
देखाव्याकरिता तरी त्याला रात्रीचं वर एकदा कुमारच्या खोलीवर जावंच लागलं. सरावासाठी त्याने कमरपट्टा बांधून पिस्तुलाच्या ‘ड्रा’ची प्रॅक्टिस केली. पिस्तुलाचा मेक आणि मॉडेल नंबर त्याने एका कागदावर लिहून घेतला. शक्य तर त्या शूटिंग रेंजमध्ये याच मॉडेलच्या पिस्तुलावर सराव करता आला तर छान.

***

दुसऱ्या दिवसासाठी त्याने मनात जी एक धाडसी योजना आखली होती तिच्यावर रात्री तो बराच वेळ विचार करत होता. केव्हा ना केव्हा ती गोष्ट करावीच लागणार होती. धोका हा होताच. राणीसाहेबांचं संरक्षणसुद्धा काही मर्यादेपर्यंतच उपयोगी पडू शकणार होतंबाकी सारं त्याचं त्याने सांभाळायचं होतं.
नऊच्या सुमारास तो कुमारच्या खोलीत आला. बरोबर येताना स्वयंपाकघरातून कॉफी आणि नाश्ता घेऊन आला होता. आपल्यामागे त्याने दार बंद करून घेतलं.
निळ्याकाळ्या चौकटीच्या कापडाचा एक सैलसर मॅनिला - हा कुमारचा आवडता होता. वास्तविक त्याच्या वर्णाला तो मुळीच शोभत नसे; पण त्या मॅनिलात कुमारला पाहायची सर्वांना सवय झाली होती- तोच मॅनिला आता त्याने निवडला. जवळजवळ त्याचीच साईज होती. पँट, बूट यांचा प्रश्नच नव्हता.
दार किंचित किलकिलं ठेवून तो बाहेरच्या खोलीत खुर्चीत बसला, समोर टीपॉयवर नाश्ता ठेवला आणि नाश्ता केला.
मग भिंतीवरचं घंटेचं बटण दाबलं.
पाचसात मिनिटांत दारावर थाप आली.
‘कोण? सोपान का?’ अजयने विचारलं.
दारात खालचा गडी उभा होता.
‘सोपानराव दिसत नाहीत.’
‘ठीक आहे. हे खाली घेऊन जा.’
‘जी,’ म्हणत गड्याने प्लेट, कपबशी उचलली आणि अजयकडे न पाहताच तो ते घेऊन गेला.
खोलीबाहेर पाय टाकताना नाही म्हटलं तरी छातीत जराशी धडधड होतच होती. ही गोष्ट उघडकीस आली तर तो दखलपात्र गुन्हा होऊ शकत होता आणि त्रिपाठींच्या कानावर गेलं तर... आणि ते जाणारच! ते अजयशी सुरुवातीपासून शत्रुत्व करीत असल्याने अजयचा पुरा पुरा काटा काढल्याखेरीज राहणार नाहीत. देवावर आणि दैवावर हवाला ठेवल्याखेरीज त्याच्या हाती दुसरं काहीच नव्हतं. दार मागे बंद करून घेत तो बाहेर आला. एक सुरक्षिततेचा उपाय म्हणून त्याने कुमार नेहमी वापरत असे तो फिकट कांचेचा गॉगल बरोबर घेतला होता आणि खोलीबाहेर पडताच तो गॉगल घातला.
आताची कामाची वेळ होती. गडीमाणसांची खूप वर्दळ चालली होती. कुमार दिसताच गडीमाणसं आपलं अंतर राखूनच वावरत होती.
अजय खाली मोठ्या हॉलमध्ये आला. ही वेळ राणीसाहेबांची कार्यालयात बसण्याची होती. कुमारच्या चालण्याची नक्कल करीत तो त्या खोलीपाशी आला. आतून एक गडी बाहेर आला. अजयने फक्त एक बोट खोलीकडे करून हाताने प्रश्न विचारला. गडी अदबीने म्हणाला,
‘राणीसाहेब? आहेत ना आत, छोटे मालक.’
अजय खोलीत गेला.
राणीसाहेब त्यांच्या नेहमीच्या जागी, टेबलामागे बसल्या होत्या.
त्याच्या बुटांचा आवाज होताच त्यांनी मान वर केली. अजयला पाहून त्यांच्या चेहऱ्यावर भावनांचा एक पट सरकत गेला.
आधी आनंद, मग आश्चर्य आणि मग जराशी शंका.
‘ये ना आतये’
आणि तो त्यांच्या टेबलासमोरच्या खुर्चीत बसताच
‘काही काम होतं का?’
आवाज जरा खाली आणत अजय म्हणाला,

‘हा शिवबाअजून परत आला नाही?’
‘नाहीपण येईलच एकदोन दिवसांत’
त्यांना काहीही संशय आला नव्हता! आवाजात कोणताही फरक जाणवला नव्हता!
‘पण कुमार, हा सोपान आहे ना कामाला?’
‘हा सोपान तुम्हाला कोठे भेटला, मातोश्री?’
‘सांगितलं नाशुगर फॅक्टरीवर गेले होतेतिथे रोजंदारीवर काम करत होता’.
‘पण साखर कारखान्यावर असे रोजंदारीचे शेकडो लोक असतातुमची त्याची गाठ कशी पडली?’
‘कामाला तो व्यवस्थित आहे ना? कामचुकारपण करीत नाही ना?’
‘नाहीनाहीतसं नाही’
‘मग कशाला त्याच्या मागच्या इतिहासाची उजळणी हवी?’
‘मातोश्री, मला शंका येते की, हा रोजंदारीवर काम करणारापैकी नाहीचत्याचं बोलणं, चालणं, विचार, सगळं काही वेगळंच वाटतं.’
राणीसाहेब एकदम सावध झाल्या.
‘वेगळं? कशा अर्थाने?’
‘जेवढ्यास तेवढं बोलेलहांजीहांजी करणार नाहीपुढे पुढे करणार नाहीतशी कामाबद्दल काही तक्रार नाही; पण शिवबा आला म्हणजे...’
‘कुमार, खरं सांगू का? गेल्या तीन-चार दिवसात सोपानचं काम व्यवस्थित होत आहे हे पाहून मीच शिवबाकडे निरोप पाठवला आहे की, आणखी पाच सांत दिवस तो गावी राहिला तरी चालेल.’
दारापाशी एक गडी उभा होता.
‘काय रे?’ राणीसाहेबांनी विचारलं.
‘कारभारी येताहेतहरकत नाही ना विचारायला पाठवलं आहे.’
‘येऊ देत ना.’
ही आफत आली का? मनाशी विचार करीत अजय उभा राहिला; पण तेवढ्यात त्रिपाठी खोलीत आलेच. अजयला पाहून ते म्हणाले,
‘वा वा! कुमार का!’
अजय परत खुर्चीत बसला. एक पाय आरामात लांब केला, दुसरा त्यावर टाकला. बेफिकीरपणा दाखववणारी पोझ. त्रिपाठींच्या उद्गारांना त्याने एका शब्दानेही प्रतिसाद दिला नाही.
‘राणीसाहेब, वाटलं तर मी जरा वेळाने येतो.’
अजय परत उभा राहिला. निसटण्याची संधी आली होती.
‘गोवर्धनदासजी, तुम्ही आणि मातोश्रीदोघांच्या मागे कामाचा व्याप आहेआम्ही रिकामटेकडे लोकचालू द्या तुमचे काम...’
हात खिशात घालून अजय सावकाश सावकाश बाहेर पडला.
त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे त्रिपाठी विचारमग्न नजरेने पाहत होते.
‘हं त्रिपाठीकाय काम होतं?’
राणीसाहेबांच्या प्रश्नाने ते भानावर आले.
‘काम सांगतोआधी मला हे सांगा राणीसाहेबकुमारांच्या वागण्यातबोलण्यात तुम्हाला काही फरक नाही जाणवला?’
‘तो शुद्धीवर होता.’
‘नाहीते नाही’ त्रिपाठी स्वत:शीच मान हलवत होते. ‘काहीतरी फरक होता; पण नेमकं बोट ठेवता येत नाही.
एक सुस्कारा सोडून ते रिकाम्या झालेल्या खुर्चीवर बसले, आणि त्यांनी कागदांची फाईल उघडली.

***

मोठ्या पायऱ्या उतरून अजय फरसबंद अंगणात आला. रशीद आसपासच कोठेतरी असावा. अजयला पाहताच तो लगबगीने पुढे आला.
‘गाडी आणू का छोटे मालक?’
‘आण.’ अजय म्हणाला.
गाडी येताच तो मागे बसला. रशीद त्याच्या हुकमाची वाट पाहत शांतपणे बसून होता.

‘इस्टेटवर घे.’
अजय मागे रेलून बसला. वीस एक मिनिटात गाडी इस्टेटच्या कंपाऊंडमध्ये शिरली. गाडी दिसताच शिंदेकाका व्हरांड्याच्या पायऱ्या उतरून खाली आले.
अजय गाडीबाहेर आला; पण तिथेच उभा राहिला.
‘शिंदेकाका. तो सोपान येतो का?’
‘दोनदा आला होता.’
‘काही प्रगती आहे का शिकण्यात?’
‘शिकेल काही दिवसात; पण मालक, त्याला कशासाठी...’
‘जाऊ द्या हो, शिंदेकाका. या लोकांच्या हौशी तरी कधी पुऱ्या होणार? दोन दिवस येईलमग आपोआप थांबेल.’
‘मला तो त्यातला वाटत नाही, मालक. जिद्दीचा वाटतो.’
‘शिकू द्या हो.’
अजय गाडीकडे वळला.
‘मालक! आज स्वारी नाही करणार?’
‘नकोआज नकोउद्यापरवा येईन’
अजय गाडीत बसला.
‘परत वाड्यावर चला.’ अजय म्हणाला.
वीस मिनिटांत गाडी परत राजवाड्यावर हजर झाली.

***

अजय वर कुमारच्या खोलीकडे आला. दाराचं कुलूप उघडून तो आत येतो न येतो तोच त्याच्या मागोमाग राणीसाहेब खोलीत आल्या. अजय त्यांना पाहून इतका चक्रावला, की तो विसरूनच गेला की आपण कुमारच्या वेशात आहोत.
दोन पावलं मागे सरत तो म्हणाला,
‘राणीसाहेब? आपण?’
एखादा धक्का बसल्यासारख्या त्या एक पाऊल मागे सरल्या,
‘राणीसाहेब? हा काय प्रकार आहे कुमार?’
दोन्ही हात जोडून त्यांना नमस्कार करीत अजय म्हणाला,
‘राणीसाहेब! मी अजय आहे-कुमार नाही!’
हा त्यांना आणखी एक धक्का होता.
‘आज हे सारं चाललंय तरी काय? आणि कुमार कुठे आहे?’
‘राणीसाहेब, ते दोन दिवसांच्या पिकनिकवर गेले आहेत.’ आज रात्री किंवा उद्या सकाळी परत येतील. कोणालाही शब्दानेही काही सांगू नकोस अशी त्यांची मला सक्त ताकीद होती म्हणून मी आपल्यापाशी काही बोललो नाही.’
जरा वेळ त्या काही बोलल्या नाहीत.
‘राणीसाहेब, पुढच्या प्रसंगाच्या तयारीसाठी आज मी ही एक प्रकारची रंगीत तालीमच केली. आपली शंका जर खरी ठरली तर मला कुमारच्या वेशात चारचौघात वावरावंच लागणार आहे.’
राणीसाहेब तिथेच एका खुर्चीवर बसल्या.
‘मला माहीत आहे हे आपल्याला अगदी अनपेक्षित आहे; पण आधी कल्पना देणं शक्यच नव्हतं. रूप बरोबर वठलं आहे की नाही ते कळायला हवं की नको?’
आता कोठे त्यांच्या चेहऱ्यावर जरासं हास्य आलं.
‘पण आपण इथे कशा आलात?’
‘अजय, तुला कुमारचा स्वभाव माहीत नाही. विनाकारण तो कोणतीही गोष्ट करीत नाही. तो सकाळी माझ्या खोलीत आला ते मनात काहीतरी हेतू ठेवूनच आला असणार ही माझी खात्री होती; पण तेवढ्यात गोवर्धनदास आलेमाझी समजूत झाली की, त्यांच्यासमोर बोलण्याची त्याची तयारी नसावी. त्यासाठी मी इथे आले होतेआता सगळा खुलासा झाला.’
पण लागलीच त्या म्हणाल्या,

‘अजय, या गोवधनदासजोपासून मात्र तुला सावध राहायला हवं. तुझ्या वागण्यात म्हणा, बोलण्यात म्हणा, त्यांना काहीतरी खटकत होतं. त्यांची नजर मोठीच तीक्ष्ण आहे.’
अर्थात त्याखेरीज राजेसाहेबांनी त्यांना इतक्या जबाबदारीच्या पदावर नेमलंच नसतं, अजयला वाटलं.
‘हो, मी ते लक्षात ठेवीन.’
राणीसाहेब उठल्या आणि काही न बोलता निघून गेल्या.

***

अजय विचार करीत होता. काही प्रमाणात तरी त्याचा प्रयोग यशस्वी झाला होता. खोल्यांची सफाई करून तो खाली आला.
आजचा दिवस त्याला रिकामा होता.
पुन्हा एकदा सोपानचा अजय झाला.
मोटार ड्रायव्हिंग स्कूलमध्ये गाडीवर सराव झाला.
शूटिंग रेंजमध्ये रिव्हॉल्व्हर झाडण्याचा सराव झाला.
आज त्याने खोलीवर जायचं ठरवलंच. समोरच्या रस्त्याच्या कडेला उभा राहून आधी त्याने नीट टेहळणी केली; पण कोणाचीही संशयास्पद अशी हालचाल दिसली नाहीतेव्हा तो सरळ इमारतीत शिरला. खोलीच्या दाराचं कुलूप त्यानं उघडलं. कुलूप उघडताना किल्ली जरा अडकल्यासारखी वाटली. मनात संशय होताच. त्याने कुलूप प्रकाशात नेऊन नीट पाहिलं. किल्लीच्या खाचांच्या आसपास अनेक चकचकीत ओरखडे होते. कोणीतरी कुलूप उघडण्याचा प्रयत्न केला होताकदाचित तो यशस्वी झालाही असेल!
हे कटकारस्थानाचं पाणी खोल खोल होत चाललं होतं. मागे एकदा अडकरांचा पाठलाग झाला होता. आता हे! हे लोक सराईत होते, चिवट होते. हार मानणारे नव्हते. प्रत्येक पाऊल जपून टाकायला हवं होतं. त्रिपाठींना या एकूण प्रकरणात अजयचा प्रवेशच नको होता. अंत:स्थ काय कारण असेल ते असो.
वाचलेल्या अनेक रहस्यकथा आणि पाहिलेले अनेक रहस्यप्रधान चित्रपट आता त्याला आठवले. शत्रूचा काटा काढण्यासाठी वापरण्यात आलेले कितीतरी ‘बूबीट्रॅप, होतेएखादी वायरजी ओढली जाताच बॉम्बची कळ दाबली जाऊन स्फोट हाईलअजयने खिशातलं पाकीट काढलं. त्यातला कार्डस्टँड आदीसाठी कप्पा होता. त्यावर प्लॅस्टिकचा अगदी पातळ तुकडा होता. तो त्याने काढला आणि दाराच्या उघडलेल्या अगदी बारीक फटीतून पार वरपासून ते खालपर्यंत फिरवला, तो कशालाही अडला नाही. त्याने अलगद दार उघडलं. काही झालं नाही तसं. हुश्श! करून त्याने एक सुस्कारा सोडला. खोलीतल्या दिव्याचं बटण डाव्या हाताला भिंतीवर होतं; पण ते बटण त्याने दाबलं नाही. खोलीतली वस्तून्वस्तू त्याच्या परिचयाची होती. कशासही न अडखळता तो टेबलापर्यंत पोहोचला. टेबलाच्या खणातली काडेपेटी काढून त्याने काडी शिलगावली आणि त्या काडीच्या प्रकाशात दिव्याचं बटण नीट पाहिलं. बटणापासून कोणत्याही तारा वगैरे निघत नव्हत्या. तरीही बटण दाबायला मनाचा जरा हिय्याच करावा लागला. क्षणभर त्याने डोळेही घट्ट मिटून घेतले होते. मग सावकाश डोळे उघडले. खोली दिव्याच्या प्रकाशाने उजळून निघाली होती.
आणि मग त्याचे डोळे विस्फारले.
त्याचं कुलूप नकली चावीने उघडून खोलीत कोणीतरी आलं होतं; आणि खोलीतलं सर्व सामान उलथंपालथं केलं होतं. पलंगावरची गादी अर्धवट उचलली होती. रॅकमधल्या वस्तू अस्ताव्यस्त झाल्या होत्या. दुसऱ्या रॅकमधले कपडे उलगडून खाली टाकले होते.
ते शोध तरी कशाचा घेत होते? त्याच्यासारख्याच्या खोलीत त्यांना काय सापडणार होतं? उद्देश चोरीचाच होताफक्त या मागे एखादा भुरटा चोर होता की याची मुळं राजवाड्यापर्यंत जात होती?
मघाशी मनात आलेल्या विलक्षण शंकाकुशंकांचं त्याला आता हसू येत होतं; पण आपण घेतली ती काळजी योग्यच होती अशी त्याची खात्री होती. शेवट चांगला झाला म्हणून हसू येत होतं; पण...
त्याने कपडे बदलले. खोलीतलं सामान नीट लावलं आणि मग तो बाहेर पडला.

***

राजवाड्यावर पोहोचायला बराच उशीर झाला; पण शिवरामपंत त्याच्यासाठी थांबले होते. दोघांनी जेवण बरोबरच घेतलं. जेवता जेवता शिवरामपंत म्हणाले, ‘सोपानराव, तो जेधे सकाळी आणि संध्याकाळी, सारखा तुमची चौकशी करीत होता. सगळ्यांना विचारत होता; पण कुणीच तुम्हाला पाहिलं नाही तर कोण काय सांगणार?’
या जेधेवर लक्ष ठेवायला हवं एवढाच यातून अर्थ निघत होता.

आज रात्री कुमार परत येण्याची शक्यता कमीच होती. कुमार आपला सर्व दिवसाचा वेळ कसा काय काढत असेल? खरंतर त्या जगण्याला काही अर्थच नव्हता. इतकी क्षेत्रे उपलब्ध असताना तो आपल्या आयुष्याची सर्वांत महत्त्वाची वर्ष अक्षरश: मातीमोल करीत होता. पण या नाराजीबद्दल खेद करण्यापलीकडे तो काय करू शकत होता?
त्याच्या खोलीत बेकायदा प्रवेश मिळवणाराकिंवा मिळवणारेकोण? ते कशाचा शोध घेत होते? राणीसाहेबांनी त्याची गाठ घेतली होती ही गोष्ट फक्त गोवर्धनदासांना माहीत होती. या प्रकरणामागे त्यांचाच हात असावा अशी त्याला शंका येत होती.
वर वर पाहता ते संस्थानाचे जुने आणि इमानी चाकर. मग त्यांचा राणीसाहेबांच्या योजनेला विरोध का? राणीसाहेबांच्या हालचालीवर त्यांची पाळत का होती? त्याला यापैकी कशाचंच उत्तर माहीत नव्हतं. राणीसाहेब आणि कुमार यांच्यात मतभेद आणि संघर्ष व्हावा अशी तर त्यांची इच्छा नसेल? त्यातही त्यांचा काही वैयक्तिक स्वार्थ असण्याचा संभव होता आणि आता त्याला राणीसाहेबांनी सांगितलेली एक गोष्ट आठवलीकोणा एका स्त्रीने आपला राजेसाहेबांशी विवाह झाला आहे आणि राजेसाहेबांपासून तिला झालेला मुलगा हाही त्यांचा औरसपुत्र आणि संस्थानच्या हक्कात वाटेकरी आहे असा दावा केला होता. एकट्या दुकट्या स्त्रीचं हे कामच नाही. तिच्यामागे कोणीतरी होतं आणि तो एक प्रयत्न फसला म्हणून हे हताश होऊन मागे सरले नव्हतेत्याचेच धागेदोरे इथपर्यंत येऊन पोहोचले नसतील कशावरून? सगळ्याच शक्यतांचा विचार करायला हवा होता. जवळ जवळ अशक्यच वाटणारा असा एक विचार त्याच्या मनात येऊन गेला होताहे गोवर्धनदास त्रिपाठी, संस्थानचे कारभारी, हेच स्वत: तर त्या कटाचे सूत्रधार नसतील कशावरून? वर वर अशक्यप्राय वाटणारी गोष्ट; पण या जगात अशक्य गोष्टी सतत घडत असतात. शक्यता मनात ठेवली, की तो घडणाऱ्या व घडलेल्या घटनांकडे वेगळ्या दृष्टीने पाहू शकत होता.
तोच देखावा असतो; पण तुम्ही वेगळ्या कोनातून पाहिलात की अनेक लापलेल्या गोष्टी उजेडात येतात.
आणि आतापर्यंत तो राहिला होता तसा एक तटस्थ निरीक्षक न राहता त्याला आता प्रत्यक्षच या प्रकरणात भाग घ्यायला हवा होता. इतर जर त्याच्या हालचालींवर पाळत ठेवू शकत होते तर मग तोही ती गोष्ट का करू शकत नव्हता?
खरंतर या विचारानेच त्याची नाडी दौडायला लागली होती.
ज्या गोष्टी तो इतके दिवस कथाकादंबऱ्यातून वाचत होता, केवळ सिनेमा नाटकातून पाहत होता त्या गोष्टी तो आता स्वत:च करणार होता.
त्या रात्री इतकी त्याची झोप कधीही अस्वस्थ नव्हती.

***

राणीसाहेब सकाळच्या बागेत एक चक्कर मारतात ही गोष्ट जगजाहीर होती. अजय आठ वाजल्यापासूनच पाळतीवर होता. मोठ्या दरवाजातून त्या बाहेर पडताच विरुद्ध बाजूने तो त्यांच्या दिशेने आला. त्या चाणाक्ष स्त्रीने ओळखलं, की अजयला त्यांच्याशी काही बोलायचं आहे.
त्यांच्याजवळून त्यांना एक नमस्कार करून अजय मागे गेला.
मग एकाएकी आठवल्यासारखं करून त्या थांबल्या. मागे वळून त्यांनी मोठ्याने हाक मारली 'अरे सोपान!'
अजय वळून त्यांच्यापासून दोन पावलांवर थांबला.
'कुमार अजून आला नाही?' त्यांनी विचारलं.
'नाही, राणीसाहेब ज्या स्त्रीने खोटा दावा केला होता त्याचं नाव आणि पत्ता मला देऊ शकाल का?'
क्षणभर त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आलं.
'बरं.' एवढंच म्हणून त्या आपल्या वाटेने निघून गेल्या.
अजय आत आला; पण लगेच वर गेला नाही. स्वयंपाकघरात शिवरामपंताना भेटायला गेला. तिथे आपोआपच चहा झाला.
'त्या जेधेची काही खबर?' अजयने विचारलं.
'आता येईलच चौकशा करायला' शिवरामपंत रागाने बोलत होते. 'हे आपल्याला पसंत नाही, सोपानराव.'
'पण त्याचे हात पार वरपर्यंत पोहोचलेत ना?'
'हो, तेही खरंच.'
थोडा वेळ थांबून तो वर कुमारच्या खोल्यांकडे गेला.
बाहेरचं दार उघडताच त्याला दाराखालून आत सारलेला तो पांढरा लिफाफा दिसला. लिफाफा उघडला तर

आत एकच कागद होता. कागदावर एक नाव आणि पत्ता होता
संजीवनीबाई माने, 113, बाजार रस्ता.
अजयने नावपत्ता लक्षात ठेवला आणि त्या कागदाच्या अगदी लहान लहान चिठोऱ्या करून त्या खिशात ठेवल्या. या मानेबाई जर कटात सामील असतील तर त्यांच्या घरावर पाळत ठेवायला हवी. कोण कोण भेटीला येतं हे जाणून घ्यायला हवं. अर्थात त्याला स्वत:ला हे जमणारच नव्हतं. कोणाला तरी नेमायला हवं. शहरात सिक्युरिटी आणि डिटेक्टिव्ह एजन्सी होत्या. त्यांच्यातल्याच एखाद्याला गाठायला हवं; पण बाब नाजूक होती. या मानेबाईंचं नाव पूर्वी चांगलंच प्रकाशात आलं होतं. प्रत्यक्ष राणीसाहेबांच्यावर खटला भरणारी बाई! तो स्वत: राजवाड्यावर कामाला आहे ही गोष्ट आता सर्वश्रुतच होती. या प्रकरणाशी त्याचा, पर्यायाने राजघराण्याचा संबंध आहे ही गोष्ट अजिबात उघडकीस येता कामा नये. पुन्हा एकदा लहानंसं वेशांतर.

***

13.

त्याने बरोबर एक काळी शाल आणि काळा मफलर घेतला. मग तो बाहेर पडला. बाजार रस्त्याने जाता जाता वाटेत नंबर 113 आलं. चांगल्यापैकी वास्तू होती. रस्त्यापासून दहाबारा फूट आत प्रशस्त दरवाजा होता. स्वतंत्र बंगला वाटत होता. म्हणजे या मानेबाई चांगल्याच इतमामात राहत होत्या तर! साधारण त्याच्याच वयाचा एक रुबाबदार तरुण आतून बाहेर आला. रस्त्यावरच कोणाचीतरी वाट पाहत उभा राहिला. कदाचित हाच औरसपुत्राचा वारसा सांगणारा दावेदार असेल!

***

'रॉयल डिटेक्टिव्ह एजन्सी'ने आपलं ऑफिस एका जुन्या इमारतीत दुसऱ्या मजल्यावर थाटलं होतं. जिन्याने वर जाता जाता अजयने शाल अंगाभोवती पांघरून घेतली आणि डोक्याभोवती मफलर बांधला. समोरून त्याचे डोळे आणि नाकाचा भाग एवढंच दिसत होतं.
ऑफिसच्या दारावर पाटी होती-
'रॉयल डिटेक्टिव्ह एजन्सी.'
प्रोप्रायटर गटणे.
अजय आत गेला. हे बहुधा बाहेरचं ऑफिस असावं. एक इसम टेबलामागे बसून काही लिखापढी करीत होता. त्याने मान वर करताच अजयने खालच्या आवाजात विचारलं, 'गटणे?'
त्या माणसाने आतल्या खोलीकडे बोट केलं.
अजयने आतल्या खोलीत प्रवेश केला. बाहेरच्या मानाने आतली खोली चांगली सजवलेली होती. मोठ्या टेबलामागे बसलेले गृहस्थच गटणे असले पाहिजेत. गृहस्थ मध्यमवयीन, चुणचुणीत आणि कार्यक्षम वाटत होते.
'यायाबसासांगा काय काम आहे ते'
अजय टेबलासमोरच्या खुर्चीवर बसला.
'एकशे तेरा, बाजार स्ट्रीट पत्त्यावर संजीवनी माने राहतात.' तो त्याच त्या खर्जातल्या, खालच्या आवाजात म्हणाला. 'नाव तुमच्या ध्यानात असेलच. नसलं तर सांगतो. काही दिवसांपूर्वी या मानेबाईंनी आपला मुलगा संस्थानचा औरस वारस ठरावा यासाठी राजघराण्यावर फिर्याद केली होती.'
गटणे एव्हाना खुर्चीत सावरून बसले होते.
'या एकशे तेरा, बाजार स्ट्रीट पत्त्याच्या घरावर चोवीस तास नजर ठेवायची आहे. आत कोण जातो आणि आतून कोण बाहेर जातो याची पूर्ण यादी मला हवी आहे. अगदी चोवीस तास. असली कामे तुम्ही स्वीकारता ना?'
'होहोस्वीकारतो ना' गटणे घाईघाईने म्हणाले, 'पण ही नजर किती दिवस ठेवायची?'
'सुरुवातीस तीन दिवसमग आवश्यक वाटलं तर मुदत आणखी वाढवता येईलतुमचे दर काय आहेत?'
'म्हणजे असं आहेचोवीस तास म्हणता'
'दर सांगा.'
'पाचशे रुपये. दिवसाचे दोनशे, रात्रीचे तीनशे.'
अजयने खिशातून नोटांचं बंडल काढलं, त्यातले पंधराशे रुपये मोजून टेबलावर ठेवले.

‘हे तीन दिवसांचे पैसे. ठीक आहे?’
‘होहोठीक आहे ना’
‘गटणे, यादी तुमच्या खिशात तयार ठेवा मी तुम्हाला कोठेही भेटेन आणि तुमच्याकडून यादी मागून घेईनयादी खिशात तयार ठेवायचीठीक आहे ना?’
‘होहोठीक आहे ना’ ते जरा चाचरत म्हणाले.
‘आणखी एक सांगायचं आहे.’ अजय अगदी हलक्या आवाजात म्हणालाआणि एकाएकी त्याचा उजवा हात वर आलात्या हातात चकचकत्या नीळसर काळ्या रंगाचं पिस्तूल होतं. गटणे अंग चोरून खुर्चीत अगदी मागे सरून बसले होते.
‘आणखी एक सांगतो ते ऐका.’ अजय त्याच त्या हलक्या आवाजात म्हणाला ‘याची कोठेही वाच्यता होता कामा नयेअजिबात वाच्यता होता कामा नयेसमजलं?’
‘हो, हो, समजलं’ एक आंवढा गिळत गटणे म्हणाले.
‘यादी खिशात नेहमी ठेवत जा.’
अजय उठला, वळला, खोलीबाहेर आणि मग इमारतीबाहेर पडला. आताच्या प्रसंगातला प्रत्येक क्षण त्याने अगदी मनापासून एन्जॉय केला होता. त्याने घातलेली अट गटणे पाळतील किंवा पाळणारही नाहीत. पाळली नाही तरच उलट चांगलं हाईल. ज्यांनी त्याचा पाठलाग केला होता, ज्यांनी त्याची खोली उलथीपालथी केली होती त्यांनी कोठे गुप्तता राखण्याचा प्रयत्न केला होता? आता त्यांनाही जरा काळजीने राहावं लागेल आणि महत्त्वाचं म्हणजे त्यांच्या हिशेबात एखादं कारस्थान असलं तर ते आता वेळ दवडणार नाहीतघटनांना आता आपोआपच काहीतरी गती येईल.

***

अजय राजवाड्यावर येऊन पोहोचतो न पोहोचतो तोच कुमारची गाडी आली. अजय तसाच गाडीपाशी गेला. गाडीचं दार उघडून कुमार बाहेर आला, मागे जोरात ढकलून त्याने गाडीचं दार बंद केलं. अजयकडे नजरही न टाकता तो पायऱ्या चढून आत गेला.
अजयने गाडीची किल्ली काढली, मागची डिकी उघडली, आतल्या बॅगा काढल्या. गाडीत इतर काही सामान नाही ते पाहिलं आणि मग गाडीचं दार बंद करून किल्ल्या खिशात टाकल्या आणि सामान घेऊन तो वर आला.
खोलीच्या दाराशी कुमार थांबला होता.
पुढे होऊन अजयने दार उघडलं आणि कुमार आत जाताच तोही त्याच्या मागोमाग आत गेला. सामान मधल्या खोलीच्या कोपऱ्यात ठेवलं.
काही न बोलता तो सरळ खाली गेला. स्वयंपाकघरात गेला.
‘शिवरामपंत, दोन कप चहा. कुमार परत आले आहेत.’
ट्रेमध्ये त्याने स्वत: चार स्लाईस, प्रीजमधली बटरची डिश, एका डिशमध्ये गोड आणि खारी बिस्किटं असं मांडलं आणि चहा तयार होताच ट्रे घेऊन तो वर आला. कुमारने कपडे बदलले होते. आरशासमोर उभा राहून तो टॉवेलने चेहरा पुसत होता. आरशातच त्याला अजय दिसला. अजयने ट्रे टीपॉयवर ठेवला. टीपॉय मोठ्या खुर्चीसमोर ठेवला.
खुर्चीत बसता बसता कुमार म्हणाला,
‘अरे सोपान, शिवबा परत आला नाही का रे अजून?’
‘नाही आला. राणीसाहेबांनीच त्याला निरोप पाठवला आहे, की वाटलं तर त्याने आणखी चार दिवस गावाकडे राहावं. मी इथे आहे आणि तुमची काहीही गैरसोय होत नाही.’
‘वा! राणीसाहेब आमच्या सोयी-गैरसोयीत खूपच लक्ष घालायला लागल्या म्हणायच्या!’
अजय काहीच बोलला नाही.
कुमारने फक्त चहा आणि एकदोन बिस्किटं घेतली. मग ट्रे मागे सारत तो म्हणाला,
‘सोपान, खूप पहाटेस निघालो आहे. आता दुपारी चारपर्यंत मी ताणून देणार आहे. मला अजिबात डिस्टर्ब करू नकोस.’
‘हो,’ म्हणत अजयने ट्रे उचलला.

***

अजय स्वयंपाकघरात जेवायला गेला तेव्हा जेधे तिथे हजर होताच. आपली थाळी घेऊन अजय सरळ जेधेच्या

शेजारीच जाऊन बसला. बसल्या बसल्या अजय त्याला म्हणाला,
'काल म्हणे तुम्ही माझी चौकशी करत होतात?'
'नाहीम्हणजे तसं नाही'
'शिवरामपंत म्हणत होते सकाळी-संध्याकाळी दोन्ही वेळा सोपान कोठे आहे विचारत होतात...'
जेधे एव्हाना सावरला होता.
'आजकाल तुमचा भाव भलताच चढला आहे, सोपानराव-तुमची नुसती ओळख आहे म्हटली तरी शब्दाला मान देतात'
'असं होयनाहीतरी काही खास काम असलं तर सांगा'
'नाहीनाही, काही खास काम नाही'
'म्हणजे; काम करायला वेळ मिळाला तर अवश्य करीन; पण वेळ मिळायला हवा नाआता कुमार परत आले आहेत'
त्या जेधेला अजयने सूचना दिली होतीकी त्याच्या सततच्या चौकशा अजयच्या लक्षात आल्या आहेतसध्या एवढं पुरे होतं.

***

साडेचारच्या सुमारास अजय कुमारच्या खोलीत गेला.
कुमारची झोप झाली होती. एवढंच नाही, तो बाहेर जाण्याच्या तयारीत होता. दोन्ही तिन्ही खोल्यांतून खूप पसारा पडलेला होता. प्रवासात वापरलेले कपडे बॅगांत तसेच होते. वाटेत घेतलेली वर्तमानपत्रं होती. अन्नपदार्थांच्या रिकाम्या झालेल्या पिशव्या होत्या. अजय तो सारा पसारा आवरण्याच्या मागे लागला. मधेच केव्हातरी कुमार गेलासुद्धा.
आता रात्री नऊदहापर्यंत अजयचा वेळ रिकामा होता.
दोन कार्यक्रम ठरलेले होते. आधी ती शूटिंग ग रेंज आणि मग रॉयल डिटेक्टिव्ह एजन्सीचे प्रोप्रायटर गटणे यांची भेट.
आता पिस्तुलाच्या वापरात खूपच सफाई आणि आत्मविश्वास आला होता. दहापैकी किमान तीन वेळा तरी गोळी समोरच्या डमीला लागत होती. अचूक नेमाइतकंच झटपट ड्रॉला महत्त्व होतं.
सहाच्या सुमारास तो रॉयल डिटेक्टिव्ह एजन्सीच्या इमारतीपाशी पोहोचला. हे गटणे महाशय बहुधा आता ऑफिस बंद करून घरी निघण्याच्या तयारीत असतील. त्यांना रस्त्यातच गाठायचा त्याचा विचार होता. बरोबर आणलेली शाल त्याने खांद्यावरून घेतली आणि डोक्याभोवती मफलर गुंडाळला आणि तो इमारतीसमोरच्या रस्त्यावर एका भिंतीला टेकून उभा राहिला. त्याचा अंदाज चुकला नव्हता. वीस एक मिनिटात गटणे इमारतीबाहेर पडले.
डावीकडे वळून ते सावकाश चालायला लागले. रस्ता ओलांडून अजय त्यांच्या बाजूला आला आणि त्यांच्या मागोमाग जरा झपाझप चालायला लागला. पुढे डावीकडे एक बोळ जात होती. ती बोळ ओलांडताना गटणे आधी जरा थांबले होते. तोपर्यंत अजय त्यांच्यामागे अगदी एका पावलावर येऊन पोहोचला होता. गटणे बोळ ओलांडून पुढच्या फुटपाथवर चढताच अजयने मागून त्यांच्या खांद्यावर हात ठेवला.
ते एकदम दचकले.
'काय! काय! कोण!' करत त्यांनी मागे पाहिलं.
'एकशे तेरा, बाजार स्ट्रीटची यादी, गटणे!' अजय त्याच त्या हलक्या आवाजात म्हणाला. त्याने एक हात पुढे केला.
'एकशे तेराहो! हो! आहे ना!'
गटण्यांनी डाव्या खिशातून एक कागद काढून तो अजयच्या हातात दिला. कागद हातात घेऊन अजयने दुसरा हात समोर केला.
'तुम्ही गेलात तरी चालेल' तो म्हणाला.
एकदोन सेकंद थांबून गटणे चालायला लागले.
अजय झटदिशी डावीकडे बोळात शिरला. शाल आणि मफलर काढून त्याची घडी करून त्याने ती काखोटीत ठेवली. मग तो, परत रस्त्यावर आला. सातआठ पावलांवरच गटणे उभे होते आणि मागचा भाग न्याहाळून पाहत होते. अजय त्यांच्याजवळून पुढे गेला तरी त्यांचं त्याच्याकडे लक्षही गेलं नाही.

***

अजय खोलीत बसला होता. त्याच्या हातात तो यादी होती. गटणे यांच्याशी भेट होताच त्यांनी माणसाची नेमणूक केलेली दिसत होती. साडेअकरापासूनच्या नोंदी होत्या.
सकाळी 11.30 श्रीमती माने रिक्षातून परत आल्या.
12.00 कुणाल माने पायी बाहेर गेला.
2.00 एक गृहस्थ भेटायला आले.
श्रीमती माने त्यांच्याबरोबर बाहेर गेल्या.
4.00 श्रीमती माने एकट्याच परत आल्या.
5.00 एम एच 12 एए 3002 नंबरची गाडी मोठ्या फाटकातून आत गेली.
5.30 गाडी बंगल्यातून बाहेर गेली. काचा काळ्या असल्याने आत कोणी होते का दिसले नाही.
6.00 ऑफिसात रिपोर्ट दिला.
संजीवनीबाईंचं जाणंयेणं बरंच होत; पण त्यांच्याकडे येणाऱ्या माणसाची ओळख पटायला हवी होती. अर्थात हे काम एका दिवसात होण्यासारखं नव्हतं. धीराने घ्यायला हवं होतं.
त्याने तर संजीवनीबाई कशा आहेत हेही अजून पाहिलं नव्हतं.
या शोधातून आपल्या हाती काय लागणार आहे याची त्याला काहीच कल्पना नव्हती. मनात एकाएकी एक 'हुंच' आली होती आणि त्याने ही पावलं उचलली होती आणि त्याला हेही समजत होतं अशी लांबून लांबून चौकशी करण्याने काही साध्य होणार नव्हतं. त्याला अप्रत्यक्षच त्यात भाग घ्यावा लागणार होता. गाडीचा नंबर एका कागदाच्या तुकड्यावर लिहून ठेवून त्याने गटण्यांच्या रिपोर्टच्या चिठोऱ्या करून टाकल्या.

***

रात्री एकच्या सुमारास कुमार परत आला. अजयने त्याच्यासाठी कॉफी तयार ठेवलीच होती. गाडी कुमार मोठ्या दरवाजासमोरच सोडत असे, मागाहून केव्हातरी ड्रायव्हर गाडी गॅरेजमध्ये नेऊन ठेवत असावा.
आजही कुमार रोजच्यासारखाच झिंगलेला होता; पण त्याचं एक अजयच्या लक्षात आलं होतं. अडखळत्या आवाजात, मोठ्या कष्टाने बोलला तरी कुमारच्या तोंडून कधीही एकही अपशब्द निघत नसे. तो टाकून बोलेल, लहरीपणाने बोलेल; पण अपशब्द उच्चारणार नाही.
गाडीतून उतरल्यावर, वर जाताना आणि खोलीत गेल्यावरही कुमारची स्वत:शीच बडबड चालली होती. क्लबमध्ये कोणाशीतरी बोलाचाली झाली असावी'डाव्या हाताने पान घेतलं का म्हणत होता?' कुमार तेच तेच वाक्य पुन्हा पुन्हा उच्चारत होताइतर काही बोलून झालं की परत 'डाव्या हाताने पान घेतलं का म्हणत होता?' चेहऱ्यावर येणारं हसू लपवायला अजयला अर्तानात खटपट करावी लागत होती. कुमारला कपडे बदलायला त्यालाच मदत करावी लागली आणि शेवटी पलंगावर झोपल्यावरही कुमारचे शेवटचे शब्द हेच होते'डाव्या हाताने पान घेतलं का म्हणत होता?'

***

रात्री अजय बराच वेळ स्वत:शी विचार करीत होता.
या संजीवनीबाईंच्या घरात प्रवेश मिळवायला हवा. त्यांना प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज कोणतंही मत बनवता येत नव्हतं. कोण परका माणूस त्यांच्या घरात गेला तर त्याचा संशय येणार नाही? ज्यावेळी राणीसाहेबांविरुद्ध कोर्टकज्जे चालू होते तेव्हा वार्ताहर त्यांच्या घरी गेले असतील; पण आता सध्या ते प्रकरण थंड झालं होतं. मुलाखत घेण्यासाठी एखादा गेला तर ते त्याला अटकाव करणार नाहीत; पण ती सबब अगदीच फुसकी वाटेल.
हां, अशा अफलातून, गाजलेल्या, सनसनाटी खटल्यांवर एखादा पुस्तक लिहीत असला तर तो मात्र अवश्य त्या घटनांत प्रत्यक्ष भाग घेतलेल्यांना भेटेल किंवा तो जर ते सत्य प्रसंग एखाद्या कादंबरीच्या स्वरूपात लिहीत असेल तर तो त्या प्रसंगात गुंतलेल्या लोकांची अवश्य भेट घेईल. पार्श्वभूमी जाणून घेण्यासाठी. सत्यस्थितीशी जराशी तडजोड केली तर त्यासाठी परवानगी घेण्यासाठीनाहीतर मागाहून अब्रुनुकसानीच्या खटल्यांचं झेंगट त्याच्या गळ्यात यायचं.
अजय जसजसा जास्त विचार करायला लागला. तसतशी त्याला ही कल्पना जास्त जास्त आकर्षक वाटायला लागली. विशेष म्हणजे त्यासाठी त्याला एक नवी व्यक्तिरेखा उभी करावी लागणार होतीत्याचं आवडतं काम! हा इसम चौकस असणार, जरासा एक्स्ट्रोव्हर्ट असणार, जरासा आगाऊपणा करणारा असणार. इतरांच्या आयुष्यातील कठीण प्रसंग असोत, मानहानीचे प्रसंग असोत, सुखदु:खाचे प्रसंग असोत, स्वत:ची प्रसिद्धी आणि स्वत:चे खिसे भरण्यासाठी त्यांचं भांडवल करणारा हा इसम इतरांच्या भावनांची फारशी कदर

करणारा नसणार मात्र वरवर तो सहानुभूती अवश्य दाखवणार. साहित्यात लिहिलेली गेलेली सर्वच चारित्रे किंवा चरित्रात्मक कादंबऱ्यासर्वत्रच खरी सहानुभूती किंवा खरा आदर नसतो.
आता तर त्याला वाटायला लागलं की, नाटकात तीन तासांपुरती एखादी भूमिका करण्यापेक्षा हेच काम खऱ्याआव्हानासारखं आहे. यशस्वी झालात तर टाळ्या मिळणार नाहीत आणि अयशस्वी झालात तर अक्षरश: गजांमागे खडी फोडायला जावं लागेल.
हा असा लेखक कसा असेल? सतत लिखापढी करणारा म्हणजे डोळ्यांना चष्मा आलाच, बोलण्यात हजरजबाबी हवी; संपूर्ण अनोळखी अशा लोकांत मिसळून वागण्याचा धीटपणा आणि जाड कातडीचा.
हळूहळू त्याच्या डोळ्यासमोर ती आकृती साकार व्हायला लागली.
महत्त्वाची गोष्ट ही होती की, तो त्या घराला एकदाच भेट देणार होता.

***

जाग आठला आली. स्वयंपाकघरात चहा घेतला आणि तो वर कुमारच्या खोलीकडे निघाला. तो जिन्याने वर जात असताना वरच्या मजल्यावरून गायत्री खाली आली. ती समोर दिसताच तिला दोन्ही हातांनी नमस्कार करीत अजय अदबीने म्हणाला, 'नमस्कार, बाईसाहेब.'
'तुझे साहेब उठले की नाही अजून?' तिने विचारलं.
'तेच तर पाहायला चाललो आहे, बाईसाहेब.'
काही वेळ ती तिथेच उभी राहिली. कदाचित तिच्या मनातून आणखी काहीतरी बोलायचं असावं; पण मग स्वत:शीच मान हलवून ती खाली गेली.
अजय कुमारच्या खोलीत आला.
कुमार जागा होता. बेडरूममध्येच येरझारा घालीत होता.
त्याच पावली अजय मागे वळला, खाली आला, स्वयंपाकघरात येऊन त्याने कुमारचा नाश्ता बनवला, तो घेऊन तो परत वर गेला. हॉलमधल्या टेबलावर वर्तमानपत्रे येऊन पडली होती. त्यातली दोन मराठी आणि एक इंग्रजी, त्याने बरोबर घेतली.
नाश्त्याचा ट्रे बाहेरच्या खोलीत टीपॉयवर ठेवून त्याने आतल्या खोलीच्या दारावर हाताने टकटक केली. कुमारने त्याच्याकडे पाहताच त्याने बाहेर हाताने खूण करून सांगितलं,
'नाश्ता बाहेर ठेवला आहे तुमचा, कुमार.'
आणि मग त्याने रोजच्या आवराआवरीला आणि सफाईला सुरुवात केली. कुमार बाहेरच्या खोलीत गेला. त्याने टीव्ही सुरू केला. काहीतरी हिंदी सिनेमा चालू होता. नाश्त्यासाठी कुमार त्याच्या नेहमीच्या खुर्चीवर बसला. अजयने रोजच्या शिरस्त्याप्रमाणे वापरलेल्या मॅनिला पॅंटचे खिसे तपासले. नोटा आणि चिल्लर ड्रॉवरमध्ये टाकली, कपडे धोब्याकडे पाठवण्यासाठी मोठ्या टोपलीत टाकले. अलमारीमधून नवीन कपडे बाहेर काढून ठेवले. मग तो तिथेच खिडकीपाशी बाहेर पाहत उभा राहिला. त्याने ठरवलं होतं की, आपण होऊन कुमारशी काहीही बोलायचं नाही, काहीही सल्ला द्यावयाचा नाही. कुमार जर बोलण्याच्या मूडमध्ये असेल तर काही बोलेलनाहीतर आपलं काम निमूटपणे करीत राहायचं. त्याचं जे मुख्य काम होतंम्हणजे कुमारच्या बोलण्या-चालण्याचं, हालचालींचं, लहानसहान सवयींचं निरीक्षण करणं- ते काम काहीही न बोलता होतच होतं. शिवाय एव्हाना तीन टेपवर कुमारचा आवाज रेकॉर्ड झालेला होता त्याचा अभ्यास अजय केव्हाही करू शकत होता.
वेळ आली तर कुमारची नक्कल करणे हा कामाचा एक भाग होता; पण त्याभोवती आता आणखी नवे आणि अनपेक्षित घटक जमा झाले होते. त्यांचाही सतत हिशेब ठेवावा लागत होता. आसपास जे एक कारस्थानांचं जाळं होतं त्यात तो काही मध्यवर्ती नव्हता. तसंच हा गुंता सोडवण्याचं कामही कोणी त्याच्यावर सोपवलेलं नव्हतं; पण आधी एक नैसर्गिक असं कुतूहल होतं आणि मनोमन त्याला वाटत होतं की, काहीही वेळ आली तर आपण तयार असायला हवंवेळ आलीच नाही तरी तयारी काही फुकट जाणार नव्हती.
कुमारचा नाश्ता झाला आहे असं पाहून तो बाहेर आला आणि टीपॉयवरचा ट्रे उचलून घेत त्याने कुमारला सांगितलं-
'तुमचे नवे कपडे आत काढून ठेवले आहेत.'
'ठीक आहे.'
'आणखी काही काम? आणखी कोणाला निरोप?'
'नाही.'

‘बारा वाजेपर्यंत मी बाहेर गेलो तर चालेल का?’
‘इस्टेटवर जाणार आहेस?’
‘जाईनही; पण नक्की नाही. तुमचा काही निरोप असला तर जाईन.’
‘नाही, काही निरोप नाही. ठीक आहे.’
ट्रे घेऊन अजय खाली आला.

* * *

‘श्रीमती संजीवनीबाई माने यांची गाठ सकाळीच घ्यायचं अजयने ठरवलं होतं. एकच भेट घ्यायची. दोन-तीन तास पुरेसे होते आणि पुन्हा वेळ मिळण्याची वाट पाहण्यापेक्षा ते काम आताच करून टाकणं चांगलंसमजा काही निष्पन्न झालं नाही तर बिघडत काहीच नव्हतं.
गडद रंगाऐवजी फिक्या रंगाचा शर्ट, अर्ध्या बाहीऐवजी फुल स्लीव्ह, खांद्यावरचं पॅडिंग काढलेलं, आणि डोळ्यांना फिकट निळसर काचांचा चष्मा आणि मुख्यत: गडीमाणसाचा वाकलेला खांदा जाऊन त्याच्याऐवजी सरळ ताठ खांदा आणि चालण्यात एक नैसर्गिक स्वच्छंदीपणा
सोपानच्या जागी लेखक देशपांडे आला होता.
सोपानला रोज पाहणारासुद्धा हा देशपांडे ओळखीचा वाटला नसता.
राजवाड्याच्या दारापाशीच देशपांडेने रिक्षा केली आणि रिक्षा एकशेतेरा, बाजार स्ट्रीट या पत्यावर पोहोचली.
पैसे चुकते करून अजय सरळ इमारतीच्या आवारात शिरला.
मोठ्या दारावरची घंटा त्याने एकदा दाबली आणि मग तो तिथेच पायरीवर हातांची छातीवर घडी करून शांतपणे उभा राहिला.
मिनिटभरात दार उघडलं गेलं. आत कोणी नोकराणी असावी. दार उघडताच अजय आत गेला. कदाचित ती बाई त्याला आतूनच ‘कोण हवं?’ विचारणार असेल; पण अजयने तिला ती संधीच दिली नाही.
‘मालकीणबाई आहेत का?’ त्याने विचारलं. अधिकारी आवाजात प्रश्न आला की लगोलग उत्तर देण्याची नोकरांना सवयच असते.
‘हो,’ ती म्हणाली.
‘त्यांना जरासा वेळ असला तर पाहता का? मी इथेच थांबतो.’
तिच्याकडे पाठ करून अजय भिंतीजवळच्या एका खुर्चीत बसलासुद्धा.
काहीच न सुचून ती बाई काही क्षण तशीच उभी राहिली आणि मग स्वत:शी काहीतरी पुटपुटत आत गेली.
अजयची नजर खोलीवरून फिरत होती. रंग, पडदे, सामान, दिवे, पंखे या सर्वांवरून श्रीमंती राहणीची सहज कल्पना येत होती.
ज्या साधारण पन्नाशीच्या बाई बाहेरच्या खोलीत आल्या त्याच संजीवनीबाई माने असल्या पाहिजेत आणि त्या तर अजूनही दिसायला खूपच सुंदर होत्या. मग तरुणपणी तर त्यांचं लावण्य अप्रतिम असलं पाहिजे.
त्या खोलीत येताच अजय उठून उभा राहिला होता. अर्धवट नमस्कार करीत तो म्हणाला, ‘श्रीमती माने, हो ना? नमस्कार. आधी आपली क्षमा मागतोकारण कोणतीही पूर्वसूचना न देता असा अचानक आपल्या घरी दाखल झालो. येण्याचं कारण सांगितलं म्हणजे मला तुम्ही खासच क्षमा कराल. आधी मी माझी ओळख करून देतो. माझं नाव देशपांडेगंगाधर देशपांडे. वास्तविक इतिहासाचा रीडर; पण काही योगायोग म्हणा, नशीब म्हणाअनेक राजघराण्यांचे इतिहास लिहायची कामगिरी माझ्यावर सोपवली गेली. सुरुवात कधी, केव्हा आणि कशी झालीमला विचाराल तर मलाही सांगता यायचं नाही; पण सर्व वर्षभर आताशी मी याच कामावर असतो आणि नाव एकाकडून दुसऱ्याला कळतं. याच मार्गाने गेल्या महिन्यात किनौर राजघराण्याचा इतिहास लिहिण्याचं काम माझ्यावर सोपवण्यात आलं आहे.’
संजीवनीबाई खुर्चीत बसून त्याचं बोलणं ऐकत होत्या. आधी जर त्यांना अजयच्या एकाएकी येण्याबद्दल मनातली नाराजी व्यक्त करायची असली तर अजयच्या शब्दांच्या प्रवाहापुढे त्यांना ती संधी मिळाली नव्हती आणि आता तर त्या कुतूहलाने त्याचं बोलणं एकत होत्या.
‘आता तुम्ही साहजिकच विचाराल्या राजघराण्याच्या इतिहासात तुमचा संबंध कसा आणि कोठे येतो? सांगतो; पण विषय जरा नाजूक आहे. अर्थात पूर्वी एकदा याची सार्वजनिक चर्चा झालीच आहे; पण कदाचित तुम्हाला ती उजळणी क्लेषकारक ठरेलतुमच्या लक्षात आलं का मी कशाबद्दल बोलत आहे?’
‘नाही.’
‘संजीवनीबाई, राजेसाहेबांच्या मृत्यूनंतर काही दावेप्रतिदावे केले गेले होते. प्रकरण कोर्टातही गेलं होतं.

समजलं का मी कशाबद्दल बोलत आहे ते?'
संजीवनीबाईंच्या चेहऱ्यावर रागाची लाली आली होती.
'एवढं ध्यानात घ्याया बाबतीत मला काहीही मत नाही. कोणावरही कोणतेही दोषारोप करण्याची माझी इच्छा नाही, ते माझं स्थानही नाही. राणीसाहेबांशी चर्चा केल्यावर माझी अशी कल्पना झाली की, त्यांना या प्रकरणाचा उल्लेखही नको आहे; पण प्रामाणिक इतिहासकाराला आपल्या वैयक्तिक आवडीनिवडी, आपले ग्रहप्रतिग्रह बाजूस ठेवावे लागतातसर्व मूल्यमापन संपूर्ण वस्तुनिष्ठ पातळीवरच व्हायला हवं. तसंच कोणालाही एखादा प्रसंग अप्रिय आहे म्हणून तो गाळता येत नाही किंवा कोणताही मजकूर केवळ एखाद्याची मर्जी संपादन करण्यासाठी घुसडता येत नाही. त्यांची इच्छा काहीही असो-मी सत्याची कदर करणारा माणूस आहे. सर्व पुरावे तपासून, शक्य असल्यास त्यांची शहानिशा करून, शेवटी जे सत्य समोर येईल तेच व तसेच मांडणारा मी माणूस आहे. क्वचित प्रसंगी आपल्या आश्रयदात्यांचीही आमच्यावर खप्पामर्जी होते; पण त्याचीही मी कधी फारशी फिकीर केलेली नाही. आता आपलं मत विचारतोकारण आपण स्वत:च त्या प्रकरणात गुंतलेल्या होतातराजघराण्याच्या इतिहासात त्याची नोंद व्हावी अशी आपली इच्छा आहे का?'
'व्हायलाच हवी!' संजीवनीबाई त्वेषाने म्हणाल्या, 'त्यांच्या हाती सत्ता आहेत्याचा वापर करून त्यांनी सत्य दडपून टाकलेलं आहे! पण ते लोकांसमोर यायलाच हवं! त्याची कायमची नोंद व्हायलाच हवी!'
'संजीवनीबाई, जसा राणीसाहेबांच्या मर्जीखातर मी एखादी गोष्ट गाळणार नाही, तशीच केवळ तुमच्या आग्रहाखातर एखादी गोष्ट त्यात घुसडणारही नाही. कोर्टाचा फैसला काहीही असोमला तो पुरावा पाहायला मिळाला तर मी तो तपासून त्या प्रकरणाची नोंद करायची का नाही याचा निर्णय घेईन. तुमची याला तयारी आहे?'
'हो! हो! तयार आहे!'
'मग मला एकदा तो पुरावा डोळ्याखालून घालू द्यात!'
संजीवनीबाईंचा राग अजून ओसरला नव्हता.
'जरा थांबा इथेचमी ती फाईलच तुम्हाला देते' म्हणत त्या खोलीतून गेल्या.
अजय तसाच बसून होता. गाडीचा आवाज आला. गाडी आवारात शिरत असावी. उभे राहून त्याने खिडकीतून बाहेर पाहिले. काळी गाडी होती. त्याला नंबर प्लेटवरचे शेवटचे 3002 हे अंक दिसले. अहवालातल्या गाडीचा नंबर!
गाडी वळून डावीकडे गेली. त्या बाजूच्या खिडकीतून त्याने बाहेर नजर टाकली. बाजूच्या दरवाजापाशीच गाडी थांबली होती आणि गाडीतून जो इसम उतरून दारातून आत गेला तो अजयच्या चांगलाच माहितीतला होता
जेधे!
अजय एकदम खुर्चीवर येऊन बसला. ही माहिती अनपेक्षित आणि धक्कादायक होती. सर्वच प्रकरणावर नवा प्रकाश टाकणारी होती. आता तर त्याला अगदी सांभाळून वागायला हवं. कोठेही एवढीशीही चूक होता कामा नये.
संजीवनीबाई परत आल्या तेव्हा तो सुरुवातीपासून बसला होता त्याच खुर्चीत तसाच शांतपणे बसला होता.
संजीवनीबाईंच्या हातात एक जाड फाईल होती. ती पुढे करीत त्या म्हणाल्या, 'हे घ्या! यात भरपूर पुरावे आहेत!'
त्याने फाईल हातात घेतली. आत कागदांची चळत होती.
'हे मोठं वेळ घेणारं काम आहे!' फाईल खाली ठेवत तो म्हणाला. 'मी त्या तयारीने आलेलो नाही आणि अशी महत्त्वाची कागदपत्रं तुमच्याकडून मागूनही घेणार नाही. मला वेळ दिलीत, सुमारे दोन तास दिलेत, तर मी इथेच, तुमच्या समक्षच, कागदपत्र पाहीन.'
'मान्य आहे.'
'हो, तुम्ही उद्या सकाळी लवकर येऊ शकता.'
'छान. आभारी आहे. मी कार्ड आणलं नाही; पण माझा इथला पत्ता ध्यानात ठेवा. गंगाधर देशपांडे, खोली नं. 312, रॉयल स्टार हॉटेल. आता आणखी एक विनंतीआपला आणि आपल्या चिरंजिवांचा एकत्र किंवा वेगवेगळा असा फोटो देऊ शकाल का? तो मी स्कॅन करून घेईन, मूळ प्रत आपल्याला उद्या परत देईनचालेल?'
'हो, देते फोटो.'

आतून त्यांनी एक अल्बम आणला. त्यातले दोन फोटो काढून अजयच्या हाती दिले. फोटो घेऊन उठत अजय म्हणाला,
'आपण जे सहकार्य दिलंत त्याबद्दल खरोखरच आभार.'
'नाहीहे एकदा व्हायलाच हवं होतं' त्या म्हणाल्या. 'पण ते फोटो मात्र आणायला विसरू नका हं!'
'अजिबात नाही. मग मी घेऊ आपली रजा?'
'ठीक आहे.'
त्यांना अर्धवट नमस्कार करून अजयने खोलीबाहेर आणि मग त्या बंगल्याच्याबाहेर पाय टाकला.
घाई न करता तो रस्त्याने चालत राहिला. जेव्हा एक वळण मागे गेला तेव्हाच त्याने सुटकेचा नि:श्वास सोडला.

***

तो फक्त त्या संजीवनीबाईंना पाहायला गेला होता; पण घडलं ते अघटितच होतं. हा जेधे संजीवनीबाईंच्या घरी आला आणि गटण्यांच्या अहवालावरून रोजच येत असावा. याचा अर्थ एकच होऊ शकत होताप्रत्यक्ष गोवर्धनदास त्रिपाठींचाच ह्या प्रकरणात संबंध होताकारण जेधे स्वत:च्या कामासाठी आला असता तर असा बंद गाडीतून आला नसता. हा एक तर्क खरा असला तर विलक्षण शक्यतांचं मोहोळ उठत होतं; पण एक खबरदारी घ्यायला हवी होतीमनातली ही शंका अगदी कोणापाशीही दुरान्वयानेसुद्धा उघड करायची नाही.

***

बारा वाजता तो वर कुमारच्या खोलीत गेला. कुमार खोलीत नव्हता. कपडे करून कोठेतरी गेला होता. परत केव्हा येणार, जेवायला येणार की नाही कशाचीच कल्पना नव्हती. त्याला कोणी विचारलं तर तो सांगणार, की मला कुमारनी काहीही सांगितलेलं नाही.
त्याने आपलं जेवण आटोपलं. पंक्तीला आज जेधे नव्हता. खोलीत येताच त्याने आपल्यामागे दाराला कडी घातली आणि सकाळी संजीवनीबाईंनी दिलेलं पाकीट काढलं. पाकिटात दोन फोटो होते. एक संजीवनीबाईंचा, दुसरा कुणालचा. कुणालला त्याने अजून पाहिलं नव्हतं. तो फोटो आधी त्याने समोर धरला.
कुणालचा चेहरा रुबाबदार होता यात शंका नव्हती. त्या फोटोकडे पाहता पाहता अजयला सारखी जाणीव होत होती, की हा चेहरा किंवा ही नजर आपण कोठेतरी पाहिली आहे. आपल्या परिचयाची आहे.
अजयला एकाएकी कॉनन डॉयलची 'हाऊंड ऑफ बॅस्कट व्हिलाज'कादंबरी आठवली. त्या गावात स्टेपलटन दिसताच होम्सला त्या चेहऱ्यातलं साम्य आठवलं होतं. दिवाणखान्यातल्या हेन्त्री बॅस्कट विहलाच्या वडिलांच्या मोठ्या तैलचित्राच्या चेहऱ्याचा भाग हाताने वेगळा करताच स्टेपलटनची नजर तैलचित्राच्या डोळ्यातून दिसली होती
अजयने आपले दोन्ही हात फोटोच्या कपाळावर आणि नाकाचा काही भाग एवढंच दिसेल असे ठेवले... आणि त्याचे हात कापायला लागले.
कारण फोटोतून गोवर्धनदास त्रिपाठींचे डोळे त्याच्याकडे पाहत होते! गोवर्धनदास त्रिपाठींचे डोळे!
याचा अर्थ एकच असू शकत होता.
कुणाल गोवर्धनदास त्रिपाठींचा मुलगा होता!
हे गुपित थक्क, चकित, दिङ्मढ करून टाकणारं होतं! हे गुपित विलक्षण स्फोटक होतंत्याला यातलं काही माहीत आहे अशी नुसती शंका जरी आली तरी त्याच्या जिवाची काही धडगत नव्हती.
हे लोक एक विलक्षण जुगार खेळले होते. त्यांनी आपल्या साऱ्या जिंदगीची, अब्रूची, सर्वस्वाची बाजी लावली होती. जुगाराची पहिली खेळी ते हरले होते; पण ते एवढ्याने थांबणार नाहीत आणि त्यांच्या रहस्याचा कोणाला सुगावा लागला आहे अशी त्यांना नुसती शंका आली तरी अशाचा काटा काढायला ते मागेपुढे पाहणार नाहीत!
आता त्याची वैयक्तिक सुरक्षाही धोक्यात आली होती.
राणीसाहेबांनी सोपवलेलं काम तो स्वीकारो अथवा न स्वीकारोतो स्वत:च त्यांच्यासाठी एक धोका झाला होता. प्रकरणाने एकाएकी एक अनपेक्षित, गंभीर, धोक्याचं वळण घेतलं होतं.
राणीसाहेबांची सुरुवातीची मागणी त्याने एक आव्हान म्हणून स्वीकारली होती. सुरुवातीपासूनच गोवर्धनदास त्रिपाठींचा त्याला विरोध का होता याचं थोडं थोडं स्पष्टीकरण व्हायला लागलं होतं. कदाचित त्यांना राणीसाहेब आणि कुमार यांच्यात वैमनस्य यायला हवं असेल, कदाचित त्यांना कुमार हा पुरा पुरा बदनाम व्हायला हवा असेल; म्हणून त्यांचा विरोध, कारण हा गोवर्धनदास मोठा महत्त्वाकांक्षी माणूस दिसत होता.
राणीसाहेब, कुमार, गोवर्धनदास या तिघांच्याही वागण्याचं काही प्रमाणात स्पष्टीकरण होऊ शकत होतं.

पण हो गायत्रीो?
संधी मिळाली तर ती कुमारशी विवाह करायला तयार होती.
याचं स्पष्टीकरण कसं होणार?
एक गोष्ट उघड होती. नात्याने ती राणीसाहेबांची भाची असली तरी ती राजवाड्यात केवळ एक आश्रित म्हणूनच राहत होती. तसा जन्माने तिला कोणताही हक्क प्राप्त झाला नव्हता.
गोवर्धनदासना जशी सत्तासंपत्ती याची हाव लागली होती, तशीच गायत्रीही संपत्तीसाठी हपापलेली होती का? कुमार दारूच्या नशेत काही काही बडबडला होतात्यावेळी वाटले तसे ते शब्द खरोखरच निरर्थक नसले तर? गोवर्धनदास आपल्या मुलाची आणि गायत्री स्वत:ची तुलना कुमारशी करीत असतीलत्याच्यासारख्या त्यांच्या मते बेजबाबदार आणि नालायक माणसाच्या पायाशी लक्ष्मी लोळण घेत होतीत्यांच्या मते कदाचित हा नशिबाचा व्यानोक्तीपूर्ण खेळ असेल
पण ते आपल्या वाट्याला आलेलं आयुष्य स्वीकारायला तयार नव्हते. ब्रह्मदेवाने त्यांच्या ललाटी कोरलेली भविष्यवाणी त्यांना पुसून टाकायची होती. त्यांना नवं भविष्य घडवायचं होतं.
दोघांनीही आपापल्या परीने जिंदगीचाच जुगार लावला होता!
अजयला वाटलं त्याच्या दृष्टीने हा क्षण महत्त्वाचा होता.
या प्रकरणात पुढे पाऊल टाकण्याआधी त्याला स्वत:चा विचार करणं आवश्यक होतं. वास्तविक पाहता या प्रकरणात त्याचा कोणताही वैयक्तिक संबंध नव्हता. वास्तविक पाहता या प्रकरणात इतकी वेडीवाकडी वळणं असतील ही सुरुवातीस कल्पनाही नव्हती. आता जरा मागे सरून तटस्थ दृष्टीने पाहायची वेळ आली होती. केवळ साहसाची हौस भागवण्यासाठी तो हे सारं करत होता? का त्याला या सगळ्यात काही वैयक्तिक स्वारस्य निर्माण झालं होतं? ही काही त्याची माणसं नव्हती. त्यांच्यात त्याचे शत्रूमित्र कोणी नव्हते. वेळ आलीच तर त्याच्यावर सोपवलेलं काम पुरं करून त्याने यातून अंग काढून घ्यायला हवं होतं.
पण मनाचा दुसरा भाग म्हणत होताआता ते काम करायचं म्हटलं तरी धोका होताचकदाचित प्राणालाही धोका होता या पाच-दहा हजारांत प्राणाचं मोल होऊ शकत होतं का?
पण शेवटी त्याला समजलं की सर्व स्वत:ची फसवाफसवी आहे.
तो मागे सरणार नव्हता.
शेवटी मानवी मन ही एक अकल्पनीय निर्मिती आहे. मनाची उत्सुकता एकदा जागी झाली, की ती जिवाला क्षणभरही चैन मिळू देत नाही.
त्याच्यासमोर प्रत्यक्ष जीवनाच्या पटावर एक विलक्षण नाट्य साकार होत होतं. याक्षणी तो सेवक होता; निरीक्षक होता; पण मनाला भुरळ पाडणारी एक गोष्ट होतीती ही, की तो या नाट्यात सहभागीही होऊ शकत होता. आपलं खरं रूप कोणालाही माहीत नाही अशा भ्रमात या नाटकातली पात्रं वावरत होती.
एखाद्या सपाट पृष्ठभागावर एखादी द्विमित सजीवांची संस्कृती असावीत्यांची दृष्टी आणि त्यांचं ज्ञान त्यांच्या सपाट जगापुरतंच मर्यादित असतं; पण त्रिमित जगातला एखादा निरीक्षक त्याचं भूतभविष्य जाणू शकेलअजयला वाटलं आपलं स्थान असंच काहीसं आहे. या विलक्षण नाटकातल्या पात्रांपेक्षा एक जास्त मिती आपल्याला उपलब्ध आहे आणि त्या ज्ञानापुढे त्यांच्यावर प्रभाव पाडण्याची शक्ती आपल्याला प्राप्त झाली आहे.
गोवर्धनदास खरोखरच या प्रकरणात गुंतलेले असतील तर त्यांना संजीवनीबाईंकडे कोणी एक गंगाधर देशपांडे नावाचा इतिहासकार चरित्र लेखक येऊन गेल्याचं लगेच समजेल. त्यांना अर्थात माहीत असणार, की अशा प्रकारचं कोणतंही काम संस्थानतर्फे कोणावरही सोपवण्यात आलं नाही. म्हणजे हा गंगाधर देशपांडे नकली होतासंजीवनीबाईंच्या घरात प्रवेश मिळवण्यासाठी त्याने तो बहाणा केला होता आणि दोन फोटो घेऊन गेला होतादुसऱ्या दिवशी सकाळी बाकीचे कागद पाहण्यासाठी येणार होताहे उघड होतं की हा देशपांडे खरोखरच सकाळी संजीवनीबाईंच्या घरी गेला तर त्याची काही धडगत नव्हती.
गोवर्धनदासांची माणसं सर्वत्र पेरलेली असणार. हेही समजून चालायला हरकत नाही, की गटणेकडून त्यांना सर्व माहिती समजणार. या संजीवनीबाईंबद्दल एकाएकी उत्पन्न झालेलं कुतूहल त्यांना नक्कीच अस्वस्थ करणार. गटणेकडे त्याचा तो ग्राहक अहवालासाठी आला की त्यालाही धोका होता.
अर्थात अजय संजीवनीबाईंकडे जाणार नव्हता आणि त्या गटणेकडेही जाणार नव्हता. हवी ती माहिती त्याला मिळाली होती.
प्रश्न हा होतात्याने त्या माहितीचा उपयोग करायचा का?

राणीसाहेबांच्या कानावर हे घातलं तर? अजयविषयीचा त्यांचा ग्रह पाहता त्यांचा माहितीवर विश्वास बसेलही; पण मग गोवर्धनदासांशी वागण्यात बदल होईल-आणि त्या चाणाक्ष गोवर्धनदासच्या नजरेतून तो बदल मुळीच सुटणार नाहीमग?
गोवर्धनदास सावध होईल आणि त्याने मनात जर काही कट कारस्थान योजलं असेल तर ते तो लांबणीवर टाकील. आता योगायोगाने अजयला जी माहिती उपलब्ध झाली होती ती मातीमोल होईल आणि जेव्हा काही दिवसांनंतर, गोवर्धनदास काही नवीन कारस्थान रचील (तसा तो रचणारच! इतकी वर्षं जो दबा धरून गुप्त हालचाली करीत आहे तो आपले प्रयत्न कधीच थांबवणार नाही!) तेव्हा अजय इथे नसेल किंवा असला तरी अनभिज्ञ असेल. राणीसाहेबांना या क्षणी काहीही न सांगणंच सर्वोत्तम.
सांगण्यासारखं दुसरं कोणीच नव्हतं. एकाएकी त्याला जाणवलं की, कुमार खऱ्या अर्थाने एकाकी आहे. त्याला कोणीही हितचिंतक नाही. गायत्रीलाही काही सांगण्यात अर्थ नव्हताकारण ती स्वत:ही निदान अजयच्या मते संशयाच्या सावलीत होती.
कुमारला प्रत्यक्ष सांगण्यात अर्थच नव्हता. त्याचा तापट स्वभाव पाहता त्याची प्रतिक्रिया निश्चित अतिरेकी होणारत्यापासून फायदा तर होणार नाहीचमोठा तोटा मात्र होईल.
शेवटी ते विलक्षण सत्य त्याच्यासमोर आलं.
त्याला माहीत असलेलं गुपित त्याने षट्कर्णी केलं तर त्यापासून तोटा होणार होता, कदाचित काहींना धोकाही संभवत होता.

एक पर्यायहे सर्व स्वत:पाशीच ठेवणं.
पण त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला पटत नव्हतं. त्याच्या नजरेसमोर एक कपटी कारस्थान रचलं जात असताना निष्क्रिय राहणं त्याला अशक्य होतं. गोवर्धनदाससंजीवनाबाई-कुणाल यांच्या मनात काहीतरी बेत असलाच पाहिजे. गोवर्धनदासांचा अजय विरोध हा त्याचाच एक भाग असला पाहिजे. कदाचित कुमार व्यसनाधीन होऊन संपूर्णपणे वाहवत जावा अशीही त्यांची इच्छा असेल किंवा मातापुत्रातील बेबनाव वाढत जाऊन त्याचं पर्यवसान एखाद्या भीषण शोकांतिकेत व्हावं असाही त्यांचा प्रयत्न असेल. गायत्रीही कुमारला सावरण्याचा, सुधारण्याचा यत्किंचितही प्रयत्न करीत नव्हती. कुमार होता त्या स्थितीत स्वीकारण्याची आणि मग त्यापासून जमेल तसा स्वार्थ साधून घेण्याची तिची तयारी होती किंवा असावी.
हे सर्व जर टाळायचं असेल तर अजयपुढे एकच पर्याय उरत होता.
स्वत: त्या नाट्यात पदार्पण करणं.
गोवर्धनदास आणि गायत्री आपोआपच त्याचे प्रतिस्पर्धी झाले होते आणि बचावाचा सर्वोतम मार्ग म्हणजे आक्रमण! त्यांचे बेत पक्के शिजण्याच्या आतच, ते जरा बेसावध असतानाच, त्यांना असा धक्का द्यायचा, की काहीतरी अविचारी हालचाल करून ते आपलं खरं रूप उघड करतील.
गोवर्धदास पहिल्या भेटीपासून त्याच्याशी अत्यंत तुच्छतेने वागत होते. त्यांच्या लेखी त्याची किंमत कस्पटासमान होती. याउलट प्रत्यक्ष राणीसाहेब त्याच्याशी किती संयमाने वागल्या होत्या! अजयच्या मानाने त्यांचं स्थान कितीतरी वरचं होतं; पण संपत्तीचा, सत्तेचा गर्व त्यांच्या शब्दाला शिवलासुद्धा नव्हता. त्याच्यावर त्यांनी केवढा विश्वास टाकला होता! राजघराण्यातली गुपितं उघडी केली होतीहजारांनी रुपये त्याच्या हातात दिले होतेगोष्ट योग्य असो वा अयोग्य असोती झाली होती.
त्याच्या मनात एक कठीण निर्धार जन्म घेत होता.
हा कावेबाज, घमेंडखोर, गर्विष्ठ गोवर्धनदास या शालीन, सुसंस्कृत, दु:खी मातेविरुद्ध काही कृष्णकारस्थान रचत असला तर अजय सर्व शक्तिनिशी त्याला विरोध करणार होता.
काय वाटेल ती किंमत द्यावी लागली तरीही.
राणी साहेबांनी त्याच्यावर टाकलेल्या विश्वासाची परतफेड करण्याचा तोच एकमेव मार्ग होता.

***

14.

पाच वाजता तो वर गेला.
कुमार परत आला होता, एवढंच नाही, त्याची वाट पाहत होता. अजय खोलीत येताच कुमार म्हणाला, 'सोपान, चल इस्टेटवर जाऊ या. शिंदेकाकांनाही चार दिवसांत भेटलो नाही.
कुमारमागोमाग अजय खाली आला. गाडीत मागे बसला.

कुमारने काही न बोलता गाडी सुरू केली.
फार्म हाऊससमोर गाडी थांबेपर्यंत काहीही बोलणं झालं नाही. शिंदेकाका व्हरांड्यातच होते. सोपानला कुमारबरोबर पाहताच त्यांच्या चेहऱ्यावर जराशी नाराजी आली. त्याचा अजयला राग आला नाही. स्वामीनिष्ठा आणि इमानी सेवकाला अशा फुकट्या खुशमस्कऱ्याचा राग येणारचशिंदेकाकांच्या मते सोपान असल्या चमच्यांपैकी होता. शिंदेकाका, या सोपानला एक घोडा द्यापाहू काही शिकला आहे की नाहीकाय रे सोपान?' कुमार म्हणाला.
'हो.'
कुमारसाठी एक उमदा घोडा आणि सोपानसाठी त्याचा नेहमीचा जरा मवाळ घोडा, असे दोन घोडे आतून माणूस लगाम धरून घेऊन आला.
'बघू बरंबस.' कुमार म्हणाला.
विशेष प्रयास न पडता अजय घोड्यावर स्वार झाला. लगामाला एक लहानसा हिसका देताच घोड्याचा कँटर सुरू केला. दहा पंधरा सेकंदातच कुमार त्याच्या शेजारून पुढे गेला. जाता जाता तो म्हणाला,
'जरा जोरात घे नापाहू'
घोडा प्रशिक्षित होता. मानेपाशी दोनदा थोपटून 'च्!' करताच त्याने एकदम वेग घेतला. इतक्या वेगाने अजयने आतापर्यंत त्याला कधीच दौडवला नव्हता. त्याच्यावरची मांड टिकवायला अजयला खूपच प्रयास पडले. हे चूक आहे, त्याला वाटलं. कुमारने सांगितलेलं सर्वच काही आचरणात आणायला हवं असं नाही. त्याचं त्याला काही तारतम्य होतं की नाही?
मानेच्या डाव्या बाजूला स्पर्श करीत आणि लगामाला थोडीशी खेच देत अजयने घोड्याचा वेग कमी केला आणि फार्म हाऊससमोर आणून थांबवला. खाली उतरून लगाम मुलाच्या हाती देऊन तो व्हरांड्यात येऊन उभा रहिला. शिंदेकाका तिथेच उभे होते. त्यांच्याकडे वळून अजय म्हणाला, 'शिंदेकाका, मी कधीही घोड्याला असा दौडवत नाही. फक्त मघाशी कुमार म्हणाले जरा जोराने चालव-तेवढ्यापुरता पळवला.'
शिंदेकाकांच्या चेहऱ्यावरची नाराजी जरा कमी झाली. अजयच्या खांद्यावर हात ठेवत ते म्हणाले, 'सोपान, का कुणास ठाऊक; पण मला नाही वाटत तुझ्याकडून छोट्या मालकांना काही धोका आहे किंवा स्वत:च्या फायद्यासाठी तू त्यांची हांजीहांजी करत आहेस. सोपान, छोट्या मालकांना तुझ्यासारखा गडी मिळाला हे फार छान झालं. सोपान, त्यांचं स्वत:कडे लक्ष नसतं.'
'सारं ध्यानात आलं, शिंदेकाका.' अजय म्हणाला.
कुमारने घोडा तुफान वेगाने दौडवीत फार्महाऊसपाशी आणला आणि अगदी शेवटच्या क्षणी लगाम इतक्या जोराने खेचला की ते जनावर मागच्या दोन पायांवर अक्षरश: उभं राहिलं. कुमारच्या अश्वारोहणाच्या कौशल्याबद्दल शंकाच नव्हती. तो सराईतपणे घोड्यावरून खाली उतरला. व्हरांड्यातल्या एका खुर्चीवर कुमार बसताच शिंदेकाकांनी टाळी वाजवली. आतून एक गडी सरबताचा ग्लास घेऊन आला.
त्या दोघांच्यात काही खास बातचीत होणार असली तर आपण तिथे असायला नको असा विचार करून अजय पायऱ्या उतरून खालच्या अंगणात आला आणि फॉर्म हाऊसपासून शे-दीडशे पावलं दूर जाऊन उभा राहिला. शिंदेकाकांना कुमारबद्दल काळजी वाटत होती ही गोष्ट तर उघड होती. गडीमाणसांत त्यांची सतत ऊठबस असल्याने त्यांच्या कानावर काही काही आलेलं असणारच आणि कुमारबद्दल त्यांना वाटणारी काळजी अनाठायी नव्हती ही अजयची खात्री होती.
काही वेळातच एक गडी त्याला बोलवायला आला.
व्हरांड्यात कुमार उभा होता. अजय येताच तो म्हणाला,
'चल खालीशूटिंगमध्ये तुझी काय प्रगती झालीय ते तरी पाहू.'
आतल्या खोलीचं कुलूप कुमारने उघडलं आणि मग आतल्या एका ड्रॉवरमधले दोन रिव्हॉल्व्हर आणि काडतुसांची पेटी घेऊन तो खाली निघाला. त्याच्या मागोमाग अजयही खाली गेला. शूटिंग रेंज जरा काळोखात होती; पण खटाखटा दिवे लावताच लख्ख प्रकाश झाला.
दोघांनीही कमरपट्टे बांधले आणि होस्टरमध्ये पिस्तुले ठेवली.
समोरच्या डमीला गोळी लागताच डमी मागे पडत होती आणि स्प्रिंगने लगोलग परत पहिल्यासारखी वर येऊन समोर स्थिर होत होती.
कुमार थांबला तसा अजय म्हणाला,
'आधी तुम्ही फायर करा, कुमार'

‘नाहीनाहीमला तुझं शूटिंग बघायचं आहे.’
ठराविक जागी अजय उभा राहिलाआणि मग तो कुमारला विसरूनच गेला. त्याचं लक्ष समोरच्या टार्गेटवर संपूर्णपणे एकाग्र झालं होतं.
रिव्हॉल्व्हरची सेफटी ऑफ केलेली होती.
अजयचा हात विजेच्या वेगाने हलला.
डमी खाली गेलीपरत वर आली.
पुन्हा फायर. पुन्हा फायर. पुन्हा फायर.
सहापैकी पाच गोळ्यांनी लक्ष्याचा अचूक वेध घेतला होता.
‘अरे! पाच! पाच! सोपान, कमालच आहे!’ कुमार आश्चर्याने म्हणाला आणि त्याचा आनंदही प्रांजळ होता.
‘कुमार, खोलीतलं ते रिकामं रिव्हॉल्व्हर तुम्ही सरावासाठी मला दिलं होतंमी त्याच्यावर खूप सराव केला आहे. अजय म्हणाला.
‘कमाल आहे! बेस्ट! बेस्ट!’ आणि मग कुमारने सहापैकी सहाही गोळ्या डमीवर मारल्या. आणखी काही वेळ दोघांनी शूटिंगची प्रॅक्टिस केली आणि मग ते वर आले. अजय हलकेच म्हणाला,
‘कुमार, मी आता बसने परत राजवाड्यावर जातो.’
‘मग ठीक आहे.’
पिस्तुलं काचपेटीत ठेवून मग कुमारने कपाटाला कुलूप लावलं. आधी कुमार आणि त्याच्यामागोमाग अजय बाहेर आला. कुमार तिथेच खुर्चीवर बसला.
शिंदेकाका खाली अंगणात दोन घोडे तपासण्यात गर्क झाले होते.
अजयने सरळ बाहेरची वाट धरली.

***

वाटेत बसमध्ये आणि आल्यावर खोलीत त्याच्या डोक्यात सतत हाच विचार चालला होता. काहीतरी करून या कटवाल्या लोकांना त्यांचा हात दाखवायला भाग पाडलं पाहिजे. त्यांना काय हवं होतं? कुमारमध्ये सुधारणा व्हायला नको होती, त्याचेराणीसाहेबांचे संबंध बिघडायला हवे होते आणि गायत्रीचा कुमारशी विवाह व्हायला नको होता. असा विवाह खरोखर झालाच तर ती हुशार आणि महत्त्वाकांक्षी स्त्री सर्वच कारभार ताब्यात घेणार मग तर त्यांना जन्मभरात संधी मिळणार नाही. समजा त्यांची अशी समजूत करून देता आली, की कुमार सुधारणार आहे आणि त्याचा विवाह गायत्रीशी होणार आहेअसं काही झालं तर त्यांच्या सगळ्याच कारस्थानावर पाणी फिरणार होतंमग तरी त्यांना काहीतरी करावंच लागेल!
यात त्याला राणीसाहेबांचं सहकार्य मिळायला हवं होतं; पण त्यांना खरी गोष्ट सांगून चालणार नव्हती. त्यांचा त्याच्यावर किती विश्वास होता? निदान प्रयत्न तरी करून बघायला हरकत नव्हती.
परत आल्यापासून तो खालच्या मजल्यावरच वावरत होता. गड्यांकडे चौकशी केली तेव्हा समजलं की, आज राणीसाहेबांचा कोणताही कार्यक्रम नव्हता. त्या वरच होत्या.
सुदैवाने म्हणा, राणीसाहेब आणि गायत्री मोठ्या जिन्याने खाली येत होत्या. राणीसाहेबांची नजर त्याच्याकडे जाताच त्याने मानेनच ‘हो’ची खूण केली. त्या चाणाक्ष स्त्रीला त्याच्या खुणेचा अर्थ बरोबर समजला. गायत्रीबरोबर त्या पायऱ्या उतरून खाली आल्या आणि मग तिच्याशी अगदी हळू आवाज काहीतरी बोलल्या. मानेनेच हो म्हणत ती पुढे गेली आणि राणीसाहेब अजयकडे आल्या.
अजय हातवारे करीत होता, वरती कुमारच्या खोलीकडे हात दाखवत होता जणूकाही तो कुमारसंबंधातच त्यांना काही सांगत आहे.
प्रत्यक्षात तो म्हणाला, राणीसाहेब, माझी एक विनंती आहे. कृपा करून का, कसं विचारू नका. वेळ आली की मी आपल्याला सर्वांचं स्पष्टीकरण देईन. फक्त एक करता आलं तर पाहाजमलं तर आज, नाहीतर उद्या सकाळी त्रिपाठींना एवढं सांगाकुमारचा आणि गायत्रीदेवींचा विवाह होणार आहे आणि उच्च शिक्षणासाठी कुमार परदेशात जाणार आहेत. एवढंच. या गोष्टी अशक्य तर नाहीतचउलट सर्वजण त्याच बातमीची अपेक्षा करीत आहेत. दुसरीही अगदी नैसर्गिक आहे. कृपया एवढं कराल का?
पाच-सात सेकंद त्या त्याच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहत उभ्या राहिल्या. कदाचित त्याचा पारदर्शक प्रांजळपणा त्यांना त्याच्या चेहऱ्यावर दिसला असावा. काहीही असो, त्यांनी आपला निर्णय घेतला.
‘ठीक आहे. उद्या सकाळी त्यांना सांगते.’
दोन्ही हातांनी नमस्कार करून, वाकून, अजयने त्यांचा निरोप घेतला आणि तो भराभर चालत निघून गेला.

***

नेहमीप्रमाणेच रात्री बारानंतर कुमार परत आला. दारूच्या नशेत होता. त्याला कसेतरी आधार देत अजयने दिवाणखान्यात आणलं. पंख्याच्या गार वाऱ्याखाली तो सोफ्यावर बसला, तसाच कलंडला आणि झोपी गेला. त्याची झोप (किंवा गुंगी म्हणा) इतकी गाढ होती की, त्याला जाग आणणं जवळजवळ अशक्यच होतं आणि आणखी दोनचार गड्यांना जागं करून इथे आणून सगळ्यांनी मिळून त्याला वर नेणं म्हणजे त्याची शोभाच करणं होतं. शेवटी अजयने वरून कुमारच्या खोलीतून दोनतीन उशा, रजया, बँकेट असं आणलं. ऊशी कुमारच्या डोक्याखाली सारली, रजई त्याच्या अंगावर पसरली आणि मग तो स्वत:ही तिथल्याच दुसऱ्या एका कोचावर ब्लँकेट घेऊन झोपला. तशी झोप रात्रभर चाळवली जातच होती. पहाटेसच जरावेळ डोळा लागला. सकाळी सातच्या सुमारास मात्र त्याने स्वयंपाकघरातून कॉफी आणली. कुमारला हलवून हलवून जागा केला, त्याला कॉफी प्यायला लावली. कॉफीने तो जरासा शुद्धीवर आला.

'रात्रभर मी इथेच होतो का रे सोपान?'

'हो.'

'आणि तू?'

अजयने समोरच्या सोफ्याकडे बोट केलं.

स्वत:शीच मान हलवत कुमार उठला आणि जिन्याने सरळ वर त्याच्या खोलीकडे निघून गेला.

रजया, ब्लँकेट, उशा गोळा करता करता अजयच्या मनात विचार येत होताआज राणीसाहेब, त्या गोवर्धनदास त्रिपाठींना ती बातमी सांगतील आणि त्याची अगदी पक्की खात्री होती, की सध्या सर्वत्र जी एक फसवी शांतता आहे ती भंग पावेल.

घटना कोणतं वळण घेतात हे भविष्यात होतं.

सर्व शक्यतांसाठी त्याला तयार राहावं लागणार होतं.

कारण राणीसाहेबांतर्फे गोवर्धनदासांच्या कानावर ती बातमी त्याच्याच सांगण्यावरून घातली जाणार होती तेव्हा पुढची सर्व जबाबदारी त्याच्यावरच होती. कोणी त्याच्यावर असाही आरोप केला असता की, नसत्या गोष्टीत तो ढवळाढवळ करीत आहे या राजेशाही लोकांच्या भवितव्याशी त्याला काय देणं घेणं होतं?

काही क्षण त्याचं मन या विचारापाशी आलं आणि मग जरा आश्चर्याने त्याला वाटलंराणीसाहेब आणि कुमार यांना आपण परके मानतच नाही. ना नात्यागोत्याचे, ना रक्ताचे; पण त्या दोघांबद्दल मनात एक आपुलकी निर्माण झाली होती. त्याच्या डोळ्यांसमोर त्यांच्याविरुद्ध कट रचला जात असताना तो निष्क्रिय राहूच शकत नव्हता.

या प्रकरणास सुरुवात त्याने केली होती नामग ते सारे निस्तरण्याचं कामही तोच करणार होता. कोणत्याही संकटांना न जुमानता.

***

उशारजयाब्लँकेट घेऊन अजय वर आला. खोलीच्या दारापाशीच भिंतीला टेकून कुमार उभा होता. अर्थात तो किल्ली न्यायला विसरला होता.

अजयने दार उघडलं आणि कुमारच्या मागोमाग तो आत आला.

कुमार तसाच बाहेरच्या खोलीत सोफ्यावर बसून राहिला.

अजय आतल्या खोलीत आवराआवर करत होता.

'सोपान! जरा बाहेर ये पाहू!' कुमार म्हणाला.

अजय बाहेर येऊन त्याच्यासमोर उभा राहिला.

'सोपान, तुझी नोकरी कशी आहे?'

'म्हणजे कसं म्हणता, कुमार?

'म्हणजे असंतू राजवाड्यातच नोकरीसाठी आला आहेस की माझ्याकडे कामासाठी राहिला आहेस?'

'राणीसाहेबांनी मला इकडे कामासाठी पाठवलं.'

'च्! मला असं म्हणायचंयसमजा मी म्हटलं माझ्याबरोबर आणखी कोठे चल, तर येशील का, की राजवाड्यातच नोकरीसाठी राहशील?'

'अजून मला समजलं नाही, कुमार.'

'सोपानहे माझं काही खरं नाहीहे रोज रोज क्लबमध्ये जाणंया पार्ट्याहे पिकनिकहे काही खरं नाही-'

'कुमार, मी तुमच्याकडचा चाकरया गोष्टी तुम्ही माझ्याजवळ बोलायला नकोत.'

‘अरे दुसरं कोणी नाही ना! दुसरं कोणी असतं तर कशाला तुला सांगत बसलो असतो?’
‘राणीसाहेब आहेतगायत्रीबाईसाहेब आहेत’
ती नावं कुमारने हाताने हवेतल्या हवेत दूर सरकावली.
‘माझा विचार आहे की काही दिवसांसाठी कोठेतरी बाहेर जावं.’
अजयला मनोमन वाटलंदैवही आपल्याला साथ देत आहे तर!
‘समजा मी ठरवलं, तर तू माझ्याबरोबर येशील का?’
‘कुमार, राणीसाहेबांची परवानगी हवी. माझी कोठेही यायची तयारी आहेआणि मला नाही वाटत त्या परवानगी नाकारतील.’
‘पण सोपान! हे कुठे बोलू नकोस बरं का!’
‘का बोलू नको, कुमार? समजा कोठे जायची तुमची इच्छा असली, तर तुमचे तुम्ही मुखत्यार नाही का?’
‘पण विचारलं, कोठे? कशासाठी तर मग?’
‘आता पुढे शिकायला लोक नाही का मोठमोठ्या शहरात जातात? परदेशीसुद्धा जात नाहीत का? समजा तसं सांगितलंत तर काय हरकत आहे? मी तर म्हणेनसर्वांना सांगाचएवढ्यात जायचा विचार आहे.’
कुमारचा आणखी काही बोलण्याचा विचार दिसत नाही असं पाहून अजय तिथून सरळ खाली आला. कुमार त्याच्या मित्रांना सांगेल किंवा सांगणारही नाही; पण अजय स्वत: मात्र खालच्या सर्व नोकरवर्गात ही बातमी हळूहळू पसरवणारच होता. राणीसाहेब गोवर्धनदास सांगणारचशिवाय खाली त्याचे जे कोणी खबरे असतील त्यांच्याकडूनही हे त्याच्यापर्यंत जाणारच.

***

त्याचे स्वत:चे सकाळचे सर्व कार्यक्रम आटोपल्यावर तो वर गेला. कुमारची इच्छा असली तर तो त्याच्यासाठी नाश्ता नेणार होता.
पण कुमारचा खोलीत पत्ताच नव्हता. म्हणजे आता बारा वाजेपर्यंत तरी अजयमागे काही काम नव्हतं.
त्याला असं समजून चालायला हवं, की गायत्रीकुमारचा विवाह आणि कुमारचं राजवाडा सोडून जाणं या दोन बातम्या योग्य ठिकाणी पोहोचल्या की, घटना घडायला लागतील. राणीसाहेब आणि कुमार यांच्याविरुद्ध कोणीतरी मोठं कारस्थान शिजवत आहे ही त्याची कल्पना खरी ठरली तर मग आपोआपच निष्कर्ष निघत होता की, त्या लोकांवर वेळेचं दडपण येणारत्यांना हवा तितका अवधी मिळणार नाहीघाई करावी लागणार.
निदान त्याला स्वत:ला असं गृहीत धरून चालायला हवं, की ते घाई करणार आणि त्यासाठी त्याला सतत तयार राहावं लागणार होतं.
एवीतेवी तो या जिवंत जीवननाट्यात प्रवेश करणारच होतामग ज्या भूमिकेत तो प्रवेश करणार होता ती संपूर्ण साकार करण्याची काळजी त्याला घ्यावीच लागणार होती आणि इतके दिवस मनाच्या तळाशी खोलवर दडपून ठेवलेली महत्त्वाकांक्षा, जी त्याने आजवर स्वत:च्या मन:चक्षूसमोरसुद्धा आणली नव्हती, ती आता पृष्ठावर आली होती.
एखाद्या थरारक नाट्यात नायक होण्याची महत्त्वाकांक्षा!
संकटात सापडलेल्या सुंदरीला सोडवण्याचं साहस!
क्रूर, कपटी खलनायकाचा कपाळमोक्ष!
स्कारलेट पिंपरनेल. सायमन टेम्प्लरसेंट. ब्लँक शर्ट. नॉर्मन कॉंक्वेस्टसेक्सस्टन ब्लेक. झुंजार. काळा पहाड.
त्यांच्या कथांची कितीतरी पारायणं झाली होती. किशोरावस्थेत आणि पौगंडावस्थेत कितीतरी दिवास्वप्नांत तो रममाण झाला होता आणि मग ती दिवास्वप्नं मनात खोल, अगदी खोल गाडून टाकली होती.
आणि आता एकाएकी प्रत्यक्ष तीच भूमिका वठवण्याच्या संधीची शक्यता समोर आली होती.
मानसिक तयारी तर होतीच.
इतरही तयारी ठेवणार होता. त्याचे जे नायक होते त्यांच्या मनगटाच्या मागे पट्ट्यात चाकू असायचे. तोही एक अतिशय पातळ चाकू जवळ ठेवणार होता; पण तो पायाच्या नडगीवर नीकॅप ओढून तिच्या आत. तो पन्नाससाठ फूट लांबीची अतिशय पातळ; पण बळकट नायलॉनची दोरी कमरेभोवती गुंडाळून ठेवणार होता. आणखीही काही काही सुचलं तर.
हा वेडेपणाही असेल कदाचित; पण हा वेडेपणा मान अभिमानाने ताठ करणारा होता. हा वेडेपणा नाडीची दौड वाढवणारा होता. हा वेडेपणा शरीरावर रोमांच उभे करणारा होता आणि हे सर्व केवळ त्याच्या एकट्यासाठी होतंकेवळ त्याच्या एकट्यासाठी!

आवश्यक तो सर्व खरेदी करून तो बाराच्या सुमारास राजवाड्यावर परत आला. राणीसाहेबांनी त्या गोवर्धनदासला ते सांगितलं असणार अशी त्याची खात्री होती. जणूकाही फटाक्याची वात शिलगावली जाणार होती आणि त्याचा कयास खरा असेल तर लवकरच धडाका उडणार होता.

***

अजय वर कुमारच्या खोलीतच त्याची वाट पाहत बसून होता.
साडेबाराएकच्या सुमारास कुमार परत आला.
'अरे! तू इथे काय करतो आहेस?' अजयला पाहताच कुमारने आश्चर्याने विचारलं.
'दुसरीकडे कोठे असणार? इथेच तर माझं काम नाही का?
अजय म्हणाला, 'आणि तुमच्या जेवणाची व्यवस्था करायचीच आहे.'
'आज खाली मातोश्रींबरोबरच जेवण घ्यावं म्हणतो.'
'मी त्यांना निरोप देऊ?'
'हो.'
'कुमार, एक सांगू का ? राग मानणार नाही ना?'
'सांग तर खरं.'
'तुमचा काही दिवस बाहेर जायचा विचार राणीसाहेबांना सांगितलात तर बरं होईल.'
'असं म्हणतोस? आणि कुठे, केव्हा विचारलं तर?'
'मनात विचार आहे एवढंच सांगितलंत तरी पुरे. म्हणजे मग मी तुमच्याबरोबर जाण्याचा त्यांच्यापाशी शब्द काढीन.'
'ठीक आहे. जाजादे निरोप.'
राणीसाहेबांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी आता वेगळी सबब काढायला नको होती. अजय खाली आला.
पाऊणच्या सुमारास राणीसाहेब जेवणासाठी खाली आल्या.
त्या डायनिंग हॉलमध्ये येताच अजय त्यांच्याजवळ गेला.
'कुमार आज खालीच जेवायला येताहेत.'
'असं? छान!' राणीसाहेब म्हणाल्या आणि मग अगदी हलकेच म्हणाल्या, गोवर्धनदासांना ती बातमी दिली.'
अजय तिथून निघाला तो सरळ त्याच्या खोलीत आला.
आता दुपारी चारपर्यंत तो रिकामाच होता. कुमारचं काही काम असेल तर निरोप येईलतोपर्यंत त्याचा तो स्वतंत्र होता.
स्वयंपाकघरात एकच्या सुमारास तो जेवायला गेला. आज जेधे हजर होता. ती बातमी पसरवायला ही नामी संधी आहे, अजयला वाटलं. आपली थाळी घेऊन तो मुद्दाम जेधेच्या शेजारी येऊन बसला.
'तुम्ही म्हणत होतात ना मोठी आरामाची नोकरी?' अजय म्हणाला. 'आता आरामाचे फार दिवस नाही राहिलेत.'
'फार दिवस नाही राहिलेत म्हणजे?' जेधेने विचारलं.
'म्हणजे आता आमचे छोटे मालक काही दिवसांसाठीकाही महिन्यांसाठी म्हणादूर जाणार आहेत. म्हणजे संपली का नाही आरामाची नोकरी? लागणार की नाही आता बारा तास राबावं?'
पण जेधेचं लक्ष अजयच्या पहिल्या शब्दांवरच होतं.
'छोटे मालक जाणार म्हणता? केव्हा? कोठे?'
'अहो आता आम्हा गडीमाणसांना का हे माहीत असणार? जे कानावर आलं ते तुम्हाला सांगितलं.'
जेधेची जागच्या जागी चुळबूळ चालली होती. बहुतेक त्याला कोणाकडे तरी ही महत्त्वाची बातमी पोहोचती करायची असणार.

***

दुपारभर तो त्याच्या खोलीतच होता.
पाच वाजता त्याने वर कुमारच्या खोलीवर एक चक्कर टाकली.
अपेक्षेप्रमाणे कुमार कोठेतरी बाहेर गेला होता.
अजयने ठरवलं होतं की, सर्व संध्याकाळभर राजवाड्यावरच हजर राहायचं. लागलीच काही होईल अशी त्याची अपेक्षा नव्हती; पण आता तो प्रत्येक क्षणी तयार राहणार होता.
त्याची खात्री होतीत्याच्या नजरेआड काही ना काही हालचाली होत आहेत. तसा पुरावा काहीच नव्हता; पण

मनोमन खात्री होती, की त्याचा अंदाज चुकलेला नाही.
दाराला आतून कडी घालून तो कुमारच्या आवाजाच्या काही काही टेप ऐकत होता. त्याची खात्री झाली होती की, सतत सरावाने त्याला कुमारच्या आवाजाच्या लहानसहान लकबी पूर्णपणे हस्तगत झाल्या आहेत. अगदी अगदी जवळच्याला सुद्धा शंका येऊ नये इतका हुबेहूब आवाज काढण्याचं कसब हस्तगत झालं होतं.
आठ वाजता खाली जाऊन तो जेवण करून परत वर आला.
बाहेरच्या खोलीतच सोफ्यावर तो जरासा आडवा झाला.
त्याच्या नकळत त्याला डुलकी लागली असली पाहिजे.
कसल्यातरी आवाजाने तो एकदम दचकून जागा झाला. हो, खाली कसलातरी आवाज येत होता खरा.
तो घाईघाईने खाली आला.
हॉलमध्ये जराशी गडबड चालली होती.
'हे आले पहा सोपानराव!' कुणीतरी म्हणालं, 'आता पाहू दे त्यांनाच!'
'काय आहे?' विचारत अजय पुढे झाला.
बाहेरच्या पायरीवरच एक तरुण स्त्री उभी होती आणि पायऱ्यापाशी कुमारची गाडी लावलेली होती; पण कुमार डावीकडच्या सीटवर बसला होता बसला होता म्हणण्यापेक्षा कलंडला होता.
हॉलमधल्या दोघांना अजय म्हणाला, 'चला, आपण कुमारना वर आणूयात्यांच्या मदतीने अजयने कुमारला गाडीतून खाली घेतलं आणि अर्धवट उचलूनच हॉलमध्ये आणून सोफ्यावर झोपवलं. अजय म्हणाला,
'तुम्ही आता गेलात तरी चालेलमी पाहतो.'
वास्तविक त्यांची उत्सुकता जागी झाली होती. काहीतरी लफडं दिसलं तर त्यावर चघळून चर्चा करता आली असती; पण अजयची कुमारशी जवळीक आता सर्वांना माहीत झाली होती. जरा नाराजीनेच, मागे पाहत पाहत ते दोघे गेले. अजय दारापाशी गेला. ती तरुणी अजून तिथेच पायरीवर उभी होती. अजय तिच्यापाशी जाऊन म्हणाला,
'जरा आत या ना'
मान हलवत ती तिथेच उभी राहून म्हणाली,
'नाही, आत येत नाही. कुमार ठीक आहेत ना?'
'हो, ठीक आहेत; पण गाडी कुणी आणली?'
'मीच आणली.'
'तुम्ही? गाडी चालवता येते?'
'हो.' मग एकदम त्याच्याकडे वळून ती म्हणाली, 'पण कुणाला हे कळू देऊ नका की गाडी मी आणली.'
'मग आता त्या दोघा गड्यांनी पाहिलं की?'
'त्यांचं कुठे गाडीकडे लक्ष होतं? ते तर नुसते माझ्याकडेच पाहत उभे होते!' तिच्या आवाजात राग होता, तुच्छता होती. अजय त्या दोघांना खासच दोष देऊ शकला नसताकारण पाहत राहण्यासारखं तिचं रूप देखणं होतंच.' जरासा हसत अजय म्हणाला,
'त्याची तर तुम्हाला खासच सवय असणार!'
त्याच्या शब्दांचा तिला राग आला नाही. अंगावरची शाल सावरत ती म्हणाली, 'कुमार ठीक आहेत ना? मग मी जाते.'
'इतक्या रात्री येता काय, जाता कायनाव तरी सांगा.'
'लिली.'
एवढ्यात त्याने हे नाव कुठे ऐकलं होतं?
कुमारला ती घेऊन आली...
कुमार क्लबमध्ये जाणार...
हो! ती डान्सर ! नव्याने कामाला आलेली!
'कुमारच्या क्लबमध्ये तुम्ही असता का?'
'हो, पण तुम्हाला कसं माहीत?'
'कुमारांनीच मला सांगितलं आहे.'
'मी आणलं एवढं सांगू नका. मी जाते.'
'एक मिनिट थांबा. कुमारांना रात्रीची ही क्लबची सवयच आहे. जगजाहीर आहे की ते रोज रात्री असेच परत

येतात. स्वत: गाडी चालवत येतात, नाहीतर कोणीतरी आणून सोडतं.'
इकडे तिकडे पाहत लिली हलक्या आवाजात म्हणाली,
'माझ्या कानांवर काही काही आलं होतं. हे कुमार माझ्याशी फार चांगले वागतात. त्यांच्या भल्यासाठीच त्यांना इथे आणून सोडलं आहे. कोणाच्या कानावर गेलं तर माझी काही धडगत नाही. तेव्हा खरंच कुणाला सांगू नका. मी जाते.'
तो काही बोलायच्या आत ती घाईघाईने निघून गेलीसुद्धा.
स्वत:शीच विचार करीत तो हॉलमध्ये आला.
लिलीचं नाव कुमारने त्रिपाठींच्या संदर्भात घेतलं होतं. आज सकाळीच त्यांना कुमारगायत्रीच्या विवाहाची आणि कुमार बाहेर जाण्याची बातमी कळलेली होती. ही लिली घाबरली होती. कारण त्रिपाठी हे काय प्रकरण आहे हे तिला चांगलं माहीत होतं. ती भीत होती ती त्रिपाठींनाच. म्हणजे त्रिपाठी आणि कुमार यांच्या संदर्भात काहीतरी तिच्या कानांवर आलेलं असणार.
कुमारच्या जिवाला काहीतरी धोका आहे हे तिला कळलं असावं. मग इथेही उघड्यावर त्यांना असंच झोपू देणंही सुरक्षित नव्हतं. इतर कोणाला बोलवायची तसदी न घेता त्याने एकट्यानेच कुमारला उभं केलं, त्याचा एक हात आपल्या मानेभोवती टाकला, एका हाताने खांदा आणि दुसऱ्या हाताने कमरेला आधार देत त्याने कुमारला अर्धवट ओढत, अर्धवट चालवत कसं तरी जिन्यावरून वर नेलं, त्याच्या खोलीत नेलं आणि त्याला तसाच गादीवर झोपवला. त्याच्या अंगावर एक पातळ शाल पसरली. खोलीचं दार लावण्यासाठी तो बाहेर आला.
फोनची घंटा खणखणली. अजयने फोन उचलून कानाला लावला.
'हॅलो?' तो फोनमध्ये म्हणाला.
'कुमार आहेत का ?' आवाज खर्जातला होता, मग्रूर होता.
'ते आताच येऊन झोपलेत. मी सोपान आहे, त्यांचा चाकर.'
'मग त्यांना उठव! जा ! त्यांना फोनवर आण!'
'पण कुमार आता आताच...'
'चूप! त्यांना हलवून जागं कर ! सांग महत्त्वाचं काम आहे!'
अजय अतिशय शीघ्र गतीने विचार करत होता. लिलीला जे काही अर्धवट समजलं होतं त्याचाच हा पुढचा भाग आहे.
'आणतो, जरा थांबा.'
त्याने फोन खाली ठेवला. बाहेरच्या दाराला आतून बोल्ट लावला. आत डोकावून पाहिलं. कुमार अगदी गाढ झोपेत होता.
पुन्हा तो फोनपाशी आला.
मग त्याने आपला निर्णय घेतला.
फोन उचलून कानाला लावला. कुमारच्या आवाजाची नक्कल करीत तो म्हणाला, 'हॅलो?' मग त्याने एक मोठी जांभई दिली.
'कुमार का?' तोच तो मग्रूर आवाज.
'फोन करायची ही काय वेळ'
'चूप बसाआणि ऐकामहत्त्वाचं आहेएकदाच सांगणार आहेनीट ऐकागायत्री माझ्या ताब्यात आहेगायत्री माझ्या ताब्यात आहेआता अकरा वाजले आहेतबारा वाजेपर्यंत एकट्याने तोफखान्यावर या-बारा वाजेपर्यंत एकट्याने तोफखान्यावर या- एकट्याने- बारा वाजेपर्यंतच वाट पाहणार आहेएकट्याने याआमचं वरून लक्ष आहेबारा वाजेपर्यंत आला नाहीत तर मग गायत्रीचं नखही पुन्हा दिसणार नाही.'
खट् आवाज करून फोन बंद झाला.

***

15.

असं काहीतरी होणार ही अजयची अर्धवट अपेक्षा होतीच. फोन खाली ठेवता ठेवता पुढचा विचारही मनात सुरू झाला होता. तिथल्याच एका डायरीवर राणीसाहेबांच्या खाजगी फोनचा नंबर होता. तो नंबर अजयने फिरवला. मिनिटाभरात फोनवर स्वत: राणीसाहेबच आल्या.

‘राणीसाहेब, मी सोपान आहे. भलत्यावेळी जाग आणली त्याबद्दल माफ. करा. आपण कुमारांच्या खोलीत येऊ शकाल का? अतिशय महत्त्वाचं काम आहे. शक्य तितक्या लवकर या.’
राणीसाहेबांनी फोन खाली ठेवला. मोठी चाणाक्ष स्त्री खरी!
त्या यायच्या आत काही काही गोष्टी करायच्या होत्याज्या त्यांना न दिसणं आणि न कळणंच चांगलं. डाव्या नडगीला त्याने घट्ट नीकॅप चढवली आणि त्या नीकॅपमध्ये अतिशय पातळ, अतिशय तीक्ष्ण, अत्यंत मुलायम चामड्याच्या केसमध्ये असलेला पाच इंची चाकू खोचला. उजव्या नडगीला तशीच नीकॅप चढवली आणि कुमारच्या कपाटातल्या ड्रॉवरमधून पिस्तुलाची बारा काडतुसं ओळीने त्या नीकॅपमध्ये खोचली. मग त्याने एक गडद रंगाचा मॅनिला आणि जराशी सैलसर पँट काढून ठेवली.
तेव्हा दारावर बारीक टकटक झाली.
अजयने दार उघडलं. राणीसाहेब खोलीत आल्या आणि आपल्यामागे त्यांनी दार लोटून ठेवलं.
‘भलत्या वेळी बोलवावं लागलं त्याबद्दल माफ करा’
‘काहीतरी महत्त्वाचं असल्याखेरीज तू असा बोलावणारच नाहीस.’ एका खुर्चीत बसत राणीसाहेब म्हणाल्या.
‘सकाळी आपण गोवर्धनदासना ते सांगितलंत?’
‘हो. त्यांना जरा नवल वाटलेलं दिसलं. वास्तविक ही गोष्ट आज कितीतरी दिवस सर्वच गृहीत धरून चालत आहेत.’
‘कदाचित त्यांना ते एवढ्यात व्हायला नको असेल.’
‘म्हणजे?’
‘राणीसाहेब, मला माहीत असलेलं सर्वकाही मी आपल्याला आधीच सांगितलं नाही; पण त्याला एक कारण होतं. गोवर्धनदासांचा या प्रकरणात संबंध आहे आणि ही गोष्ट आपल्याला समजली असती तर त्यांच्याशी बोलताना आपल्याला ती लपवणं फार कठीण गेलं असतं आणि त्या चाणाक्ष माणसाला काहीतरी संशय आला असता.
‘राणीसाहेब, ही माहिती मला कशी आणि केव्हा मिळाली याच्या तपशिलात मी आता जात नाही. तेवढा वेळ नाही. ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटणार आहे. कदाचित विश्वासही बसणार नाही. या संजीवनीबाई माने आहेत ना? गादीवर हक्क सांगणारा त्यांचा मुलगा कुणालत्याचे वडील कोण आहेत, माहिती आहे का? स्वत: गोवर्धनदास त्रिपाठीच! या साऱ्या कारस्थानामागे तेच आहेत. गायत्रीदेवी आणि कुमार यांचा विवाह त्यांना व्हायला नको आहे. कुमार सुधारायला नको आहेत. कुमारचे आणि तुमचे संबंध बिघडायला हवे आहेत.
‘गायत्रीकुमार यांचा विवाह होणार आणि कुमार काही दिवस बाहेर जाणारदोन्ही गोष्टी झाल्या तर त्यांच्या सर्व कटावर पाणी पडणार होतं. ते काहीतरी करणार अशी माझी अपेक्षाच होती. तशा एक नाही, तीन गोष्टी घडल्या आहेत. कुमार ज्या क्लबमध्ये जातात तिथेच लिली नावाची नवीन डान्सर आली आहे. कदाचित गोवर्धनदासांच्याच सूचनेवरून असेलती कुमारशी मुद्दाम सलगी वाढवत होती; पण कुमारचा स्वभाव दिलदार आणि खुला आहे. कुमारना आज काहीतरी धोका आहे असं तिच्या कानावर आलंरात्री दहालाच तिने कुमारला त्याच्याच गाडीत घालून इथे आणून सोडलंमी तिच्याशी चार शब्द बोललोनिदान या बाबतीत तरी तिचा काही स्वार्थ नव्हता अशी माझी खात्री झाली.
‘पंधरा मिनिटांपूर्वीच इथे, या नंबरवर फोन आला. हा खाजगी नंबर आहे. अगदी खास लोकांनाच तो माहीत असणार, नाही का? यावरून काय समजायचं ते समजा. फोनवरचा आवाज मग्रूर होता. आधी मी सांगितलं, सोपान आहे, कुमार झोपले आहेत; पण त्याने मात्र फर्मावलं की आताच्या आता त्यांना जागं करून आण. अर्थात कुमार आता काहीच समजण्याच्या अवस्थेत नाहीत. तेव्हा जरा वेळाने मीच फोनवर बोललो; पण कुमारांच्या आवाजात आणि त्याने फोनवर काय सुनावलं माहीत आहे?
‘तो म्हणालागायत्री आमच्या ताब्यात आहे. तुम्ही स्वत: अगदी एकट्याने रात्री बारा वाजेपर्यंत तोफखान्यावर या. बरोबर कोणालाही आणू नका. आम्ही वरून लक्ष ठेवून आहेत. बारा वाजेपर्यंत आला नाहीत तर मागाहून तुम्हाला गायत्रीचं नखही दिसणार नाही आणि एवढं बोलून होताच त्याने फोन बंद केला.’
‘अगंबाई!’ तोंडावर हात ठेवत राणीसाहेब म्हणाल्या.
‘राणीसाहेब, कुमारची भूमिका वठवण्यासाठी तुम्ही माझी निवड केली होतीत ना? मग तुम्ही सोपवलेलं कामच मी करणार आहेकुमार म्हणून मीच तोफखान्यावर जाणार आहे.’
‘एकट्याने?’
‘हो एकट्याने जायला हवं. गायत्रीदेवींना काहीही अपाय होता उपयोगी नाही. माझी तुम्हाला एवढीच विनंती

आहेइथे कुमारांकडे लक्ष राहू द्या आणि मला दोनअडीच तास द्या. मग रात्री अडीचनंतर तुमच्या माणसांना तोफखान्याला वेढा घालू द्यात. मग कोणाला बाहेर पडू देऊ नका'
'पण अजय! तू एकट्यानेच काय करू शकणार आहेस?'
'मी प्रयत्न तर करणार आहे, राणीसाहेब. मला सुयश चिंता.'

***

राणीसाहेब बाहेरच्या खोलीत बसून होत्या.
आत अजयने कपडे बदलले. कमरेला कमरपट्टा बांधला. होस्टरमध्ये रिकामं पिस्तूल ठेवलं. ड्रॉवरमधली काही रक्कम खिशात ठेवली. मग तिथल्याच गाडीच्या किल्ल्या घेऊन तो बाहेरच्या खोलीत आला.
'अगंबाई! कुमार!' राणीसाहेब एकदम म्हणाल्या, आणि मग खरा प्रकार ध्यानात येऊन त्या परत खुर्चीत बसल्या.
कपाटात व्हिस्कीची बाटली होती ती अजयने बरोबर घेतली आणि मग खाली वाकून राणीसाहेबांच्या पायांना हात लावीत तो म्हणाला, 'राणीसाहेब, तुमच्या सुपुत्राच्याच नावाने, त्यांचंच कर्तव्य पार पाडण्यासाठी मी जात आहेमला यशाचा आशीर्वाद द्या.
त्यांनी क्षणभर त्याच्या मस्तकावर आपला हात टेकवला.
आणि मग अजय खोलीबाहेर पडला.

***

आता बुजरेपणा आणि अडखळणं, सारं काही मागे राहिलं होतं.
भन्नाटातल्या भन्नाट अशा स्वप्न प्रवासावर तो निघाला होता.
विश्वासच न बसण्यासारखी घटना.
खरोखरच एक सुंदरी संकटात सापडली होती.
खरोखरच क्रूर, दुष्ट अशांच्या हाती ती सापडली होती.
आणि अंगावर शस्त्रे, मनात आशा आणि ओठांवर प्रार्थना घेऊन तो खरोखरच तिची सुटका करायला निघाला होता.
यशाची शंका होती, अपयशाची भीती होती
पण पूर्वीही कित्येक असे संघर्षाला सामोरे गेले होते
सर्वांना यशाची खात्री थोडीच होती?
आनंद आणि श्रेय प्रयत्नांना होतं, यशापयशाला नव्हतं.
महिन्याभरापूर्वी तो त्याच्या टीचभर खोलीत आरशासमोर उभा राहून मुद्राभिनय करत होता, लांब लांब स्वगतं उच्चारत होता.
स्वगतात भावनांना आव्हान होतं, धारदार शब्दांची उधळण होती, उपमाउपेक्षांची खैरात होती.
प्रेक्षकांच्या औटघटकेच्या मनोरंजनासाठी!
वेळ संपली की अंगावरचे कपडे उतरवून ठेवावेत, सर्वकाही विसरून जावंकारण बोलून चालून शेवटी ते एक नाटकच!
त्यावेळी त्याला कल्पना तरी होती का, असं एक थरारक नाट्य प्रत्यक्ष त्याच्या जीवनात येणार आहे? पुढच्या दोन-तीन तासांत अक्षरश: काहीही होऊ शकणार होतं आणि त्याला भीती वाटत नव्हती, सुरक्षिततेची काळजी नव्हतीमनावर साहसाची एक धुंदी चढली होतीसारं शरीर अपेक्षेच्या आचेवर धरलं गेलं होतं.

***

दाराबाहेर पडताच अजयने कुमारच्या भूमिकेत प्रवेश केला. तशीच हालचाल, तसंच चालणं.
मोठ्या दारावर पहारेकरी पेंगा खात होता.
अजयच्या बुटांचा आवाज होताच तो एकदम जागा झाला.
अजयला पाहताच तो ताठ उभा राहिला.
त्याच्याकडे वळूनही न पाहता अजय पायऱ्या उतरून खाली गेला, गाडीचं दार उघडून आत बसला, हातातली व्हिस्कीची बाटली शेजारच्या सीटवर ठेवली आणि दार लावून घेतलं.
किल्ली फिरवताच गाडी सुरू झाली.
गाडी वळून फाटकाबाहेर आली, रस्त्याला लागली.
रहदारी तर नव्हतीच; पण बाजाररोडच्या चौकात पोलिसांची गस्तीची गाडी उभी होती. इन्स्पेक्टर आणि दोन

कॉन्स्टेबल जोपशेजारी उभे होते. अजयची गाडी येताना पाहून इन्स्पेक्टर पुढे रस्त्यात आले आणि एक हात वर करून त्यांनी शिटी फुंकली.
वेग कमी करून अजयने गाडी त्यांच्याजवळ उभी केली.
'साहेब, जरा खाली उतरता का?' इन्स्पेक्टरनी विचारलंशब्द वाटायला अदबीचे; पण त्यामागे आज्ञा होती.
गाडी तशीच चालू ठेवून अजय खाली उतरला आणि ताठ उभा राहिला आणि मग जरा पुढे वाकून म्हणाला,
'तुम्ही मला ओळखलेले दिसत नाही, इन्स्पेक्टर.'
कॉन्स्टेबल पुढे आला आणि इन्स्पेक्टरांच्या कानात काहीतरी बोलला.
'अरे! कुमारसाहेब!' इन्स्पेक्टर मागे होत सलाम ठोकत म्हणाले. 'मला माफ करां हंआधी ओळखलंच नाही मी तुम्हालामाफ कराजाऊ शकता आपण'एक हात वर करून त्यांचा निरोप घेत अजय गाडीत बसला आणि गाडी सुरू करून सावकाश पुढे निघाला. ते काहीक्षण त्याची नाडी जोरात दौडायला लागली होती.
जणूकाही या एका लहानशा घटनेने सत्याची प्रखर अशी प्रचीती आली होती. जणूकाही त्याने एक लक्ष्मणरेखा ओलांडली होती आणि आता मागे फिरणं अशक्य झालं होतं. आता तर त्याला तोफखान्यावर जावंच लागणार होतं. तिथे काय परिस्थिती आहे याची त्याला काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे आधी काहीच ठरवणं अशक्य होतं.
त्याने एक केलं. तोफखान्याच्या आधीच्या चौकात गाडी थांबवली. बाटलीतली थोडी व्हिस्की शर्टच्या पुढच्या भागावर उडवली; रुमालावर थोडीशी ओतली, आणि बाकीची गाडीबाहेर ओतून बाटली पार रिकामी केली.
एक अगदी फारच अंधुक प्लॅन मनात साकार होत होता.
शेवटचा चौक ओलांडून गाडी तोफखान्यापाशी आली.

***

तोफखाना पेशवाईच्या काळात बांधला गेला होता. कातीव दगडांत रचलेली दोन मजली चिरेबंदी रास. ही वास्तू शोभेची नव्हती. दाराखिडक्यांवर महिरपी नव्हत्या. पायाच्या आणि कोनाच्या दगडांवर नक्षीकाम नव्हतं. बळकट भिंती, बळकट दारं.
मग पेशवाई गेली, संस्थानं राज्यात विलीन झाली.
पण तोफखान्याची इमारत तशीच ठाम उभी होती.
तिथे एखादं दफतर नेण्याचा किंवा तिचा इतर काही कामांसाठी वापर करण्याचा विचारही कोणाच्या मनाला शिवला नाही.
दोनशे बाय शंभर फुटांच्या, अर्ध्या एकराच्या आवारातच मधोमध उभी असलेली करड्या रंगाची रास.
वीज तिथपर्यंत पोहोचली होती. एवढीच सुधारणा.
बाहेरचं फाटक उघडं दिसत होतंपण आताच्या इमारतीत कोठेही प्रकाशाची चीरसुद्धा दिसत नव्हती.
अजयने गाडी आत नेली, एक चक्कर मारून गाडीचं तोंड परत फाटकाकडे केलं, दिवे मालवले, इंजिन बंद केलं; पण किल्ली डॅशमध्येच ठेवली. दार उघडून तो बाहेर आला; पण दार उघडंच ठेवलं. आत वाकून त्याने डाव्या हाताने बाटली बाहेर काढली, तोंड वर करून बाटली तोंडाला लावली, घटाघटा, दारू पिण्याचा अभिनय केला, मग उजव्या हाताचा मागचा भाग तोंडावरून फिरवला आणि बाटली हलवून पाहत दूर भिरकावून दिली. ते म्हणत होते आमचं वरून लक्ष असणारत्यांचे जे कोणी पहारेकरी होते त्यांच्यासाठी हे मूक नाट्य होतं?'
मग दारूच्या नशेत असल्यासारखा हेलकांड्या खात खात तो दाराच्या दिशेने निघाला. दारापाशी पोचल्यावर एका हाताने दाराचा आधार घेत तो किंचित बोबड्या आवाजात मोठ्याने म्हणाला, 'अरे! कोणी आहे का नाही इथे?'
दोन टॉर्चचा लख्ख प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडला. मग टॉर्च मालवले गेले आणि खोलीत दिवा लागला.
किलकिल्या डोळ्यांनी अजय समोर पाहत होता. समोर तीन माणसं उभी होती. मधला ताठ उभा होता, त्यांचा नायक होता. बाकीच्या दोघांच्या हातात टॉर्च होते. त्यांच्यातला एक जरा हसून म्हणाला,
'चांगलीच चढलेली दिसतेय!'
तो हसला, त्याच्याबरोबरच दुसरा टॉर्चवालाही हसला.
'माझी टिंगल करता! बदमाश!'
अजय ओरडला. दाराचा आधार सुटताच तो पायावर जरासा लटपटला. एक हात होस्टरकडे गेला. पिस्तूल सहजासहजी बाहेर आलं नाही. जरा खेचूनच बाहेर काढावं लागलं. मग तसच हलत्या हातांनीं वर करून

त्याने ते त्या दोघांवर रोखलं आणि चाप दाबला.
'आयला! पिस्तूल!' करत ते दोघे जरा मागे सरले.
पण पिस्तुलाचा नुसता 'क्लिक' 'क्लिक' आवाज येत होता. पिन रिकाम्या चेंबरवर आपटत होती.
मधला माणूस पुढे झाला. अजयच्या हातातलं पिस्तूल त्याने हिसकावून घेतलं, उघडून आतले चेंबर फिरवून बघितले.
'माझं रिव्हॉल्व्हर दे! झटपट!' अजय ओरडला.
'त्याची तपासणी करा रे!' मधला म्हणाला.
त्या दोघांनी पुढे येऊन त्याचे खिसे, पँटचे खिसे तपासले.
'काही नाही.' एक म्हणाला.
'रिव्हॉल्व्हर! रिव्हॉल्व्हर! तो दे!' अजय ओरडत होता.
'घे!' त्याने रिव्हॉल्व्हर पुढे केलं. ते होस्टमध्ये कसंतरी वेडेवाकडे खोचण्याचा अजय अभिनय करत होता.
'त्याला वर घेऊन चला.' तो म्हणाला.
खोलीतला दिवा मालवला गेला. एक टॉर्च शिलगावला गेला.
त्याच्या प्रकाशात ते चालले. मागच्या खोलीतून एक जिना वर जात होता. त्या जिन्याने त्यांनी त्याला वर नेलं.
खरंतर अजयने आता मोठाच जुगार लावला होता; पण त्याखेरीज गत्यंतरच नव्हतं. त्याच्यापाशी पिस्तूल आहे; पण ते रिकामं आहे हे त्यांना आता कळलं होतंआता ते बेसावध राहतील. ही शक्यता होती, की त्यांनी त्याचं पिस्तूल परत केलंच नसतं; पण तो धोका सुदैवाने टळला होता.
जिन्यात अंधार होता. वरच्या खोलीत एक दिवा होता; पण खिडक्यांवर जाड पडदे होते. खोलीत एका टेबलामागे दोघे बसले होते. ते अजयच्या ओळखीचे नव्हते. त्यांच्यातला जरासा वयस्क होता तो म्हणाला,
'आले का कुमार?'
तोच तो फोनवर बोलणारा आवाज. आताही त्या आवाजात मग्रुरी होती, तुच्छता होती.
'झिंगलेला दिसतो! चालता तरी येतंय का?'
पुन्हा एकदा धोका पत्करून अजय वेडावाकडा चालत टेबलापाशी गेला आणि टेबलावर हात आपटीत म्हणाला,
'गायत्री! कुठे आहे गायत्री?'
'मागे सर!' तो इसम खेकसला'काय घाण मारतेय! जा रे त्याला आत घेऊनबांधून ठेवा खुर्चीवरआणि तूपरश्या जा रे फोन करायलात्यांना सांग काम झालं म्हणून'
त्याच्याबरोबर वर आलेल्या तिघांपैकी एकजण परत खाली गेलाबहुतेक फोन करण्यासाठी. कोणास? कुणाला? गोवर्धनदासांना? दुसऱ्या दोघांनी त्याला हाताला धरून आतल्या खोलीत आणलं. आत दिवा नव्हता. दारातून बाहेरच्या दिव्याचा येत होता तेवढाच प्रकाश. त्यांनी एक खुर्ची प्रकाशात आणली. खुर्चीत त्याला बसवला. त्याने मुद्दामच शरीरावर ताबा नसल्यासारख्या हालचाली केल्या.
खुर्चीच्या हाताला त्यांनी त्याचे दोन्ही हात बांधले खरे; पण त्याच्या सारख्या हालचालीमुळे दोरी खूपच ढिली राहिली होती. त्याला खुर्चीत ठेवून ते बाहेरच्या खोलीत गेले. आपल्यामागे त्यांनी दार लावून घेतलं आणि कडी सरकावली.
आतल्या खोलीत गुडूप अंधार झाला. अजयने आधी डोळे घट्ट मिटले आणि मग सावकाश सावकाश उघडले. तोंडाने सारखी वायफळ बडबड चाललीच होती. अंधाराचा सराव झालेल्या डोळ्यांना आता उजवीकडे दोन खिडक्यांचे चौकोन दिसायला लागले. बाहेरचा प्रकाश अगदी अगदी अंधुक होऊन आत येत होता. त्या अंधुक प्रकाशात त्याला उजवीकडे खुर्चीत बांधून ठेवलेली गायत्री दिसली. तिचा काहीही आवाज आला नाही. त्याअर्थी तोंडातही बोळा घातला असावा.
आधीच हाताभोवतीची दोरी सैल होती. दोन्ही हात मागेपुढे, मागेपुढे असे वीस-पंचवीस वेळा हलवताच एक हात मोकळा झाला. लगोलग दुसराही मोकळा झाला. खाली वाकून त्याने डाव्या नडगीवरच्या नीकॅपमधून चाकू काढला. तो सावकाश गायत्रीकडे गेला. जवळ पोहोचल्यावर त्याला तिचे त्याच्यावर खिळलेले विस्फारलेले, भयभीत डोळे दिसले. तिच्या अगदी जवळ जाऊन त्याने हलकेच विचारलं
'ऐकू येतं का ?'
'हं.' तिचा हुंकार आला.
'मी तोंडावरचं फडक काढणार आहे. काहीही बोलू नकोस.'

मानेपासचौ गाठ सोडताच तिचं तोंड मोकळं झालं.
‘आता हाताच्या दोऱ्या कापतो आहे. आवाज करू नको.’
परत एकदा तोंडाची निरर्थक बडबड सुरू करीत त्याने चाकू हलकेच पुढे केला. धारदार पात्याचा स्पर्श होताच हातांवरच्या दोऱ्या गळून पडल्या. तिला किती वेळ बांधून ठेवली होती कोणास ठाऊक! हातांचं रक्ताभिसरण बंद पडलं असेल. हातांना मुंग्या आल्या आसतील. तिच्या खुर्चीपाशीच खाली बसून त्याने तिचा एकएक हात आपल्या दोन्ही हातात घेऊन चांगला चोळला. एकदोन मिनिटानंतर हातांचा बधिरपणा कमी झाला, बोटात आणि पंज्यात हालचाल सुरू झाली.
‘आता ठीक वाटतं?’ त्याने हलकेच विचारलं.
‘हो.’ ती पुटपुटली.
‘तुझ्या पर्समध्ये लहान टॉर्च आहे?’
‘हो.’
चाकू परत एकदा त्याने डाव्या नडगीला नीकॅपमध्ये ठेवून दिला. त्याचक्षणी त्याला उजव्या नडगीला लावलेल्या नीकॅपमधील गोळ्यांची आठवण झाली. त्याने कॅपमधल्या सहा गोळ्या काढल्या, पिस्तुलाच्या चेंबरमध्ये भरल्या, चेंबर गर्रर्रर्र फिरवून खात्री करून घेतली, पिस्तूल परत होस्टरमध्ये ठेवून दिलं.
अजिबात आवाज न करता तो खिडकीपाशी गेला. त्याची शंकाच खरी ठरली. खिडकीला जाड जाड गज होते. तिथून सुटका करून घेण्याचा कोणताही मार्ग नव्हता.
गायत्रीच्या खुर्चीशेजारीच तिची पर्स होती. पर्समध्ये जरा शोधशोध करताच पेन्सिल टॉर्च हाताला लागला. टॉर्च शिलगावण्याआधी त्याने त्यावर रुमाल टाकलातरीही सुरुवातीला त्याचा प्रकाश किती प्रखर वाटला!
टॉर्चचा प्रकाश त्याने खोलीभर फिरवला. वस्तू दिसली की तिचा उपयोग लक्षात येईल ही त्याची अटकळ खरी ठरली. स्वसंरक्षणाचं काहीतरी साधन तो शोधत होता. एका भिंतीपाशी त्याला काव्या लाकडाचे रूळ दिसले. जाडीला मूठभर होते, लांबीला अडीचतीन फूट होते. अगदी उत्तम शस्त्र! त्यातले दोन उचलून एक त्याने आपल्या हातात घेतला, दुसरा गायत्रीच्या हातात दिला.
‘कुमार’ ती हलकेच म्हणाली.
‘आता काहीही बोलायचं नाही. ते कुठेतरी निरोप पाठवणार आहेत. आणखी कोणी इथे येऊन पोहोचण्यापूर्वीच आपण सुटकेची खटपट केली पाहिजे. मला जरा विचार करू दे.’
अजयने टॉर्च मालवला. खिशात घातला. गायत्रीजवळ जात तो म्हणाला, ‘इकडे ये माझ्याबरोबर.’ त्याने तिला दाराच्या डाव्या बाजूला उभं केलं. तो स्वत: उजव्या बाजूला उभा राहिला. मग तो हलकेच म्हणाला,
‘पुढे येदार आतून घट्ट दाबून धर’ ती पुढे येताच तो म्हणाला, ‘थांब. आधी माझी योजना काय आहे ते नीट ध्यानात घे. मी आता खुर्चीचे काही आवाज करणार आहेआवाज कसला आहे ते पाहण्यासाठी कोणीतरी आत यायचा प्रयत्न करीलबाहेरची कडी उघडल्याचा आवाज होताच दार आतून रेटून धरजितका जोर असेल तितका लावून रेटून धरआणि मी आता! म्हणताच दार सोडून एकदम मागे भिंतीच्या बाजूला जासमजलं? मग धर दार’
तिने दोन्ही हातांनी दाराला नेट लावताच त्याने खुर्ची खालच्या फरशीवर जोरजोराने आपटायला सुरुवात केली. मिनिटभरातच बाहेरून कोणीतरी ओरडलं
‘ए! गप! आवाज बंद कर!’
अजयचं खुर्ची आपटणं चालूच होतं.
‘आयला!’ म्हणत कोणीतरी बाहेरची कडी उघडली; पण गायत्रीच्या रेट्यापुढे दार उघडलं नाही. त्याने बाहेरून आणखी जोर लावला. तरीही दार हलेना. ‘आयला!’ म्हणत त्याने खूप जोर लावला.
‘आता!’ अजय म्हणाला.
गायत्री दारापासून एकदम बाजूला झाली. आतला अडथळा एकदम दूर होताच दार आत ढकललं गेलं आणि सर्व शक्ती एकवटून जोर लावणाऱ्याचा तोल जाऊन तो कोलमडत खोलीत आला.
अजयने खांद्यावर उचललेला तो जड लाकडाचा रूळ हवेतून सप्! आवाज करीत आला आणि त्या माणसाच्या डोक्याच्या मागच्या भागावर कच्! आवाज करून बसला. त्या माणसाच्या तोंडून आवाजही निघाला नाहीतो तसाच कडमडत कडमडत पुढे गेला आणि खाली कोसळला.
अजय मागे सरला. गायत्री त्याच्याकडे पाहत होती. त्याने आपला रूळ परत वर नेला, तिलाही दारामागे उभं राहण्याची खूण केली. दोघं उघडलेल्या दोन दारांमागे उभे राहिले.

हा! हा! हा! हा!
आवाज करीत अजयने मोठमोठ्याने हसायला सुरुवात केली.
हा! हा! हा! हा!
दुसरा माणूस काय प्रकार आहे ते पाहायला येणार हे उघडच होतं; पण त्यांना काहीतरी संशय आला होता. त्याने शिलगावलेला टॉर्च हातात घेतला होता आणि टॉर्च पुढे करून तो सावकाश सावकाश खोलीत आला. टॉर्चच्या प्रकाशात समोरच त्याला त्याच्या साथीदाराची फरशीवर निश्चल पडलेली आकृती दिसली. तो दचकलाच आणि टॉर्च पुढे करून आणखी एक पाऊल आत आला.
'गायत्री! टॉर्चच्या हातावर!' अजय म्हणालाआणि काही हालचाल करायला त्या माणसाला सवड मिळण्याआधीच अंधारातून त्याच्यावर दोन जबरदस्त प्रहार झाले. हातावर इतका जोराचा टोला बसला की हात लुळापांगळाच झालाटॉर्च खाली पडून घरंगळत गेला आणि दुसरा टोला डोक्यावर बसलात्यामागोमाग मानेवर आणखी एक जोराचा प्रहार झालातोही कडमडत कडमडत आत गेला आणि त्याच्याच साथीदाराच्या अंगावर कोसळून पडला.
हातातला रूळ बाजूला फेकत अजय म्हणाला,
'गायत्रीचल!'
ती पुढे आली तसा तिचा हात धरून तो बाहेरच्या खोलीत आला. टेबलापासचे दोघं त्याच्याकडे पाहतच राहिले.
मग ते दोघं सावकाश उभे राहताच अजयने गायत्रीला एका बाजूला ढकललं आणि होस्टरमधलं पिस्तूल काढून ते त्यांच्यावर रोखून तो उभा राहिला.
टेबलापासचा एक, ज्याने खालच्या मजल्यावरच्या खोलीत अजयचं पिस्तूल तपासलं होतं, तो टेबलाला वळसा घालून पुढे आला.
'अरे दारुड्या! तुझी धुंदी अजून उतरलेली दिसत नाही आहेतू विसरलेला दिसतोस की तुझ्या पिस्तुलात एकही गोळी नाही!'
एकाएकी त्याचा उजवा हात पुढे आला आणि खट् आवाज होऊन हातातल्या चाकूचं चांगलं सात आठ इंची लखलखतं पातं पुढे आलं.
'जागचा हलू नकोस.' अजय थंड आवाजात म्हणाला.
'हे ब्लफिंग चालायचं नाही!' तो हसत म्हणाला, आणि त्याने एक पाऊल पुढे टाकलं.
पिस्तुलाचा कानठळ्या बसवणारा आवाज झाला.
त्या माणसाच्या छातीवर लालभडक रंगाचा डाग आला
अविश्वासाने समोर पाहतच तो खाली कोसळला.
अजयचं पिस्तूल दुसऱ्या माणसाकडे वळलं.
'पिस्तूल रिकामं नव्हतं,' अजय त्याच थंड आवाजात म्हणाला.
टेबलामागच्या माणसाचा उजवा हात अत्यंत वेगाने त्याच्या खिशाकडे गेला; पण हात खिशापर्यंत पोहोचण्याअधीच पुन्हा एकदा पिस्तुलाचा आवाज आला आणि त्या माणसाच्या खांद्याच्या चिंधड्या उडाल्या.
तो माणूस तसाच मटकन मागच्या खुर्चीत कोसळला.
सगळ्यांच्या जिवावर उठणारे हे क्रूर लोक.
त्याच्या मनात त्यांच्याबद्दल यत्किंचितही करुणा नव्हती.
त्या माणसाचा चेहरा वेदनेने विकृत झाला होता.
अजय सावकाश चालत जाऊन त्याच्यासमोर उभा राहिला.
'आम्ही इथे आल्याची खबर तुम्ही कोणालातरी फोनवरून दिली होतीस ना? तो म्हणाला. 'आपण आता त्यांची वाट पाहू.'
गायत्री हा सारा प्रकार विस्फारलेल्या डोळ्यांनी पाहत होती. खरं तर तिचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता.
तेवढ्यात जिन्यावर बुटांचे धाडधाड आवाज आले.
अजय एकदम सावध हाऊन दाराकडे पिस्तूल रोखून उभा राहिला.
दारातून काळ्या कपड्यातले तीन लोक एकामागून एक असे आत आले. समोर अजयला पाहताच त्यांच्यातला पुढचा मोठ्याने म्हणाला,

‘अरे! कुमारसाहेब!’
‘तुम्ही कोण?’ पिस्तूल खाली न घेता अजयने विचारलं.
‘कुमारसाहेब आम्ही राणीसाहेबांची खास माणसं आहोत.’
‘पण आता या वेळी इथे कसे काय हजर झालात?’
‘राणीसाहेबांची आज्ञा होतीतोफखान्यावर नजर ठेवायची आणि दीडच्या सुमारास आत घुसायचं; पण एवढ्यातच आम्हाला इथून गोळीबाराचे आवाज आलेतुम्ही इथे असाल हे आम्हाला माहीतच नव्हतं’
‘ठीक आहे.’ पिस्तूल परत होस्टरमध्ये घालत अजय म्हणाला, ‘या माणसाला ताब्यात घ्या आणि एवढ्यातच इथे आणखी कोणी कोणी येतीलत्यांना ताब्यात घ्या. मग ते कोणीही असोत-लक्षात आलं का? ते कोणीही असोत-त्यांना ताब्यात घ्या.’
‘मी आता जातो. सांगितलेलं ध्यानात ठेवा. चल गायत्री.’
अजय आणि त्याच्यामागोमाग गायत्री जिन्याने खाली गेले. ऐनवेळी धावपळ करावी लागली तर अत्यंत मोलाचे सेकंद दवडू नयेत त्याकरता अजयने गाडीचं दार उघडं ठेवलं होतं आणि आत किल्ली तशीच ठेवली होती. सुदैवाने तशी वेळ आली नव्हती.
‘बस,’ त्याने गायत्रीला सांगितलं आणि तो गाडीत बसला. गाडी सुरू होऊन मार्गाला लागली.
‘कुमार-’ एकदम त्याच्याकडे वळत गायत्री म्हणाली.
‘एक ऐकशील का? प्लीज! आता कशावरही चर्चा नकोप्लीज! मग वेळ झाला की बोलूया’
‘अंठीक आहे.’ ती जरा नाराजीनेच म्हणाली.
तिच्याबरोबर घालवलेला प्रत्येक क्षण अजयला विलक्षण ताणाचा होता. एकेरी नावाने हाक मारून, हाताला धरून चालवायचंही सलगी करताना त्याला विलक्षण प्रयास पडले होते आणि त्यात आता जर तिने काही संभाषण सुरू केलं तर प्रसंग बाका येणार होता.
सुदैवाने त्यानंतर ती काहीच बोलली नाही.
गाडी मोठ्या दारापाशी थांबली. गाडी तिथेच ठेवून अजय खाली उतरला, त्याच्यामागोमाग गायत्री खाली उतरली.
दोघं जिन्याने बरोबरच वर गेले. दुसरा मजला आला आणि ‘अच्छा! गुड नाईट!’ म्हणत अजयने गायत्रीचा निरोप घेतला आणि तो कुमारच्या खोलीकडे निघाला.
तो दारात किल्ली सरकवायचा प्रयत्न करीत असतानाच दार आतून एकदम उघडलं.
आत राणीसाहेब उभ्या होत्या. त्याच्याकडे पाहत होत्या.
अजयने मागे सावकाश दार लोटलं, आणि तो म्हणाला,
‘राणीसाहेब, गायत्रीदेवींना मी परत आणलं आहेआताच त्या वर आपल्या खोलीकडे गेल्या आहेत. त्यांना कोणतीही इजा वगैरे झालेली नाहीफक्त त्यांचा गोंधळ झालेला आहेअजून त्यांना शंका आलेली नाही, की मी खरा कुमार नाहीत्यांना जे काही पाहायला मिळालं त्यानं विलक्षण चकित झालेल्या असणार’एका खुर्चीत स्वत: बसत राणीसाहेब म्हणाल्या,
‘अजय, समोर बस आणि मला सारं काही खुलासेवार सांग पाहू.’
अजय बसला; पण खुर्चीच्या कडेवर.
‘राणीसाहेब, गायत्रीदेवी सुखरूप आहेत. माझ्याबरोबरच राजवाड्यात परत आल्या आहेतवर गेल्या आहेत. तुम्ही पाठवलेली माणसं अगदी योग्य वेळी तिथे पोहोचली. तिथे एकदोन मृतदेह असतील- एकाचा हातखांदा फ्रॅक्चर झाला आहेत्याला त्यांनी ताब्यात घेतला असेलआणि’
‘आणि काय?’
‘ज्या कोणी हा सर्व कट रचला तोही तुमच्या लोकांच्या हातात सापडला असेल असा माझा कयास आहे.’
‘अजय, यातलं अक्षरही मला कळत नाही. सुरुवातीपासून सगळं खुलासेवार सांग’
‘राणीसाहेब, आता रात्रीचा दीड वाजला आहे’
‘विसर घड्याळ आणि वेळ. सांग.’
‘सांगतो. आधी हे कपडे उतरवतो. सोपानचे चढवतो. पाचएक मिनिटात सोपान राणीसाहेबांसमोर हजर झाला.
‘राणीसाहेब, कुमार?’
दोन्ही हात कानाला लावून त्यांनी गाढ झोपेची खूण केली.

‘या संजीवनीबाई माने यांच्याबद्दल मला कुतूहल होतं. इथेच राहून प्रत्यक्ष राजघराण्याविरुद्ध खटला करण्याची हिंमत साध्या बाईत असूच शकणार नाही अशी माझी कल्पना होती. तिच्या पाठीमागे दुसरं कोणीतरी असावं अशी मला शंका होती. असं कोणीतरी, की ज्याच्यापाशी सत्ता आहे, पैसा आहे, राजवाड्यात प्रवेश आहे मी नाव घेत नाही.
‘पुन्हा एकदा हे नाटकातलं नाटक आलं. गंगाधर देशपांडे या नावाचा इतिहास आणि चरित्र लेखक बनून मी या मानेबाईंची गाठ घेतली. तिच्या खटल्यासंदर्भात तिला बोलण्यात गुंतवून तिच्याकडून तिचा आणि कुणालचा, तिच्या मुलाचा असे दोन फोटो मिळवले.
‘राणीसाहेब, त्या कुणालचा फोटो पाहताच आधी मला शंका आली आणि मग नीट पाहिल्यावर खात्री झाली की हा कुणाल म्हणजे गोवर्धनदास त्रिपाठी यांचाच मुलगा आहे. एकदा ही गुप्त गोष्ट समजली की इतर खूप स्पष्ट होतं, नाही का? या संजीवनीबाईंनी कशाच्या आधारावर एवढा खटला भरला? गोवर्धनदासांचा माझ्या प्रवेशास एवढा विरोध का? त्यांना कुमार बदनाम व्हायला हवे होते, कुमार- आणि तुम्ही यांच्यात बेबनाव व्हायला हवा होता. वैमनस्य यायला हवं होतंतुमच्याविरुद्ध निवडणुकीत उतरण्याचा विचार त्यांनीच कोणच्यातरी मार्फत कुमारांच्या मनात शिरवला असला पाहिजे.’
‘पण आज सकाळी ही गायत्रीकुमारच्या विवाहाची बातमी गोवर्धनदासांना कशासाठी सांगायला लावलीस?’
‘राणीसाहेब, काहीही अप्रिय गोष्टी ऐकण्याची तयारी ठेवा. इतर वेळी त्यांचा मी उच्चारही केला नसता; पण आता सांगायलाच हव्यात. राणीसाहेब, कुमारांच्या मनात गायत्रीदेवीसंबंधात संशय होता. अशा अर्थी की, त्या कुमारांशी विवाह करायला का तयार झाल्या आहेत? आपल्या स्वभावाची, पात्रतेची, व्यसनांची, लोकांच्या मनात आपली काय प्रतिमा आहे याची कुमारना पूर्ण कल्पना होती. या गोष्टी ऐकून तुम्हाला वाईट वाटणार आहे; पण त्या सांगायलाच हव्यात. कुमारांच्या मते या विवाहामागे गायत्रीदेवींचा एक डाव होता. वडिलांनी दिलेल्या शब्दाच्या पालनासाठी स्वत:च्या सर्वस्वाचं दान हे एक ढोंग होतं, हा एक बहाणा होता. कुमारांच्या स्वभावाची त्यांना पूर्ण कल्पना होती. विवाह झाल्यावर दोन गोष्टी होऊ शकत होत्याएक, जर कुमार त्यांच्या मनासारखे वागले असते तर राणीसाहेब, आपल्या पश्चात सर्व सत्तासंपत्तीची मालकी गायत्रीदेवींकडे आली असती किंवादोन, विवाह अयशस्वी झाला असता तर कित्येक लाख रुपयांची जबर किंमत वसूल केल्यावरच त्यांनी कुमारांना त्यांचं स्वातंत्र्य दिलं असतं’
राणीसाहेबांचा चेहरा संतापाने लाल झाला होता.
‘राणीसाहेब, जरासं नशेखाली असताना प्रत्यक्ष कुमारनीच मला हे ऐकवलं आहे; पण ते आता महत्त्वाचं नाही. त्या दोघांचा विवाह म्हणजे सर्व प्रयत्नांवर पाणी ही गोवर्धनदासांची खात्री होती. कारण गायत्रीदेवी हुशार आहेत, कार्यक्षम आहेत हे त्यांना माहीत होतं. म्हणून काहीही करून त्यांना हा विवाह टाळायचा होता. त्यासाठीच मी आपल्याला विनंती केली की, ही बातमी त्यांच्या कानांवर जाऊ देत आणि कुमारही काही दिवसांसाठी दूर जाणार हा त्यांना आणखी एक धक्का होताकट शिजवायला त्यांना उसंत मिळू नये, त्यांनी घाईगर्दीने काहीतरी हालचाली कराव्यात यासाठी ती खटपट होती आणि ती यशस्वी झाली आपण पाहतच आहात.
‘ती लिली कुमारांच्या क्लबमध्ये नुकतीच कामावर आली होती. राणीसाहेब, कुमार स्वभावाने दिलदार आहेतत्यांनी लिलीस काहीतरी मोठी मदत केलेली आहेकुमारांना नादी लावण्यासाठी गोवर्धनदासांनी तिला पाठवलं असणं अशक्य नाही; पण रात्री क्लबमधून कुमारांना कोठेतरी नेण्याच्या बेताचा सुगावा तिला लागला आणि मोठं साहस पत्करून तिने कुमारांना इथे आणून सोडलं. गायत्रीदेवींना कशाचीच शंका नव्हतीतेव्हा त्या त्यांच्या हाती सहज सापडल्या.
‘मग इथे कुमारना फोन आला. पुढचं सगळं तुम्हाला माहीत आहेचतिथे थोडीशी चकमक झालीचएक मरण पावला, दुसऱ्याचा खांदा आणि हात निकामी झाला आहे आणि या साऱ्या कटाचा सूत्रधार तुमच्या माणसांच्या हातात सापडलेला असणार’
‘पण हे सर्व कशासाठी? त्यांना काय साधायचं होतं?’
‘राणीसाहेब, एका दगडाने दोन पक्षी मारण्याचा हा कावा होता. कुमार त्यांच्या हाती लागले असते तर कुमार आणि गायत्रीदेवी यांना गाडीत घालून त्यांनी एखाद्या घाटात नेलं असतं आणि तिथून वरून गाडी खाली ढकलली असतीकुमारांचं दारूचं व्यसन सर्वश्रुतच होतंगायत्रीदेवी त्यांच्या निकटच्या परिचयाच्यातेव्हा ते दोघं गाडीने कोठे गेले असतील तर त्यात नवल वाटण्यासाखं काहीच नव्हतं आणि दारूच्या अमलाखाली असताना गाडीवरचा ताबा सुटून गाडीला अपघात झाला तर त्यातही कोणाला काही नवल वाटणार

नव्हतंकोणालाही, प्रत्यक्ष राणीसाहेब, आपल्यालाही काही शंका आली नसती की हा नैसर्गिक अपघात नाही, इथे काहीतरी काळंबेरं आहे'
'पण मग पुढे?'
'मग पुढे प्रत्यक्ष तुम्हालाही धोका होता, राणीसाहेब अजून संस्थानी मानमरातब, हुद्देपेशे चालू आहेत; पण संस्थान केव्हाच नष्ट झालं आहेहाही राज्याचा एक प्रांत आहेइथेही निवडणुका होतात- तुम्ही नसलात तर या गोवर्धनदासला कोण अडवणार? त्याची माणसं सर्वत्र पेरलेली आहेतसत्तेची मर्मस्थानं त्याच्या हातात असतील; आणि मग कुणालच्या वाटेत कोणताही अडथळा येणार नाही.'
'मला आणखी एक शंका येते. राजवाड्यातली त्याची माणसं आहेत, खबरे आहेतखरे कुमार राजवाड्यातच आहेतच आहेत हेही त्याच्या कानावर जाण्याची शक्यता होतीमग मी हातात सापडताच मीच तोतया कुमार बनून गाडीसह गायत्रीदेवींना पळवण्याचं कारस्थान रचलं होतं असं कुभांडही ते माझ्यावर रचू शकले असतेसुदैवाने सर्व धोका आता टळला आहेराणीसाहेब, मी आता खाली जातो. एक विनंती ऐकाल का?'
'काय?'
'आपण इथेच थांबावाटलं तर जरा विश्रांती घ्या; पण सकाळी कुमारना जाग आल्यावर सर्वांच्या आधी आपणच त्यांची गाठ घ्यायला हवी. आजच्या रात्रीचा प्रकार त्यांना कळायलाच हवा आणि हे पाहाआपण सुरुवातीपासूनच मला कुमारांचं नकली रूप घेण्यासाठी आणलं होतं हे सांगूच नकात्यांच्या जागी मी का गेलो हे मी त्यांना आपण होऊनच सांगेन; पण काय काय झालं हे मात्र त्यांना अगदी पूर्ण तपशिलासह माहीत हवंकारण सांगतोराग मानू नकागायत्रीदेवी आज रात्रीच्या अनुभवाने खूपच एक्साईट झाल्या आहेतगाडीतच त्यांना बोलायचं होतं; पण मी त्यांना ती संधी दिली नाही; पण उद्या सकाळी कुमारांची गाठ घ्यायला त्या अगदी नक्की येणारत्याआधी एकूण सर्व प्रकार त्यांना माहीत असायलाच पाहिजे'
अजयने सर्व काही आता प्रथमच राणीसाहेबांना सांगितलं. दारूच्या नशेत असल्याची नक्कल कशी केली, पायाच्या नडग्यांना चाकू आणि पिस्तुलाच्या गोळ्या नीकॅपमध्ये खोचून कशा नेल्या, पिस्तूल रिकामं असण्याची त्यांची कल्पना कशी करून दिलीगायत्रीला मोकळं केल्यानंतर पुढे काय काय घडलंत्या माणसाला ठार कसा केला आणि दुसऱ्याला जखमी कसा केलात्या तीन कमांडोंना काय सूचना दिल्या, हे सर्व अगदी तपशीलवार सांगितलं.
'गायत्रीदेवीशी त्यांना जसं वागायचं असेल तसं वागू द्यात' अजय शेवटी म्हणाला, 'पण रात्रीचा पूर्ण प्रकार त्यांना माहीत हवा. आपण आणि गोवर्धनदास सोडता मी कुमारची भूमिका करण्यासाठी आलो आहे हे कोणालाही कळता कामा नये. गायत्रीदेवींना तर नाहीच नाही.'
'का?'
'याक्षणी त्यांच्या मनात कुमारांच्याबद्दल खूप आकर्षण आहे, न जाणो त्यातूनही काही चांगलं निष्पन्न होईल!'
अजय उठला आणि राणीसाहेबांचा निरोप घेऊन खाली गेला.

***

16.

दिवसभराचा मनावरचा ताण गेला होता. गादीवर पडल्या पडल्या त्याला जी गाढ झोप लागली ती एकदम सकाळी दहा वाजता जाग आली.
काहीतरी खूप विलक्षण झालं आहे अशी त्या क्षणी मनात जाण होती; पण सुरुवातीच्या काही क्षणात काहीच आठवेना.
आणि मग एकाएकी आदल्या रात्रीचे सर्व थरारक प्रसंग डोळ्यासमोर एकामागून एक सरकत गेले. आठवणींनी पुनर्प्रत्ययाचा आनंद होत होता आणि अजूनही अंगावर रोमांच उभे राहत होते; पण ते नाटक संपलं होतं. आता आलं रोजचं जीवन.
वीसएक मिनिटात तो कुमारच्या खोलीत हजर झाला.
कुमार जागा होता, बाहेरच्या खोलीतच बसला होता. सोपान आत येऊन दाराच्या आत पावलाभरावर उभा राहिला. कुमारची नजर वर आली आणि सोपानच्या चेहऱ्यावर खिळली. नजरेत कितीतरी भाव होते. नवल होतं, जरासा राग होता, हेवा होता, कौतुकही होतं
'या, या, वीरबहादूर, या!'
'कुमार, हे काय भलतंच!' अजय म्हणाला.

‘सोपान, मला मातोश्रींनी सर्वकाही सांगितलं आहे. आधी खरोखरच माझा माझ्या कानांवर विश्वास बसेना; पण त्यांचा स्वभाव थट्टामस्करी करण्याचा नाही. मला आता तुझ्या तोंडून सर्व काही ऐकायचं आहे.’
‘कुमार, मी तुम्हाला मागेच सांगितलं आहेजीव जरासा स्वप्नरंजनात रमणाऱ्यापैकी आहेलहानपणी वाचलेल्या रहस्यकथांतील नायकांप्रमाणे आपण सर्वगुणसंपन्न व्हावं ही मनची इच्छा खरोखरच होती आणि तुमच्या कृपेने मला अनेक संधी मिळाल्याआजवर तुम्हाला सांगितलं नव्हतं ते आज सांगतोतुमचा तो पोट्रेटचा फोटो आहे नातो साफ करता करता मी आरशासमोर उभा होतो आणि आरशातल्या माझ्या प्रतिबिंबाकडे आणि तुमच्या फोटोकडे पाहता पाहता ध्यानात आलं, की दोन्ही चेहऱ्यात खूपच साम्य आहेतेवढी ती एक गोष्ट मनात राहिली होती’
‘काल रात्री त्या इसमाचा फोन आलागायत्री आमच्या ताब्यात आहे आणि बारा वाजायच्या आत कुमार तोफखान्यावर हजर झाले नाहीत तर गायत्री तुम्हाला परत केव्हाही दिसणार नाही.’ कुमार तुम्ही तर हलण्याच्याही अवस्थेत नव्हता. तेव्हा ती धाडसी कल्पना माझ्या डोक्यात आली. गाडी चालवायला, पिस्तूल वापरायला तुम्हीच मला शिकवलं होतंराणीसाहेबांची परवानगी घेऊन मी तुमचे काही कपडे चढवले आणि गाडीतून तोफखान्यावर गेलो’
‘नुसता गेला नाहीस! तिथे दोन हात केलेस! दोघांना ठार मारलंस, दोघांना जखमी केलंस, गायत्रीला सुखरूप परत आणलंसमातोश्री म्हणत होत्या, बरोबर चाकू आणि पिस्तुलाच्या गोळ्या लपवून नेल्या होत्यास...’
मान खाली घालून जरा शरमिंद्या आवाजात अजय म्हणाला,
‘या सगळ्या ट्रिक आणि युक्त्या माझ्या आवडत्या नायकांनी वेळोवेळी वापरल्या आहेतमी त्यांचंच अनुकरण करत होतो.’
‘सोपान, तू जितक्या सोप्या करून सांगतो आहेस तितक्या या गोष्टी सोप्या नाहीत; पण तू जास्त काही सांगणारच नाहीस ना?’
‘कुमार, मी खरोखरच सर्व काही सांगितलं आहे.’
दारावर जोराची टक टक झाली.
अजयने दार उघडलं.
बाहेर गायत्री उभी होती.
एकवार कुमारकडे पाहत अजय खोलीबाहेर आला आणि दार आपल्यामागे लावून घेत सरळ खाली आला.

***

खालच्या दिवाणखान्यात राणीसाहेब उभ्या होत्या. अजयला पाहताच त्यांनी त्याला बोटाने खूण करून बोलावलं. त्यांच्या मागोमाग तो त्या खोलीत गेला, जिथे अडकर यांची मुलाखत झाली होती. आत जाताच वळून त्या म्हणाल्या, ‘अजय, तिथे दारापाशीच उभा राहा म्हणजे लोकांना वाटेल तू कामावर आहेस. मी इथूनच बोलते. ऐकू येतं का?’
‘हो.’
‘आज सकाळी दहा वाजता माझ्या कमांडोंच्याकडून मला रिपोर्ट मिळाला. प्रत्यक्ष येऊनच त्यांनी सांगितला. कारण ही माहिती फार स्फोटक आहे. काल रात्रीच्या अपहरणाच्या प्रकरणात कोणाचा मुख्य हात होता अशी तुझी कल्पना आहे?
‘स्वत: त्रिपाठींचाच! तेच तोफखान्यावर आले आणि माझ्या लोकांनी त्यांना ताब्यात घेतलं. तू तिथून निघताना जी ताकीद दिली होतीसइथे अगदी कोणीहीअगदी कोणीही आलं तरी त्याला ताब्यात घ्याती आज्ञा त्यांनी तंतोतंत पाळली. त्रिपाठींना ताब्यात घेतलं आणि दहा वाजता मला ती बातमी दिली. कालच्या पाचांपैकी एक फरारी आहे. दोघं जखमी आहेत-त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केलं आहे. दोघं मरण पावले आहेत. त्यांची व्यवस्था परस्पर केली जाईल. अजय, दहा वाजता मी स्वत: तोफखान्यावर गेले होते.’
‘आपण स्वत: राणीसाहेब?’ अजयने नवलाने विचारलं.
‘हो, या गोष्टी षट्कर्णी होऊन उपयोगी नाही. मी स्वत:च गेले. त्रिपाठी तिथेच आहेत. आधी त्यांनी खूप थापाथापी करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांच्याविरुद्ध इतका पुरावा आहे; आणि इतके साथीदार आहेत की, शेवटी त्यांना अपराधाची कबुली द्यावीच लागली. अजय, मला दिसत होतं की हे प्रकरण चव्हाट्यावर आलं तर त्यापासून सर्वांनाच त्रास होणार, सर्वांचीच मानहानी होणारमी त्रिपाठी, कुमार आणि आमचं घराणंलोकांना सुखदु:ख कशाचंच नसतंत्यांना घटकाभराचं मनोरंजन हवं असतं.
‘मी त्रिपाठींना एकच पर्याय ठेवला. सर्व परिवार, सर्व चीजवस्तू घेऊन त्यांनी तीन तासांच्या आत शहर

सोडायचं आणि परत शहरात पाय ठेवायचा नाहीयाला ते तयार झाले, तर मग मी झाल्या गोष्टी विसरून जायची तयारी दाखवली. हे चूक केलं की बरोबर केलं मला समजत नाही; पण मला तरी त्यातल्या त्यात हा सर्वांत कमी त्रासाचा मार्ग वाटला. तुला काय वाटतं?'
'मी काय सांगणार, राणीसाहेब?'
'मी तो निर्णय घेतला खरा. काय परिणाम व्हायचा असेल तो होईलत्रिपाठींबरोबर माझी माणसं सतत होतीदुपारी दोन वाजता त्रिपाठी शहर सोडणार आहेतशेवटच्या क्षणापर्यंत माझे लोक त्यांच्याबरोबर असणार आहेतत्रिपाठींना माहीत आहे, की पुन्हा ते कोणालाही शहरात दिसले तर त्यांची काही धडगत नाहीबरं तुझं काय? कुमारशी बोलणं झालं का ?'
'मीमीत्यांना सर्व काही जसं घडलं तसं सांगितलं. त्यांचा कितपत विश्वास बसला मला माहीत नाही आणि राणीसाहेब, एवढ्यातच गायत्रीदेवी त्यांच्या भेटीसाठी गेल्या आहेत.'
'आता गेली आहे?'
'हो.'
'आणि तिने काही विचारलं तर?'
'काय काय झालं, कोणत्या क्रमाने झालं याचा सगळा तपशील मी कुमारांना दिला आहे; पण राणीसाहेब, मला नाही वाटत गायत्रीदेवींच्या प्रश्नांना किंवा शंकांना कुमार काही उत्तरं देतील.'
'गप्प बसला तर बरंच होईल.'
'राणीसाहेब, एक विचारू का?'
'काय?'
'आपण कुमारना रात्रीच्या प्रसंगाची माहिती दिलीत तेव्हा त्यांची प्रतिक्रिया काय झाली?'
'आधी त्याचा विश्वासच बसेनाअर्थात थट्टामस्करी करण्याचा माझा स्वभाव नाहीआणि असता तरी दुर्दैवाने आमच्यातले संबंध तसे नाहीत; पण अर्थात शेवटी मी खरं तेच सांगते आहे हे त्याला स्वीकारावंच लागलंतो एकदम गप्प झालाखाली मान घालून स्वत:शीच विचार करत बसून राहिला-सारखा स्वत:शीच मान हलवत होता-काय विचार चालले होते कळायला काही मार्ग नव्हतादोनतीनदा त्याला हाका मारल्या; पण 'हं'च्या पलीकडे त्याचा काही प्रतिसाद आला नाहीशेवटी मी खोलीबाहेर पडलेदुसरं काय करणार?'
अजय मोठ्याने काही बोलला नाही; पण राणीसाहेब, कुमार आणि गायत्री यांच्या प्रतिक्रिया पाहता त्याला अशी एक खात्री वाटायला लागली होती की, आदल्या रात्रीच्या अकल्पनीय आणि धक्कादायक अनुभवाचा त्या तिघांच्यावर काहीतरी मोठा परिणाम होणार आहे.
त्याला आशा (आणि जरासा खिन्नपणाही) वाटायला लागली होती की, या एकूण प्रकरणातला त्याचा सहभाग आता संपत आला आहे. या अद्भुत घटना घडत होत्या तेव्हा त्यांच्यात पूर्णार्थाने भाग घेऊन प्रत्येक क्षणाची उन्मादक धुंदी त्याला अनुभवायला मिळाली होती हेच त्याचं केवढं भाग्य! आता होता रोजचा रटाळ पसारा त्याचे अंदाज किती चुकत होते याची या क्षणाला तरी त्याला अजिबात कल्पना नव्हती.

***

गायत्री खोलीत आली.
कुमार समोरच्या खुर्चीत बसला होता. दोन्ही हात मानेमागे टेकवले होते आणि नजर वर छताकडे होती. त्याच पवित्र्यातून त्याने गायत्रीकडे पाहिलं आणि मान जराशी हलवली.
गायत्री त्याच्या समोरच्या खुर्चीवर येऊन बसली.
'हिरो कुमार!' ती हसत म्हणाली आणि तो काही बोलायच्या आतच हात वर करून तिने त्याचे शब्द अडवले.
'कुमार, मी थट्टा करीत नाही, चेष्टा करीत नाही. अगदी प्रांजळपणे, मनापासून बोलत आहेशब्दश: खरं आहेहिरो कुमार!'
'आता मी हिरोसारखा दिसतो का?' कुमारचा आवाज जरा कडवट होता. बारीक डोळ्यांतून तो गायत्रीकडे पाहत होता.
'तीच तर त्यांनी चूक केली!'
'त्यांनी? कोणी? कसली चूक?'
'त्यांचं कशाला? मीही इतके दिवस फसले नव्हते का?'
'कोड्यांची भाषा सोडून जरा साध्या शब्दात बोलतेस का?'
'हो, सांगते, बाबा सांगते. सगळीकडेच तुझी अशी ख्याती आहे, की कुमार म्हणजे मौजमजा करणारा, सतत

दारूच्या नशेत असणारा एक हौशी, रंगेल तरुण'
'मग ते काय खोटं आहे का?'
'खरं असोखोटं असो. तू ते मुद्दाम करीत असशीलही; पण तुझ्या स्वभावाला दुसरी बाजू आहे हे आजवर कोणाच्या कल्पनेतही आलं नव्हतं. टणक, धारदार, कठोर बाजू माझ्या डोळ्यांसमोर तर एक पातळ चित्र येतंसर्वांची नजर त्या चित्रावरच खिळलेली असतेसर्वांना ते अगदी निरुपद्रवी वाटत असतं; पण सर्वजण हे विसरतात की, त्या चित्राला एक धारदार, कापणारी, रक्तबंबाळ करणारी तीक्ष्ण कड आहे जी प्रसंगी प्राणही घेऊ शकतेमला तुझा अभिमान वाटातो, कुमार.'
कुमार काय बोलणार? तो तिला सांगू शकत नव्हता, की काल रात्री तो इथे झिंगून पडला होता आणि ही सारी नेत्रदीपक करामत एका तोतया कुमारची होती! तो तिला हेही विचारू शकत नव्हता, की तिला त्याच्या वागण्याने संशय कसा आला नाही? त्याचं तोंड कायमचं बंद झालं होतं!
'माझा विश्वास बसला नसता की केवळ तीनचार शब्दात इतका अर्थ येऊ शकतोतू त्या चाकूवाल्याला म्हणाला होतासपुढे येऊ नकोस! तीनच शब्दआणि त्याला ठार केल्यावर वळून म्हणाला होतासपिस्तूल रिकामं नव्हतं! तीनच शब्द! अंगावर कसा काटा आला! मला तुझा अभिमान वाटणार नाही का?'
कुमारने डोळे मिटून घेतले होते.
'कुमार! कालपासून तू असा काय करतो आहेस? गाडीत एक शब्द बोलला नाहीसआताही एक शब्द बोलत नाहीस.'
गाडीत! इतकं जवळ येऊनही तिला शंका कशी आली नाही की तिची सुटका करणारा कुमार नव्हता...
पण शंका यायचीच नाही! एक तर त्यांनी कुमारलाच फोन केला होतातेव्हा येणार तो कुमारच! ती अंधारलेल्या खोलीत होती. कानावर आवाज आला तो कुमारच्याच आवाजाची नक्कल होतीती धरूनच चालणार की कुमारच हजर झाला आहे! पुढचा त्या खोलीतला सगळा प्रकार जवळजवळ अंधारातच घडला. बाहेरच्या प्रकाशित खोलीत आले तरी तिचं लक्ष त्या दोन माणसांकडेच असणारआणि हा भीषण रक्तपात चालला असताना शांत विचाराला तिला सवड कशी मिळणार? आणि मग गाडीतही अंधुक प्रकाशच! तिला शंका कशी येणार की आपल्याबरोबर जो आहे तो कुमार नाही याची? जे दिसण्याची माणूस अपेक्षा करत असतो त्यासारखं काहीही दिसलं की मनातलंच दिसलं आहे असं माणूस धरूनच चालतोतिला कशासाठी दोष द्यायचा?
ती आता खोलीतून जाईल तर बरं, कुमारला वाटलं. हा तर तोंड दाबून बुक्क्यांचा मार असा प्रकार होत होता.
'किती स्तुती करशील, गायत्री?' तो शेवटी म्हणाला.
'समथिंग इज राँग, कुमार!' ती चाणाक्ष स्त्री म्हणाली.
अगदी शेवटच्या क्षणी त्याला ते सुचलं.
'गायत्री, असा माणसांचा जीव घेण्याचा प्रसंग किती जणांच्यावर येतो? एखाद्याचा प्राण घेणं ही काय साधी गाष्ट आहे का? त्याक्षणी आपल्याला ते कृत्य कितीही योग्य, समर्थनीय वाटत असेल; पण मागाहून रिॲक्शन येते! तोही आपल्यासारखाच माणूस होता, त्याच्यामागेही कोणी कोणी त्याच्यासाठी शोक करणारे असतील कितीतरी विचारांची गर्दी होते.'
हातांनी डोळे झाकून घेत तो स्वत:शी मान हलवत बसला.
'कुमार!' गायत्री एकदम नरम आवाजात म्हणाली, 'अरे, मला कल्पना नव्हती! खरंच कल्पना नव्हती! आय ॲम सॉरी! रिअली सॉरी! मी आता तुला अजिबात त्रास देत नाहीमला माफ कर.'
ती त्याच पावलावर वळली आणि खोलीबाहेर गेली.

***

खालच्या हॉलमध्ये येताच तिला एका खोलीच्या दाराशी सोपान उभा असलेला दिसला.
'आत्या दिसली का रे तुला सोपान?' गायत्रीने विचारलं.
'राणीसाहेब आत आहेत' खोलीकडे बोट करीत अजय म्हणाला आणि गायत्री खोलीत जाताच तो तिथून आपल्या खोलीकडे आला.
'गायत्रीऽ!' राणीसाहेब म्हणाल्या, 'खरं तर काल रात्रीच तुझी गाठ घ्यायला हवी होती; पण कुमार म्हणाला तिला विश्रांती घेऊ देती जरा कठीण प्रसंगातून गेली आहेम्हणून मी भेट टाळली.' पुढे येऊन तिच्या खांद्यावर हात ठेवत राणीसाहेब म्हणाल्या, 'काय गं भयंकर प्रसंग! इथे कुमारला फोन आला आणि आमची पाचावर धारण बसली! तशी मदतीला माणसं खूप आहेत गं; पण त्यांनी धमकी दिली होती ना कुमारनं एकट्यानंच

यायचं! नाहीतर तुला धोका होता!'
'अगं आत्या, मीटिंगमधून बाहेर आले तर बाहेर अगदी तुझ्या गाडीसारखीच हुबेहूब मरून रंगाची गाडी दार उघडून उभी'राणीसाहेबांनी गाडी पाठवली आहे' तो म्हणाला. कशी गं शंका येणार? पुढचा मागचा विचार न करता गाडीत बसले मात्रएकदम दार बंद झालं आणि आत दोघं हातात सुरे घेऊन तयार! 'चूप! एक शब्द उच्चारायचा नाही!' एकाने धमकी दिली. काय करणार गं! चूप बसून राहिले.
'कुठल्या तरी इमारतीत गाडी शिरलीघाईघाईने त्यांनी मला आत नेलं, वरच्या मजल्यावर नेलं आणि आतल्या खोलीत एका खुर्चीत बांधून ठेवलं. मी ओरडत होते हे काय! हे काय! तुम्हाला माहीत नाही का मी कोण आहे ते! याचे परिणाम वाईट होतील! ते नुसते हसत होते. खुर्चीत मला बांधून ठेवून ते सरळ निघून गेले.
'बाहेरच्या खोलीत माणसं येत होतीजात होतीत्यांचा काहीतरी बेत चुकला होताआरडाओरडा चालला होता आणि मग त्यांच्यातला एक आत आला आणि म्हणालातुमच्या कुमारांना बोलावलं आहे इथे! येतील का? त्याचा आवाज हिणवण्याचा होता आणि मी तरी त्याला कसा दोष देणार? कुमारची ख्याती सगळीकडेच पसरली आहेबारा वाजायच्या आत या,नाहीतर गायत्री दिसणार नाही'अशी त्यांना धमकी दिली आहे म्हणत होता. मी सगळी आशाच सोडली बघ.
'पावणेबाराला कुजबूज सुरू झालीआला की कुमार! म्हणत होते- बाहेरच्या खोलीतून त्याचा आवाज कानावर आलाआणि आत्या! तोही दारूच्या तारेतला आवाज! आणि त्याला त्यांनी आतल्या खोलीत आणला तेव्हाही त्याचं बरळणं चाललंच होतं.
'पण आत्या! सगळं नाटक होतं! तोंडाने बरळणं चालू असतानाच त्याने स्वत:ला मोकळं केलं, टॉर्च वापरून दोन लाकडी रूळ शोधून काढलेमग आवाज करून त्यांच्यातल्या एकाला खोलीत चकवून आणलं आणि टोला मारून खाली पाडलातसंच दुसऱ्यालाही
'पण आत्या! पुढचं ऐक! माझा हात धरून अगदी शांतपणे बाहेरच्या खोलीत गेलाअशी क्रूर माणसं गं! त्यांच्यातला एकजण हसत हसत पुढे आलात्याच्या हातात मोठा चाकू होता आणि तो तोंडाने म्हणत होतातुझ्या पिस्तुलात गोळ्या नाहीत! आणि हलू नको म्हणून कुमारने सांगितलेलं असतानाही त्याने एक पाऊल पुढे टाकलं मात्र; कुमारने त्याला गोळी घालून ठार केलं! आणि मग कुमार दुसऱ्याकडे वळून म्हणालापिस्तूल रिकामं नव्हतं! तीनच शब्द! पण किती भयंकर! अजूनही आठवलं की अंगावर शहारा येतो! मग तुझी माणसं आली आणि आम्ही राजवाड्यावर परत आलो.
'पण हा कुमार! कालपासून एक शब्द बोलत नाहीय! रिॲशक्शन आहे म्हणतो'
राणीसाहेब काही वेळाने म्हणाल्या, 'येईल गं ठिकाणावर काही दिवसांनीतू सुखरूप परत आलीस' काही वेडबिद्रं झालं नाही यातच मला केवढं समाधान आहे!'
'पण आत्या! तुला कुमारच्या वागण्याचं काहीच नवल वाटत नाही? मी माझ्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिलं नसतं तर माझा यावर विश्वासच बसला नसता! तू अशी गप्प का?'
'अगं मलाही नवल वाटतंय ना! पण जसा तुझ्याशी तसाच माझ्याशीही त्या प्रकाराबद्दल एक शब्द बोलायला तयार नाही! एवढीच कृपा की सरळ बोलतो आहेनाहीतर काही काही वेळा त्याच्या तोंडचा 'मातोश्री'हा शब्द एखाद्या शस्त्रासारखा झोंबतो' जरा वेळाने राणीसाहेब म्हणाल्या,
'रात्री खूप उशिरा परत आलात ना? सकाळी झोप कशी काय लागणार? दुपारची विश्रांती घे जा.'
गायत्री खोलीबाहेर गेली.

***

दुपारी चारच्या सुमारास दारावरचा पहारेकरी राणीसाहेबांना भेटायला आला. त्यांना सलाम करीत म्हणाला,
'राणीसाहेब, राजवाड्याबाहेर खूप माणसं जमायला लागली आहेतअजूनही बाहेरून येताहेततसे लोक खुशीत दिसतातपण एव्हानाच दोन अडीचशे माणसं जमली आहेत.'
'असं करकोणाला तरी पाठवत्या गर्दीतल्या वेगवेगळ्या पाचसात जणांना विचारकशासाठी जमले आहेतआणि मला येऊन सांग.'
'जी, राणीसाहेब.'
दहापंधरा मिनिटात तो परत आला.
'राणीसाहेब, शहरात बातमी पसरली आहे, की काल रात्री गायत्रीबाई साहेबांना काही गुंडांनी पळवून नेलं होतंआणि कुमार एकटे तिथे गेले, त्या गुंडांपैकी दोघांना ठार करून त्यांनी गायत्रीबाई साहेबांना सुखरूप परत आणलंराणीसाहेब, हे खरं आहे का?'

एवढी तपशीलवार माहिती जाहीर झाल्यावर त्या ती गोष्ट कशी नाकारणार?
'होथोडंसं तसं झालं खरं; पण ही बातमी पसरली कशी? केव्हा? कोणी पसरवली?'
'ते काही त्यांना माहीत नाही; पण लोक कशासाठी जमले आहेत माहीत आहे का? त्यांना कुमारांचा सत्कार करायचा आहे!'
क्षणभर राणीसाहेबांना काय करावं ते सुचेनाच. अर्थात शेवटी एवढ्या मोठ्या संख्येने आणि सद्भावनेने जमलेल्या जनसमुदायाला निराशा करणं अशक्यच होतं.
'बरंहे बघपाचसात माणसं जमवं, मोठ्या दरवाजापुढच्या पायऱ्याच्याखाली दोन टेबलं मांड, मागे पाचसात खुर्च्या मांड, टेबलांवर लाल नाहीतर निळा कपडा घाल, पुढच्या बाजूने फुलांच्या माळा लावथोडक्यात, व्यासपीठासारखी तयारी कर.'
'हो, राणीसाहेब.'
तो गेल्यावर राणीसाहेब स्वत: खाली गेल्या. मोठ्या दरवाजात पोहोचल्या. त्यांना पाहताच लोकांतून गर्जना आली
'राणीसाहेब की जय!' 'प्रदीपकुमार की जय!'
त्यांनी एक हात वर करून समुदायाला शांत केलं.
'आमच्या घराण्यावरची आपली निष्ठा आणि आपलं प्रेम पाहून मला अतिशय आनंद होत आहे.' त्या जरा पुढे येत म्हणाल्या.
'आपली इच्छा प्रदीपकुमारांचा सत्कार करण्याची आहे हे समजलं त्याबद्दल मला आनंदच आहेमात्र काल रात्रीच्या श्रमाने कुमार जरा थकलेले आहेतत्यांना यायला जरा उशीर होईलतोपर्यंत शांत राहा.'
शेजारच्या एका माणसाला त्यांनी अंगणात ध्वनिक्षेपक बसवून त्यावरून भक्तिसंगीत ऐकवण्याची व्यवस्था करायची आज्ञा दिली; आणि त्या वर, कुमारच्या खोलीकडे निघाल्या.
ही भलतीच समस्या अगदी अनपेक्षितपणे समोर उभी राहिली होती! होकार दिला तरी पंचाईत, नकार दिला तरी पंचाईत! आणि कुमारची प्रतिक्रिया काय होईल याची त्यांना जराशी धास्तीच वाटत होती.
दारावर टकटक करताच त्याचाच आवाज आला.
'या आता.'
दार उघडून राणीसाहेब आत गेल्या, आपल्यामागे त्यांनी दार बंद केलं. कुमार बाहेरच्याच खोलीत खुर्चीत बसला होता; पण आरामात बसलासा वाटत नव्हता. राणीसाहेबांना पाहताच जरा सावरून बसत तो म्हणाला, 'मातोश्री! आपण?'
त्याच्या समोरच्या खुर्चीवर बसत राणीसाहेब म्हणाल्या,
'कुमार, एक अनपेक्षित समस्या समोर उभी राहिली आहे.'
'समस्या? काय?'
'अंकाल रात्रीकाल मध्यरात्रीनंतर जो काही प्रकार घडला त्याची बातमी शहरात पसरली आहेमला कळत नाही हे कसं झालं ते- मी, सोपान आणि माझे तीन कमांडो यांच्या व्यतिरिक्त हे कोणासही कळायलाच नको होतं; पण कळलेलं आहेआणिआणि काय झालंयखाली आवारात पाचसातशेचा जमाव आहे.'
'आवारात? जमाव? काही गोंधळ घालताहेत की काय?'
'अरे नाही! तसं मुळीच नाही! ती सारी माणसं प्रदीपकुमार यांचा सत्कार करायला जमली आहेत! त्यांच्या शौर्याचा सत्कार करायला!'
'प्रदीपकुमारचा! म्हणजे माझा! पण मी तर तिथे गेलोसुद्धा नाही!'
'पण कुमार, ते कोणालाच माहीत नाही!'
त्या गप्प बसल्या. कुमार त्यांच्याकडे एकटक पाहत होता. त्याच्या नजरेखाली त्या खूपच अस्वस्थ झाल्या.
'म्हणजे हा सत्कार स्वीकारण्यासाठी मी खाली त्यांच्यासमोर जावं असं सुचवायला आपण आला आहात, मातोश्री?' तो जरा कडवट आवाजात म्हणाला. 'ज्या कृत्यात माझा काडी उचलण्याइतकाही सहभाग नाही त्यासाठी मी हारतुरे स्वीकारायचे? गौरव करून घ्यायचा? छान!'
'कुमार, प्लीज! माझी परिस्थिती जरा पाहशील का? मी काही हे ठरवून केलेलं नाहीमला कशाची कल्पनाही नव्हती; पण आता या क्षणी मी काय करू? त्यांना नकार कसा देऊ? कोणत्या कारणासाठी देऊ? मी आजवर कशासाठीही गळ घातलेली नाहीआता विनंती करते, काही तास त्यांच्यासमोर चलमाझ्यासाठीप्लीज!'

राणीसाहेबांनी मान खाली घातली, त्या खुर्चीवरून उठल्या, दाराकडे गेल्या. दारापाशी थांबून मागे वळून न पाहत त्या म्हणाल्या,
'मी त्यांना तास दीडतास शांतपणे वाट पाहत बसायला सांगितलं आहे-'
मग त्या बाहेर गेल्या. त्यांच्यामागे दार बंद झालं.

***

सकाळी जाग आली तेव्हा कुमारला आपल्या पलंगाशेजारी राणीसाहेब दिसल्या होत्या. तोच आधी मोठा धक्का होता आणि त्यातून सावरायला त्याला उसंतच मिळत नव्हती. आधी राणीसाहेबांनी रात्रीची ती विलक्षण हकीकत ऐकवली होती.
सोपान! साधाभोळा सोपान! त्याने आपली भूमिका वठवली होती! नुसती वठवलीच नव्हती, अचाट शौर्याची आणि साहसाची कृत्यं केली होती! सोपानने!
आणि सोपानशी दोन शब्द बोलून होतात न होतात तोच ती गायत्री खोलीत आली होतीत्याच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव करण्यासाठी! जी माणसं काळी का गोरी हेही त्यानं पाहिलं नव्हतं त्यांच्या समोरासमोरच्या जीवघेण्या द्वंद्वात वध करण्यासाठी! कोणत्या त्या तोफखान्याच्या इमारतीतून पाच-सहा जणांशी संघर्ष करून मोठ्या हिकमतीने तिची सुटका करण्याबद्दल!
व्यानोक्ती आणखी कोठपर्यंत पोहोचू शकत होती?
क्षणाक्षणाला पायाखालची वाळूच सरकत असल्यासारखा तोल जात होतालोक बाहेर त्याच्या शौर्याची गाथा गात होते; पण प्रत्यक्षात त्याचं आयुष्य किती निरर्थक होतं! किती दिशाहीन होतं!
मद्यपान, जुगार, स्त्रियांशी चाळे, याव्यतिरिक्त त्याने आजवरच्या आपल्या आयुष्यात काय केलं होतं?
आणि हे सगळं कमीच होतं म्हणून की काय, आता बाहेर त्याच्या जाहीर स्वागतासाठी ही शेपाचशे माणसं जमली होती! आणि राणीसाहेब त्याला खाली चलण्याची विनंती करत होत्या!
सोपान, गायत्री आणि राणीसाहेब तिथे हजर असताना तो या लोकांचं स्वागत कसं स्वीकारणार? आणि क्षणभरासाठी समजलं, की केवळ राणीसाहेबांच्या विनंतीखातर त्याने या फार्समध्ये भाग घेतलायानंतरचा प्रत्येक दिवस तो राणीसाहेब, गायत्री, सोपान यांच्या नजरांना नजर तरी कशी देणार?
त्याला यापुढे राजवाड्यात राहणंच अशक्य होतं. थोडा जरी स्वाभिमान जिवंत असेल तर त्याने इथून निघावं हेच चांगलं...
आणि आताच्या आता! या क्षणी!
अजून फारतर अर्धापाऊण तास ते त्याची वाट पाहतील...
आणि मग लगेच वर येतील.
मग त्याला संधी मिळणार नाही.
कुमार उठला, त्याने अंगावरचे कपडे बदलून त्यांच्याऐवजी खाकी रंगाचे, प्रवासास योग्य असे कपडे चढवले. एक साखळीची बॅग घेतली, बॅगमध्ये घाईघाईने आणखी दोन मॅनिले, दोन पँट, अंडरवेअर, सॉक्स, रुमाल, दाढीचं सामान, टॉर्च असं भराभर घातलं. आता पैसे! पैसे हवेत!
मागचा मूर्खपणा आता कामी आला. बेफिकीरपणे शर्टाच्या, पँटच्या खिशात त्याने पैसे राहू दिले होते. सोपानने ते एकत्र करून चेस्टच्या ड्रॉवरमध्ये ठेवले होते. आता कुमारने ड्रॉवर पुढे ओढला.
आत नोटांचा गठ्ठा होता, सुट्या नाण्यांच्या चळती होत्या. काही नोटा त्याने खिशात कोंबल्या, बाकीच्या बॅगच्या तळाशी ठेवल्या, बॅगची चेन सरकवली आणि तो खोलीबाहेर पडला.
पण तो दारापाशीच थांबला.
तो राजवाडा सोडून जात होता; पण पळून जात नव्हता.
आतापर्यंत आयुष्य अपयशी झालंच होतं.
त्यात हा पळपुटेपणाचा आणखी कलंक नको.
सरळ पत्र लिहून ठेवून जायला काय हरकत होती?
इतके दिवस मातोश्रींना (विना उपहास मनात आलेला शब्द) खूप त्रास दिलाच होता. असं न सांगता जाऊन त्या क्लेषात आणखी भर कशाला घालायची?
तो परत आत आला, टेबलापाशी बसला, पॅड पुढे ओढलं.
जरासा विचार करून तो लिहायला लागला

***

परमांप्रेय मातोश्रींना,
चि. प्रदीपकुमारचा स.न.
मी आता एका मोठ्या चमत्कारिक अवस्थेत आहे.
कारणात जाण्याची आवश्यकता नाहीतुम्ही
जाणालच की मला यापुढे राजवाड्यावर राहणं
सर्वथा अशक्य होणार आहे. खरोखर तसंच निघून
जाण्याची इच्छा होती; पण विनाकारण आपल्याला
क्लेष देण्यात काय अर्थ होता?
माझे जर काही अपराध असतील तर ते ओमिशनचे
आहेत, कमिशनचे नाहीत; पण नाकर्तेपणा हासुद्धा
कधी कधी फार मोठा अपराध होऊ शकतो.
कदाचित जीवनातील जे स्थान माझ्यावर लादलं गेलं
आहे त्यासाठी मी अपात्र असेन.
मी राजवाड्यातून निघून जात आहे. कृपया माझा
शोध घेण्याचा प्रयत्न करू नये. माझी काळजीही करू
नये.
आपला नम्र, प्रदीपकुमार.
पत्राची घडी करून त्याने ती टेबलावर मधोमध ठेवली आणि मग मात्र तो झपाट्याने खोलीबाहेर पडला.
वेळी-अवेळी वापरण्यासाठी एक मागचा जिना होता. आताच्या वेळी सगळे नोकरचाकर बाहेरच्या हॉलमध्ये जमलेले असणार आणि मागच्या बाजूस कोणीही नसणार ही त्याची अटकळ खरी ठरली.
जिना उतरून तो खाली आला. मागच्या बाजूस गड्यांसाठींच्या खोल्या होत्या. त्यांना वळसा घालून तो मागच्या अंगणात आला आणि मागच्या कामगारनोकर इत्यादींसाठी असलेल्या फटकातून बाहेर पडला... आणि रस्त्याला लागला.

***

17.

साडेपाचच्या सुमारास राणीसाहेबांनी अजयला वर पाठवलं. कुमारची यायची तयारी झाली का नाही ते पाहायला.
अजय खोलीत आला; पण आत सर्वत्र सामसूम होती. तीनही खोल्या रिकाम्या होत्या आणि मग त्याला टेबलावरच मध्यभागी ठेवलेलं ते पत्र दिसलंते वाचून होताच त्याची घडी करून ती खिशात ठेवीत तो घाईघाईने खाली गेला. राणीसाहेब लोकांच्या गराड्यात होत्या;
'काय रे सोपान! कुमार तयार झाला की नाही अजून?' अजयला पाहताच त्यांनी विचारलं.
'राणीसाहेब, कुमारनीच आपल्याला मिनिटभरासाठी वर बोलावलं आहेजरा महत्त्वाचं काम आहे म्हणतातयेता?'
'आता काय?' म्हणत त्या अजयबरोबर निघाल्या.
अजयने त्यांना आधी खोलीत जाऊ दिलं आणि मग आपण आत येऊन दार मागे बंद केलं आणि खिशातलं पत्र काढून ते पुढे करीत तो म्हणाला, 'राणीसाहेब हे बघा.'
राणीसाहेबांनी पत्र वाचलं आणि त्या मटकन् एका खुर्चीत बसल्या. डोक्यावर हात ठेवून त्या म्हणाल्या.
'आता काय करायचं रे अजय?'
'ते मागाहून पाहू, राणीसाहेब,' अजय म्हणाला. 'आधी हे ध्यानात घ्याकुमार रागारागानं निघून गेलेले नाहीतजरा थांबा हं.'
तो आत गेलाड्रेसरचा ड्रॉवर उघडून त्याने आत पाहिलं. तो बाहेर येऊन म्हणाला, 'आणि राणीसाहेब, त्यांनी बरोबर हजाराच्यावर रक्कमही नेलेली आहेतेव्हा त्यांची काळजी करू नका.'
'ते खरं आहेआणि पत्रही समंजसपणाचं आहेकोणावर दोषारोप नाहीत, कुत्सित भाषा नाही; पण आता काय करायचं रे. खाली तर शेकड्यांनी माणसं जमली आहेतआणि तासाभरातच कुमार येताहेत असं मी त्यांना सांगून बसले आहेआता कसं सांगू की कुमार बाहेर गेलेत म्हणून?'

‘त्यांना काही सांगण्याची आवश्यकता नाही. तासाभरात कुमार येतोल म्हणून तुम्ही त्यांना सांगितलंत ना? मग तासाभरात कुमार त्यांना अवश्य भेटतील.’
‘कसे भेटणार? तो तर...’
मग राणीसाहेब गप्प बसल्या. अजय स्वत:च्या छातीवर बोटे आपटत होता.
‘तू?’ राणीसाहेब नवलाने म्हणाल्या.
‘का नाही? काल एवढ्या आणीबाणीच्या वेळी जर मी ती भूमिका वठवू शकलो तर आज काय कठीण आहे? तासाभराचा तर प्रश्न आहेलोक काय सत्कार करतील तो स्वीकारायचावेळच पडली तर चार शब्द बोलायचेकी संपलं. मी एकदा आत आलो की, आपण खरोखरच जाहीर करू शकता की कुमार विश्रांतीसाठी काही दिवस परगावी गेले आहेत. ते अगदी शब्दश: सत्य असेल, नाही का?’
त्या काही न बोलता तशाच बसून राहिल्या होत्या.
‘राणीसाहेब, आपण खरोखरच काही काळजी करू नका. खाली जाऊन सांगा, की दहापंधरा मिनिटांत कुमार येत आहेत. राणीसाहेब, सर्वकाही व्यवस्थित होणार आहे.’
एक सुस्कारा सोडून त्या उठल्या आणि सावकाश सावकाश खोलीबाहेर गेल्या.

***

आताची कुमारची भूमिका वठवण्याची ही शेवटचीच वेळ होती.
एका शौर्याच्या कृत्याबद्दल सत्कार स्वीकारायला जाण्यासाठी.
मग त्यासाठी रुबाबदार पोशाख नको का?
अजयने निळसर डेनिमचा शर्ट आणि फिकट निळसर जीन यांची निवड केली. पायात घोट्यांपर्यंत पोहोचणारे तपकिरी रंगाचे बूट घातले. अलमारी बंद करता करता त्याला समोर रिव्हॉल्व्हर दिसलं.
का नको? शेवटचंच एकदा! त्याला मोह झाला. त्याने कमरेभोवती पट्टा आवळला, सवयीने रिव्हॉल्व्हर होस्टरमधून बाहेर काढलंमग त्याला आठवलं, आतल्या दोन गोळ्या काल झाडल्या आहेत. पेटीतली दोन काडतुसं त्याने रिकाम्या चेंबरमध्ये भरली, चेंबर गर्रकन् फिरवून पाहिलं आणि मग रिव्हॉल्व्हर होस्टरमध्ये घातलं.
आता भरदिवसा आणि गायत्रीसारख्या त्याला चांगलं ओळखणारांसमोर जायचं होतं. फोटोकडे पाहत त्याने केसांची रचना ठाकठीक केली आणि शेवटचा सुरक्षिततेचा उपाय म्हणून टेबलाच्या ड्रॉवरमधला अगदी अगदी फिकट निळ्या काचेचा गॉगल घातला.
मग तो बाहेर आला, आपल्यामागे त्याने दार लावून घेतलं आणि मग मोठ्या जिन्याने तो खाली आला.
‘कुमार आले!’ ‘छोटे मालक आले!’ हॉलमध्ये जमलेल्या लोकांच्यात आवाज आला. तो जिन्याच्या शेवटास येताच लोकांनी त्याला वाट करून दिली. मोठ्या दरवाजापाशीच राणीसाहेब आणि गायत्री उभ्या होत्या. शिष्टाचार आणि उच्चपदस्थांचा सन्मान, या दोन्ही कारणांसाठी कुमारांनी राणीसाहेबांना वाकून नमस्कार करणं योग्य ठरलं असतं; पण आजवरच्या कुमारच्या वर्तनाशी ते एकदम विसंगत ठरलं असतं. त्या दोघींकडे पाहून मान किंचित हलवत अजय त्यांच्यापुढे गेला आणि मोठ्या दरवाजात येऊन थांबला.
समोरचं अंगण खरोखरच लोकांनी भरून गेलं होतं. तो दाराच्या चौकटीत दिसताच लोक जागचे उठून उभे राहिले आणि त्यांच्यातून घोषणा यायला लागल्या
‘प्रदीपकुमार की जय!’
‘प्रदीपकुमार की जय!’
अजयने एक हात वर करताच त्या घोषण थांबल्या. मोठ्या पायऱ्या उतरून तो खाली आला. रंगीत कापडांनी मढवलेली आणि रंगिबेरंगी फुलांच्या माळांनी सजवलेली तीन टेबलं मांडली होती. त्यांच्यामागे सहा-सात खुर्च्या मांडल्या होत्या.
राजवाड्याचा मुख्य दरवाजा पूर्वाभिमुखी होतातेव्हा आता आपोआपच सूर्य अजयच्या मागे आला होता आणि समोरचा सर्व जनसमुदाय पश्चिमेच्या तिरकस उन्हात होता. आपला चेहरा सावलीत असणार आणि ते सूर्याविरुद्ध पाहणार, तेव्हा आपोआपच आणखी सुरक्षितता येणार, अजयला वाटलं.
तो पायऱ्या उतरून टेबलामागच्या खुर्चीपाशी उभा राहिला. राणीसाहेब आणि गायत्री त्याच्या मागोमाग पायऱ्या उतरून येत होत्या. राणीसाहेब मधल्या खुर्चीवर बसल्या, त्यांच्या पलीकडच्या खुर्चीवर गायत्री बसली. दुसऱ्या बाजूच्या खुर्चीवर अजय बसला.
एक जरा प्रतिष्ठित वयस्क माणूस पुढे आला. त्याने अजय, राणीसाहेब आणि गायत्री यांना वाकून नमस्कार

केला आणि मागे जमलेल्या लोकांकडे वळून तो बोलायला लागला. त्याने अनेक सभा गाजवल्या असल्या पाहिजेत. बोलण्यात तो अगदी पटाईत होता. अजिबात अडखळत नव्हता.
'मित्रहो आणि बंधू भगिनींनो, आपण इथे अगदी स्वखुशीने, उत्स्फूर्तपणे जमलेलो आहोत. काही औपचारिक सभा नाही. इथे अध्यक्ष, प्रमुख वक्ता, निमंत्रक असला काहीही प्रकार नाही. आपले प्रदीपकुमार यांच्याबद्दलचा आपला आदर आणि त्यांच्याबद्दल आपल्या मनात असलेलं प्रेम व्यक्त करण्यासाठी आपण जमलो आहोत.'
अपेक्षेप्रमाणे या वाक्याने खूप टाळ्या घेतल्या.
'एखाद्या नाटक सिनेमात किंवा कादंबरीतच शोभेल अशी एक विलक्षण घटना काल रात्री आपल्या शहरात घडली. काही समाजकंटकांनी आपल्या या गायत्रीदेवींचं अपहरण केलंमागाहून लक्षात आलं, की कारस्थानाचा रोख गायत्रीदेवींवर नसून प्रदीपकुमार यांच्यावर होता. बारा वाजेपर्यंत प्रदीपकुमारांनी एकट्याने त्या ठिकाणी हजर व्हावे, अन्यथा गायत्रीदेवींच्या आयुष्याला धोका आहे अशी त्यांना धमकी देण्यात आली.
'अभिमानाची गोष्ट ही, की पोलिसांची अथवा अन्य कोणाचीही मदत न घेता प्रदीपकुमार एकट्याने त्या विवक्षित स्थळी हजर झाले. आपल्या शौर्याच्या, चातुर्याच्या आणि हिकमतीच्या जोरावर त्यांनी त्या समाजकंटकांचा डाव त्यांच्यावरच उलटवला. त्यांच्यापैकी दोघांना ठार केलं, दोघांना जखमी केलं आणि गायत्रीदेवांना त्यांच्या कचाट्यातून सुखरूप सोडवून राजवाड्यावर परत आणलं.'
पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट. अजयला मनोमन नवल वाटत होतं की या साऱ्या गुप्त गोष्टी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचल्याच कशा?
'आपल्या शहरात अनेक आपमतलबी लोक आहेत. नाना अफवा उठवून, लोकांना फसवून आपला स्वार्थ साधण्याचं काम ही मंडळी करीत असतात. आपल्याला माहीत असेलच, की शहरात गेले कित्येक दिवस आपल्या प्रदीपकुमारांबद्दल नाना प्रकारच्या अफवा उठवण्यात येत होत्या. हा केवळ त्यांच्या चारित्र्यहननाचा एक अत्यंत निंद्य प्रयत्न होता.
'आपल्या प्रत्यक्ष वर्तनानेच प्रदीपकुमारांनी या अफवांतला फोलपणा सिद्ध केला आहे. आपल्या शूर, हिकमती, धाडसी वर्तनाचा आदर्श आपल्या सर्वांसमोर ठेवला आहे. ईश्वर आपल्या प्रदीपकुमारांना दीर्घायुष्य देवो अशी माझी प्रभूचरणी प्रार्थना आहे.'
पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट.
'आम्हा सामान्य नागरिकांच्या आदराचे आणि प्रेमाचे प्रतीक म्हणून आम्ही प्रदीपकुमारांना देत असलेले शाल आणि श्रीफळ याचा त्यांनी स्वीकार करावा अशी मी त्यांना विनंती करतो.'
एका गृहस्थाने वक्त्यांच्या हातात शाल, श्रीफळ आणून दिलं.
अर्थात, अजयला खुर्चीवरून उठून टेबलाला वळसा घालून टेबलासमोर यावं लागलं. त्या गृहस्थांनी शाल त्याच्या खांद्यावर घातली आणि हातात श्रीफळ देऊन नमस्कार केला.
पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट.
'मला कल्पना आहे,' वक्ते पुढे बोलू लागले, 'बऱ्याच लोकांची प्रदीपकुमारांना स्वहस्ते पुष्पगुच्छ वगैरे देण्याची इच्छा आहे. मी प्रदीपकुमारांना विनंती करतो की त्यांनी दोन शब्द बोलावेत आणि आपल्या प्रेमाच्या देणग्यांचा स्वीकार करावा.'
सर्वांना नमस्कार करून वक्ते दूर श्रोत्यांत जाऊन बसले.
आता अजयला दोन शब्द तरी बोलण्यावाचून गत्यंतरच नव्हतं.
मग त्याच्या मनात विचार आलाकुमारविषयी दोन चांगले शब्द या वक्त्यांनी ऐकलेच आहेत, तोच धागा पकडून आणखी चार शब्द बोलायला काय हरकत आहे? आणि त्याने जी इतकी स्वगतं पाठ केली होती त्यांचा उपयोग नाही करायचा तर केव्हा?
सर्व श्रोत्यांना नमस्कार करून तो बोलायला लागला,
'आपण सर्वांनी दाखवलेल्या प्रेमाच्या आणि आपुलकीच्या भावनेने मला खरोखरच अतिशय आनंद झाला आहे. आपणांपैकी बरेच माझ्यापेक्षा वयाने, अनुभवाने, ज्ञानाने श्रेष्ठ आहेत. आताच ज्यांनी माझ्याविषयी चार शब्द सांगितलेमला त्यांचं नाव माहीत नाही'
लोकांमध्ये हसण्याची खसखस पिकली. एका हाताने 'नाही नाही'ची खूण करीत अजय म्हणाला,
'नाहीनाहीही हसण्याची गोष्ट मुळीच नाहीत्यांचा माझा परिचय नाहीमी त्यांना संपूर्ण परका आहेतेव्हा त्यांनी

कोणत्याही खाजगी लाभासाठी माझी स्तुती केलेली नाही हे उघड नाही का? त्यांची प्रतिक्रिया ही सर्वसामान्य माणसाची प्रातिनिधिक प्रतिक्रिया आहे असाच यातून अर्थ निघत नाही का? मी तर समजून चालतो की, हेच लोकांचे माझ्याबद्दलचे प्रांजळ मत आहेआणि त्याबद्दल मी आपला सर्वांचा आभारी आहे.'
टाळ्या.
'माझ्यासंबंधात काही काही बोललं जातं त्या अफवा आहेत असं ते म्हणाले होते. आता मी सांगतो, की त्या अफवा नाहीत. माझं वागणं खरोखरच जरा स्वच्छंदीपणाचं आहे. मी कोणावरही अन्यायअत्याचार केलेला नाही; पण जरा बेजबाबदारपणे वागत असतो ही गोष्ट खरी आहे; पण वडीलधारी माणसं लहानांच्या लहानमोठ्या चुकांवर नेहमीच पांघरून घालत असतात, नाही का?'
काहीक्षण शांतता, आणि मग जोराच्या टाळ्या.
'ज्या घटनेसंदर्भात आपण सर्व जमला आहात त्या घटनेबद्दल दोन शब्द बोलायलाच हवेत, नाही का? सुरुवात काल रात्री अकराच्या सुमारास आलेल्या फोनपासून झाली.' टेबलामागच्या गायत्रीकडे हात करीत अजय म्हणाला, 'फोनवरच्या मानसाने सांगितलं, गायत्री आमच्या ताब्यात आहे.' राणीसाहेबांच्या जवळच्या नातलगाचा असा एकेरी नावाने उल्लेख! 'बाराच्या आत इथे एकट्याने या नाहीतर गायत्रीचं नखही तुमच्या दृष्टीस पडणार नाही,' अशी धमकी. संतापाने मनाचा भडका उडाला; पण माझ्यासारख्या जरा बहकलेल्या, जरा बेजबाबदार माणसाच्या संतापाला काय किंमत होती?
'पण मग संतापाने मनात विचार आलामाझ्या धमन्यांतून क्षत्रियाचं रक्त वाहत आहे. राजेसाहेबांनी सक्ती करून मला शस्त्रास्त्रांचं, मार्शल आर्टचं, नि:शस्त्र झटापटीचं शिक्षण घ्यायला लावलं ते कशासाठी? ते एक परंपरागत वारसा जपत होते. मी प्रत्यक्षात राजसिंहासनावर बसणारही नाही; पण माझा जन्म राजघराण्यातला आहेआणि राजाला सर्वगुणसंपन्न असायलाच हवं. परंपरागत संकेत ते पालन करीत होते, त्या क्षत्रियवंशाचा वारसा मी वागवत होतो.
'आमच्या क्षत्रिय वंशात परपुरुष स्त्रीला केवळ आरशातच पाहू शकतो. आमच्या क्षत्रियवंशात परपुरुषाचा स्पर्श होऊ नये म्हणून स्त्रिया अग्निप्रवेश करतात. अशा क्षत्रिय वंशातील स्त्री या समाजकंटकांनी पळवून नेली होती आणि मला उघड आव्हान दिलं होतं.
'मातापित्यांची शिकवण मनात खोलवर रुजली असली पाहिजे. ती आता वर आली. मी हे आव्हान नाकारूच शकत नव्हतो. भले त्यासाठी मला माझा प्राण गमवावा लागला तरी हरकत नाही! आव्हान मिळूनही मी भ्याड़ासारखा कातडी बचावण्यासाठी चार भिंतीमागे लपून बसलो असतो तर? तर प्राण वाचवला असतापण बाकी सर्व गमावलं असतं! जगात उजळ माथ्याने वावरणं अशक्य झालं असतं. किड्यामुंगीसारखं सांदीकोपऱ्यात लपून राहावं लागलं असतं. आज माझा सन्मान करणारे तुम्हीतुम्हीच माझी छी: थू! केली असती
'मी गेलो आणि आवश्यक ते सर्व केलं. दैवाची साथ मिळाली असं समजा. दैव शूराचीच सोबत करतं. मी माझ्या कार्यात यशस्वी झालो. गायत्रीदेवी सुखरूप परत आल्या आणि म्हणून आपल्या सत्काराचा स्वीकार करण्यासाठी आनंदाने आलो. आपले सर्वांचे आभार.'
कितीतरी वेळ टाळ्यांचा कडकडाट चालला होता.

***

मघाचेच प्रतिष्ठित वयस्क गृहस्थ पुढे आले. हात जोडून म्हणाले,
'कुमार, काहीजण आपली वैयक्तिक गाठ घेऊन आपला सन्मान करू इच्छितात. माझी विनंती आहे की आणखी काही वेळ थांबून त्यांना ती संधी द्यावी.'
'काही हरकत नाही.' अजय म्हणाला.
त्या गृहस्थांनी हात वर करताच गर्दीतील काही काही मंडळी उठली. त्यांनी शिस्तीने रांग लावली.
काहींच्या हातात पुष्पगुच्छ होते, काहांच्या हातात एकेकटीच पण टपोरी फुलं होती, काहींच्या हातात पुष्पमाला होत्या, काहींच्या हातात छोट्यामोठ्या पेट्या होत्या. अजय सर्व घेत होता, शेजारच्या टेबलावर ठेवत होता.
रांग अजून किती मागेपर्यंत गेली आहे हे पाहण्यासाठी त्याने समोर नजर टाकली. रांगेच्या मध्ये, सुमारे वीस पावलांवर, ओळीने उभे असलेल्या तिघांनी त्याचं लक्ष वेधून घेतलं आणि ते तिघे आणखी पाचसात पावलं पुढे येताच त्यांच्यातल्या पुढच्याला अजयने ओळखलं.
कुणाल!

आणि लगोलग कितीतरी गोष्टींचा आपोआप उलगडा झाला.
कुणाल! गोवर्धनदासांचा मुलगा! त्या कटातला भागीदार! आता रात्रीच्या प्रकारची बातमी सर्वत्र कशी पसरली याचाही उलगडा झाला आणि या सत्कार समारंभाची कल्पना लोकांच्यात कशी पसरवली गेली याचाही उलगडा झाला.
म्हणजे धोका!
त्याने उजवा हात कमरेजवळच्या होस्टरवरून नेला.
ते सर्व ठीक होतं.
मग तो टेबलावरून वाकून राणीसाहेब आणि गायत्री यांना किंचित खालच्या पण अधिकाराच्या आवाजात म्हणाला, 'राणीसाहेब! गायत्री! मला काहीतरी धोका दिसतोदोघीही माना खांद्यात घाला-दोघीही माना खांद्यात घालाआताच्या आता! डू इट!'
दोघींनी क्षणभरच त्याच्याकडे पाहिलं आणि मग टेबलावर दोन्ही हात ठेवून डोकं हातांच्या खाली घेतलं.
एव्हाना ते दोघे दहा पावलांवर येऊन पोहोचले होते.
कुणाल पुढे होता, दोघं त्यांच्यामागे होते.
तिघांच्याही डाव्या हातात मोठमोठे पुष्पगुच्छ होते. एकच गोष्ट अजयच्या बाजूस होती. त्या तिघांच्याही तोंडावर मावळत्या सूर्याची पिवळी किरणे सरळ होती. डोळ्यात नक्कीच दीप आली असली पाहिजे.
कुणालने डावा हात पुढे केला.
'कुमार! आमच्यातर्फे हा गुच्छ!' तो म्हणाला.
अजयने उजवा हात पुढे केला, पण गुच्छाकडे न नेता खाली नेला. त्याचा उजवा हात हलताच त्या तिघांचे उजवे हात खाली गेले होते.
पण तासातासांच्या कठोर सरावाचं फळ आता मिळालं.
हात जितक्या वेगाने खाली गेला तितक्याच वेगाने वर आला. हातात रिव्हॉल्व्हर होतं.
कुणालचा उजवा हात वर येत असतानाच अजयच्या रिव्हॉल्व्हरमधली पहिली गोळी सुटलीती सरळ कुणालच्या छातीत घुसली. रिव्हॉल्व्हर जरासा वळलादुसऱ्याचं पिस्तूल एव्हाना बाहेर आलं होतं; पण ते वर येण्याच्या आधीच त्याच्याही छातीत गोळी घुसली. येथपर्यंत तिसऱ्याला सवड मिळाली होतीत्याचं पिस्तूल बाहेर आणि वर आलं होतं. अजयच्या आणि त्याच्या पिस्तुलांच्या गोळ्या जवळजवळ एकाच क्षणी उडाल्या. अजयची गोळी बरोबर त्याच्या छातीत घुसली आणि त्याच क्षणी अजयच्या डाव्या खांद्यावर जबरदस्त दणका बसला.
पाच सेकंदाच्या आत सर्व प्रकार आटोपलाही होता.
ते तिघं कोसळून खाली पडत होते आणि अजय डोळे घट्ट मिटून डावा खांदा उजव्या हाताने घट्ट धरून टेबलाच्या आधाराने उभा होता.
मग एकच कोलाहल माजला.
राणीसाहेब काही सेकंदच थिजल्यासारख्या जागच्या जागी बसल्याआणि मग त्यांचातला कार्यक्षम प्रशासक जागा झाला. घाईघाईने टेबलाला वळसा घालून त्या पुढे आल्या.
एव्हाना लोक जमावाने पुढे यायला लागले होते.
'कोणीही पुढे येऊ नका!' राणीसाहेब खड्या आवाजात म्हणाल्या. 'कोणी डॉक्टर हजर असतील तर ताबडतोब पुढे या!'
गर्दीतून वाट काढत काढत दोघेजण पुढे आले. अजयकडे बोट करीत राणीसाहेब म्हणाल्या, 'कुमारच्या खांद्याला जखम झालेली दिसतेइथे तात्पुरते उपचार करा आणि त्याला वर न्यामी आमच्या डॉक्टरांकडे निरोप पाठवते.'
मग त्या पुढे झाल्या.
सुमारे तीन निश्चेष्ट देह पडले होते. तिघांच्याही हातात पिस्तुलं होती. ते तिघे कोणत्या उद्देशाने सभेला आले होते आणि कोणत्या निमित्ताने कुमारांच्याजवळ पोहोचले होते हे सारं समोर होतंच.
राजवाडा पोलीस चौकीवरचे इन्स्पेक्टर एव्हाना तिथे पोहोचलेच होते. 'राणीसाहेब...' ते पुढे होत म्हणाले, 'आता आम्ही इथलं सर्व पाहतो. आपण आता गेलात तरी चालेल आणि कुमारांचा जीव वाचला याबद्दल आम्हाला अतिशय आनंद झाला आहे. केवळ त्यांच्या तत्परतेनेच फारच मोठा भीषण प्रसंग टळला. आपण आता अवश्य जा.'

***

राणीसाहेब वर कुमारच्या खोलीत आल्या.
अजयला त्यांनी पलंगावर झोपवलं होतं. राजवाड्यातले डॉक्टर एव्हाना हजर झाले होते. अजय झोपेच्या इंजेक्शनच्या गुंगीत होता.
शर्टची डावी बाही कापून काढली होती डॉक्टर आता जखम साफ करण्यात गुंतले होते. राणीसाहेबांना आलेलं पाहून ते म्हणाले,
'राणीसाहेब, जखम खोल आहे; पण मसलकडची आहेस्नायूंतून गोळी आरपार गेली आहेहाडाला धक्का लागलेला नाहीतसे कुमार नशीबवानच म्हणायला हवेत.'
राणीसाहेब पलंगाच्या जवळ आल्या. अजयला उजव्या कुशीवर झोपवलं होतं. डावा खांदा, मागचा पाठीचा भाग, मानेजवळचा भाग दिसत होता.
आणि त्यांची नजर खांद्याच्या मागच्या भागावर खिळली.
तिथे तुळशीपत्रासारखी एक काळसर जन्मखूण होती.
तुळशीपत्रासारखी जन्मखूण!
त्यांना एकदम जाणवलं, की आपल्या शरीराला कंप सुटला आहे. श्वास जोराने यायला लागला आहे. नाडी दौडायला लागली आहे आणि त्याला कारणही होतं...
कारण राजेसाहेबांच्या खांद्यामागे अशीच जन्मखूण होती आणि कुमारच्या खांद्यामागेही अशीच जन्मखूण होती.
म्हणजे म्हणजेहा अजयहा अजय
हो! तसंच असलं पाहिजे! त्याशिवाय का त्या दोघांच्या चेहऱ्यात इतकं साम्य असेल?
राजेसाहेबांनाच बाहेरच्या एखाद्या संबंधातून
महतप्रयासाने त्यांनी आपलं मन ताळ्यावर आणलं.
या साऱ्या गोष्टी पावशतकापूर्वी होऊन गेल्या होत्या. तेव्हाही त्यांनी त्या स्वीकारल्या होत्या. त्यातून हे फळ अपेक्षितच होतं. आता जरा खोल विचार करूनच पुढचं पाऊल टाकलं पाहिजे.
'कुमार शुद्धीवर आला की माझ्याकडे निरोप पाठवा,' त्यांनी डॉक्टरांना सांगितलं आणि त्या बाहेर पडल्या.

***

अजयला या गुप्त गोष्टीची कल्पना होती का? आतापर्यंतच्या त्याच्या वर्तनावरून तरी तसं वाटत नव्हतं. शिवाय महत्त्वाची गोष्ट ही होती, की नोकरीच्या वा इतर कोणत्या निमित्ताने तो आपण होऊन त्यांच्याकडे आला नव्हता. उलट त्यांनीच त्याचा पत्ता शोधून काढून त्याची भेट घेतली होती. ज्यांनी अजयचं नाव सुचवलं होतंज्यांना राणीसाहेबांनी 'तुझे एक हितचिंतक'असं मोघम नाव दिलं होतं त्यांना याची कल्पना असण्याची शक्यता होती का? राजेसाहेबांच्या अगदी निकट सहवासात येणारांपैकी ते एक होते का? राजेसाहेबांच्या या संबंधाची त्यांना माहिती होती का? या प्रकरणांतून अशी लफडी निर्माण होणार हे उघडच होतंआणि राजेसाहेब ही प्रकरणं बाहेरच्या बाहेर मिटवत असले पाहिजेत. या कामासाठी एखाद्या अत्यंत विश्वासू आणि जबाबदार मदतनीसाची आवश्यकता पडल्यास उदरनिर्वाहाची सोय करणं, या संबंधातून जन्मास आलेल्या मुलाचं वा मुलीचं शिक्षण, पुढे विवाह अथवा एखादी नोकरीव्यवसाययासाठी या 'हितचिंतकांना', या कुटुंबांना वर्ष- सहा महिन्याकाठी भेटी द्याव्या लागत असतीलअशाच अलीकडच्या एखाद्या भेटीत अजय आणि कुमार यांच्या चेहऱ्यातलं साम्य त्यांच्या लक्षात आलं असेलआणि ही योजना पुढे आली तेव्हा निनावी राहण्याच्या अटीवर त्यानी अजयचं नाव सुचवलं असेलही तर्काची साखळी मजबूत नव्हती; पण तरीही अशक्य खास नव्हती. ज्या अर्थी कोणत्याही प्रकरणाचा गवगवा झाला नव्हता, त्याअर्थी ती प्रकरणं यशस्वीपणे हाताळली गेली असली पाहिजेत
एक कुणालचा अपवाद वगळता.
पंचवीससव्वीस वर्षांपूर्वी संजीवनीबाई खरोखरीच सुंदर दिसत असल्या पाहिजेत. राजेसाहेबांच्या सहवासात त्या येणं अशक्य खास नव्हतं; पण कुणाल गोवर्धनदासांचा मुलगा होता आणि गोवर्धनदासांनी ते कुटिल कारस्थान रचलं होतं.
अजयची गोष्ट वेगळी होती. मुख्यत: आता त्यांना कुमारला भेटण्याच्या निमित्ताने राजरोसपणे त्याच्या खोलीत जाऊन त्याच्याशी मोकळेपणाने बोलता येणार होतं. त्याला आपल्या जन्मकथेची काही कल्पना आहे का याची चाचपणी करता येणार होती.

पण त्याचे राजघराण्यावर केवढे उपकार झाले होते!
त्याने गायत्रीची सुटका केली होती तिचं शील आणि राजघराण्याची अब्रू वाचवली होती.
आणि आजच्या संध्याकाळी तर त्यांचा स्वत:चा आणि गायत्रीचाही प्राण वाचवला होता. तीन पिस्तूलधारी मारेकऱ्याना जागच्या जागी ठार केलं होतं. कल्पना येताक्षणीच त्याने संरक्षणाची अशी विद्युतवेगाने कारवाई केली नसती तर राणीसाहेबांचा, गायत्रीचा आणि त्याचाही प्राण गेला असता.
म्हणजे त्यांच्यासाठी जगाचा शेवटच झाला असता.
हे ऋण त्या कधीही विसरू शकणार नव्हत्या.

***

रात्री साडेदहाला त्यांना निरोप आला, की कुमार आता सावध झाले आहेत. काही वेळासाठी त्या त्याला भेटू शकतात.
राणीसाहेब लगबगीने त्याच्या खोलीत आल्या.
डावा खांदा (आणि मागची ती जन्मखूण) पांढऱ्या शुभ्र ड्रेसिंगखाली झाकला गेला होता. अजयचा चेहरा ओढलेला होता; पण त्यांना पाहताच त्याच्या चेहऱ्यावर हास्य आलं.
त्या पलंगाशेजारच्या खुर्चीत बसल्या. शेजारी नर्स होती. तिला त्यांनी बाहेर जाण्याची खूण केली. दोघं खोलीत एकटे राहताच त्यांनी विचारलं, 'आता कसं वाटतं?'
'ठीक आहे; पण अजून गुंगी आहेच.'
'कुमार.' त्या बोलताच त्याने मान जराशी हलवली. हाताने नाहीची खूण करीत त्या परत म्हणाल्या, 'कुमार, पण तुला शंका कशी आली, की काही दगाफटका होण्याची शक्यता आहे?'
'कुणालचा फोटो मी पाहिला होताबारकाईने पाहिला होता- त्या लख्ख प्रकाशात मी त्याला ताबडतोब ओळखलं. तो कोण आहे हे आपल्याला माहीत आहे. तेव्हा माझं अभिनंदन वा माझा सन्मान करायला तो येणं अशक्यच होतंदुसरा एकच उद्देश असू शकत होता, शिवाय त्या तिघांनी पुष्पगुच्छ डाव्या हातात धरले होतेतिघांचे उजवे हात मोकळे होतेसंशयाला आणखी खतपाणी!'
जरासा हसत तो म्हणाला, 'राणीसाहेब, बालपणाचे माझे अनेक हिरो होतेअजूनही आहेतसर्व कथाकादंबऱ्यानाटकांतून वावरणारे. सर्वजण यशस्वी होणारे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवरही मात करणारे. त्या सर्वांचा एक मूलमंत्र होतासर्वांत वाईट गोष्टीसाठी तयार राहाबी प्रीपेअर्ड फॉर दी वर्स्ट! म्हणजे तुम्ही कधीही बेसावध सापडणार नाही
'आणि मी एका हिरोचीच भूमिका करत नव्हतो का? मग मलाही क्षणाक्षणाला सावध असायलाच हवं होतं, नाही का? शिवाय आणखी एक गोष्ट होतीमाझ्या दृष्टीने तरी या विलक्षण नाट्याचा हा शेवटचाच अंक होतासर्वांचा सन्मान स्वीकारून कुमार एकदा राजवाड्यात गेला की विश्रांतीसाठी किंवा हौसेखातर तो काही दिवसांच्या प्रवासावर जाणार होता, आज्ञातस्थळी जाणार होता, नाही का?'
जरा खिन्नपणे राणीसाहेबांनी मान डोलावली.
'मला या नाट्याचा शेवट सुखमय व्हायला हवा होता. अगदी शेवटच्या क्षणी काही विघ्न यायला नको होतंम्हणून मी अत्यंत सावध होतो. मी प्रयत्न केलाईश्वराने मला यश दिलं.'
एवढ्या बोलण्यानेही त्याला थकवा आला होता. कपाळावर घामाची चमक आली होती. राणीसाहेब उठल्या.
'कुमारहो! इथे आहेस तोवर तुला कुमार म्हणूनच राहावं लागणार आहेमनात भलतंच काहीतरी आणून इथून गायब होऊ नकोस! आमच्यासाठी तू आपला जीव धोक्यात घातला आहेसविश्रांती, वैद्यकीय मदत यांची तुला याक्षणी नितांत आवश्यकता आहेतुझं ऋण फिटणार नाही; पण मदतीची काही संधी देशील की नाही? मला वचन देमानापानाच्या खोट्या कल्पनेपायी काही भलतं करणार नाहीसदे वचन.'
'हो, मी आपलं म्हणणं मान्य करतो.' अजय शेवटी म्हणाला.
'आता विश्रांती घे आणि लवकर पूर्ववत ठणठणीत हो.'
त्याच्या मस्तकावर राणीसाहेबांनी क्षणभर हलकेच हात टेकवला आणि मग त्या खोलीबाहेर गेल्या.

***

18.

अजयच्या मनात खरोखरच विचार आला होता की, प्रकृतीस जरासा आराम पडताच वेश बदलून राजवाडा सोडायचा. कुमारच्या हस्ताक्षरातलं पत्र राणीसाहेबांपाशी होतंच. त्यांना कशाचंही स्पष्टीकरण द्यावं लागणार

नव्हतं; पण आता वचन दिल्यावर इथून हलणं अशक्यच होतं.
फक्त गायत्रीच्या भेटीच्या कल्पनेने तो जरा अस्वस्थ होत होता. तोफखान्यातल्या अंधारयुद्धाने ती आधीच भारावली होतीआता तर शेकडो लोकांच्या साक्षीने, उघड्यावर, दिवसाढवळ्या हे रुद्र भीषण नाट्य घडलं होतंत्याचा तिच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला तर काय नवल? ज्या कुमारला ती एक चैनी, सुखलोलूप, व्यसनी, ऐतखाऊ, नाकाम माणूस समजून चालली होती त्या कुमारने केवळ चोवीस तासांच्या अवधीत एकाहून एक सरस, मन थक्क करणारे पराक्रम केले होतेतिच्या साऱ्या कल्पनाच उलट्यासुलट्या होणार होत्याती भांबावून गेलेली असणारआणि ती त्याला अवश्य भेटायला येणार! त्या भेटीलाच तो मनोमन भीत होता.
रात्री बाराच्या सुमारास त्याने डॉक्टरांनी दिलेली गोळी घेतली. गोळीत वेदनाशामक आणि झोप आणणारं, दोन्ही रसायनं होती. काही वेळातच झोप लागली.

***

जाग आली तेव्हा सकाळचे दहा वाजले होते. नर्स हजरच होती. तिने खाली निरोप दिला. एक गडी चहा घेऊन आला. नर्सने टेम्परेचर पल्स इत्यादी मोजलं, कागदावर नोंद करून ठेवली. चहाबरोबर तिने एक गोळी दिली. त्याने गोळी घेतल्यावर नर्स म्हणाली, 'सकाळी दोन वेळा गायत्रीबाई साहेबांकडून माणूस विचारायला आला होता कुमारना जाग आली का? आता त्यांच्याकडे निरोप पाठवू का?'
'हो, पाठवा ना' अजय म्हणाला. जे एवीतेवी व्हायचंच होतं ते लांबणीवर टाकण्यात काय अर्थ होता? येईल त्या प्रसंगाला शक्य तितक्या कौशल्याने तोंड द्यायचं, एवढंच त्याच्या हाती होतं.
एक पातळसर शाल डोक्यावरून आणि खांद्यावरून पांघरून घेऊन अजय बाहेरच्या खोलीत एका खुर्चीवर बसला. त्याचा चेहराच फक्त थोडासा दिसत होता आणि त्याच्या जवळ बसायला खुर्चीच नव्हती. गायत्री आली तरी तिला पाचसहा फुटांवरील अंतरावरच्या समोरच्या खुर्चीतच बसावं लागलं असतं.
पंधरा मिनिटांतच गायत्री खोलीत आली. आधी ती दारातच उभी राहिली. 'अरे! इथे बसलाहेस वाटतं! मला वाटलं झोपला असशील!' ती दारातूनच म्हणाली आणि मग आत येऊन तिने खुर्चीच्या हातावर ठेवलेल्या त्याच्या हाताला स्पर्श करून पाहिला.
'फिव्हरीश आहेच थोडंसं!' म्हणत ती समोरच्या खुर्चीत बसली आणि त्याच्याकडे एकटक पाहू लागली.
'कुमार, मला काय बोलायचं सुचत नाही!' ती म्हणाली.
अजय काहीच न बोलता नुसता बसून होता.
'एकामागून एक असे दोन पराक्रम! आणि एकाहून दुसरा जास्त जबरदस्त! आणि जास्त धोक्याचा! खरोखरच आता मला समजतंअवाक् होणं म्हणजे काय ते!'
अजयने काही न बोलता फक्त मान हलवली. जरा रागाने गायत्री म्हणाली, 'परवापासून पाहते आहेअसा नुसता गप्प गप्प का बसतो आहेस? तू कधी शब्दांसाठी अडलेला मला आठवत नाही! माझा एक तर तुझे दहा शब्द असायचे! बोल की?'
अजयने केवळ हातानेच प्रश्नार्थक खूण केली.
'हे एवढं कसं काय जमलं?'
'वेळ आली की आपोआपच सुचतं' अजय खालच्या आवाजात म्हणाला. 'गोष्टी काही कोणी ठरवून करत नाही.'
काही वेळ गायत्री गप्प बसली. मग जरा पुढे वाकून म्हणाली,
'कुमार, अरे त्या आपल्या सेशेल्सच्या ट्रिपचा अल्बम कोठे आहे रे? माझी एक मैत्रीण जाते आहेतिला दाखवायचा होताइथे असेल? कपाटात? नेहमी आपले अल्बम असतात तिथे? मी पाहातेतू जागचा अजिबात हलू नकोस'
ती उठली, तिने कपाट उघडलं, जरा शोधाशोध केली आणि मग ती म्हणाली, 'होहे पाहा सापडले!'
आणि ती वळली. अजय वर तिच्याकडे पाहत होता.
गायत्रीच्या हातात रिव्हॉल्व्हर होते.
आणि ते अजयवर रोखलेलं होता.
'जागचा हलू नकोस!' ती अतिशय कठोर आवाजात म्हणाली.
'मला माहीत नाही तू कोण आहेस ते; पण एवढं माहीत आहेतू कुमार नाहीस!'
अजय काहीच बोलला नाही.

‘आता का दातांखेळो बसलो? बोल ना! का करू ठार?’
‘मी काय बोलणार? ठार करणार आहेस? कर ठार! चाकू सुरे घेतलेल्या गुंडांना जमलं नाही, पिस्तूल घेऊन आलेल्या तिघातिघांना जमलं नाही ते तुम्हाला सहज जमेल! तुम्हालाज्यांचा प्राण मी एकदा, नाही दोनदा वाचवला आहे! करा ठार!’
‘ओ!’ गायत्रीने पिस्तूल शेजारच्या कोचावर टाकलं. ‘आय ॲचम सॉरी! आय ॲनम सॉरी!’
खुर्चीत बसून तिने दोन्ही हातांची छातीशी घडी केली.
‘मला कशाचा अर्थच लागत नाही! तू आहेस तरी कोण?’
‘तुमच्या केव्हा लक्षात आलं मी कुमार नाही हे?’
‘परवा संध्याकाळीच! कुमार गाडी कशी चालवतो ते मला पुरं माहीत आहे. व्हिलवर त्याचा कायम एकच हात असतो. हॉर्न वाजवण्याची त्याची पद्धत मला माहीत आहे. गाडी राजवाड्यात आल्यावर जोरात वळण घेऊन दारासमोर जोरात ब्रेक लावून थांबवण्याची त्याची सवय मला माहीत आहे’
‘मग तेव्हाच तुम्ही मला थांबवलं का नाही?’
‘माझं चित्त तरी ठिकाणावर होतं का? कोणत्या प्रसंगातून मी गेले होते आठवत नाही का? पळवून नेली, अंधारात खुर्चीला बांधून ठेवली, नाही नाही त्या धमक्या दिल्यामग कुमारम्हणजे तू! आलास, गोळीबार... खरं तर त्या क्षणापासूनच वाटत होतं ही हिंमत, ही धडाडी, ही तत्परता कुमारमध्ये नाहीच! गाडीत बसल्यावर फरक ध्यानात आलाक्षणभर वाटलंआणखीच कुठे तरी नेलं तर? आगीतून निघून फुफाट्यात पडायची! पण गाडी राजवाड्यावरच परत आलीजीव भांड्यात पडलावाटेत बोलायचा प्रयत्न केला; पण तू मला गप्प केलंस’
‘रात्रभर विचार चाललाच होताकुमारच्या जागी हे कोण होतं? पण हे काही फसवाफसवीचं कृत्य वाटत नव्हतंकारण त्या माणसाने आपला जीव धोक्यात घातला होता! तेव्हा काल सकाळी खऱ्या-खोट्याची शहानिशा करण्यासाठी इथे आलेतर प्रत्यक्ष कुमारच भेटला! त्याबद्दल तर काहीच शंकाच नाही! बरं, रात्रीच्या प्रसंगाचं वर्णन केलं तर त्याने त्यापैकी एकही नाकारलं नाही! मग हे काय त्याच्या संमतीनं झालं होतं की काय? कुमार इतका खालच्या पातळीला पोहोचला होता, की त्याने आपल्याऐवजी अशा धोक्याच्या प्रसंगाला तोंड द्यायला दुसऱ्याला पाठवावा? आणि काल संध्याकाळी परत तू हजर! हा गोळीबार, ही समयसूचकता, हे कुमारचं कामच नाही! का पुन्हा लपून बसला आहे?’
मान हलवत अजय म्हणाला,
‘गायत्रीदेवी, तुम्ही कुमारवर वृथा आरोप करीत आहात. त्यांनी कोणतंही भ्याडपणाचं कृत्य केलेलं नाही. मला जरा वेळ द्या खरोखर काय घडलं ते मी तुम्हाला सांगतो.’
‘तुम्हाला पळवून नेऊन तोफखान्यात ठेवल्याचा जेव्हा फोन आला तेव्हा दुर्दैवाने कुमार मद्याच्या नशेत गाढ झोपले होते. त्यांना जाग आणणंसुद्धा अशक्य होतंमीमी सोपानतिथे हजर होतो. वेळ चमत्कारिक होती आणि आणीबाणीच्या प्रसंगी आणीबाणीचेच उपाय वापरावे लागतातमाझ्या आणि कुमारांच्या चेहऱ्यात थोडंबहुत साम्य आहेमला कुमारनीच गाडी चालवायला, पिस्तूल वापरायला शिकवलं आहेमीच राणीसाहेबांना विनंती केली की कुमारच्या ऐवजी; पण त्यांच्याच रूपात त्यांनी मला जाण्याची परवानगी द्यावी.’
‘म्हणजे आत्याला हे सर्व माहीत होतं?’
‘हो, त्यांच्याच परवानगीने हे झालं. मी तिथे हजर झालोईश्वरकृपेने मला यश मिळालंआपण इथे परत आलो.’
‘दुसऱ्या सकाळी, म्हणजे काल, आधी राणीसाहेबांनी आणि नंतर मी, कुमारांना झालेला सर्व प्रकार सांगितला. त्यांची प्रतिक्रिया काय झाली समजायला मार्ग नाही कारण ते काही बोललेच नाहीत.’
‘पण प्रकरण एवढ्यावर संपायचं नव्हतं. काल संध्याकाळी राजवाड्यापाशी लोकांचा जमाव जमला. कुमारांचा सन्मान करण्यासाठी. स्वत: राणीसाहेबांनीच कुमारला आग्रह केला, विनंती केली, की दहापंधरा मिनिटांसाठी त्याने लोकांसमोर यावं...’
‘पण पाचच्या सुमारास मी त्यांना घेऊन जाण्यासाठी इथे आलो तर कुमार नव्हतेच. त्यांनी राणीसाहेबांच्या नावे एक पत्र लिहून ठेवलं होतं आणि ते राजवाडा सोडून गेले होते.’
‘राजवाडा सोडून गेला? कुठे?’
‘काही कल्पना नाही; पण तेव्हा हा विचार करायला वेळ होता कुठे? बाहेर लोकांची भीड लागलेलीसर्वजण कुमारांची वाट पाहत होतेराणीसाहेबांची अवस्था काय झाली असेल?
‘गायत्रीदेवी, मीच राणीसाहेबांना विनंती केलीपुन्हा एकदा, आणि शेवटचं, मला कुमारच्या रूपात लोकांच्यासमोर जाऊ देततिथला प्रसंग आपण स्वत: पाहिला आहेचत्या तीन हल्लेखोरांपैकी एक कुणाल

होता, ज्याने मागे राज्याच्या वारसासाठी दावा केला होतात्या तिघांच्या संशयास्पद हालचालांनी मी सावध झालोआणि त्यांचा नीच बेत हाणून पाडलाआणि दुर्दैवाने असा जखमी झालो नसतो तर कालच्या रात्रीच राजवाडा सोडून आल्या वाटेने गेलो असतोआणि मग राणीसाहेबांवर, तुमच्यावर आणि माझ्यावर ही वेळ आलीच नसती.'
गायत्रीचं आरोपांचं सारं अवसान गळून गेलं होतं.
'म्हणजे आत्याकुमारआणि तू, तू सोपान, तिघांनी मिळून हे नाटक केलं आणि मला मात्र अंधारात ठेवलंत!'
'गायत्रीदेवी, या काही ठरवून केलेल्या गोष्टी नाहीतपरवा रात्री आणि काल संध्याकाळी विचाराला वेळच नव्हतात्या त्या क्षणाला निर्णय घ्यावे लागत होतेयात आपण आपला अपमान झाला आहे अशी मुळीच समजूत करून घेऊ नका.'
पण गायत्रीचा राग कमी झाला नव्हता.
'तू आणि आत्याकरा काय वाटेल ते!'
ती फणकाऱ्याने म्हणाली आणि खोलीबाहेर निघून गेली.

***

बाराच्या सुमारास राणीसाहेब खोलीत आल्या.
त्यांच्या मागोमाग गडी जेवणाची ताटं घेऊन आला. बाहेरच्या खोलीत दोन खूर्च्यांच्यामध्ये त्याने ताटं लावली. फ्रीजमधलं पाणी आणि ग्लास काढून ठेवले. राणीसाहेब म्हणाल्या,
'हे बघ, काही लागलं तर मी घंटा वाजवीन. जा.'
'जी.' म्हणून तो गेला, त्याच्यामागे दार बंद झालं.
'राणीसाहेब...' अजय उभा राहत म्हणाला.
'अजय, आता काही वेळापुरता औपचारिकपणा बाजूला ठेव. मला तुझ्याशी काही काही बोलायचं आहे. मघाशी मला गायत्री भेटली होती. ती बिचारी अगदीच गोंधळून गेली आहे.'
'अगदी साहजिकच आहे. त्यांना कशाचीच कल्पना नव्हती.'
'ते आता राहू दे. बस. जेवायला बस. काही संकोच करण्याचं कारण नाही. बस.'
शेवटी नाइलाजाने अजयला त्यांच्यासमोर बसावंच लागलं.
'आमच्या घराण्यातला गुप्त आणि उघड, सर्व गोष्टी तुला आता माहीत झाल्या आहेत; पण तुझ्याबद्दल मला काही; पण जे काही माहिती नाहीदोन दिवसांनी गेलास तर मनाला चुटपूट लागून राहील त्या अजयचं एक नाव सोडलं तर आपल्याला त्याच्याबद्दल काहीही माहिती नाही! तो कोण, कुठला, वडील काय करत होते, आता कोठे असतात हे सगळं सांग बरं!'
अजयचा चेहरा जरासा खिन्न झाला.
'राणीसाहेब, माझ्या वडिलांना मी पाहिलंसुद्धा नाही. माझ्या लहानपणीच ते गेले. आईला त्यांच्यासंबंधी विचारलं तर ती एवढंच म्हणायची, बाळ तुझे वडील फार फार चांगले होते रे. एवढंच.'
'पण मग उदरनिर्वाह कसा चालत होता?'
'वडिलांना संस्थानकडून काहीतरी पेन्शन मिळत असे. त्याच्यानंतर आईलाही दरमहा संस्थानकडून ती रक्कम यायची.' अजय मागचं आठवत म्हणाला. 'महिन्यादोन महिन्यांनी घरी एक कोणीतरी येत असत. आमच्या प्रकृतीची, माझ्या शिक्षणाची चौकशी करीत असत. त्यांच्याच मध्यस्थीने मला शाळेत शिष्यवृत्ती मिळाली; पण दहावी झालो आणि मी शिक्षण सोडून दिलं. खरंतर त्यात मला फारशी गतीही नव्हती आणि थर्ड क्लास डिग्री घेऊन काय करायचं? त्यापेक्षा ती चार पाच वर्षं व्यावहारिक शिक्षण घेण्यातच घालवली तर फायदा होईल असं मला वाटलं.'
'मग?'
'तेच तर चुकलं. डिग्री फर्स्ट क्लास असो वा थर्ड क्लास असोती घेतली नाही तर अनेक दरवाजे तुमच्यासाठी कायमचे बंद होतात. माझ्यात हरहुन्नरीपणा आहे, धाडसीपणा आहे, बेडरपण आहेही फुशारकी नाही, राणीसाहेबमी अगदी खरं बोलतो आहे; पण नोकरीकरिता क्वालिफिकेशन मागतात ती ही नाहीतडिग्रीच असतात. खरंतर आयुष्य भरकटण्यासारखंच चाललं होतं. नाटकात कामं करत होतो ती हौसेनेपरिश्रमाला कमी नव्हतोकोणाला ठाऊक कधीकाळी चान्स आणि नावलौकिक मिळाला असता की नाही ते! पण म्हणतात ना संधी एकदाच तुमच्या दाराशी येते ती घ्यायला हवी- पुन्हा ती येत नाही
'राणीसाहेब, वास्तविक पाहता तुम्ही माझ्यासाठी योजलेलं काम किती कठीण होतं! पण मी होकार दिला

माझे जे कोणी अनामिक हितचिंतक आहेत त्यांचा विश्वास साथ ठरवलात्यांचं नाव मला कळू शकेल का?'
'नाही.' राणीसाहेब जरा हसत म्हणाल्या. 'ती त्यांची मुख्य अट होती.'
'ते तुम्हाला भेटतात?'
'हो.'
'माझे मनापासूनचे आभार त्यांच्यापर्यंत पोहोचवाल?'
'अगदी अवश्य.'
'गेल्या महिन्याभरात माझ्या आयुष्यात केवढी क्रांती झाली आहे! एका संपूर्ण नव्या जगाची ओळख झाली आहे! राजेसाहेब, राणीसाहेब, कुमार, गायत्रीदेवीआमच्यासारख्या सामान्य माणसांसाठी ही माणसं अतिदूर, अस्पर्शच होतीत्यांच्या इतक्या जवळ येण्याचं भाग्य कोणाला लाभतं? आणि जवळ आल्यावर दिसलं की समाजात उत्सवमूर्तीच्या रूपात वावरणारी ही माणसं आमच्यासारखीच आहेत. त्यांना रागलोभप्रेममममतालोभ मोहअभिमान सर्व काही भावविकार आहेत,' पण जरा वेळ थांबल्यावर अजय म्हणाला,
'राणीसाहेब, तुम्हाला एक विचारू?'
'अवश्य विचार.'
'तुम्ही माझ्यावर इतका विश्वास कसा टाकलात? घराण्याच्या अगदी आतल्या वर्तुळात प्रवेश कसा दिलात? तुम्हाला अशी शंकाही आली नाही का, की मी या संधीचा गैरफायदा घेईन?'
'काही वेळा बाह्य पुराव्याशिवाय एखाद्या व्यक्तीबद्दल वा एखाद्या गोष्टीबद्दल ठाम मत होतं. तर्काचा कोणताही पुरावा देता येत नाही. मनाला आणखी एखादं सहावं इंद्रिय असतं का काय नकळे! माझी खात्री झाली एवढी गोष्ट खरी आहे आणि कोणत्याच बाबतीत तू माझी निराशा केली नाहीसतुझ्यासाठी मी मनात योजलेली गोष्ट अगदीच साधी होतीत्या कामाचं मोल मी हजारात करीत होते; पण प्रत्यक्ष प्राणांची बाजी लावून तू जे काही साध्य करून दाखवलंस त्याचं मोल रुपयापैशांत कसं करू?'
आणि प्रथमच राणीसाहेबांच्या डोळ्यात अश्रू आले.
'राणीसाहेऽब!' अजय जरा गडबडून म्हणाला.
'तरीही शेवटी आपल्यापाशी तीच एकटी मोजपट्टी आहे, नाही का? ही सर्व कामगिरी कुमारने केली असती तर अर्थात तो त्याचा कर्तव्याचाच भाग झाला असतातरीही त्याचं कौतुक झालंच असतं; पण तूतू काहीही केलं नसतंस तरी तुला कोणीही बोल लावला नसता; पण तरीही तू अगदी प्राण पणाला लावून आमच्या शीलाचं, अब्रूचं आणि प्राणांचं रक्षण केलंस.'
राणीसाहेब खाली मान घालून गप्प बसल्या.
'राणीसाहेब, अशी साहसाची उमेद माझ्या रक्तातच असली पाहिजे बघा! कोणता माझा पूर्वज असा बेडर, हिकमती योद्धा होता देवासच माहीत! कदाचित त्याच अज्ञात पूर्वजाचे गुण माझ्या रक्तात आले असतील! पण या सर्व कविकल्पना झाल्या. राणीसाहेबएक सत्य सांगतोमी राजवाड्यात आलो, कुमारच्या संपर्कात आलोका कुणास ठाऊक; पण मला कुमारांच्याबद्दल एक विलक्षण आपुलकी वाटायला लागलीमी तरी एवढंच सांगू शकतो.'
'अजय, तू त्या परवाच्या रात्री गायत्रीला सोडवण्यासाठी तोफखान्यावर निघाला होतासकुमारच्या वेशात होतास माझ्या पायाला हात लावून म्हणालासमला आशीर्वाद द्या! युद्धावर निघालेल्या पुत्राला आशीर्वाद देताना वीरमातेला वाटत असेल तसा अभिमान क्षणभर मलाही वाटला; पण मग ध्यानात आलं, समोर प्रत्यक्ष कुमार नाहीतो दारूच्या नशेत झिंगून पडला आहे.'
'राणीसाहेब! प्लीज! कदाचित तुम्हाला कुमारांच्या खऱ्या स्वभावाची प्रचीती यायची असेल! असं निराशपणे बोलू नका! प्लीज!'
'त्याची सतत भलावण करणारा तूच एकटा निघालास, अजय!'
'माझ्या मनात काय ऊर्मी उसळत होत्या कोणाला माहीत होत्या? मलासुद्धा माहीत नव्हत्या! पण वेळ येताच त्या वर आल्या की नाही? कुणी सांगावंकुमारांच्यातही असं विलक्षण परिवर्तन होणार असेल!'
दारावर टकटक आली. गडी आला होता.
अजयने उठून दार उघडलं.
राणीसाहेब जाण्यासाठी उठल्या.
अजयची खात्री होती, आता पुन्हा त्यांच्यावरचा बुरखा कधीही निघणार नाही. काही क्षण त्याला त्या

बुरख्याआड असलेल्या, एका व्यथेत मातेच दर्शन झालं होतं.

***

19.

अजयच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा होत होती. ते चार-पाच दिवस त्याला विलक्षण कठीण गेले. शहरातील अनेक प्रतिष्ठित मंडळी त्याच्या प्रकृतीच्या चौकशीसाठी राजवाड्यावर येत होती सकाळी नऊ ते अकरा या वेळात तो हॉलमधल्या एका खुर्चीत बसून असे. चाहत्यांची रांग लागलेली असे. कोणी फळं आणत, कोणी फुलं आणतसदिच्छा सर्वांच्याच होत्या.

त्या चार-पाच दिवसांत गायत्री त्याला एकदाही दिसली नाही आणि त्या चार-पाच दिवसांत राणीसाहेब त्याच्याशी सकाळच्या भेटीतल्या दोन औपचारिक शब्दांखेरीज काहीही बोलल्या नाहीत.

पाचव्या दिवशी सकाळी त्याची खात्री झाली की, आता आपली प्रकृती ठीक झालेली आहे. त्या सकाळी रोजचा 'दरबार'संपल्यावर त्याने राणीसाहेब कोठे आहेत याची चौकशी केली. त्या वर होत्या. त्यांना वेळ आहे का याची चौकशी करायला माणूस वर पाठवला.

पाच-सात मिनिटांत त्या स्वत:च खाली आल्या. अजयच्या शेजारच्या खुर्चीवर बसल्या. आसपास गडीमाणसं वावरत होती.

'मातोश्री,' अजय म्हणाला, 'अगदी आवश्यक वाटलं म्हणूनच आपल्याला इथपर्यंत येण्याची तसदी दिली.'

राणीसाहेबांच्या चेहऱ्यावर एक कडवट हास्य होतं.

'मला वाटतं आता कुमारना काही दिवसांसाठी विश्रांतीसाठी कोठेतरी जाण्याची वेळ आली आहे. कुमार उद्याच जात आहेत असं आपण जाहीर केलंत तर छान होईल.'

राणीसाहेब एकदम ताठ झाल्या आणि मग म्हणाल्या,

'हो, सर्व दृष्टींनी योग्य होईल.'

'मी आता वर गेलो तर चालेल का?'

'हो.'

'अजय उठला आणि राणीसाहेबांना अर्धवट नमस्कार करून वर त्याच्या खोलीकडे गेला. तो सर्व दिवस तो खोलीबाहेर पडला नाही.

***

दुसऱ्या दिवशी सकाळी उठताच त्याने पॅकिंग सुरू केलं. अर्थात अंगावर कुमारचेच कपडे घालावे लागणार होतेत्याला इलाजच नव्हता; पण बॅगमध्ये त्याने सोपानचे सर्व कपडे घातले. आपली काही खूणसुद्धा मागे ठेवली नाही. जरा लवकरच तो खाली आला. पुन्हा तो या वास्तूत येणार नव्हता. बागेतून शेवटची एक चक्कर मारण्याची त्याची इच्छा होती.

मोठ्या पायऱ्या उतरून तो बागेत येतो न येतो तोच गायत्री त्याच्यामागून आली. तिचा श्वास जरा जोरानेच येत होता. कदाचित ती त्याच्या खाली येण्याची वाटच पाहत असावी. तिच्यासाठी तो थांबला.

दोघं बरोबरच चालायला लागले.

'गायत्रीदेवी, मी आज जाणार आहे.'

'हो, मला आत्याकडून समजलं. त्यासाठीच मुद्दाम भेट घ्यायला आले आहे. कुणास ठाऊक पुन्हा भेट होणार आहे की नाही!'

त्यावर अजयने काहीच टिपणी केली नाही.

'मला कुमारांच्या वेशातच जावं लागणार आहे. शक्यता आहे की काही मंडळी इथे भेटायला येतील, काही मंडळी स्टेशनवरही निरोप द्यायला येतीलतेव्हा हा मुखवटा शेवटच्या क्षणापर्यंत वागवला पाहिजे.'

गायत्री काहीच बोलली नाही.

'गायत्रीदेवी, जाताना कुमारांच्या खोलीची किल्ली मी आपल्यापाशी देऊन जाणार आहे. कुमारांच्या अनेक मौल्यवान जिनसा खोलीत आहेत. बरेच पैसे आहेत, अंगठ्या आहेत, गळ्यातल्या चेन्स आहेत, घड्याळं आहेत, टायपिन्स आहेत, रेबॉनचे गॉगल्स आहेत, उंची अत्तराच्या स्प्रे बॉटल आहेत; कपाटात हजारो रुपये किमतीच्या मद्याच्या बाटल्या आहेत; शिवाय ते रिव्हॉल्व्हर आहे, काडतुसाच्या पेट्या आहेत. आणखीही काही काही मौल्यवान वस्तू असतीलआपण जर माझ्याबरोबर वर आलात तर मी पॅक केलेली माझी बॅग आपल्याला दाखवीनत्या बॅगमध्ये मी सोपानचेच कपडे भरलेले आहेतया गोष्टी तुमच्यापाशी सांगतो, कारण

राणीसाहेबांना सांगताना मला संकोच वाटेल.'
'सोपान,' गायत्री हलक्या आवाजात म्हणाली, 'त्या दिवशी मी एकदाच तुझ्यावर संशय घेतला होता. त्याबद्दल का ही शिक्षा आहे?'
'गायत्रीदेवी, तो विचारही माझ्या मनात आला नव्हता.'
'म्हणून तर ती शिक्षा आणखी कडक होते. आमच्यासाठी तू काय काय केलं आहेस ते मला कधीतरी विसरता येईल का?'
'त्याबद्दल आभार; पण या गोष्टी कोणालातरी सांगायला हव्यातच ना?
'सोपान, मी वेगळ्याच कारणासाठी तुला भेटले आहे. तू कुमारची भूमिका वठवत होतास; पण प्रत्यक्ष त्या स्थानावर तुझा अजिबात हक्क नव्हता. सोपान, जरा विचार केला तेव्हा माझ्या लक्षात आलंमी गायत्रीदेवी म्हणून राजवाड्यात मिरवत आहे, सर्व सुखसोयीमानसन्मान यांचा उपभोग घेत आहे; पण माझा तरी त्यापैकी एकावरतरी हक्क आहे का? मुळीच नाही! जुगारापायी माझे वडील कफल्लक झाले होते केवळ आत्याने मनाचा मोठेपणा दाखवून मला इथे ठेवून घेतलं आहे हेच माझे मुद्दल! सर्व काही तुझ्या हातात होतं, सोपान, तुला काय अशक्य होतं? पण जसा निष्कांचन आलास तसाच रिकाम्या हातांनी जात आहे. तू लाखात एक आहेस सोपान.'
ती आणखी काहीतरी बोलणार होती; पण राजवाड्यातून कुमारला बोलावणं आलं. भेटीसाठी मंडळी आली होती. ते दोघं परत फिरले.

***

दहा वाजेपर्यंत माणसांची वर्दळ चालूच होती. मग ती थांबवण्यात आली. डायनिंग हॉलमध्ये अजय, गायत्री आणि राणीसाहेब या तिघांनी एकत्रच नाश्ता घेतला. बोलणं फारसं झालं नाही.
दाराबाहेर गाडी हजर झाली.
किल्ली गायत्रीच्या हाती देऊन तो राणीसाहेबांसमोर नमस्कारासाठी वाकला.
डावा हात नमस्कारासाठी पुढे आणताना कळ आलीच.
त्याची काहीतरी खूण त्याच्या चेहऱ्यावर दिसली असली पाहिजे.
राणीसाहेब एकदम पुढे वाकून म्हणाल्या,
'कुमार! अजून हात ठीक नाही का?'
'नाहीनाहीठीक आहे. मी जातो, मातोश्री!'
'सुखाने जा आणि सुखी हो.' त्यांनी हलकेच आशीर्वाद दिला.
अगदी गाडीत बसताना गड्याने एक चौकोनी पार्सल आणून दिलं. राणीसाहेबांनी अजयला एका बाजूस बोलावलं.
'अजय,' त्या अगदी हलक्या आवाजात म्हणाल्या. 'त्या पेटीत पन्नास हजार रुपये आहेत. अगदी जपून ठेव. शिवाय माझा खाजगी फोन नंबर आहेतो डिरेक्टरीत नसतो. तुला केव्हाही फोन करायची मोकळीक आहे, हे सांगायला नकोच. सुखी हो. यशस्वी हो.'
अजय गाडीकडे वळला. गायत्रीही मागच्या सीटवर बसली होती!
'मीही येणार आहे स्टेशनपर्यंत!' ती हसत म्हणाली.

***

अजयची अटकळच खरी ठरली.
स्टेशनवर प्रदीपकुमारना निरोप द्यायला बरीच माणसं जमली होती.
हारतुरे-पुष्पगुच्छ हे सोपस्कार झालेच.
गाडी सुटायची वेळ झाली.
जशी गायत्री पुढे आली तसे बाकीचे सर्व लोक दूर झाले.
गायत्री हलक्या आवाजात म्हणाली, 'सोपान, या सोपान या एका नावाखेरीज मला तुझ्याबद्दल काहीही माहिती नाही!'
गाडीची शिट्टी झाली. गाडी हळूहळू पुढे सरकायला लागली.
जरासा हसत पुढे वाकून अजय हलकेच म्हणाला,
'तेही माझं खरं नाव नाही!'
दोन्ही हात दोन बाजूंना पसरून गायत्री प्रश्नार्थक चेहऱ्याने त्याच्याकडे पाहत असताना गाडीने वेग घेतला

गायत्री, तिच्याबरोबरचे लोक, स्टेशन, सर्व मागे मागे गेलं.

***

20.

फर्स्ट क्लासचं एक कंपार्टमेंट त्याच्यासाठी रिझर्व्ह केलेलं होतं.
गाडी सुरू होताच अजयने अजिबात वेळ दवडला नाही.
बॅग उघडून त्याने आतून अजयचे कपडे काढले, कुमारचे अंगावरचे कपडे उतरवून ठेवले, त्यांच्याऐवजी अजयचे कपडे चढवले आणि पहिलं उपनगराचं स्टेशन येताच अजय कर्नाटकी हातात बॅग घेऊन गाडीतून उतरला.
आणि अर्ध्या तासाच्या आत तो आपल्या खोलीवर हजर झाला.
आपल्यामागे दाराला आतून कडी घालून तो आत आला आणि त्याच्या पत्र्याच्या घडीच्या खुर्चीवर बसला.
त्याचं आयुष्य केवढ्या संक्रमणातून जाऊन आलं होतं!
जेमतेम चार आठवडे! पण साऱ्या आयुष्याला पुरून उरतील इतके थरारक अनुभव त्या चार आठवड्यांत खच्चून भरले होते! एवढंच नाही, त्याच्या साऱ्या आयुष्याची दिशाच बदलली होती. उदरनिर्वाहाचा प्रश्न काही दिवसांसाठी तरी सुटला होता. हवे ते छंद, व्यवसाय यासाठी त्याला सवड होती. राणीसाहेबांचे हे सारे उपकार! पैशाचं महत्त्व होतंच, पण त्यापेक्षाही राणीसाहेबांनी त्याच्यावर जो संपूर्ण विश्वास टाकला होता त्याचं मोल अधिक होतं! आणि काही प्रमाणात तरी तो त्याची भरपाई करू शकत होता
कुमार! तो जर कुमारच्या बाबतीत काही करू शकला तर?
गोष्ट अशक्य खास नव्हती.
निदान प्रयत्न तरी करून पाहायला काय हरकत होती?
कुमार कोठे गेला असेल?
राणीसाहेबांनी आणि त्याने स्वत: कुमारला आदल्या रात्रीच्या सर्व प्रसंगाचं तपशीलवार वर्णन सांगितल्यावर त्याची अवस्था कशी झाली होती? तो कोणाशी बोलत नव्हता, स्वत:च आतल्या आत ओढला गेल्यासारखा झाला होता.
एखाद्या दुखावलेल्या लहान मुलासारखी अवस्था.
अशा अवस्थेत काहीतरी तर्काच्या आधाराने शोध घ्यावा लागणार होता. सुदैवाने राणीसाहेबांनी कुमारच्या त्यांना आठवल्या तेवढ्या सर्व आठवणी लिहून त्याच्यापाशी दिल्या होत्या. जर चाळून पाहिल्या तर त्यांच्यात एखादा दुवा सापडण्याची शक्यता खासच होती.
पण आधी त्या पैशाची सुरक्षित सोय करायला हवी होती. ज्या बँकेत त्याचं नाममात्र बचत खातं होतं तिथेच त्याने लॉकर भाड्याने घेतलं; दोन हजार रुपये वर खर्चासाठी ठेवून बाकीची रक्कम लॉकरमध्ये टाकली तेव्हाच त्याला मोकळेपणा वाटला.
दुपारभर खोलीवर विश्रांती घेतली.
सर्व संध्याकाळ काही जुन्या मित्रांना भेटण्यात, काही वेळ नेहमी जात असत त्या अड्ड्यावर अशी काढली आणि जेवण करून तो परत खोलीवर आला आणि मग त्याने राणीसाहेबांनी त्याच्यापाशी दिलेली कात्रणं काढली.

***

टिपणं वाचता वाचता त्याच्या ध्यानात आलं की, या अगदीच ढोबळ आठवणी होत्या. मातापुत्रातला दुरावा त्यावेळीही होता. टिपणं म्हणजे नुसती एक जंत्री होती. कुमारांना राजवाड्यात कोणी मित्रच नव्हता. एकाएकी त्याला शिवबा आठवला.
कुमारांच्याकडून बोलणं खाणारा; पण सतत त्यांची काळजी घेणाराशिवबा कुमारांच्या लहान वयापासून नोकरीवर होता. राजेसाहेब आणि राणीसाहेब आपापल्या व्यापात गुंतलेले असताना कुमारांचं सर्वकाही शिवबाच पाहत असेल
अजयने घड्याळात पाहिलं. सव्वादहा वाजले होते.
जरा उशीर झाला होतातरीही धीर करून त्याने राणीसाहेबांनी दिलेला नंबर फिरवला.
फोनवर स्वत: राणीसाहेबच आल्या.
'राणीसाहेब, माफ करामी अजय.'

‘अजय? अरे वा!’ त्यांना खरा आनंद झालेला दिसला.
‘राणीसाहेब, मी पुढच्याच स्टेशनवर उतरलो आणि परत शहरात आलो.’
‘कसा आहेस? हाताची नीट काळजी घे बरं का.’
‘हो राणीसाहेब, एक काम होतं’
‘मग सांग ना’
‘आपल्या शिवबाचा पत्ता आपण मला सांगू शकाल का?’
‘त्याचा पत्ता कशासाठी?’
‘त्याला भेटावं म्हणत होतो.’
‘अरे तो एकदोन दिवसांत कामावर हजरच होणार आहे’
‘आपल्याला कसं कळलं?’
‘त्याच्या गावाहून निरोप आला.’
‘राणीसाहेब, मला त्याची भेट घ्यायची आहेआपला सोपान कदाचित परत एकदा राजवाड्यावर येईल.’
‘तुला माहीत आहेत्याला केव्हाही प्रवेश आहे.’
‘आभारी आहे, राणीसाहेब ठेवू फोन?’
‘हो.’
त्याने फोन खाली ठेवला आणि तो बूथबाहेर पडला.
हे काम फारच चांगलं झालं. त्याला वाटलं.

***

दोन दिवसांनी संध्याकाळी शिवबा त्याच्या खोलीबाहेर बसला होता आणि समोरून त्याला सोपान येताना दिसला,
एकदम उभा राहत शिवबा म्हणाला,
‘अरे सोपान! तुझा काय पत्ता? दिसलाच नाहीस तो.’
‘चला शिवबा! जरा बाहेर येता का? का काम आहे?’
‘सोपान, अरे कुमारच नाहीत.’
‘चलता का बाहेर?’
दोघं मागच्या फाटकातून बाहेर आले. एका बऱ्यापैकी हॉटेलमध्ये अजय शिवबाला घेऊन शिरला.
‘शिवबा, तुमच्या कानावर आलं असेल कुमार बाहेर गेले आहेत...’
‘अरे, काय काय कानावर आलं बघ! आधी त्या गायत्रीदेवांना म्हणे गुंडांनी पळवून नेलंआपल्या कुमारांनी म्हणे त्यांना सोडवून आणलं आणि छोट्या मालकांचा सत्कार चाललेला असताना म्हणे दोनतीन पिस्तूलवाले गुंड एकदम आले आणि छोट्या मालकांनी म्हणे त्यांना जागच्या जागी ठार केलं! सगळंच नवल!’
‘होतेव्हाच त्यांना खांद्याला लहानशी जखम झाली होती चारपाच दिवसांनी ते विश्रांतीसाठी म्हणून गेले; पण शिवबा...’
‘काय रे?’
‘जिथे पोहोचायला हवेत तिथे पोहोचलेच नाहीत!’
‘पोहोचले नाहीत म्हणजे काय?’
‘इथनं निरोप घेऊन गेलेराणीसाहेब पोहोचल्याची तार येण्याची वाट पाहत होत्याआता हे कोणाला सांगू नको; पण त्यांची तार आलीच नाहीवाटेतच त्यांनी बेत बदलला असला पाहिजे आणि आता ते कोठे आहेत याची राणीसाहेबांना काहीच कल्पना नाही आणि त्यांना जरा काळजीच वाटतेकारण कुमारांना डाव्या खांद्याला जखम झालेली आहे.’
‘होवाटणारच काळजी.’
‘म्हणून तुमची गाठ घेतली शिवबा.’
‘माझी गाठ कशासाठी?’
‘तुमच्यासारखं कुमारांना कोण ओळखतं, शिवबा? कुमार लहान असल्यापासून तुम्ही त्यांच्याबरोबर आहातप्रत्यक्ष राजेसाहेब किंवा राणीसाहेब ओळखणार नाहीत इतके तुम्ही कुमारांना चांगलं ओळखताहे खरं आहे की नाही?’
‘हे खरं आहे म्हणा.’

‘मग तुमचा काय तर्क चालतो? कुमार कोठे गेले असावेत असं वाटतं? त्यांच्या आवडत्या जागा, त्यांची आवडती गावं, त्यांची आवडती माणसंतुम्हाला सगळं माहीत असणार, नाही का?’
चहाच्या बशीतला रिकामा कप गोल गोल फिरवत शिवबा विचार करत होता. आठवण्याच्या प्रयत्नात त्याच्या म्हाताऱ्या, सुरकुतलेल्या कपाळावर आणखी आठ्यांची गर्दी झाली होती.
‘सोपान, आता एक आठवलं बघ.’
‘सांगा.’
‘अरे, किरसी नावाचं गाव आहेआपला घाट उतरला ना, की पहिलंच गाव लागतं. राजेसाहेबांबरोबर मी आणि छोटे मालक एक-दोनदा गेलो होतो. आधी वर्दी गेलेली असायची. पाटील त्यांच्या वाड्यावर आमची सोय करायचेराजेसाहेब कुठे शिकारीला, कुठे मैफलीला असे जायचे, तेव्हा गाव फार छान होतं सोपानआता देवास ठाऊक कसं आहे ते’
‘मग तुम्ही दोघं काय करायचात?’
‘डोंगर उतारावर गाव आहे. ओढे आहेत, धबधबे आहेत, जरा दाट जंगलही आहे. जंगलात बिबटे, रानडुकरं आहेत म्हणतात. कोणी कोणी शिकारीला जातही असतील. का म्हणून विचारलंस तर सांगता यायचं नाही; पण हे किरसी गाव छोट्या मालकांच्या मनात फारच भरलं होतं बघराजेसाहेब गेल्यावरही छोटे मालक किरसीला जातातदोनदा तर त्यांनी मलाही बरोबर नेलं होतं’
‘पण कशासाठी?’
शिवबाची नजर एकदम घसरली.
‘शिवबा, सांग की!’
शिवबा मान हलवत होता.
‘शिवबा, आताची वेळ गोष्ट लपवण्याची नाहीतुम्हाला माहीत आहे मला काही सांगितलंत तर ते अजिबात षट्कर्णी होणार नाहीआपल्याला राणीसाहेबांनी छोट्या मालकांच्या कामासाठी ठेवलं आहे ना?’
‘कसं सांगायचं रे सोपान’
‘सांगा, शिवबा, पुष्कळ वेळा गोष्टी आपल्याला वाटतात तशा नसतात आणि अशा लपवून ठेवल्या की गळवासारख्या चिघळतात... सांगा’
‘सोपान, त्या किरसीत शेवंताबाई नावाची गुजरीण आहे आता लहान गावात गोष्टी लपून का राहणार आहेत? छोटे मालक शेवंताबाईकडे जायचेसगळ्या गावात चर्चेचा विषय होता’
‘शिवबा, इतके सोवळे केव्हापासून झालात? राजवाड्यावर इतकी वर्षे कामाला आहात’
‘अरे सोपान! छोट्या मालकांचं वय कायत्या शेवंताबाईचं वय कायलोक हसायचे बघ छोट्या मालकांच्या पाठीमागे’
‘शिवबा, लोकं हसतात; पण सगळेच आनंदाने हसत नाहीत बरं का!’
‘म्हणजे कसं, सोपान?’
‘जाऊ द्या. चलायचं का परत? खूप मदत झाली तुमची आणि आणखी एकसोपान वाड्याला आला होता हे कोणापाशी बोलू नका, कारण कुमार दुसरीकडे गेले आहेत कोणाला माहीत नाहीसगळ्यांना वाटतंय मी कुमारांबरोबरच आहे’
‘तसं तर तसं.’

***

अजय सकाळच्या सातच्या एस.टी.ने निघाला ते सव्वादहा वाजता किरसीला पोहोचला. घाटाच्या पायथ्याशीच किरसी होतं. हवा दमट होती. पाच-सात प्रवासी उतरले होते ते आपापल्या वाटांनी निघून गेले होते.
धुराळा उडवीत बसही निघून गेली होती. ती दहाबारा मिनिटं स्टँडवर खूप वर्दळ झाली होतीआता सगळं कसं सामसूम झालं होतं. अजय स्टँडवरच्या हॉटेलमध्ये शिरला आणि एक कप चहाची ऑर्डर देऊन कडेजवळच्या एका टेबलापाशी बसला.
स्टँडचं आवार रिकामं झालं होतं. खेळणी, शेंगदाणेफुटाणे-डाळ, हवाई चपला, रसाचा चरक इत्यादींच्या हातगाड्या कडेला उभ्या होत्या. आवारात केकाटणारी कुत्री, गाढवं, गायी, एक डुक्कर यांचाच तेवढा वावर होता. या शेवंताबाई गुजरीणीची माहिती काढायची तरी कशी?
हॉटेलमधला छोकरा बशीत बिल ठेवून गेला. अजयची नजर काऊंटर मागे उभ्या असलेल्या मालकाकडे गेली. एस.टी. स्टँड म्हणजे गावाची नस. याच्याशीच संधान बांधायला हवं.

पैसे देण्यासाठी तो काऊंटरपाशी गेला. पैसे देता देता म्हणाला.
‘मालक, जरा पंचाईत झालीय.’
‘का हो? पंचाईत कसली?’
‘काय आहे, आम्ही शहरातली माणसंछोट्या गावातले रीतीरिवाज आम्हाला कुठले कळायला? गाडीत पुढेच दोन माणसं बसली होतीबोलता बोलता समजलं तेही किरसीलाच उतरणार आहेतम्हटलं चला सोय झालीत्यांना विचारलंअहो, तुमच्या गावात शेवंताबाई गुजरीण आहेत ना? त्यांचा पत्ता सांगाल का? अहो मालक, ते दोघं माझ्याकडे पाहून असं काही हसायला लागले की बस! ‘अहो, एवढं हसण्यासारखं काय आहे? साधा पत्ता विचारला’ म्हणतात कायत्या गुजरीणीचा पत्ता ना? गावात कुणालाही विचारा, एखादं शेंबडं पोरसुद्धा पत्ता सांगेलमालक, आपल्याला काही ते ठीक वाटलं नाहीआता बसमधून उतरलोम्हटलं तुम्हालाच विचारावं
मालक काऊंटरवर जरा पुढे वाकून म्हणाला, ‘ती माणसं का हसली माहीत आहे का? शेवंताबाई म्हणजे राजेसाहेबांच्या...’
त्याने एका नाकपुडीवर बोट आपटून खूण केली.
‘आणि आता म्हणे त्यांचे चिरंजीवही.’
‘पुन्हा त्याने तीच खूण केली.’
‘आपल्याला त्याच्याशी काय करायचं हो!’ अजय म्हणाला.
‘शहराकडचा निरोप त्यांना पोहोचवलाआपलं काम झालंसांगता येईल का तुम्हाला त्यांचा पत्ता?’
मालकाने बरोबर पत्ता सांगितला.

***

लहानसं गाव. पत्ता सापडायला मुळीच वेळ लागला नाही.
रस्त्यावर मेंदीचं कुंपण होतं. त्यात रिफाडाचं फाटक होतं.
दगडगोट्यांचं अंगण होतं, मधे तुळशीवृंदावन होतं, की लगेच घराचं चार पायऱ्याचं जोतं होतं. मध्ये चौकोनी मोकळी जागा होती. तीन बाजूंची दारं तीन खोल्यांत उघडत होती.
अजयने काही वेळ विचार केला आणि सरळ रिफाडाचं फाटक उघडून अंगणात प्रवेश केला. फाटकाचा खूप मोठा आवाज झाला. आवाज होताच समोरचं मधलं दार उघडलं आणि एक पोक्त स्त्री बाहेरच्या जोत्यावर आली. बहुतेक याच शेवंताबाई, अजयने तर्क केला.
चालत चालत तो जोत्याच्या पायऱ्यापाशी पोहोचला आणि थांबला. जवळ पोहोचल्यावर त्याला दिसलं, की तरुणपणी या बाई खूपच सुंदर दिसत असल्या पाहिजेतअर्थात त्याखेरीज राजेसाहेब त्यांच्याकडे आकर्षित झालेच नसते! अजयने स्वत:शी क्षणभरच विचार केला आणि ठरवलं, की धीटपणा आणि स्पष्टोक्तीच इथे फायद्याची ठरेल. हात जोडून तो म्हणाला,
‘नमस्कार, तुम्हीच शेवंताबाई गुजर?’
‘समजा असलेपुढे काय?’
‘कुमार आहेत ना इथे?’
या प्रश्नाने मात्र त्या बाई जराशा गडबडल्या. अजय जरा पुढे होत म्हणाला, ‘शेवंताबाई, मी काही कोणी परका नाही, उपऱ्या नाही, कुमार मला चांगला ओळखतातराजवाड्यात मी कुमारांच्याच ड्यूटीवर होतोत्यांना सांगासोपान आला आहेएवढं तरी कराल?’
मिनिटभर स्वत:शी विचार करून ती स्त्री म्हणाली,
‘जरा इथेच थांबा.’
म्हणजे कुमार इथे आहेत तर! इथपर्यंत तर काम फत्ते झालं!
तो शांतपणे जागच्या जागी उभा राहिला.
ज्या दारातून त्या बाई आत गेल्या होत्या त्याच दारातून स्वत: कुमारच बाहेर आला. दारूच्या नशेत तर्रर्र झालेला. झोकांड्या खात. जोत्याच्या कडेशी येऊन कमरेवर दोन्ही हात ठेवून कुमार उभा राहिला. तोल सांभाळण्यासाठी त्याला खटखट करावी लागत होती. तो बोलला तेव्हा त्याचे शब्दही स्पष्ट येत नव्हते
‘तू इथे कशाला कडमडलास?’
अजय काहीच बोलला नाही.
‘तिकडे प्रताप केलेस तेवढे पुरे नाही का झाले?’

तरीही अजय तसाच मुकाट्याने उभा राहिला.
'जरासुद्धा चैन पडू द्यायचं नाही असं ठरवलं आहेस की काय तुम्ही सगळ्यांनी?' कुमार जराशा रडवेल्या आवाजात बोलत होता. 'कुठे जातोय कुणाला सांगितलं नाहीतू कसा आलास इथे?'
'तुमच्या सवयी माहीत आहेत सर्वांना, कुमार.' अजय शेवटी म्हणाला. कुमारच्या मागे दारात शेवंताबाई उभ्या होत्या. त्यांच्या चेहऱ्यावरून अजयचं तिथे येणं त्यांना पसंत पडलं आहे की नाही याचा काहीही अंदाज लागत नव्हता. म्हणजे कुमारला त्या दोन समजुतीचे शब्द सांगणार नव्हत्या. जे काय बोलायचंकरायचं ते त्याचं त्यालाच करावं लागणार होतं.
शेवटी अजय जोत्याच्या पायऱ्या चढून वर गेला. कुमारला वळसा घालून मागे शेवंताबाईजवळ गेला.
'कॉफी करता का? कुमारना अशावेळी कॉफी घ्यायची असते.' अजय म्हणाला. 'मला कोठे आहे काय आहे दाखवलंत तर मीच त्यांना नेहमी लागायची तशी कॉफी करून आणतो.'
'मीच आणतेतुम्ही त्यांना आत आणा' त्या म्हणाल्या आणि आत गेल्या. अजय वळून कुमारपाशी आला.
'कुमार, आत येता का इथेच खुर्ची आणू?' त्याने विचारलं.
सोपान इथे आला आहे, आपण त्याच्याशी चार शब्द बोललो आहोत हे कुमार विसरूनच गेलेला दिसला.
'तू? सोपान? इथे कसा आलास? केव्हा आलास?'
'चला आत' कुमारच्या खांद्याला स्पर्श करताच तो वळला आणि अजयबरोबर आत आला. आतली खोली माजघरासारखी होती.
तिथून चारी बाजूंना दारं वेगवेगळ्या खोल्यांत उघडत होती. कुमार डावीकडच्या दारातून आत गेला. त्याच्यामागोमाग अजयही त्या खोलीत गेला.
खोलीत पलंग होता, दिवाण होता, खुर्च्या होत्या, कपाटं होतीसामान उंची नव्हतं; पण सर्व सोयी इथे होत्या. कुमार खिडकीपाशी उभा राहून बाहेर पाहत होता, अर्थात बाहेर पाहण्यासारखं काहीच नव्हतं.
पाच एक मिनिटातच शेवंताबाई कॉफी घेऊन आल्या. अजयने त्यांच्या हातातून कॉफीचा मग घेतला आणि कुमारजवळ जाऊन तो म्हणाला, 'कुमार, कॉफी आणली आहेघ्या.'
कुमार वळला, पलंगावर बसला, अजयने पुढे केलेला मग त्याने तोंडाला लावला. त्या कडक कॉफीने नशा जराशी उतरली.
शेवंताबाई गेल्यावर कुमार म्हणाला,
'सोपान, तू बरोबर इथे कसा पोहोचलास?'
'कुमार, शिवबा तुमच्याबरोबर असायचा हे तुम्ही विसरलाततुम्ही लहान असताना तुम्ही आणि राजेसाहेब यांच्याबरोबर तो इथे यायचा आणि राजेसाहेब गेल्यावरही तुमच्याबरोबर तो इथे एकदोनदा आला आहे त्यानेच सांगितलं, किरसीला शोध घ्या. छोटे मालक तिथे नेहमी जातात.'
'होमी इथे येतो खरा'
अजयने नुसतीच मान हलवली.
'का? मान हलवायला काय झालं?'
'नाहीकुमारलोक नाही नाही ते बोलतात.'
'मी आणि शेवंताबाईबद्दल ना? मला माहीत आहे. शेवंताबाई काय करते ते मी काही दुधखुळा नाही सोपान; पण सोपान तुला एक गुपित सांगतोलहानपणापासून तिने मला अगदी मायेने वागवलं आहे बघराजवाड्यात वाटत नाही इतकं मला इथं अगदी घरच्यासारखं वाटतं.'
'कुमार, तुमच्या इथे येण्याबद्दल, इथे राहण्याबद्दल काहीच बोलायला मला अधिकार नाहीकुणालाच नाहीतसे तुम्ही कुणाला जबाबदार आहात? फक्त एकच वाटतं'
'काय?'
'राणीसाहेबांना तुमची विलक्षण काळजी वाटते आहे.'
'हे नवीनच एकतो आहे.' कुमारचा आवाज एकदम कठीण झाला होता. 'मी तीन-तीन दिवस परत आलो नाही तर मातोश्रींनी कधी काळजी केल्याचं आठवत नाही!'
'तुम्हाला काय माहीत?'
'काय माहीत म्हणजे काय?'
'प्रत्यक्ष शब्दांनी बोलून दाखवलं नाही याचा असा अर्थ नाही की त्यांना काळजी वाटत नसेल.'
कुमार अजयकडे पाहत होता.

‘आणि कुमार, यावेळची गोष्ट जरा वेगळी आहेरात्रीच्या प्रसंगाने तुम्ही फार अस्वस्थ झाला होतात.’
एक हात वर करून कुमार म्हणाला,
‘आणि त्या संध्याकाळी राजवाड्यासमोर सर्वांसमक्ष काय काय घडलं तेही मला माहीत आहे!’ कुमार कडवट आवाजात म्हणाला. ‘आणि जो तो माझ्या शौर्याची प्रशंसा करीत आहेसोपान, हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार खाण्याचा प्रकार झाला आहेमी तर सांगू शकत नाही, की एकामागून एक तिघा मारेकऱ्याना ठार करणारा मी नव्हतोचमाझ्या वेशात दुसराच कोणी होतागप्प बसतोदातओठ खात गप्प बसतोदुसरं काय करणार?’
‘कुमार, मी एक विचारतोत्याचं खरं उत्तर द्याल?’ अजय म्हणाला. ‘प्रश्नाचा राग येईल; पण खरं उत्तर द्या.’
‘विचार! तूच तेवढा बाकी आहेस!’
‘त्या रात्री गायत्रीदेवींच्याबद्दल फोन आला तेव्हा तुम्ही दारूच्या अमलाखाली होतात; पण समजाघटकाभर समजातुम्ही सावध असतात, नेहमीसारखे असतातर मग असा फोन आल्यावर तुम्ही तोफखान्यावर गेला असतात?’
आधी कुमारच्या चेहऱ्यावर जरासा राग आला. मग अजयच्या प्रश्नाचा मथितार्थ ध्यानात आल्यावर त्याच्या चेहऱ्यावरचा रंग उतरला.
त्याने डोळे मिटून घेतले.
‘सोपान, मी काय केलं असतं खरोखरच सांगू शकत नाही खरोखरच सांगू शकत नाही’आणि मग एका हातावर दुसऱ्या हाताची मूठ आपटत कुमार म्हणाला, ‘पण त्याचं परिमार्जन करण्याची, माझा स्वाभिमान परत मिळवण्याची, जगासमोर माझी खरी पात्रता सिद्ध करण्याची संधी मला संध्याकाळी आली होतीआणि मी भेकडासारखा पळून आलो! आता वाटतं तुझ्या जागी तिथे मी असतोआणि खरोखरच मरण आलं असतं तर आजवरच्या निरर्थक जीवनाचं सोनं झालं असतं! असं भ्याडासारखं कानाकोपऱ्यात लपूनछपून बसावं लागलं नसतं?
अजय हलक्या आवाजात म्हणाला, ‘कुमार, आयुष्य म्हणजे काही राजमार्ग नाही. त्यात काटेकुटे आहेत, अडचणी आहेत, अडथळे आहेत, आव्हानं आहेतविशेषत: तुमच्या सारख्यांच्या आयुष्यात तर असे प्रसंग वारंवार येणार.’
कुमार मानेनेच नाहीनाहीची खूण करत होता.
‘मी तुमच्याशी कोणताही वाद घालत नाही’ अजय शेवटी म्हणाला, ‘आता इथे येण्याचं खरं कारण सांगतो. मी तुम्हाला एक विनंती करणारमाझ्याबरोबर चला, राणीसाहेबांची गाठ घ्या - आणि मग तुम्हाला हवं ते करा-’
‘कशासाठी गाठ घ्यायची?’
‘तुम्ही काही पळून आलेला नाहीत ना? तिथे मागे पत्र ठेवून आला आहात ना? पण कुठे आहात ते त्यांना सांगत का नाही? आणि या दोन घटनांबद्दल लोक तुमची स्तुती करतात. त्याचा तुम्हाला राग येतो म्हणतापण हे खरं नाही का की जोपर्यंत तुम्ही स्वत: आपल्या तोंडाने आपल्या पराक्रमांची बढाई मारत नाही, तोपर्यंत त्याचं दायित्व तुमच्याकडे येतच नाही! आपला जसा समज असतो, तसं लोक बोलतात ते सर्व खरंच असतं असं थोडंच आहे?
‘आता इथेच पाहा की! तुम्ही शेवंताबाईंच्याकडे येता, त्यासंबंधात तुमच्याबद्दल वेडंवाकडं बोलणारे आहेतच की! त्याने काही फरक पडतो का?’
‘सोपान! तू इतका उलटासुलटा बोलतो आहेस की मला कशाचा अर्थच समजेनासा झाला आहे.’
अजय मनातल्या मनात म्हणाला, चला, निदान आता हा शुद्धीवर तरी आला आहे.
‘शेवटी माणसाचा खरा न्यायाधीश तो स्वत:च आहेमाणूस स्वत:ला कधीही फसवू शकत नाहीतशी वेळ आली असती तर रात्रीचे तुम्ही गेला असतात की नाही हा प्रश्न याक्षणी निरर्थक आहेकारण तशी वेळ तुमच्यावर आली नाहीभविष्यात तशी एखादी वेळ आली तर तुम्ही काय कराल याचं उत्तर आताच्या क्षणी देता येत नाहीमाझं म्हणणं एवढंच आहे, की ज्या गोष्टी झाल्याच नाहीत त्याचा दोष तुम्ही स्वत:ला का लावून घेता? जी परीक्षा झालीच नाही त्यात स्वत:ला अपयशी का धरून चालता?’
‘सोपान! एक साधी गोष्ट तुझ्या लक्षात येत नाही का? मला राजवाड्यावर राहणं यापुढे अशक्य होणार आहे?’
‘का अशक्य व्हावं? खरी गोष्ट मी, राणीसाहेब आणि गायत्रीदेवी यांच्याखेरीज कोणालाही माहीत नाही आणि आम्हा तिघांनाही सत्य परिस्थिती काय होती ते माहीत आहेमी तर नाहीचत्या दोघीही तुम्हाला कोणताही दोष देणार नाहीतशिवाय तुम्ही राजवाड्यावर राहिलं पाहिजे अशी तुमच्यावर काय सक्ती आहे का? माझी विनंती

एवढीच आहेतुम्ही राणीसाहेबांची भेट घ्या.'
'सोपान,' कुमार एकदम म्हणाला, 'तू बाहेर जा. मला विचार करू देत.'
अजय खोलीचं दार मागे बंद करून बाहेर आला.

***

माजघरातच एका खुर्चीत शेवंताबाई बसल्या होत्या. अजय खोलीबाहेर येताच त्या उठून उभ्या राहिल्या.
'कुमारांच्या जेवणाचं काय?' अजयने विचारलं.
'मी खूप बनवीनत्यांनी काही खाल्लं पाहिजे ना?'
'आता एक वाजायला आलाद्या थाळी बनवूनमी घेऊन जातो त्यांच्याकडे.
शेवंताबाईमागोमाग अजय स्वयंपाक घरात गेला. सोपानच्या गड्याच्या भूमिकेला ते योग्यच होतं.
'सोपानराव.' शेवंताबाई हलकेच म्हणाली, 'तिकडे राजवाड्यावर झालं तरी काय? नाही नाही त्या गोष्टी कानावर येतात.'
'काय काय कानावर आलं सांगा तरी!'
'म्हणे मध्यानरात्री जाऊन मारामारी करून गायत्रीदेवांना सोडवून आणलंआणि म्हणे दुसऱ्या संध्याकाळी प्रत्यक्ष भरसभेतच तीन लोकांना गोळ्या घालून ठार केलं.'
'मग? तुमचा विश्वास बसत नाही?'
'तसं नाहीपण आपले कुमार त्यातले वाटत नाहीत.'
'अहो शेवंताबाई, कोण कसा आहे ते कधी बाहेरून कळतं का? अशी काय लेबलं लावली असतात छातीवर? प्रसंग ओढवला की मगच माणसाची पारख होते.'
'दोन दिवस झाले इथे आलेतकोणाशी एक शब्द बोलणं नाहीखाणं नाहीनुसती दारू ढोसत बसलेत'
'हातनं चारपाच माणसं मारली गेलीही काय साधी गोष्ट आहे का? कितीकांच्या आयुष्यात हे असं घडतं?'
'त्याचा परिणाम असेल म्हणता?'
'का असणार नाही?' अजय म्हणाला. शेवंताबाईने थाळी तयार केली होती, ती घेऊन अजय कुमारच्या खोलीत गेला. आधी कुमार अन्नाला हात लावायला तयार नव्हता; पण आग्रह करकरून अजयने त्याला चार घास खायला लावलेच. थाळी उचलत अजय म्हणाला,
'तुम्ही आता विश्रांती घ्या कुमार.'
स्वयंपाकघरात अजय आणि शेवंताबाई जेवायला बसले.
'राजवाड्यावरचा शिवबा माहीत आहे तुम्हाला?'
'हो.' शेवंताबाई म्हणाली.
'त्याने बरोबर ओळखलंकुमार इथेच असणार.'
शेवंताबाई काहीच बोलली नाही. अजय हलकेच म्हणाला,
'शेवंताबाई, गावात तुम्ही आणि कुमार यांच्याबद्दल काय काय बोललं जातं याची मला चांगली कल्पना आहे.'
'शेण घालायला हवं अशा मेल्यांच्या थोबाडात!'
'अहो गाव म्हटलं की गावकी आलीच!' अजय म्हणाला. 'वाईटावर टपलेले काय थोडे असतात का!'
'अहो सोपानराव, हे कुमार पाचसहा वर्षांचे असल्यापासून माझ्याकडे येताहेतस्वत:, राजेसाहेब गेल्यावरही येत राहिलेचया नतद्रष्टांच्या कावीळ झालेल्या डोळ्यांना सगळंच पिवळं दिसतं!'
कुमार इथे का येत असावा याची अजयला थोडीबहुत कल्पना होती. शेवंताबाई जरा नरम आवाजात म्हणाली. 'बरं का सोपानराव, तसा कुमारांच्या येण्याचा मला काही त्रास नाही...पण.'
'त्यांनी इथे जास्त राहू नये असंच सुचवायचं आहे ना?'
'अंहो'
'मी त्यासाठीच आलो आहे. शक्य तर उद्याच त्यांना माझ्याबरोबर न्यायचा विचार आहे तुम्ही काही काळजी करू नका...'

***

चार वाजता अजयने कुमारच्या खोलीत डोकावून पाहिलं.
कुमार गाढ झोपला होता.
अजय बाहेरच्या मोकळ्या जागेत येऊन उभा राहिला. कुमारला शहरात यायला राजी करायला हवं आणि काहीतरी वाहनाचीही सोय करायला हवी. तो या विचारात इतका गढला होता की, घराच्या फाटकासमोर ती

जीप थांबली तिकडेही त्याचं लक्ष नव्हतं. जीपमधून दोन माणसं उतरून त्यांनी करकरतं फाटक उघडलं तेव्हा तो एकदम भानावर आला.
त्या दोन माणसांपैकी एक जेधे होता. जेधे!
अजय एकदम सावध झाला. जेधेगोवर्धनदासचा माणूस! त्या दोघांच्या मागे आणखी एक जण उतरून घराकडे येत होता.
अगदी उघड उघड ओळखू येणारा गुंड मारेकरी.
'अरे वा! सोपानराव का!' जेधे उसन्या अगत्याने म्हणाला.
'तुम्ही आहात म्हणजे आमचं काम सोपं झालं म्हणायचं!'
'कोणतं काम?' अजयने विचारलं.
'राणीसाहेबांनी कुमारांना तातडीने राजवाड्यावर बोलावलं आहे' जेधे म्हणाला. 'त्यासाठीच तर गाडी घेऊन आलो आहोत.'
अजयच्या मनातल्या धोक्याची जाणीव अगदी स्पष्ट झाली होती. या सर्व थापा होत्या. कुमार कोठे आहे हेही राणीसाहेबांना माहीत नव्हतं आणि जेधेवर तर ते काम कधीच सोपवलं गेलं नसतंशहरात पाय टाकायचीसुद्धा जेधेची हिंमत नव्हती. मग हा सारा बनाव कशासाठी?
कुमारचं अपहरण करून त्याला अज्ञात स्थळी नेण्यासाठी!
त्याच्या सुटकेच्या बदल्यात राणीसाहेबांकडून जबर खंडणी वसूल करायचा डाव असेल किंवा त्यांचा हेतू त्यापेक्षाही नीच असू शकेलगोवर्धनदासांना एवढंच समजलं असणार की कुमारनी कुणालला भर दिवसा शेकडो लोकांसमोर गोळी घालून ठार केलं होतं. कुणाल! त्यांचा मुलगा!
सुडाचाही कट असू शकत होता.
त्यांच्या खऱ्या उद्देशाची त्याला काही कल्पना आली आहे याचा एवढासाही सुगावा त्यांना लागू देता उपयोगी नाहीनाहीतर सर्वांवरच संक्रांत!
'त्याला काही हरकत नाही; पण जरा थांबायला लागेल' अजय म्हणाला. 'तुम्हाला माहीतच आहेकुमार...'
दारूची बाटली हातात धरून तीतून दारू पिण्याचा त्याने अभिनय केला.
'त्यांना नीट शुद्धीवर आणायला जरा वेळ लागणार आहेतसंच हलवायला गेलं तर भलताच आरडाओरडा करतात' त्यांना आपला बेत गुपचूप पार पाडायचा असणार असा तर्क करून अजय म्हणाला.
'ठीक आहेआम्ही थांबतो अंगणात' जेधे म्हणाला.
'पाचदहा मिनिटं लागतील हंअधीरपणा करून आरड्याओरडा करू नकावाट पाहा'
मागे वळून न पाहता अजय आत गेला. आपल्यामागे त्याने दार बंद करून घेतलं. आत गेल्या गेल्या त्याने हाक मारली
'शेवंताबाईऽ!'
त्याचा आवाजच असा होता, की त्या लगबगीने आतून बाहेर आल्या.
'शेवंताबाई, मी काय सांगतो ते लक्ष देऊन ऐका. जरा गंभीर प्रसंग आला आहेवेळ जास्त नाहीतेव्हा ऐका. कुमारना नेण्यासाठी काही माणसं बाहेर आली आहेतमाणसं चांगली नाहीतकुमारांना काहीतरी दगाफटका करण्याचा त्यांचा डाव आहेतेव्हा ऐकाकुमारांचे कपडे घालून त्यांच्याऐवजी मीच त्यांच्याबरोबर जाणार आहेमी कपडे बदलतो तोवर स्वयंपाकघरातून काडेपेटी आणि पसा दोन पसाभर तांदूळ घेऊन या, जा!'
त्या एक पळभरच गोंधळल्या, मग लगोलग आत गेल्या.
कुमार अजूनही तसाच गाढ झोपेत होता. कपाटात त्याचे कपडे होतेचत्याला एक जरा गडद रंगाचा मॅनिला आणि डार्क रंगाची पँट काढून अजयने स्वत:च्या कपड्यांऐवजी ते कपडे चढवले. सुदैवाने त्याच्या बॅगमध्ये ती नीकॅप आणि चाकू होताचतो त्याने डाव्या नडगीला अडकवला. जरा फिकट काचांचा गॉगल घालून तो खोलीबाहेर आला. पुन्हा जरासा विचार करून तो आत गेला आणि व्हिस्कीची एक अर्धी भरलेली लहान बाटली खिशात घालून परत बाहेर आला.
स्वयंपाकघरातून येणाऱ्या शेवंताबाई वाटेतच थबकल्या.
'अगं बाई! कुमार!' त्या म्हणाल्या.
'नाहीशेवंताबाई, मी सोपान आहे' अजय म्हणाला.
'अगंबाई!' करत त्या मागे सरल्या.
'आता वेळ नाहीआणलेत तांदूळ? काडेपेटी?' अजयने विचारलं.

त्यांनी तांदळाचा छोटासा कुंडा आणला होता. ते त्याने आपल्या खेशात भरले. काडेपेटी वरच्या खेशात ठेवली. त्यांना पुढे बोलवत तो म्हणाला,
'शेवंताबाईआता नीट ऐका. मी या लोकांबरोबर जात आहे. जीप हलताच कुमारना जागं करा. तोंडावर पाणी मारा, हलवा काहीही करा, पण त्यांना जागं करा. रागावतील, ओरडतील, फिकीर करू नका. त्यांच्यापेक्षाही मोठा आवाज काढून बोला. काय झालं आहे ते त्यांना सांगा. सांगा की सोपान त्यांचे कपडे घालून त्यांना न्यायला आलेल्या लोकांबरोबर गेला आहे. हे सांगाकी त्याने बरोबर तांदूळ नेले आहेत आणि शेवंताबाई, त्यांना हे सांगातुम्ही शोधत होतात ती संधी आली आहे!'
'मला तर बाई कशाचा अर्थच समजत नाही!'
'न समजू दे! सांगतो आहे ते त्यांच्यासाठी आहे! लक्षात राहील ना? सोपान त्यांच्या कपड्यात गेला आहे, बरोबर तांदूळ नेले आहेत आणि त्यांना हवी ती संधी आली आहेलक्षात ठेवा! मी जातो!'
दार उघडून बाहेर पडता पडता त्याचा पवित्र बदलला. दाराबाहेरच कमरेवर हात ठेवून उभा राहून तो रागीट आवाजात म्हणाला,
'सोपान! कुठे आहे रे सोपान! कोण आलं आहे रे?'
जेधे आणि त्याच्याबरोबरचा माणूस पुढे झाले.
'तुम्हाला राजवाड्यावर न्यायला आम्ही आलो आहोत'
अजयने जराशी हुज्जत घातली; पण जराशीच. त्या दोघांबरोबर तो गेला, उघड्या जीपच्या मागच्या मधल्या सीटवर बसला. जेधेकडे पाहत अजय म्हणाला, 'तू कोण रे? तुला पाहिल्यासारख वाटतं'
'मी जेधे, मालकराजवाड्यात कामाला असतो.'
'तरीच.'
अजयने जरासा विश्वासाचा पवित्रा घेतला तसे दोन्ही बाजूचे ते दोघं जरा सैल बसले. सुरुवातीस त्यांनी झगड्यासाठीच तयारी ठेवली होती.
अजयने दोन्ही मुठीत तांदूळ भरून घेतले होते. गाडी उजवीकडे वळताच उजव्या हातातले तांदूळ रस्त्यावर टाकले. जसजशी गाडी वळेल तसतसं तो हे करणार होतामनात आशा बाळगून की कुमारला त्याच्या कृतीचा अर्थ बरोबर समजेल.

***

21.

शेवंताबाई कुमारला जरा घाबरूनच असायची; पण आताच त्या लोकांबरोबर कुमारच्या वेशात गेलेल्या सोपानच्या आवाजात अशी काही जरब होती, की त्याचा शब्द मोडायची त्यांची हिंमतच नव्हती.
साध्या हाकेने कुमारला जाग येत नाही असं पाहताच त्याने आतून ओला टॉवेल आणला आणि तो त्याच्या चेहऱ्यावर टेकवला. एक झटका देऊन कुमार ताडदिशी उठून बसला. शेवंताबाईकडे पाहत तो ओरडला,
'मावशी! हा काय प्रकार आहे?'
त्याचा आवाज जरा चढताच मागे सरणाऱ्या शेवंताबाई जागच्या हलल्याही नाहीत. उलट खड्या आवाजात म्हणाल्या, 'कुमार, तुम्ही झोपला होतात आणि इथे रामायण घडलं आहेऐका आधीदहा मिनिटांपूर्वी जीपमधनं तीन चार माणसं आलीतुम्हाला राजवाड्यावर नेण्यासाठीसोपानराव आत आलेत्यांनी मला सांगितलं, ही माणसं चांगली नाहीतकुमारच्या जिवाला धोका आहेमी त्यांच्याबरोबर कुमारांच्या वेशात जात आहेआताच्या आता कुमारांना जागं करा आणि त्यांना माझा हा निरोप द्यामी बरोबर तांदूळ घेतले आहेत आणि तुम्ही शोधत होतात ती संधी तुमच्यापुढे आली आहेअगदी हेच शब्द आहेत त्याचे! मला त्यातल्या एका शब्दाचा अर्थ समजला नाही!'
कुमार जागच्या जागी निश्चल झाला होता.
आयुष्यात असा एखादा क्षण येतोएकदाच क्षण येतो; पण तो अभिज्ञानाचा क्षण असतोत्या क्षणाइतकी नजर त्यानंतर आयुष्यात कधीही स्वच्छ होत नाही. खूप मोठा देखावा फिल्मचा एखादा लहानशा चौकोनावर रेखित व्हावा तसा भूतवर्तमानभविष्य असा खूप मोठा कालखंड काही क्षणात सामावल्यासारखा वाटतोजबाबदारी, कर्तव्य, परिणाम, सर्व काही आरशासारखं स्पष्ट होतं
'आणि हो!' शेवंताबाई म्हणाल्या, 'ते सोपानराव म्हणाले, कुमारांना सांग पसाभर तांदूळ बरोबर नेत आहेते म्हणत होते तुम्हाला त्याचा अर्थ बरोबर समजेल.'

कुमारच्या चेहऱ्यावरच्या भावात एक महाविलक्षण परिवर्तन होत होतं. कुमार उठून उभा राहिला आणि स्वत:शीच हसायला लागला. दोन्ही हात डोक्यावर नेऊन त्याने एक भला मोठा आळस दिला, मग तो खिडकीपाशी गेला. दिवस मावळला होता. झाडाझुडपांच्या अगदी अस्पष्ट छायाकृती दिसत होत्या. कुमार शेवंताबाईकडे वळला.
'मावशी, आपल्या दत्ता पाटीलला बोलावून आणता का?'
'कुमार! दत्ता पाटील! तो तर...'
'नंबर एकचा गुंड, हो ना? पण आता आपल्याला त्याचीच मदत घ्यायला हवीजा त्याला सांगा मी बोलावलं आहे.'
स्वत:शीच मान हलवत शेवंताबाई खोलीतून बाहेर गेल्या. कुमारने कपाट उघडलं. आतले कपडे तो हाताळून पाहत होता. तो सोपान त्याच्या वेशात गेला होतासोपानचा शर्ट तरी न्यायलाच हवा, एकाच वेळी दोन दोन कुमार कोणाच्याही नजरेस पडायला नकोत!
मग बरोबर नेण्यापेक्षा अंगावर चढवायला काय हरकत होती? सोपानची बॅग उघडून त्यातला एक परीटघडीचा लाल शर्ट काढून तो कुमारने अंगात घातला. त्याच्यापाशी बाकी काहीच साधनं नव्हती. त्या दत्ता पाटलाचीच मदत घ्यायला हवी होती.
बाहेरच्या खोलीत पावलांचे आणि बोलण्याचे आवाज आले.
खोलीचं दार उघडून तिशीच्या आसपासचा एक तगडा इसम खोलीत आला, दाराच्या आत पावलाभरावरच उभा राहिला. समोर कुमार उभा आहे याची त्याला काही विशेष फिकीर वाटतेशी दिसत नव्हती, हातांची छातीवर घडी करून दाराला पाठ लावून तो काही न बोलता उभा राहिला होता.
'दत्ता, जरा महत्त्वाचं काम आहे तुझ्याशी.'
'आता बरी आठवण झाली! मागे जेव्हा मी भेटलो होतो...'
'दत्ता, मागचं राहू देतत्या संबंधात पुन्हा केव्हातरी बोलूआता वेळ महत्त्वाचा आहे आणि तुझ्याखेरीज दुसऱ्या कोणाची मदत होण्यासारखी नाहीम्हणून तुला बोलावून घेतलं.'
'तुम्हाला गरज लागली की आम्ही धावत यायचं...'
'आधी ऐकशील का? मला असा माणूस हवा आहे, की ज्याच्यापाशी गाडी, बंदूक आहे, ज्याला रात्रीच्या प्रवासाची सवय आहे, जो बेडर आहे, कशालाही बिचकून मागे सरायचा नाही असा माणूसतू जर या व्याखेत बसत नसशील तर खुशाल परत जा.'
दत्तूचं कुतूहल जागं झाल्याखेरीज राहिलं नाही.
'असं कसलं काम असणार?'
'माझा एक मित्र काही बदमाश लोकांच्या हातात सापडला आहे. त्याला सोडून आणायचा आहे.'
पण कुठे नेलाकसा नेला...'
'जीपधून नेला.'
'पण आता कुठे कुठे शोधणार?'
कुमार जरासा हसत म्हणाला,
'तोही तसा हिकमती आहे, त्याचा माग आपल्याला बरोबर लागेल अशी त्याने सोय केली आहेयेणार?'
'आता नाव राखायला यायलाच हवं, नाही का?'
'दोन चांगले दांडगे गडी बरोबर आण आणि शिकारीचे मोठे टॉर्च तुझ्याकडे आहेत मला माहीत आहेदोन टॉर्चही आण.'
दत्तू त्याच पावली घराबाहेर पडला.

***

वीस मिनिटांनी दत्तूची जीप दारासमोर उभी राहिली. कुमार पुढे बसला. मागे तिघं बसले होते. गाडी सुरू झाली. कुमार म्हणाला,
'त्याने बरोबर तांदूळ घेतले आहेत चौक आला किंवा फाटा फुटला तर खाली उतरून बघायला हवं'
'हो.'
'पहिल्याच चौकात गाडी थांबली. चौकाचे रस्त्याच्या बाजूचे दोन कोपरे टॉर्चच्या प्रकाशात नीट पाहताच उजव्या कोपऱ्यापाशी तांदळाचे दाणे दिसले. काही न बोलता सगळे परत गाडीत चढले आणि गाडीने उजवीकडचं वळण घेतलं.

जीपच्या दिव्यांच्या प्रकाशात रस्त्यावर मधून मधून तांदळाचे दाणे चमकताना दिसत होतेते रस्ता दाखवीत होते. त्यामुळे चौकातसुद्धा लगेच ओळखू येत होतेपुढची गाडी कोणत्या वाटेने गेली ते.
अंधार पडलाच होता. रस्ता गर्द झाडीतून जात होता. त्याने अंधार आणखीच वाढला होता. रस्त्यावरचं एक लहानंसं वळण तर चुकलंच. चांगले दोन फर्लांग पुढे गेल्यावर त्यांना उमगलंवाट चुकली आहे. उलट फिरून दोन्ही बाजूंना नीट पाहत ते परत आले तेव्हा त्यांना तो लहानसा जोडरस्ता दिसला. रस्ता अरुंद होता, कच्चा होता, वरवर चढत होता. आसपास शांतता होती, काळोख होता. गाडीचा आवाज आणि दिव्यांचा प्रकाश, दोन्हीमुळे त्यांचं अस्तित्व कोणाच्याही चटकन लक्षात आलं असतंआणि त्यांच्या येण्याचा मुख्य हेतूआश्चर्यतोच फसला असता.
'दत्तू, गाडी थांबव.' कुमार म्हणाला. गाडी थांबताच गाडीबाहेर येत तो म्हणाला, 'मला वाटतं पुढचं अंतर पायीच जावंफार लांब नसणार अशी माझी खात्री आहेचला'
'गाडी रिव्हर्स करून ठेवतो. 'दत्तू म्हणाला. 'एक तर मागाहून विनाकारण उशीर होईल आणि उतार आहेनुसता ब्रेक सोडला की आपोआप हलायला लागेल'
त्याचे दोन्ही विचार कुमारला पटले.

***

गाडीचे दिवे बंद होताच एकदम काळोख दाटून आला.
'टॉर्च लावू नका' कुमार म्हणाला. 'जरा वेळ थांबा. डोळ्यांना आपोआपच कमी प्रकाशाची सवय होईल.'
काही सेकंदातच आसपास झाडं, झुडपं, रस्ता, आसपासची माणसं यांनी आकार घेतला. चढाच्या वाटेवरून चौघं निघाले. पायाखाली दगड कोटक्यांचा आवाज होणार नाही याची ते आपोआपच काळजी घ्यायला लागले. दोनतीन मोठे चढ चढून आल्यावर रस्ता पठारावर आला आणि वर आल्यावर त्यांना ती दुमजली इमारत दिसली. खोल्यांतून दिवे दिसत होते. माणसांच्या सावल्या पडद्यांवरून सरकत होत्या. हीच जर त्या गुन्हेगारांची जागा असेल तर ते खूपच बिनधास्त दिसताहेत, कुमारला वाटलं. आपल्या मागावर कोणी येण्याची शक्यताही त्यांना वाटत नसावी आणि ते खरंच नव्हतं का? त्या सोपानने समयसूचकता दाखवून ती तांदळाची युक्ती वापरली नसती तर महिन्यामहिन्यांच्या शोधानंतरही त्यांना ही अगदी आड बाजूची जागा सापडली नसती.
इमारतीपासून सुमारे पन्नाससाठ फुटांवर ते थांबले. तिथे झाडांचा आडोसा होता. इमारतीच्या दारापाशीच जीप उभी होती. सोपानला घेऊन येणारी जीप हीच असली पाहिजे, म्हणजे निदान ते योग्य ठिकाणी तर पोहोचले होते. पुढचं पाऊल टाकण्याआधी जरा विचार आवश्यक होता. माणसं किती आहेत याची त्यांना कल्पना नव्हती. त्यांच्यापाशी किती आणि कोणती शस्त्रं आहेत याची त्यांना कल्पना नव्हती. शिवाय कोणत्या प्रकारच्या लोकांशी आपला मुकाबला आहे याचीही त्यांना कल्पना नव्हती. तत्त्वावरच्या निष्ठेने लढणाऱ्या एकदोन लोकांचाही प्रतिकार कडवा असू शकतो. याउलट भाडोत्री गुंड जिवावरच बेतलं तर कातडी बचावण्याच्याच मागे लागणार हे उघड होतं.
एक प्रकारची पाहणी करण्यासाठी आपल्यापैकीच एखाद्याला पुढे पाठवायचा विचार कुमारच्या मनात आला. दत्तू पाटलाजवळ जाऊन कुमार हलकेच म्हणाला, 'दत्तू, तुझ्याबरोबरच्या लोकांपैकी चपळ, डोकेबाज, धाडसी कोण आहे? आपल्यापैकी एखाद्याने पुढे जाऊन परिस्थितीचा अंदाज घ्यायला हवा. माणसं किती आहेत, पहाऱ्यावर एखादा आहे का, कुत्री वगैरे वावरताहेत का हे जर पाहता आलं तर आपलं काम सोपं होईल.'
दत्तूच्या शेजारी एक तगडा उंच माणूस उभा होता. त्याच्याकडे पाहात दत्तू म्हणाला, 'शिवाऐकलंस ना? जापाहून ये'
हा शिवा अंगाने आडदांड असला तरी हालचालीत एखाद्या चित्त्यासारखा चपळ होता. झाडांच्या कडेकडेने जात, मधूनच सावलीचा फायदा उठवत तो इमारतीपर्यंत तर पोहोचला. बाजूबाजूने भिंतीला अगदी खेटून त्याने साऱ्या इमारतीला फेरी मारली आणि तो परत आला.
'खाली दहा अकरा माणसं तरी आहेतकुत्र्याची काही खूण नाहीमंडळी आरामात आहेतएका खोलीत पत्त्यांचा डाव मांडला आहे.'
'कुणाला बांधून वगैरे ठेवलं आहे का?' कुमारने विचारलं.
'नाही.' शिवा म्हणाला. 'पण' त्याने एक बोट वरच्या मजल्याकडे केलं. वरच्या मजल्यावरच्याही तीन खिडक्यांत प्रकाश दिसत होता. सोपान वरच्या मजल्यावर असण्याची शक्यता होती. कुमारने घड्याळात

पाहिलं. साडेआठ वाजले होते. या मंडळींचा एवढ्यात हलण्याचा काही चिन्हं दिसत नव्हती. जरा वेळ इथेच थांबून वाट पाहणंच योग्य.
सोपान वर असला आणि हातपाय बांधून ठेवलेल्या अवस्थेत नसला तर तो वरून काहीतरी खूण दाखवील
कुमारचं सोपानबद्दलचं मत दिवसादिवसागणिक बदलत चाललं होतं. वरून दिसायला साधा असला तरी खऱ्या अर्थाने 'अंतरी नाना कळा'वागवणारा होता.
त्याच्या वेशात जायची सोपानची ही तिसरी खेप होती. तीनही वेळा धोक्याच्या जागीच तो गेला होता; पण विशेष म्हणजे प्रत्येक वेळी काहीतरी तयारी करून गेला होता. आपल्या येण्याची तो वाट पाहत असणार. त्याच्या मनात काहीतरी योजना असणारच. आपण इथे हजर असल्याची काहीतरी खूण त्याला द्यायला हवी.
'शिवा,' कुमारने विचारलं, 'वरच्या मजल्यावर मागच्या बाजूला प्रकाश दिसला का रे?'
'अंनाहीफक्त या समोरच्या तीन खोल्यांतच दिसतो तेवढा.'
म्हणजे या वरच्या तीन खोल्यांपैकी एकीत कुठेतरी सोपान होता.
'दत्तू,' कुमार म्हणाला, 'आपण इथेच तास दीडतास थांबूही मंडळी जरा बेफिकीर दिसतातत्यांची खाणी वगैरे झाल्यावर काहीतरी पिणं वगैरे होणारचमग दोनतीन माणसं जागी राहतील बाकीची झोपतीलकिंवा सगळेही झोपतीलमला तरी ही काही अनुभवी मंडळी वाटत नाहीत.'
ते पाचही जण मोठ्या झाडांच्या बुंध्यांना पाठ लावून बसले.

***

शेवंताबाईने जाग आणल्यापासून कुमारला निवांत असा वेळ मिळालाच नव्हतातो आता मिळत होता.
हा सोपान त्याच्याच वयाचा वाटत होता. वास्तविक त्या दोघांच्या परिस्थितीत जमीन अस्मानाचा फरक होता. त्याला स्वत:ला जन्मापासून सर्व संधीसुविधा उपलब्ध होत्या; पण त्याने आतापर्यंतच्या आयुष्यात काय साध्य केलं? गोळा बेरीज अक्षरश: शून्य आली असती.
त्याच्या उलट हा सोपानजन्माला आला तेव्हा त्याच्यापाशी काय होतं? काहीही नाही! पण प्रत्येक लहानसहान संधीचा फायदा घेत घेत तो कोठपर्यंत पोहोचला होता! कुमारपाशी त्याने एकदाच फक्त आपलं अंतर्मन उघडं केलं होतंरोमांचकारी, धाडसी, साहसी, शौर्यशाली आयुष्य जगण्याचं त्याचं स्वप्न होतंजरा संधी मिळताच त्यानेसर्वकाही हस्तगत करून घेतलं होतं.
पण तो केवळ तेवढ्यावरच थांबला नव्हता. अचानकपणे वेळ आली तेव्हा एका साहसी नायकाची भूमिका त्याने खरोखरच वठवली होती! त्याच्या पदरात काय पडणार होतं? काही नाही! कदाचित स्तुतीचे चार शब्द किंवा काही धन; पण कुमारची खात्री होती सोपानने हे त्यासाठी मुळीच केलं नव्हतंती अंतर्मनाची एक ऊर्मीच होती!
आणि मग संध्याकाळी पुन्हा एकदा
आणि आज संध्याकाळी पुन्हा एकदा- तिसऱ्यादा!
एवढंच नाहीकुमारसाठीही त्याने ते साहसाचं दार खोललं होतं!
कुमार आपल्या मागोमाग आपल्या मदतीला येणारच अशी मनात खात्री ठेवूनच सोपान गेला होता. तिथे प्राणाला कदाचित अपाय होण्याचा संभव आहे हे माहीत असूनही गेला होता
त्याचा विश्वास सार्थ ठरवलाच पाहिजे!
त्याचा शेवटचा निरोपशेवटचे शब्द म्हणाअक्षरश: खरे होते!
'तुम्हाला दुसरी संधी आली आहे'
तो म्हणाला होता.
काही काही कोडी अशी असतात, की सुरुवातीस ती नुसती वेड्यावाकड्या रेषांची गुंतागुंत वाटते; पण एकदा का त्यातली गुप्त आकृती ज्ञात झाली, की नजर पुन्हा कधीही फसत नाही.
आपलं असंच झालं आहे, कुमारला वाटलं. इतके दिवस आयुष्य म्हणजे निरर्थक घटनांचा गुंतावळा वाटत होता; पण आता आयुष्याचा खरा अर्थ ध्यानात आल्यानंतर पुन्हा कधीही तशी फसवणूक होणार नव्हती!

***

22.

अजयने सगळे निर्णय तडकाफडकी घेतले होते. मनातल्या मनात त्याने खूप योजना आखल्या असतीलअसं व्हावं, तसं व्हावं, अमक्याने असं करावं; पण ते शेवटी त्याच्या मनातलेच मांडे ठरणार नाहीत कशावरून?

ऐशआरामात लोळणारा, दारूच्या नशेत झिंगलेला कुमार त्याच्यात क्षणाधीत असं आमूलाग्र परिवर्तन होइल ही आशा वेडेपणाचीच नव्हती का?
जीपमधून जाताना तो वळणावर आणि मग रस्त्यावर तांदळाचे दाणे टाकत होता खरा; पण सगळा शेखमहंमदी स्वप्नांचाच प्रकार होताकुमार धुंदीतून भानावर येणारत्याला आपल्या शब्दांचा अर्थ समजणारलागलीच काहीतरी योजना आखून तो आपल्या पाठलागावर येणारहे सर्व ढगांचे किल्लेच ठरण्याची शक्यता जास्त होतीएखाद्या वाऱ्याच्या झुळुकीने विरून जाणारे
कठोर सत्य हे होतं की, त्याच्या स्वत:खेरीज त्याला कोणावरही विसंबून राहता येणार नव्हतंपाऊल पुढे टाकलं होतं तर खरंते आता मागे घेणं नाही

* * *

आधी गावाबाहेरचा रस्ता आणि मग झाडीतून जाणारा कच्चा रस्ता मिनिटामिनिटागणिक परिस्थितीतला वाढत जाणारा कठीणपणा जाणवला होता
शेवटी जीप त्या दुमजली इमारतीसमोर थांबली.
'या कुमार, या' जेधे नकली अदबीने म्हणाला. अजय गाडीतून खाली उतरलाखिशातली दारूची बाटली त्याने तोंडाला लावली. दोन घोट घेतल्याचा अभिनय केलाउजव्या हाताच्या मागच्या बाजूने तोंड पुसलं आणि इकडे तिकडे पाहत तो म्हणाला
'अरे! हा काही राजवाडा नाही! अरे!'
मागून दोघांनी त्याला खांद्याला धरून जरासं ढकलत त्या इमारतीच्या दरवाजाकडे नेलं.
'चला आता कुमार!' त्यांचा आवाज जरासा मग्रूर होता.
झोकांड्या खात अजय दारातून आत शिरला.
त्याच्यामागे दार बंद झाल्याचा आवाज आला.
मग त्याने समोर पाहिलं.
समोर गोवर्धनदास त्रिपाठी उभे होते. डावा हात कमरेवर होता, उजवा हात चांदीच्या मुठीवर होता.
म्हणजे आता साऱ्या बतावण्या संपल्या होत्या तर! अजयने मनातल्या मनात विचार केला. गोवर्धनदासांनी उघड उघड शत्रुत्वाचा पवित्रा घेतला होता आणि या धीटपणामागे एकच कारण असू शकत होतं. त्यांची खात्री असली पाहिजे की, कुमार आता इथून जिवंतपणी परत बाहेर जाणार नाही. क्षणभर त्याच्या सर्वांगावरून भीतीचा एक सरसरता काटा येऊन गेला; पण मग त्याला उमगलंया नाण्याला दुसरीही बाजू होतीआता त्याचेही हात बांधलेले नव्हतेआता तोही सुटकेसाठी कोणतेही आणि सर्व उपाय वापरू शकणार होता!
त्याच त्या बरळल्यासारख्या आवाजात तो म्हणाला,
'अरे! गोवर्धनदासजी! तुम्ही मला न्यायला आला की काय? वा! वा ! काय म्हणतात मातोश्री?'
'मातोश्रींची गाठ पडायला जरा अवकाश आहे, कुमार.'
गोवर्धनदास थंड आवाजात म्हणाले. 'मी जे सांगतो ते समजण्याइतका तू शुद्धीवर आहेस की नाही मला माहीत नाहीआणि खरंतर मला त्याची फिकीरही नाही कुमार, तुझ्या आयुष्याच्या या शेवटच्या काही घटका आहेतया घटका शेवटच्याच का आहेत, काही वेळातच तुझ्या आयुष्याचा शेवट का होणार आहे हे मी तुला सांगणार आहे; पण सारं आयुष्यच ज्याने दारूच्या नशेत घालवलं तो शेवटच्या क्षणीतरी भानावर असणार आहे कशावरून? असो'
गोवर्धनदासजींनी खोल्यातल्या बाकीच्यांना आत जायची खूण केली. ते आणि अजय एवढेच खोलीत राहिले.
'कुमार, मी तुला दारुडा, बेजबाबदार समजत होतोअजूनही समजतो; पण माझे दोन प्रयत्न फसले याचं कोडं मला उलगडत नाहीतू तोफखान्यावर आलास तेव्हा झिंगलेला होतासआसपास वावरणाऱ्यालाही दारूचा भपकारा येत होताहातातलं पिस्तूल रिकामं होतंएक खेळणं होतंत्या गायत्रीला वर खुर्चीला बांधून ठेवली होतीतुलाही खुर्चीत बांधला होतातू कसा मोकळा झालास? वर पाठवलेल्या दोन सराईत गुंडांना तू जमीनदोस्त कसं केलंस? खाली येऊन एकाला गोळी घातलीसदुसऱ्याचा खांदा कायमचा निकामी करून टाकलासआणि तुमचे लोक ऐनवेळी हजर झालेमला हे कोडंच उलगडत नाही'
दोन्ही हात हवेत हलवून अजय हसत होतात्याचा आवाज आला तो बरळल्यासारखा आला
'गोवर्धनदासजीत्याचं असं आहे'
'चूप!' ते ओरडले. 'दुसऱ्या दिवशीचा घाट किती काळजीपूर्वक जमवून आणला होतातुमच्या लोकांनी मला

हद्दपार केलं होतंसाऱ्या जन्माची कमाई मातीत घातली होतीतुमचा पुरा पुरा सूड मी त्या संध्याकाळी घेणार होतोतुला माहीत आहे का, की कुणाल माझा मुलगा होता? तो सारा सत्काराचा बेत मीच जुळवून आणला होता. आणि भर सभेत शेकडो लोकांसमोर तू, तुझी आई आणि ती गायत्रीतिघांच्याही आयुष्याचा अंत व्हायचा होता; पण झालं भलतंच! माझा कुणालच मारला गेला! आता माझ्यासाठी सूडाखेरीज काहीही शिल्लक नाही! आधी तू आणि मग तुझी आई! तुमचं घराणंच मी नामशेष करणार आहे!'
गोवर्धनदासांच्या डोळ्यात वेडाचीच लकाकी दिसत होती. मनाचा तोल पुरा ढासळलेल्या माणसाची ती दर्पोक्ती होती. आपल्या कृत्यांचा परिणाम काय होईल याचाही त्यांना विसर पडला होता आणि या अवस्थेत त्यांच्या हातून काहीही होणं शक्य होतं.
'या रे!' ते ओरडले. याला वर नेऊन बांधून ठेवा!'
दोन माणसं खोलीत आली. अजयने प्रतिकाराचा केवळ अभिनय केला. तो अर्धवटच भानावर आहे एवढी त्या दोघांची खात्री होण्याइतपतच.
ते दोघं त्याला वरच्या खोलीत घेऊन गेले. मधे वायरला एक दिवा लोंबत होता. आसपास नजर टाकायला त्याला जो काय थोडा अवधी मिळाला त्यावरून दिसलं की खोली वापरातली नव्हती. सर्वत्र धूळ कचरा होता. मधली एक खुर्ची त्यांनी पुढे ओढली आणि त्याला खुर्चीत बसवला. त्याची धडपड चालली होती. दोन्ही हात खुर्चीच्या हातांवर न ठेवता ते खुर्चीच्या हातांच्या कडेला ठेवण्याची त्याची खटपट चालली होती. शेवटी कंटाळून त्यांनी त्याचे हात तसेच खुर्चीच्या हातांना बांधले, दोन्ही पाय खुर्चीच्या दोन पायांना बांधले आणि आपल्यामागे खोलीतला दिवा मालवून ते बाहेर गेले. दाराला बाहेरून कडी लावल्याचा आवाज आला.
दार बंद होताच अजयने उजवं मनगट सरळ केलं. आधी ते सपाट होतं, आता उभं होताच दोरीत जरा ढील आली. फक्त त्याच हातावर त्याने लक्ष एकाग्र केलं. दोरी कांचत तर होतीच; पण हात मागेपुढे हलवता येत होतादोरीतली ढील वाढत होतीखालच्या खुर्चीचा हातही सरळ नव्हता कोरीव होताआणि एक भाग खूपच चिंचोळा होताओढत ओढत दोरी त्या निमूळ भागापाशी आणली तेव्हा आणखीच सैल झालीपाचसात मिनिटांच्या धडपडीनंतर उजवा हात शेवटी मोकळा झालादोरीला कांचून एकदोन ठिकाणी रक्ताळला होताघामाने तिथे विलक्षण झोंबत होतंहात पुँटवर पुसताच ती वेदना जरा कमी झाली
खाली वाकून त्याने डाव्या नडगीच्या नीकॅपमध्ये खोचलेला चाकू बाहेर काढला, दोन्ही पाय, डावा हात मोकळा केलाचोळून चोळून त्यांच्यात परत सेन्सेशन आणलं आणि मग तो सावकाश उभा राहिला.
धुरकटलेल्या खिडक्यांच्या कांचातून अगदी अंधुक प्रकाश येत होता. सांभाळून चालत तो दारापाशी गेलाहातांनी चाचपून पाहताच त्याला आतली कडी हाताला लागली. त्याने दाराला आतून कडी घातली. भिंतीवर हात फिरवताच डाव्या हाताला दिव्याचं बटण लागलं. ते दाबताच खोलीत प्रकाश झाला. खोलीकिंबहुना हे सर्व घरचवापरात नसावी ही त्याची अटकळ खरी ठरली. फार पूर्वी कधी काळी इथे राहून गेलेल्या लोकांचं टाकाऊ सामान खोलीत पसरलं होतं. वाटेतली खुर्ची त्याने भिंतीला लावून ठेवली. खाली दोऱ्या पडल्या होत्यादोरी बळकट होतीएकाला एक अशी बांधल्यावर दुहेरी करूनसुद्धा चांगली आठ-नऊ फुटांची लांबी होत होती.
आपल्या मदतीला कोणीही येणार नाही असं गृहीत धरून बचाव आणि आक्रमण या दोन्हीसाठी उपयुक्त साधनं शोधण्यासाठी त्याची नजर खोलीभर फिरत होती. बरोबर त्याने जवळजवळ अर्धी बाटली व्हिस्की आणली होतीत्यावेळी फारसा विचार न करता त्याने बाटली खिशात घातली होती- कारण कुमारच्या खिशात दारूची बाटली अपेक्षितच होती. पण आता त्याला त्या व्हिस्कीचा एक आक्रमक उपयोग सुचलाहा प्रयोग त्याने प्रत्यक्ष कधीच केला नव्हता; पण सिनेमातून अनेक वेळा पाहिला होता
मोलोटोव्ह कॉकटेल!
पेट्रोलने भरलेल्या बाटलीत फडक्याची वात घालून वात शिलगावून ती बाटली लांब फेकल्यावर फुटताच उडणारा ज्वालांचा भडका आणि स्फोटपडद्यावरचा तो देखावा विसरता येण्यासारखा नव्हताचमग त्याला तोच प्रयोग करून पाहायला काय हरकत होती? आसपास जरा शोध घेताच तीन मध्यम आकाराच्या बाटल्या सहज सापडल्या. एक खिडकीला लोंबकळत असलेल्या जुनाट पडद्याच्या त्याने तीन लांब चिंध्या काढल्या. तीनही बाटल्या व्हिस्कीने भरल्या आणि वर चिंध्यांची बुचं बसवली. तीनही बाटल्या खिडकीच्या खाली ओळीने मांडून ठेवल्या. हातातली लांब दोरी त्याने भिंतीजवळच्या पलंगाला बांधली आणि दोरी दाराच्या आत सुमारे चार फुटांवर जमिनीवर सरळ ठेवली. बाटल्या आणि दोरीची जागा नीट लक्षात ठेवून त्याने दिवा मालवून टाकला. खूप दिवसांत उघडली नसल्याने घट्ट असलेली खिडकी उघडता उघडता तो मनाशी विचार

करीत होताकल्पनाही केली नसेल अशा हल्ल्यांना गोवधनदासांना तोंड द्यावं लागणार होतंत्यांनी स्वप्नातही आणले नसतील असे हल्ले!
राणीसाहेब, कुमार आणि गायत्रीदेवी यांच्या हत्या करायला निघालेला हा नीच गोवर्धनदास! ज्या घराण्याने त्याला मानमरातब सत्तासंपत्ती दिली तेच घराणं निर्वंश करायला निघालेला हा नराधम! हे राजघराणं म्हणा वा कुमार म्हणा आपल्या मनात त्यांच्याबद्दल एवढी विलक्षण आपुलकी का निर्माण झाली आहे याचं उत्तर त्यालाही सांगता आलं नसतं; पण आपुलकी होती हे निर्विवाद! तीन वेळा त्याने कुमारच्या बचावासाठी आपला जीवच धोक्यात घातला होताकोणतीही अपेक्षा न करता!
खिडकी उघडली. बाहेर रात्रीचा काळा पसारा होता. कोठेही दिवासुद्धा दिसत नव्हता. खालच्याच खोल्यांतल्या दिव्यांचे प्रकाशझोत अंगणात पडले होते. त्याने घड्याळात पाहिलं. आठ वाजले होते. आपण घरातून बाहेर पडताच शेवंताबाईंनी कुमारला शुद्धीवर आणला असेल आणि सर्व घटनांचा अर्थ समजून तो निघाला असेल तर तो एव्हाना यायला हवा होता. जणू काय त्याच्या प्रार्थनेला उत्तर म्हणूनच की काय लांबवरून एक प्रकाशाचा ठिपका त्याच्या दिशेने येताना दिसला. घर टेकडीच्या माथ्यावर असलेल्याने नजरेच्या टप्प्यात खूप मोठा परिसर येत होता. ही रस्त्यावरून सरळ जाणारी एखादी परकी गाडी असू शकेल; पण जेव्हा ते दिवे थांबले, परत गेले आणि घराकडे येणाऱ्या रस्त्याकडे वळून सावकाश सावकाश वर चढायला लागले तेव्हा मात्र मनात आशा जन्माला आली
रात्रीच्या शांततेत इंजिनाचा आवाज अस्पष्टपणे त्याच्यापर्यंत पोहोचत होता.. दिवेही अंधारात अगदी स्पष्ट दिसत होते. त्याला वाटलं, त्यांनी (जर ते त्याचे मित्र असतील तर!) जरा सावधपणे यायला हवं
जणूकाही हेच कोणीतरी त्यांच्या कानात सांगितलं! दिवे थांबले, गाडीने रिव्हर्स घेतला, दिवे मालवले गेले. गोवर्धनदासची माणसं असती तर बिनदिक्कत वरपर्यंत आली असतीतेव्हा अशक्यातली अशक्य गोष्ट घडली होतीकुमारच त्याच्या मदतीसाठी आला होता!
दोन टॉर्चचे झोत काही वेळ दिसले, मग मालवले गेले. मग अजयला दिसलं की चढउतारांचा आणि सावल्यांचा फायदा घेत घेत एक आकृती झाडांतून पुढे आली आणि (बहुधा घराला वळसा घालून) परत झाडीत दिसेनाशी झालीछान! ते अगदी सावध पावलं टाकीत होते!
काही करून त्यांच्याशी संपर्क स्थापन करायला हवा होता. जो काय झगडा करायचा तो लवकरात लवकर करायला हवा. न जाणो, गोवर्धनदासांची आणखी माणसं येऊन दाखल व्हायची
खिशातली काडेपेटी काढून त्याने एक काडी शिलगावली आणि खिडकीजवळ डावी उजवीकडे अशी तीन चार वेळा हलवली; पण तिकडून काही प्रतिसाद आला नाही. त्यांचं या बाजूला लक्ष नसेल.
दहापंधरा मिनिटांनी त्याने तोच प्रयोग पुन्हा केला आणि ताबडतोब प्रतिसाद आला!
प्रकाशाचा एक लालसर ठिपका (बहुधा रुमालाने झाकलेला टॉर्च असावा) हवेत आडवा पाचसहा वेळा हलला.
त्यांना नऊची वेळ दिली पाहिजे. जे काय करायचं ते नऊ वाजता करा. अजयने काडी शिलगावली, हातामागे धरली आणि वर नेऊन हात डावी उजवीकडे चार वेळा केला आणि काडी खाली घेतली. मिनिटभर थांबून त्याने तीच खूण परत एकदा केली. मग तो समोर पाहत थांबला.
टॉर्चचा पिवळा ठिपका लागलात्यावर नऊ वेळा हाताची सावली आली. म्हणजे त्यांना सूचना बरोबर मिळाली होती तर! आता फक्त थांबायचं. वीसच मिनिटं, पण तीसुद्धा उलटता उलटेनात.
मनावर मोठ्या शिकस्तीने ताबा ठेवावा लागला.
त्याच्या घड्याळ्यात नऊला एक मिनिट कमी असताना समोर झाडांच्या रांगेबाहेर एक ठिणगी चमकली आणि लगोलग मोठा जाळ आला (त्यांनी गाडीतलं पेट्रोल वापरलं असलं पाहिजे.)
मिनिटभरात खालचं दार धाडकन् उघडलं. अजयने तयार केलेल्या तीन बाटल्यांतली एक हातात घेतली, वरची कापडाची वात आत बुडवून जराशी बाहेर ठेवली. खालच्या दारातून दोनजण बाहेर पडले. समोर पेटलेला जाळ घरापासून तीसपस्तीस पावलांवर होता. ते दोघं वीसपंचवीस पावलं पुढे गेले असतील तेव्हाच अजयने हातातल्या बाटलीची वात पेटवली आणि बाटली खिडकीतून त्या दोघांच्या रोखाने फेकली. हवेतून वक्राकार अग्निरेखा काढीत ती बाटली त्यांच्यामागे चार फुटांवर पडली आणि लहानसा फट्! आवाज होऊन आगीचा लोळ उठला. त्याचक्षणी समोरच्या झाडीतून बंदुकीचा फाड्! आवाज आला. त्या दोघांपैकी एकजण मुडपून खाली पडलादुसरा पळत पळत मागे घराकडे आला. अजय घाईघाईने खोलीत वळला, त्याने दाराची कडी काढून ठेवली आणि एका बाजूला बसून जमिनीवरच्या दोरीचं टोक हातात धरून ठेवलं.

अपेक्षेप्रमाणे जिन्यावर पावलांचा धाडधाड आवाज आला
दाराची कडी काढली गेली, दार आत जोराने ढकललं गेलं
दोघंजण घाईघाईने खोलीत आलेअजयने दोरी एकदम ताठ आणि वर केली
पुढच्याच्या गुडघ्याखाली दोरी आली, त्याचा एकदम तोल गेला, तो कोलमडत पुढे पडलात्याच्या मागच्या दुसऱ्याचाही तोल गेला. खिडकीतून बाहेरच्या जाळाचा प्रकाश आत येत होताअजयने शेजारीच ठेवलेली जड खुर्ची उचलली, डोक्यावर नेली आणि झपाट्याने खाली आणली. दयामया दाखवायची ही वेळ नव्हती.
'मेलो!' एकजण ओरडला.
खुर्ची पुन्हा वर गेली, पुन्हा झपाट्याने खाली आली.
नुसता कण्हण्याचा आवाज आला.
अजयने खुर्ची बाजूला ठेवली. पुढे होऊन खाली पडलेल्यांचे खिसे चाचपले. एकाच्या खिशात पिस्तूल होतं. ते घेतलं. तो खिडकीपाशी गेला. खालच्या जीपपाशी एक दोघं जमले होते. अजयने दुसरी बाटली घेतली, तिची वात व्हिस्कीत बुडवून ओली केली, बोळा घट्ट बसवला, वातीला काडी लावताच वातीने पेट घेतलाती बाटली तशीच सरळ खाली टाकलीती गाडीच्या बॉनेटवर आपटून फुटली आणि आगीचा लोळ उठला
अजयने अंगातला कुमारचा मॅनिला काढला, तो उलटा करून घातला; तो खोलीबाहेर पडला, मागे त्याने खोलीचं दार बंद केलं आणि मग तो जिन्यावरून सावकाश सावकाश खाली आला
खोलीत सहासात माणसं होतीत्यात गोवर्धनदासही होते. सगळ्यांची धावपळ चालली होती. काय होत आहे हेच त्यांना कळत नव्हतं
खोलीचं दार उघडं होतं. बाहेरचा देखावा दिसत होता.
तीसचाळीस पावलांवर ती होळी अजूनही धडधडतच होती.
पण आता होळीच्या प्रकाशाविरुद्ध पाच माणसं घराच्या दिशेने येताना दिसत होती. दोघांच्या हातात टॉर्च होते, दोघांच्या हातात जाड लाकडं होती आणि एकाच्या हातात बंदूक होती.
'दूर व्हा!' गोवर्धनदास ओरडले आणि ते दारापाशी आले.
अजयला दिसलं की त्यांच्या हातात पिस्तूल होतं.
नेम धरण्यासाठी त्यांनी पिस्तूल उचललं.
'गोवर्धनदास! मी इकडे आहे!' अजय ओरडला.
'अं?' म्हणत गोवर्धनदास गरकन वळले
अजयच्या रोखाने त्यांनी पिस्तूल झाडलं.
त्यांचा नेम चुकला.
अजयचा नेम चुकला नाही.
त्यांच्या छातीवर लाल डाग आला. हातातलं पिस्तूल खाली आलं आणि त्यामागोमाग तेही खाली कोसळले.
त्याचवेळी दारातून ते पाचही जण जोरात आत आले.
'सोपान?' कुमार ओरडला.
'कुमार? मी इकडे आहे!' अजय म्हणाला.
भराभर पावलं टाकत कुमार त्याच्यापाशी पोहोचला. त्याचा हात हातात घेऊन जोराने दाबत म्हणाला,
'सेफ! थँक गॉड!'
आणि मग तो खोलीकडे वळला. बंदुकीच्या धाकाखाली खोलीतली सारी माणसं एका कोपऱ्यात अंग चोरून उभी होती.
'दत्तू!' कुमार म्हणाला, 'मी या सोपानबरोबर गावात जातो. चौकीवर झाल्या प्रकाराची वर्दी देतो. तिथून माणसं येतीलच. त्यांना इथलं सगळं पाहू दे. काय त्यांची सिस्टीम असेल त्याप्रमाणे काम करू दे. आज मी गडबडीत आहे. आज पुन्हा गाठ पडायची नाही; पण आपला व्यवहार मागाहून पुरा करू, ठीक आहे?'
'हो,' दत्ता म्हणाला.
'आणि वेळेवर मदतीला आलास त्याबद्दल आभार. नाहीतर मी एकट्याने काय केलं असतं? जाऊ मी? या सगळ्यांच्यावर नीट लक्ष ठेव बरं का. सगळी तयार माणसं आहेत. शहरातून कोणीतरी इन्स्पेक्टर येतीलचकारण यातल्या काहींचा मागच्या अपहरण, खुनाचा प्रयत्न असल्या गुन्ह्यांशी संबंध आहेसावध राहा'
आणि मग सोपानकडे वळून म्हणाला, 'चल सोपान.'

***

बाहेर आल्यावर त्यांनी दारापासच्या जीपची तपासणी केली. बॉनेटवर थोडा काळपट डाग होतात्याखेरीज बाकी काही बिघाड झालेला दिसत नव्हता.
'आपण दत्तूच्या गाडीतून जाऊ या' कुमार म्हणाला, 'गावात गेलो की बघतो गाडीची काही सोय होते का.'
दोघं उतारावरून खाली चालत गेले. जीपमधे बसून कुमारने इंजिन सुरू केलं आणि अजय शेजारी येऊन बसताच गाडी सुरू केली. मोठ्या रस्त्याला लागून शेवंताबाईच्या घराशी पोहोचेपर्यंत कुमार एक शब्दही बोलला नाही. त्या दोघांना बघून शेवंताबाईचा 'आ'च झाला.
'मावशी, मी गावात जाऊन येतोतोवर आमच्या दोघांसाठी काहीतरी बनवआम्ही लगेच निघणार आहोत'
'कुठे?'
'जाणाराला कुठे जाता विचारायचं नसतं, हो ना?' कुमार म्हणाला आणि तसाच बाहेर गेला.
माजघरातल्या खुर्चीत बसत अजय म्हणाला,
'शेवंताबाई, तुम्ही सांगितलेलं काम झकास केलंत!'
'पण सोपानराव, हा प्रकार आहे तरी काय?'
दोन्ही हात दोन्ही बाजूंना पसरीत अजय म्हणाला,
'शेवंताबाई, आपण साधी माणसंकोणाचे काय खेळ चालले आहेत आपल्याला काय कळणार? कोणीतरी आपल्याला पटावरच्या प्याद्यासारखं मागेपुढे करीत असतंसुखरूप परत आलो ना? त्यावरच समाधान मानून गप्प बसावं, हेच चांगलं, नाही का'
'म्हणजे तुम्ही मला काही सांगणार नाही!' ती चाणाक्ष स्त्री म्हणाली.

***

कुमारला परत यायला पाऊण तास लागला. तोपर्यंत अजयने दोघांच्या सामानाचं पॅकिंग करून ठेवलं होतं.
लगोलग दोघं जेवायला बसले (टेबलावर कुमारसमोर बसल्यावर मग एकाएकी अजयला जाणवलंबोलण्याच्या भरात आपण आपली गड्याची भूमिका विसरूनच गेलो आहोत!).
तो उठून उभा राहताच कुमार म्हणाला,
'सोपान, बस रे! आता या शिष्टाचाराला वेळ नाही! बस!'
तेव्हा मग अजयला त्याच्याबरोबर जेवण घ्यावंच लागलं.
'कुमार, आता अकरा वाजून गेले आहेतइतक्या रात्री निघून काही विशेष फायदा होणार आहे का? उद्या सकाळी आपण गेलो तर?'
'असं म्हणतोस? मी खूप खटपट केली; पण रात्री काही गाडी मिळण्याची लक्षणं नाहीतउद्या सकाळीच निघायला हवं.'
अजयने नंतर काही विचारलं नाही. वास्तविक काय झालं आहे ते जाणून घेण्याचा त्याला कमालीची जिज्ञासा होती; पण त्याची जागा सोडून तो काहीही जास्त बोलू शकत नव्हता.
'सोपान,' कुमार म्हणाला, 'बऱ्याच गोष्टी तू माझ्यापासून लपवून ठेवल्या आहेस, मला माहीत आहे. आता सांग.'
अजयने प्रश्नार्थक चेहऱ्याने कुमारकडे पाहिलं.
'वेड्याचं सोंग पांघरू नकोसतुला जे झालं त्यातलं काहीच अनपेक्षित नव्हतंनिदान आश्चर्य वाटण्यासारखं नव्हतं- हे खरं आहे ना?'
'अंहो'अजय म्हणाला. 'जरा वेळ मिळाला की सारं काही तुम्हाला सांगायचं ठरवलंच होतंठीक आहे, आता सांगतो. कुमार या सर्व कटामागे कारभारी गोवर्धनदासजी त्रिपाठी होते. आता माझ्यापर्यंत या गोष्टी कशा पोहोचल्या याच्यात जायला नकोकाही वर्षांपूर्वी संजीवनीबाई माने नावाच्या बाईंनी आपल्याशी राजेसाहेबांनी विवाह केला आहे आणि आपला मुलगा कुणाल, हा राजेसाहेबांचा औरस वारस आहे अशी फिर्याद केली होती'
'होते मला माहीत आहेकोर्टाने ती फिर्याद कचऱ्याच्या टोपलीत फेकून दिली हेही मला माहीत आहे'
'कुमार, हा कुणाल गोवर्धनदासांचा मुलगा होता-'
'काय?'
'होय - गोवर्धनदास आणि संजीवनीबाई यांचा. कुमार, जरा खाजगी गोष्टींबद्दल बोलतो त्याबद्दल माफ कराखाली गडीमाणसांत अशी एक बातमी पसरली होती की, आपला आणि गायत्रीदेवींचा लवकरच विवाह होणार आहे आणि आपण काही दिवसांसाठी परगावी किंवा परदेशात जाणार आहात.'

‘सोपान! हो संपूर्ण थापाथापी आहे! अक्षरन् अक्षर खोटं आहे!’
‘पण तुमच्या लक्षात येईल की, हे सर्व कारस्थान गोवर्धनदासांचं असलं तर त्यांना या दोन्ही गोष्टी व्हायला नको होत्यायातलं काही काही तुम्ही स्वत:च मला एकदा बोलून दाखवलं होतं, आठवतं?’
‘गायत्री संबंधात? होशक्य आहे’
‘त्या गोष्टी होऊ नयेत म्हणून त्यांनी गायत्रीदेवांना पळवून नेऊन आपल्याला त्यात गुंतवण्याचा कट रचलालिली या नावाची एक डान्सर तुम्हाला आठवते?’
‘हो’
‘तिचे आपण उपकार मानायला हवेतकारण क्लबातून तुम्हाला पळवून नेण्याचा कट होतातो तिच्या कानावर आला आणि तुम्ही वेळोवेळी तिला खूप मदत केली होतीतत्याची आठवण ठेवून स्वत: धोका पत्करून तिने तुम्हाला रात्री राजवाड्यावर आणून सोडलंतुम्ही जर गोवर्धनदासांच्या हाती सापडला असतात तर तुमचा आणि गायत्रीदेवींचा एखाद्या अपघातात मृत्यू झाला असताआणि तुमच्या सवयी पाहता कोणाचा विश्वास बसला नसता. मग गोवर्धनदासांच्या मार्गात उरल्या फक्त राणीसाहेबज्यांना या खोल कटाची अजिबात कल्पना नव्हती’
कुमार आश्चर्याने विस्फारलेल्या डोळ्यांनी अजयकडे पाहत होता.
‘पण तुम्ही राजवाड्यावर परतल्याची बातमी त्यांच्यापर्यंत पोहोचलीत्यांचे हस्तक सगळीकडेच होतेतेव्हा त्यांनी तो फोनचा प्रयत्न केला आणि कुमार, तुमची अवस्था काहीही करण्याची नव्हतीसमजा तुम्ही गेला नसतात तर तुमच्याविरुद्ध कुप्रसिद्धीचं केवढं हत्यार त्याला मिळालं असतं! फोन मीच घेतला आणि त्या क्षणातच तो धाडसी निर्णय घेतलात्यामागची कारणं मलाही सांगता यायची नाहीत.’
आणि मग अजय जरा खालच्या आवाजात म्हणाला, ‘तुमच्या कपाटातली एक दारूची अर्धी बाटली घेतलीपिस्तूल घेतलं; पण गोळ्या पायाच्या नीकॅपमध्ये खोचल्यागाडी चालवायला तुम्हीच शिकवलं होतं तुमचे कपडे घातल्यावर कोणालाच काही संशय आला नाहीतिथेमाफ करा जरा नशेत असल्याचा, रिकामं पिस्तूल हवेत फिरवण्याचा अभिनय केलात्यांनी मला वर नेलं’
‘आणि राणीसाहेबांना याची कल्पना होती?’
‘हो, त्यांच्या परवानगीनेच मी हे साहस केलं आणि त्यांनी लगोलग त्यांचे कमांडो पाठवलेचत्यांची केवढीतरी मदत झाली!’
‘नाही, सोपान, गायत्रीने मला सर्व काही सांगितलं आहेतू एकाला ठार करून, दुसऱ्याच्या हाताच्या पिस्तुलीच्या गोळीने चिरफळ्या उडवल्यास आणि मग ते कमांडो आले’
‘ज्या ज्या वेळी जे जे योग्य वाटलं ते ते करावंच लागलं.’
‘ठीक आहे. पुढे.’
‘गायत्रीदेवींना मी राजवाड्यावर परत आणलं; पण अर्थातच वाटेत त्यांच्याशी एकदोन शब्दांपेक्षा जास्त बोलणं अशक्यच होतं.’
‘हो, मग?’
‘संध्याकाळचा जाहीर सन्मानाचा घाट गोवर्धनदासचाच होता आणि तुम्ही निघून जायचा निर्णय घेतलात- राणीसाहेबांची अवस्था काय झाली काय सांगू? म्हणून मी पुन्हा एकदा ते धाडस करण्याची सूचना राणीसाहेबांना केलीअगदी सुदैवानेच मी कमरेला भरलेलं पिस्तूल लावलं होतं आणि पंधरा पावलांवरूनच कुणालला ओळखलातो आणि त्याच्या बरोबरचे दोघेत्यांचा पवित्राच संशयास्पद होतामी सावध झालोशेवटी तुम्ही दिलेली शिकवणच उपयोगी पडली, माझी एकही गोळी चुकली नाही.’
कुमारने फक्त उसासा सोडला.
‘कुमार,’ अजय म्हणाला, ‘तुम्ही निघून गेलात- राणीसाहेबांच्या मनाला ती गोष्ट फार लागलीआतापर्यंत तुम्ही अनेक वेळा असे गेलेले आहात, त्या म्हणत होत्या; पण यावेळची गोष्ट वेगळी होतीगेल्या एकदोन दिवसांत जे काही झालं होतं त्याचा तुमच्या मनावर काही अनिष्ट परिणाम होईल अशी त्यांना भीती वाटत होतीत्यांच्याशी काहीही न बोलता मी मनातल्या मनात ठरवलं, की शक्य तर तुमचा शोध काढायचा आणि तुम्हाला एवढीच विनंती करायची की राणीसाहेबांशी संपर्क साधाकोठे आहात, कसे आहात ते त्यांना कळवात्यांना जास्त काही नको होतं’
‘पण माझा पत्ता तुला कसा मिळाला?
‘शिवबा.’

‘हो, खरं आहे. त्याला माहीत होतं की मी असा इथे आलो आहे.’
‘पण कुमार, जी माहिती मला मिळाली ती गोवर्धनदासांनाही मिळणारच! इथे ती जागा घेऊन, माणसं आणून सगळा बेत रचण्यात त्यांचे एकदोन दिवस गेले आणि काल संध्याकाळी त्यांनी इथे माणसं पाठवलीपुढचं सर्व तुमच्या देखतच झालं आहे’ अजय गप्प बसला.
जेवण झाल्यावर कुमार त्याच्या खोलीत गेला. अजय आपली झोपण्याची सोय पाहू लागलातोच कुमारने त्याला हाक मारली.
तो खोलीत येताच कुमार म्हणाला, ‘सोपान, दार लोटून घे आणि जरा समोर बस.’
अजय त्याच्यासमोर एका घडवंचीवर बसला.
‘सोपान, मला माहीत आहे तू काही विचारणार नाहीस; पण मी तुला सगळं काही सांगणार आहे; पण त्याआधीआतापर्यंत तू जे काही केलंस त्याबद्दल आभार मानायचे आहेत.’
‘कुमार, त्या त्यावेळी दुसरा मार्गच नव्हतापहिल्या खेपेस तुमची अवस्था कशी होती सांगायला नकोदुसऱ्या खेपेस तुम्ही हजरच नव्हतात आणि आज संध्याकाळी दुसरा मार्गच नव्हता.’
जरा पुढे वाकून बसत कुमार म्हणाला,
‘सोपान, आता एक सांगनोकरगडी मालकांच्या रक्षणासाठी काहीही करीलखरा स्वामीनिष्ठ असेल तर प्राणांचीही पर्वा करणार नाही ते समजू शकतं; पण तुझी गोष्ट तशी नाही आहेवेगळी आहे- एकदा नाही, दोनदा, नाही तीनदा तू माझ्याऐवजी गेलासतीनही वेळा प्राणांना धोका होता, ती गोष्ट तुला माहीत होतीतरीही तू गेलासमाझी भूमिका तर वठवलीसचविलक्षण अकल्पनीय क्लृप्त्या आणि युक्त्या लढवून प्रत्येक वेळी प्रतिपक्षाला नामोहरम केलंसहे कोणत्या कोडमध्ये बसतं? याला काही पूर्वीचे दाखले आहेत का? हे करण्याची तुझ्यावर सक्ती नव्हती, तशी कोणाची अपेक्षाही नव्हतीतरीही तू हे केलंसआता मला सांगशील काकी हे का केलंस.’
‘कुमार, मी सांगितलंच आहेमाझा हा पिंडच लहानपणापासून या रोमांचकारी रहस्य कथांवर पोसला गेला आहेमाझी कल्पनाशक्ती जरा जास्त तीक्र असेलया तारुण्याच्या काठावरच्या अवस्थेत अशीच देदीप्यमान साहसं करण्याची दिवास्वप्न प्रत्येकच युवक पाहत असतोमाझं नशीब एवढंच की, तुमच्या सहवासात आल्यानंतर तुमच्या उदार स्वभावामुळे एरवी केवळ अशक्यच असणाऱ्या विद्या शिकण्याची मला संधी मिळालीतसा तुमच्याबद्दल मला सुरुवातीपासूनच एक ओढा वाटत आला आहेतुमच्या आणि माझ्या चेहऱ्यातलं साम्यही ध्यानात आलं होतंया कलाही हस्तगत झाल्या होत्या आणि दैवयोगाने तुमच्याच वेशात, तुमच्याच रक्षणासाठी, तुम्हीच शिकवलेल्या कला वापरण्याची संधी समोर आलीमी ती घेतली एवढंच सांगतो आणि अगदी मनातली गोष्ट सांगायची, तर ती ही, की, कुमार तीही एक कैफ आहे! तुमच्या वेशात गेलं की सर्वत्र जी एक आदराची वागणूक मिळते, वागण्यात जी एक स्वैर स्वतंत्रता असते त्याची सर कशाला येणार आहे? त्या अधिकाराचीही कैफ आहे! तुमच्या वेषात गेलं की सर्वत्र जी एक आदराची वागणूक मिळते, वागण्यात जी एक स्वैर स्वतंत्रता असते त्याची सर कशाला येणार आहे? त्या अधिकाराचीही एक नशा असते!’
‘पण त्याचा तू कधीही दुरुपयोग केला नाहीस!’ कुमार म्हणाला. ‘मातोश्री, गोवर्धनदास, गायत्री यांच्यासारखे मला अगदी जवळून ओळखणारेही जर फसले, तर इतर लोक सहज फसणारच! तुला काहीही शक्य होतं, सोपानहो ना?’
‘कुमार, तुमची भूमिका तंतोतंत वठवणं हेच माझं साध्य होतं ते कशाचंही साधन नव्हतं.’
‘तू एवढंच सांगणार,’ कुमार एक उसासा सोडून म्हणाला.
‘कदाचित तुझं तुलाही यापेक्षा जास्त माहीत नसेलते असो.’
‘आता आजचं. गाडी शोधण्याच्या आधी मी चौकीवर गेलो. नावाचा आणि हुद्याचा कधी कधी खरोखर फायदा होतो. एखादा सामान्य माणूस चौकीवर या वेळी गेला असता तर त्यांनी त्याला या ना त्या सबबी सांगून वाटेला लावला असता; पण माझ्याशी ते तसं कसे वागणार? जे काय घडलं ते त्यांना सविस्तर सांगितलं. ते आता तिथे जातीलचस्वत:ची खातरजमा करून घेतील; पण जास्त चौकशी वरचे अधिकारीच करतील. कुमार आणि गोवर्धनदास त्रिपाठी अशी दोन मातब्बर नावं यात गुंतली आहेतत्यांचा नेहमीचा हडेलहप्पीपणा इथे चालणार नाहीप्रत्यक्षात सर्व गोष्टी कदाचित उघड्यावर येणारही नाहीततात्पर्य हे, की आपल्याला त्या बाबतीत जास्त काळजी करत बसण्याचं कारण नाही.’
कुमार सांगत होता त्यातला शब्द अन् शब्द खरा होता. अजय झोपायला जाण्यासाठी उठला. कुमार

म्हणाला,
‘सोपान, काही बोलणार नाहीस?’
‘कशाबद्दल?’
‘आम्ही नेमके त्या घरापाशी कसे पोहोचलो याबद्दल.’
अजय हसला.
‘कुमार, तुमच्या गाडीच्या दिव्यांनी घराकडच्या रस्त्याचं वळण घेईपर्यंत माझी खात्री नव्हती की तुम्ही याल’
‘कारण?’
‘मला शेवंताबाईंना काहीही समजावून सांगता आलं नव्हतंअगदी थोडक्या शब्दात सांगितलं होतं.’
‘एवढं नाहीआणखी?’
खालच्या मानेने अजय म्हणाला,
‘हो, ती शंकाही होतीतुम्ही वेळेवर सावध होणार नाहीसावध झालात तरी त्या मोजक्या शब्दांचा अर्थ तुम्हास समजणार नाही आणि समजला तरी रात्रीच्या आडवेळी धावाधाव करून सर्व तयारी करून तुम्ही यालच अशी शंभर टक्के खात्री नव्हतीमला माफ करा; पण माणूस अनुभवानेच मत ठरवत असतो’
‘तुझं त्यात काय चूक आहे? आणि खरे आभार त्याबद्दलच मानायचे आहेतआव्हान स्वीकारणारा, साहसाची संधी शोधणारा, प्रसंगी प्राणाचीही बाजी लावणारा असा एक अल्लड आणि अननुभवी कुमार या व्यसनाच्या आणि ऐशआरामाच्या आणि भोगाच्या पिंजऱ्यात सापडला होतात्याला तू मोकळं केलंसमाझा स्वाभिमान आणि आत्मविश्वास मला परत मिळवून दिलास, त्याबद्दल तुझे आभार मानायचे आहेत, सोपान.’
‘कुमार, सोनं ते सोनंच! त्याचा कस कधी ना कधी तरी लागणारच! आज नाही तर आणखी चार-दोन महिन्यांनी!’
‘हीच तर गंमत आहेमाझा स्वत:चा माझ्यावर नव्हता इतका तुझा माझ्यावर विश्वास होता!’ आणि त्याच्या जोरावर तू अक्षरश: मृत्यूच्या जबड्यात उडी घेतली होतीस!’ कुमार पुढे आला आणि हात पुढे करून म्हणाला, ‘सोपान, तुझ्यासारखा सोबती मिळाला याबद्दल मी मला स्वत:ला भाग्यवान समजतो.’
अजयने हात पुढे करताच कुमारने तो हात दोन्ही हातात घट्ट धरला, खालीवर हलवला आणि मग हात सोडत तो म्हणाला, ‘सोपान, थँक्यू.’
त्याने चटदिशी पाठ फिरवली.
त्याचा आवाजही जरासा घोगरा येत होता.

***

अजय मधल्या खोलीत आला. शेवंताबाई त्याची वाटच पाहत होती. तिच्या वागण्यातला बदल सहज जाणवत होता. हा बदल प्रत्येकाच्याच वागण्यात होणार आहे, अजयची खात्री होती. कुमार, आता शेवंताबाई, मग राणीसाहेब, शेवटी गायत्रीहीसाधा गडीमाणूस म्हणून तो राजवाड्यावर आलेलाएक राणीसाहेब वगळता कोणालाही त्याच्या खऱ्या इतिहासाची माहिती नव्हतीआता या गड्याशीज्याने डोक्यावर उपकारांचा ढीग रचला आहे कसं वागायचं हा त्यांना प्रश्नच पडणार होता. सर्वांत चांगली गोष्ट ही, की शक्य तितक्या लवकर राजवाड्यावरून मुक्काम हलवायचा. मुळात ज्या समस्येसाठी राणीसाहेबांनी त्याला राजवाड्यावर आणला होता, ती समस्याच सुटली होती. आता त्याच्या राहण्याचं प्रयोजनच नव्हतं.
तो काहीतरी बोलेल अशी शेवंताबाईंची अपेक्षा असावी. मालकांच्या जरा मर्जीस उतरलं की गडीमाणसं कशा बढाया मारतात त्याचा त्याला अनुभव होता. तिची अपेक्षा तरी चूक कशी म्हणायची?
‘शेवंताबाई,’ तो म्हणाला, ‘जरा झोपायची व्यवस्था बघता का? रात्री निघण्याऐवजी सकाळी निघणार आहोतसकाळी आवराआवर व्हायची आहे आणि धावपळही खूप झाली आहेतेव्हा जितकं लवकर झोपायला मिळेल तितकं चांगलंपाहता का तेवढं?’

***

23.

सकाळी सातलाच हवालदार एक जीप घेऊन दाराशी हजर झाला. त्याला अजयच भेटला.
‘काल रात्री कुमार गाडीसाठी चौकशी करीत होते?’
‘हो.’
‘त्यांच्यासाठी साहेबांनी जीप पाठवली आहे. राजवाड्यावरून परत आणायची सोय आम्ही करू असा त्यांचा

निरोप आहे.'
'छान छान. मी कुमारना सांगतो.'
'ही सत्तेची जादू! अजयला वाटलं.

***

आठ वाजता त्यांच्या जीपने गाव सोडलं. अजय पुढच्याच सीटवर बसला होता. गाडी रस्त्याला लागली तसा तो म्हणाला,
'कुमार, तुम्हाला एक सांगू का?'
'सांग.'
'जरा राग येणार आहे; पण सांगायलाच हवं.'
'सांग.'
'कुमार, तुमच्या वागण्यात बदल झाला आहे. एका नजरेतच ते समजतं. त्यामागची कारणं मला थोडीबहुत माहीत आहेत.'
'पुढे?'
'पण इतरांना माहिती असण्याची शक्यता नाहीआणि ती कारणं शब्दांनी सांगण्यासारखी नाहीतआणि सांगायचीही नसतात'
'पुढे?
'अनपेक्षित बदल माणसाला बुचकळ्यात टाकतातकधी कधी त्याचा विश्वास बसत नाहीकधी कधी त्याला संशय येतो' अजय जरासा थांबला आणि मग म्हणाला, 'पायरीची कल्पना करून पाय टाकावा आणि तिथे पायरी नसली की शरीराला एक हिसका बसतोकुमार, लोकांच्या तुमच्यासंबंधी काही कल्पना आहेत, काही आडाखे आहेतते लक्षात ठेवून वागा, एवढंच सांगायचं आहे'
कुमार काहीच बोलला नाही. फक्त स्वत:शीच मान हलवत गाडी चालवत राहिला.

***

अकरा वाजता जीप शहरात शिरली आणि दहापंधरा मिनिटांत राजवाड्यावर पोहोचली. अजय म्हणाला, 'कुमार, ही घ्या तुमच्या खोलीची किल्लीवर जाऊन कपडे वगैरे बदलून, जरा ताजेतवाने होऊन यातोपर्यंत मी राणीसाहेबांना तुम्ही आल्याची वर्दी देतो'
दहापंधरा सेकंद कुमार अजयकडे पाहत उभा राहिला आणि मग किल्ली हातात घेत म्हणाला, 'ठीक आहे.'
अजयने एक मोठा उसासा सोडला.
मोठ्या हॉलमधून जिन्याने कुमार वर त्याच्या खोलीकडे गेला. अजय उजवीकडच्या बोळात शिरला. राणीसाहेबांची नेहमीची खोली उघडी होती. त्याने आत डोकावून पाहिलं. नशीब, राणीसाहेब त्यांच्या नेहमीच्या जागी होत्या. समोर खूप कागद दिसत होते; पण त्या नुसत्या बसून होत्या. अजयने दारावर हलकेच टकटक केली. त्यांची नजर वर आली आणि अजयला पाहताच त्या एकदम ताठ बसल्या.
अजय आत आला, त्यांच्या टेबलापाशी उभा राहिला आणि म्हणाला, 'राणीसाहेब, कुमार माझ्याबरोबर परत आले आहेत.'
'कुमार परत आला? कुठे आहे?'
'पाच-सात मिनिटांत येतीलचते सारं काही सांगतीलच; पण माझी एक सूचना अवश्य ध्यानात ठेवाकाहीही झालं तरीअगदी काहीही झालं तरी हे कोणालाही कळू देऊ नका, की काही एका खास कामासाठी तुम्ही मला म्हणजे अजय कर्नाटकीलाराजवाड्यावर आणलं आहेतसोपान तुम्हाला कारखान्याच्या भेटीत दिसलाआणि त्याचा चुणचुणीतपणा आणि हजरजबाबीपणा पाहून तुम्ही त्याला इकडे काम करण्याची संधी दिलीत हेच एकमेव सत्य'
बाहेर बुटांचे आवाज आले. अजय दोन पावलं मागे सरला. कुमार खोलीत आला.
'आलेच बघा!' अजय म्हणाला. कुमार आत आला तसा त्याला वळसा घालून अजय बाहेर जायला लागला. त्याच्या खांद्यावर हात ठेवत कुमार म्हणाला, 'सोपान, तू इथेच थांब.'
'कुमार, मी बाहेरच आहेहाक मारलीत की लगेच येईनराणीसाहेबांशी तुमचं बोलणं होऊ द्यातुम्ही बोलत असताना मी हजर राहणं प्रशस्त होणार नाही.'
'त्याला अवघड वाटत असेल तर जाऊ दे ना, कुमार.' राणीसाहेब म्हणाल्या.
'ठीक आहे,' कुमार म्हणाला.

अजय घाईघाईने खोलीबाहेर गेला.

***

राणीसाहेब परत खुर्चीत टेकून आरामात बसल्या होत्या, कुमार मात्र बसला नव्हता. एक प्रकारच्या अस्वस्थपणे तो खोलीत येरझारा घालत होता. शेवटी स्वत:शी काहीतरी निर्णय करून तो त्या टेबलासमोर उभा राहिला आणि म्हणाला,

'मातोश्री'

आणि मग स्वत:शीच मान हलवत

'नाहीमातोश्री नाहीआई, मी परत आलो आहे.'

याची राणीसाहेबांना खासच अपेक्षा नव्हती.

'काय?' त्या एकदम पुढे वाकत म्हणाल्या.

'जे म्हणालो तेचआई, मी परत आलो आहे.

राणीसाहेबांचा चेहरा एकदम गोरामोरा झाला. त्या अगदी अस्पष्ट आवाजात म्हणाल्या, 'कुमार, गेल्या पंधरा वर्षांत तू मला 'आई'म्हणून हाक मारलेली नाहीसहा बदल कसा झाला मी विचारत नाहीकुमार, सर्वांसमोर मी 'राणीसाहेब'या कठोर, निरपेक्ष, स्वाभिमानी राज्यकर्तीच्या भूमिकेत वावरते आहे; पण अरे, आत मातेचंच हृदय आहेयाच एका प्रेमाच्या शब्दासाठी कासावीस झालेलं काळीज आहेआई! दोन अक्षरी शब्द! पण त्यात केवढी शक्ती आहे! मी देवाचे शतश: आभार मानते.'

त्यांनी डोळे मिटून घेतले.

'आई, ज्याचे आभार मानायचे तो असा स्वर्गात नाही. तो इथेच आहे. इथेच आहे. आता होता. आपला सोपान.'

त्यांनी डोळे खाडकन् उघडले.

'सोपान?'

'हो, सोपान, वरून साधा दिसणारा; पण अंतरी नाना कला वागवणारा सोपान! तो स्वत: आव्हान स्वीकारतो आणि दुसऱ्यालाही आव्हान स्वीकारायला लावतो! तुमच्यावर तो इतका आंधळा विश्वास टाकतो की पाय मागे घेण्याची शरमच वाटावी!'

कुमार स्वत:शीच मान हलवत होता.

'हा सोपान म्हणजे एक ठिणगी आहेठिणगी आहे. स्पर्श होताच पेटून उठावं अशी ठिणगी.'

शेवटी राणीसाहेब म्हणाल्या,

'कुठे गेला होतास, काय झालं, सोपानबरोबर परत कसा आलास ते तरी सांगशील?'

हुश्श! करून कुमार समोरच्या खुर्चीत बसला.

'त्या दिवशी त्या सत्कार समारंभाबद्दल ऐकलं आणि इथे राहणं अशक्यच झालं. चोरून मागच्या दरवाजाने बाहेर पडलोसाध्या एस.टी.ने किरसीला गेलोमावशीकडे.'

'शेवंताबाई?'

'हो. पुढचे काही दिवस म्हणातास म्हणास्मरणातच नाहीत.

तुला माहीत असेल वा नसेलमावशींच्या घरी मी दारू आणून ठेवलेली असतेआई, त्यांची कोणतीही फूस नाही; पण मला लागते त्याला काय करू? त्या नशेत असलो पाहिजे आणि काल अकराबारा वाजता हा सोपान तिथे अचानक दाखल झाला!

'पुढचं आठवतं ते एकदम मावशी मला जागं करीत होत्यातोंडावर ओलं फडकं ठेवून! जे करायची आजवर त्यांची कधीही हिंमत झाली नव्हती ते. मी संतापलो; पण त्या पाऊलभरही मागे सरल्या नाहीत आणि मग त्यांनी मला सोपानचा निरोप सांगितला'

कुमार स्वत:शीच मान हलवत काही वेळ गप्प बसून राहिला.

'पुढच्या काही क्षणात काय झालं ते मी खरंच सांगू शकत नाही. डोळ्याभोवती घट्ट आवळलेली पट्टी तुटून जावीकिंवा हातापायांना जखडून ठेवणाऱ्या साखळ्या तटातट तुटून जाव्यात किंवा सर्व शरीराला आवळून ठेवणारा एखादा काळा कोष गळून पडावाखरंतर शब्दांत सांगताच येत नाहीएका अंधाऱ्या जागेवर प्रकाशाचा झोत पडावा आणि अनेक हरवलेल्या गोष्टी त्या उजेडात समोर याव्यात तसं झालं

'मी धुंद होऊन पडलो होतोआणि तीन माणसं जीपमधून मावशींच्या दाराशी आली. एक जेधे होताइथे पूर्वी कामाला होता वाटतं

‘जेधे! म्हणजे गोवधनदासचा माणूस!’ राणीसाहेब म्हणाल्या.
‘सोपान व्हरांड्यात होताअर्थात त्या जेधेला वाटलं असणार मीच त्याला माझ्याबरोबर आणला आहे ‘राणीसाहेबांनी कुमारना बोलावलं आहेत्यांना नेण्यासाठी जीप पाठवली आहे’ तो जेधे म्हणत होता. सोपानला समजलं सर्व काही थापा आहेत. मला जागं करण्याच्या निमित्ताने तो आत आलात्या लोकांना बाहेरच थांबवलंमाझे कपडे घातले, मावशीकडून काडेपेटी आणि पसाभर तांदूळ घेतलेमावशींना बजावून गेला की, त्यांची जीप नजरेआड होताच मावशींनी मला उठवायचंवाटलं तर तोंडावर पाणी मारून! आणि हा निरोप सांगायचाआई, तो निरोप जन्मभर माझ्या स्मरणात राहणार आहेमावशी म्हणाल्या, कुमार, सोपानराव तुमचे कपडे घालून काही लोकांबरोबर गेले आहेत. त्यांनी बरोबर पसाभर तांदूळ नेले आहेत आणि तुम्ही शोधत होता ती संधी आली आहेहा निरोप!
‘झोप आणि धुंदी खाडकन् उतरली. मला पळवून न्यायला काही लोक आले होते. माझ्या जागी सोपान गेला होता. पूर्वी एकदा गायत्री त्यांच्या कचाट्यात सापडली होतीतेव्हा मी तिच्या सुटकेसाठी जायला हवं होतं; पण मी नशेत पडलो होतो! पुन्हा एकदा तशीच वेळ आली होती! हा सोपान किती सहजपणे त्यांच्याबरोबर गेला होता! माझ्यावर भिस्त ठेवून! हाच तो क्षण, आई! जेव्हा डोळ्यांवरची झापडं उतरली!
‘त्याने तांदूळ अर्थात त्याचा माग काढायला आम्हाला मदत म्हणून नेले होते! फक्त गाडी, दोन माणसं हवी होतीगावातला दत्ता पाटील आठवला! गावगुंड. एकदोनदा आमची वादावादी झाली होती तसा जरासा डूख धरूनच होता माझ्यावर; पण त्याला बोलावून घेतलाआधी गुर्मीत होतापण पाचसात मिनिटात तो तयार झालागाडी, बंदूक, तीन माणसं घेऊन आलाआणि आम्ही निघालो आणि सोपानच्या डोक्याचं नवल वाटतं! ज्या वळणावर जीप वळली तिथे त्याने तांदूळ टाकले होते! आणि मग सरळ रस्त्यावरही मधून मधून टाकले होते
‘जरा वेळ लागला; पण त्याला नेलं होतं ती जागा अखेर सापडलीच. जरा चढावर. एकाकी इमारत होती. दोन मजली होती. एकाला आधी चक्कर मारून यायला सांगितलं. आठदहा माणसं होती; पण सोपान खाली नव्हतावरच्या खोलीत असला पाहिजे
‘पण त्याला आम्ही आल्याचं समजलं असलं पाहिजे. वरच्या खोलीच्या खिडकीतून आधी काडीची ज्योत दिसली. त्याने डावी उजवीकडे हलवताच मी टॉर्चही तसाच हलवला, मग त्याने काडीसमोरून हात नऊ वेळा हलवला. मी ही टॉर्च नऊवेळा टाकला. काडी विझली.
‘घड्याळात पाहिले पावणे नऊ वाजले होते. त्याच्या इशाऱ्याचा अर्थ होतानऊ वाजता आणि इथे काहीतरी करून त्यांचं लक्ष वेधून घ्यायचं. आम्ही झाडांच्या बऱ्याच वाळक्या फांद्या जमवल्या. नऊला दोन मिनिटं कमी असताना त्यांच्यावर थोडं पेट्रोल ओतलं आणि बरोबर नऊ वाजता त्याला काडी लावलीअर्ध्या मिनिटातच मोठा भडका उडाला आणि होळी धडधडायला लागली.’
‘त्यांची प्रतिक्रिया मिनिटाभरातच आली. खालचं दार धाडकन् उघडलं आणि दोघंजण धावत धावत होळीकडे यायला लागलेत्यांच्या हातात शस्त्रं असण्याची शक्यता होतीमी बंदूक हातात घेतली; पण तेवढ्यात वरच्या खिडकीतून पेटत्या बोळ्यासारखं काहीतरी हवेतून भिरभिरत आलं आणि त्यांच्यामागे पडून स्फोट झाला, भडका उडाला त्यांच्यापैकी एकाच्या हातात काहीतरी चकचकताना दिसलंमी धोका पत्करला नाहीत्याच्यावर गोळी झाडलीतो खाली कोसळलादुसरा काहीतरी ओरडत मागे घराकडे पळाला.
‘आता थांबण्यात अर्थ नव्हताआम्ही सर्व त्याच्या मागोमाग पळत निघालोखोलीत प्रकाश होता आणि दिसत होतं की दारापाशी दोघं-तिघं आहेत आणि एकाच्या हातात पिस्तूल आहेआतून आवाज आलासोपानचा आवाज‘गोवर्धनदास, मी इकडे आहे’ तो माणूस बहुधा गोवर्धनदासचवळलापिस्तुलांचे दोन आवाज आलेआम्ही खोलीत पोहोचलोसोपान जिन्याच्या तोंडाशी उभा होताआणि गोवर्धनदास खाली पडले होते’
‘तिथे जास्त बोलायला वेळच नव्हता. सोपानने एक शहाणपणा केला होतामाझा मॅनिला उलटा करून घातला होतात्याने कोणाला शंकाही आली नाही की तो कुमार म्हणून आला होतादत्तूला अशी काही शंका आली असती तर विनाकारण घोटाळा झाला असता
‘आम्ही तिथनं गावात परत आलो. मी चौकीवर गेलोतिथे आवश्यक ती सर्व माहिती दिलीआज बहुधा त्यांच्यापैकी कोणीतरी तुझी गाठ घ्यायला येईलचम्हणजे गोवर्धनदास आणि कुमारदोन्ही नावं अशा प्रकरणात आली की ते जरा काळजीनेच हाताळणार सारं काही तेव्हा असा प्रकार आहे!’
हुश्श! करून कुमार बोलायचा थांबला.
‘किती विलक्षण हकीकत आहे!’ राणीसाहेब म्हणाल्या, ‘पण हा सोपान प्रत्येकवेळीच अशा विलक्षण प्रसंगात

गुंतलेला असतोकाहीजणं साहस शोधत हिंडतात आणि काहींच्या मागे साहसंच हात धुऊन लागलेली असतातअशांपैकी हा सोपान!'
'त्याला बोलावून घेता?' कुमार म्हणाला.
'हो.' त्यांनी टेबलावरची घंटी वाजवली. खोलीत आलेल्या गड्याला सांगितलं, 'अरे, आपला सोपान खाली असेलजा त्याला सांग, राणीसाहेबांनी त्याला आताच्या आता बोलावलं आहे.'
'जी.' म्हणून तो गडी गेला.
त्यांची अपेक्षा होती त्यापेक्षा त्याला परत यायला जरा जास्त वेळ लागला. मग दाराच्या आत उभा राहून तो म्हणाला. 'राणीसाहेब, सोपान खाली त्याच्या खोलीत नाही.' आणि मग त्याने एक पाकीट पुढे केलं.
'सोपानने शिवबाला सांगून ठेवलं होतंकोणी त्याला बोलवायला आलं तर त्याला हे पाकीट द्यायचं.'
पुढे येऊन गड्याने पाकीट टेबलावर ठेवलं आणि तो खोलीतून निघून गेला.
कुमारने पाकीट उचलून पाहिलं. वर लिहिलं होतं,
माननीय राणीसाहेब यांच्यासाठी.
त्याने पाकीट राणीसाहेबांकडे सारलं.
'तुझ्या नावाने लिहिलं आहे.'
राणीसाहेबांनी पाकीट उघडलं. आत एकच कागद होता.
त्यांनी तो वाचला आणि कुमारच्या हातात दिला.
सोपानचं पत्र असं होतं
माननीय राणीसाहेब यांस
सोपानचे कृतज्ञतापूर्वक सहस्त्र प्रणाम.
काल किरसी येथे काय प्रकार घडला याची कुमारांनी आपल्याला कल्पना दिलीच असेल. माझी मर्यादा शेवटची एकदा ओलांडून मी म्हणतो, कुमारांनी ते आव्हान स्वीकारलं. त्यांना खूप काही प्राप्त झालं आहे हे त्यांचं त्यांनाच उमगेल. आपलीही त्यांच्याशी गाठ पडली आहे आणि माझी खात्री आहे, ही भेट नवीन नाती आणि बदललेले दिवस यांची नांदी आहे.
या परिस्थितीत आपण, गायत्रीदेवी आणि कुमार यांच्यासमोर वावरणं मला अशक्य होणार आहे.
त्यामुळे आपली भेट न घेताच मी राजवाडा सोडून जात आहे. मला क्षमा कराल अशी आशा आहे.
आपला नम्र सेवक,
सोपान.
'कमाल आहे!' पत्र खाली ठेवत कुमार म्हणाला.
'निदान एकदा तरी त्याने मला भेटायला हवं होतं.' राणीसाहेब म्हणाल्या. त्यांच्या डोळ्यांसमोर त्याच्या डाव्या खांद्यावरची तुळशीच्या पानासारखी जन्मखूण सारखी येत होती. गायत्री, कुमार आणि शेवटी त्या स्वत: या तिघांकरताही त्याने काय काय संकटांशी सामना करून त्यांच्यावर मात केली होती!
त्यांच्या घराण्यातल्या सर्वच व्यक्तींविरुद्ध त्या नीच गोवर्धनदासने केवढा कट रचला होता याची त्यांना कल्पनाही नव्हती. तो कट जर यशस्वी झाला असता! (आणि तो हाणून पाडायला कोण होतं?) तर काय अनर्थ ओढवला असता!
आणि कुमारच्या वागण्यात झालेला आश्चर्यकारक बदल?
ती तर एखादी किमयाच वाटत होती.
त्या अजयचं केवढं तरी ऋण होतं त्यांच्यावर!
पण ते व्यक्त करण्याची संधीसुद्धा त्याने त्यांना दिली नव्हती!
निदान एकदा तरी त्याने त्यांची भेट घ्यायला हवी होती! निदान एकदा तरी! त्याच्या जन्माचं गुपित त्यांच्या ओठातून कधीही बाहेर येणार नव्हतं; पण त्याचे मनापासून आभार तरी मानता आले असते!

***

राणीसाहेब आणि कुमार यांना खोलीत सोडून बाहेर येता येताच अजयने राजवाडा सोडायचा निर्णय घेतला होता. ज्या कामासाठी त्याची निवड करण्यात आली होती ते पूर्ण झालं होतंयशस्वीरीत्या. आता त्याची तिथे क्षणभरासाठीसुद्धा गरज नव्हती. ते तिघे त्यांच्या आयुष्यात जो कालखंड विसरू पाहत होते, त्याचा अजय हा साक्षीदार होता आणि त्याचं अस्तित्व त्यांना त्या कालखंडाची क्षणोक्षणी आठवण देणार होतं. ते त्याचे आभार मानतीलआभार मनापासूनही असतील; पण त्यासाठी थांबण्याची आवश्यकता नव्हती.

आपल्या खोलीत आल्या आल्या त्याने आपल्या थोड्याशाच सामानाची आवराआवर केली; पण राणीसाहेबांसाठी काहीतरी निरोप मागे ठेवल्याशिवाय जाणं अगदीच अयोग्य दिसलं असतं. शेवटी त्याने एका कागदावर एक छोटंसं पत्र लिहून ठेवलं, कागद पाकिटात घातला, पाकिटाचं तोंड बंद केलं, वर 'माननीय राणीसाहेब यांच्यासाठी.' एवढं लिहून पत्र खाटेवर ठेवलं.
दारापाशी उभा राहून वाट मोकळी आहे याची खात्री करून घेऊन तो बाहेर अंगणात आला आणि मागच्या दाराने बाहेर पडला.

***

बाहेर वाटेला लागल्यावर आणखी एक मुद्दा त्याच्या ध्यानात आला आणि आपण राजवाडा सोडण्यात किती शहाणपणा केला आहे याची त्याला कल्पना आली. आदल्या रात्रीच्या तीनचार मृत्यूंचा पोलीस तपास होणारच. आणि अगदी जुजबी चौकशी म्हटली तरी त्याला हजर राहावंच लागलं असतंकारण त्याचा मुख्य भाग होता. त्याचं नावगाव, पत्ता विचारल्यावर तो काय सांगणार? खोटं पचलं नसतं आणि खरं सांगायला गेला असता तर राणीसाहेब अडचणीत आल्या असत्या. काही काही वेळा आपोआपच आणि नकळतच योग्य निर्णय घेतले जातात हीच गोष्ट खरी.
बँकेच्या सेफ लॉकरमधून त्याने काही पैसे काढले, एका लॉजमध्ये खोली घेतली. एक गोष्ट त्याच्या मनाला सतत सतावत होती. शहर सोडायचा विचार मनात होता; पण राणीसाहेबांची एक गाठ घेतल्याखेरीज त्याला चैन पडत नव्हती.
एकाएकी त्याला तो विचार सुचलागोविंदराव अडकर!
त्यांच्या राजवाड्यात जाण्याने कोणाचाच संशय जागा झाला नसता.
मनात विचार येताक्षणीच त्याने करड्या रंगाचा कोट, तसलीच पँट, झीरो नंबरचा जाड फ्रेमचा चष्मा, जुनी रेक्झीन बॅग असं सर्व सामान खरेदी केलं. संध्याकाळी सहाच्या सुमारास तो राजवाड्यावर हजर झाला. त्याचं व्यक्तिमत्त्वच इतकं फिकं होतं, की कोणालाही त्यांची चटकन् ओळख पटत नव्हतीमात्र कोणालाही त्यांचा संशय येत नव्हता.
मागच्या दरवाजाने आत येऊन ते सरळ वाचनालयाच्या खोलीत आले. आत जगदाळे सफाई करीत होता. दोन दिवसांत खोलीला आलेली शान एव्हाना जायला लागली होती.
घसा जरा साफ करत तो नरम आवाजात म्हणाला,
'ओळखलं का जगदाळे?'
दहापंधरा सेकंदातच त्याला ओळख पटली.
'अरे! तुम्ही अडकर मास्तर!'
'हो.'
'असे कसे गायब झालात हो एकदम! आता काय पुन्हा कामावर आलात की काय? तसं असलं तर पंचाईत आहे'
'का रे?' काय झालं जगदाळे?'
'नवीन माणूस केव्हाच कामावर आला आहे.'
'माझं एक काम करशील का?'
'काय?'
'राणीसाहेबांचं पुस्तक वगैरे द्यायचं आहे का?'
'आताशी नेत नाहीत काही त्या.'
'मग त्या मोकळ्या आहेत का पाहून येतोस का? असल्या तर अडकर मास्तर आले आहेत एवढं सांगशील का?'
'राणीसाहेबांशी तुमचं काय काम असणार?'
'अरे, त्यांनीच माझी नेमणूक नाही का केली? मग असा एकाएकी गेलो तर दोन शब्दांचं तरी स्पष्टीकरण द्यायला नको का?'
'जरा थांबानवे मास्तर आले की मी जातो'
'नको. आताच जा. मी नव्या मास्तरांना सांगेन. नहीतर त्या एखाद्या कार्यक्रमासाठी निघूनही जायच्या.'
'ठीक आहे.'
जगदाळे पाच मिनिटांतच परत आला.

‘तुमचं नशीब जोरावर आहे मास्तर! निरोप सांगताच राणीसाहेब म्हणाल्याजा त्यांना लवकर पाठवून दे. मला वेळ नाही. जा.’
थँक्यू, आभार इत्यादी उपचार जगदाळेला परिचित नव्हते.
अजय सरळ पुढे आला आणि जिन्याने वर आला.

* * *

राणीसाहेब त्यांच्या नेहमीच्या खोलीतच होत्या. आत इतर कोणी नव्हतं, तरी देखाव्यासाठी अजयने दारातूनच त्यांना नमस्कार केला. मग तो आत गेला. राणीसाहेब टेबलामागे होत्याअजय त्यांच्यासमोर उभा राहिला. त्या त्याच्याकडे रागाने पाहत होत्या; पण मग त्यांच्या चेहऱ्यावरची रागाची जागा हास्याने घेतली.
‘बस नाउभा का?’ त्या म्हणाल्या.
‘राणीसाहेब, मी माझं स्थान कधीही विसरता कामा नये.’
‘इतकं झाल्यावरही?’
‘इतकं झाल्यावरच, खास. कारण काही काही कारणाने मला आपणा सर्वांसंबंधात खूपच माहिती मिळालीकाही वेळा मी तुम्हा सर्वांच्या खूपच निकटच्या सहवासात आलो; पण ती वेळेची गरज होतीत्यातून मी भलता अर्थ काढला, भलतंच गृहीत धरून वागायला लागलो तर तो एक फार मोठा अपराध होईल.’
‘असो. आता बस.’
अजय समोरच्या खुर्चीवर बसला.
‘अजय, मला माहीत आहे ही आपली शेवटचीच भेट आहे. मला तुझे आभार मानायचे आहेत. तू भेटला नसतास तर ती रुखरुख कायमची मनात राहून गेली असती. मी, गायत्री आणि कुमार, आम्ही सर्वजण तुझे फार फार आभारी आहोत.’
‘तुमच्यासाठी काहीतरी करता आलं हे मी माझं मोठं भाग्य समजतो, राणीसाहेब.’
‘तुझी गाठ पडली नाही त्याने कुमारला फार वाईट वाटलं. त्यानेही तुला थँक्स दिले असते.’
‘राणीसाहेब, कुमारांच्या मनात माझ्याबद्दल एक आपुलकीची भावना राहिली तर त्यानेच मला खरा आनंद होईल.’
‘अजय, मला एकच प्रश्न विचारायचा आहेउत्तर देता आलं तर पाहातू कुमारसाठी एवढे मोठे धोके का पत्करलेस? प्रत्यक्ष प्राणावरही बेतण्याची वेळ आली असताना तू त्याची जागा का घेतलीस?’
‘मनात एक ऊर्मी होती एवढंच मी सांगू शकतो, राणीसाहेब. मला त्यापेक्षा खरोखरच काही जास्त सांगता येत नाही.’
‘आपण ते तेवढ्यावरच सोडू.’ राणीसाहेब म्हणाल्या. ‘अजय, तुला काहीतरी द्यायची माझी इच्छा आहे’ राणीसाहेबांनी पर्समधून चेकबुक काढलं, वर तारीख घातली, खाली सही केली आणि तो कोरा चेक अजयपुढे केला. अजयने टेबलवरचं पेन उचललं, रकमेच्या जागी शून्य रुपये पैसे असा मजकूर लिहिला. आकड्यांच्या जागी शून्य लिहिली आणि मग हसत चेकची घडी करून ती खिशात ठेवून दिली.
‘राणीसाहेब, पैशाने विकत मिळत नाहीत किंवा ज्या बाजारात उपलब्धच नसतात अशा कितीतरी गोष्टी मला गेल्या महिन्याभरात मिळाल्या आहेत. मोठ्या मोठ्या क्लबमध्ये, स्पोर्ट सेंटरमध्ये, सर्वत्र अजय कर्नाटकी या नावाला एक खास मान प्राप्त झाला आहे, हे एक. तुमच्यासारख्या एका अभिजात खानदानी राजघराण्यात बरोबरीने वावरायची अमूल्य संधी मला मिळाली हे दोन. पण हे काहीच नाहीलहानपणापासून ज्याची मी केवळ स्वप्नच पाहत होतो, जे केवळ नाटक-सिनेमातच घडलेलं दिसतं अशा विलक्षण अद्भुत, रोमांचकारी, थरारक अनुभवातून जाण्याची सुवर्णसंधी मला मिळालीजेथे तुमची बुद्धी आणि हिकमत यांची बाजी प्रत्यक्ष मृत्यूशीच लागलेली असते असे क्षण अनुभवण्याची संधी मला तुमच्यामुळेच मिळालीगेले काही आठवडे आयुष्य अशा काही बेभान लयीने चालले होतं, की श्वासच छातीत रुकावा यापेक्षा देवाशी आणखी काय मागायचं?’
राणीसाहेब खाली पाहत होत्या. त्यांची नजर वर आली तेव्हा त्यांचे डोळे किंचित पाणावले होते.
‘अजय, कुमारच्या वेशात असताना तू एकदा माझ्यासमोर वाकला होतामातोश्री, मला आशीर्वाद द्या, म्हणाला होतासवेशांतरात का होईना, तू मला मातेसमान मानलं होतंसआता त्या मातेची तुला एक आज्ञा आहेती तुला मानलीच पाहिजे.’
‘राणीसाहेब’
‘ऐक, महिन्या दोन महिन्यांत केव्हातरी तू माझ्याशी संपर्क साधलाच पाहिजेसफोनने वा पत्राने वा भेटूनही

माझी आज्ञा आहे.'
अजय उठून उभा राहिला. दोन्ही हात जोडून राणीसाहेबांना नमस्कार करीत तो म्हणाला, 'आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे, राणीसाहेब.' आणि मग अगदी हलक्या आवाजात, 'मातोश्री.'
'मला आज्ञा द्यावी, राणीसाहेब.' तो म्हणाला.
टेबलाला वळसा घालून राणीसाहेब पुढे आल्या आणि त्याच्या मस्तकावर हात ठेवत म्हणाल्या, 'यशस्वी हो, अजय.' (आणि मग अगदी स्वत:शीच पुटपुटत, 'बाळा.')

***